अहवाल क्रमांक : १५४

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

### महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या नागपूर जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत

# दहावा अहवाल

सत्यमेव जयते

**(सदर अहवाल दिनांक     मार्च, २०१८ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, मुंबई

२०१८

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या नागपूर जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत**

# दहावा अहवाल

**पंचायती राज समिती**

**(सन २०१७-२०१८)**

**समिती प्रमुख**

१. श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
३. श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
४. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
५. ॲड. राहुल कुल, वि.स.स.
६. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
७. डॉ. देवराव होळी, वि.स.स.
८. डॉ. सुरेश खाडे, वि.स.स.
९. डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
१०. श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. किशोर पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.
१४. श्री. तुकाराम काते, वि.स.स.
१५. श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
१६. श्री. भारत भालके, वि.स.स.
१७. प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
१८. श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
१९. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
२२. प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
२३. श्री. विक्रम काळे, वि.प.स.
२४. श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
२५. श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

२६. श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
२७. श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
२८. श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
(५) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

## पंचायती राज समिती

## (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख**

१. *श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
५. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
९. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
१०. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.
१४. ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.
१५. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१६. श्री. अमित झनक, वि.स.स.
१७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१८. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
१९. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२०. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२१. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
२४. ** रिक्त
२५. ** रिक्त.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी.

***** सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर २०१६ रोजीपासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची " कार्यकारी समिती प्रमुख " म्हणून नामनियुक्ती केली आहे.

****** सन्माननीय समिती प्रमुख श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

## पंचायती राज समिती

## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
६. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
९. श्री. राजेंद्र नजरधाने, वि.स.स.
१०. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१४. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.
१५. ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.
१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१७. श्री. अमित झनक, वि.स.स.
१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)
(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी.

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा ‘समिती प्रमुख’ या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरून पंचायती राज समितीचा दहावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ करीता समिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायतीराज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा. सभापती, विधानपरिषद व मा. अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहांच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायतीराज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Lesgislature) या समितीला “Mini Legislature” सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्त्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो. शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि, शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्ल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्त्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंतसुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा. सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरीतीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारून संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुद्धा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत. चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्यांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारून घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २००८-२००९ व २०११-२०१२ या वर्षाच्या लेखा परीक्षा पुर्नविलोकन व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१५-२०१६ साठी गठीत झालेल्या समितीने नागपूर जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने नागपूर जिल्हा परिषदेस दिनांक २९, ३० सप्टेंबर व १ ऑक्टोबर, २०१५ रोजी भेट देऊन श्री. शिवाजी जोंधळे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ करिता गठीत झालेल्या समितीने नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १० व ११ ऑक्टोबर, २०१७ रोजी जिल्हा परिषद, नागपूर संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, डॉ. प्रदीप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. विजय कुमार, प्रधान सचिव, कृषी व पणन विभाग, श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग, श्रीमती विनिता वेद सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. चंद्रशेखर जोशी, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, ग्रामविकास विभाग, श्री. दिनेश वाघमारे, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. विकास देशमुख, सचिव, पशुसंवर्धन विभाग, डॉ. सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. र. प्र. आटे, सहसचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. र. अ. नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. ना. भा. रिंगणे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. गिरीश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. सुग्रिव धपाटे, उप सचिव, कृषी विभाग, श्री. कमलाकर फंड, आयुक्त, आय.सी.डी.एस., मुंबई, श्री. अशोक करंजकर, एस.आर.डी.सी, श्री. संतोष कुमार, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तसेच श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या नागपूर जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक २२ मार्च २०१८ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २२ मार्च २०१८.

**सुधीर पारवे**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण क्रमांक | विषय | | परिच्छेद क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | | (४) | (५) |
| (१) | एक | सुसुंद्री खैरी रस्त्याचे कामात निरर्थक खर्चाबाबत(सन २००८-०९) | . . | ३.२४४ | १ |
| (२) | दोन | शासन निर्देशाविरुद्ध परिपोषणाचे जादा प्रदानामुळे शासनाचे झालेले नुकसानाबाबत (सन २००८-०९). | . . | ३.८४३ | ६ |
| (३) | तीन | मागासवर्गीय महिलांच्या विकासासाठी १०० टक्के अनुदानावर शिलाई मशीनचा पुरवठा करण्याबाबत (सन २००८-०९). | . . | ३.८४७ | १० |
| (४) | चार | सन २००३-२००४ व २००५-२००६ मध्ये राबविण्यात आलेल्या योजनेवरील थकित प्रदानाबाबत (सन २००८-०९). | | ३.९२२ | १४ |
| (५) | पाच | लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करणेबाबत (सन २००८-०९) व (सन २०११-१२). | | | २१ |
| (६) | सहा | थकित आगाऊ रकमांबाबत (थकित अग्रीम) (सन २००८-०९) | . . | ३.१०३९ | ५६ |
| (७) | सात | जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या बैठक व्यवस्थेकरिता डेक्स बेंच (स्टील) खरेदीबाबत (सन २०११-१२). | . . | ३.१३१/४ | ६४ |
| (८) | आठ | शालेय पोषण आहार योजना सन २०११-१२ वर्ग १ ते ८ च्या विद्यार्थ्यांना शिजविलेले अन्न पुरविण्याबाबत (सन २०११-१२). | . . | ३.१३२ | ७१ |
| (९) | नऊ | जिल्हा परिषद प्रशासकीय इमारत बांधकामाबाबत (सन २०११-१२) | . . | ३.२५६ | ८० |
| (१०) | दहा | श्री. महालक्ष्मी जगदंबा संस्थान कोराडी येथे चारचाकी वाहनतळ बांधकामबाबत (सन २०११-१२). | . . | ३.२५७ | ८५ |
| (११) | अकरा | मौजे सुरेरा, बनेरा व घाटकुकडा ता.पारशिवनी येथील पुरक नळ पाणीपुरवठा योजनाबाबत (सन २०११-१२). | | ३.४२० | ९२ |
| (१२) | बारा | मागासवर्गीय विद्यार्थ्यांना १०० टक्के अनुदानावर जेन्टस सायकलींचा पुरवठा करण्याबाबत (सन २०११-१२). | | ३.६५४ | १०३ |
| (१३) | तेरा | पाटणसावंगी येथील अंतर्गत रस्ते बांधकामाबाबत (सन २०११-१२) | . . | ४.१५९ | १०९ |


## परिशिष्ट

शासनाने आदेश व परिपत्रके आणि समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त.

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, नागपूर

## सुसुंद्री खैरी रस्त्याचे कामात निरर्थक खर्चाबाबत

**परिच्छेद ३.२४४ (सन २००८-०९)**

सदर कामाचे अंदाजपत्रकास १९ बाबी नमूद करून त्यांस कार्यकारी अभियंता यांनी तांत्रिक मान्यता दिली. कंत्राटदारानी काम करीत असतांना १९ पैकी ११ बाबी कार्यान्वित केल्या. ८ बाबी कार्यान्वित केल्या नाहीत. बाब क्र. ९ प्रोव्हायडींग जाडी ७५ मी.मी. जाडी बीबीएम ३०१८ चौ.मी. काम केल्याचे नोंदवून रु.३,६१,७६८ चे मूल्यांकन करणे तांत्रिक दृष्ट्या योग्य नाही. सदर खर्च निरर्थक वाटतो. जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

कामाचे अंदाजपत्रकीय मूल्य रु. ९,९०,३९१ असताना फक्त क्त रु.५,४६,३५० मूल्याचे काम करणे व ते अंतिम करणे गंभीर बाब असून जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १५२ (३) प्रमाणे रिड्युस ईस्टीमेट सुद्धा करण्यात आले नाही. त्यामुळे काम कमी झाले याची पडताळणी करता आली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सुसुंद्री खैरी रस्त्याचे मूळ कामाचे अंदाजपत्रक रु. ९,९०,३९१ चे होते. सदर कामास सुरूवात केल्यानंतर कंत्राटदारानी अंदाजपत्रकीय १९ बाबी पैकी ८ बाबी, बी.बी.एम. स्तरापर्यंत कार्यान्वित केल्या व कंत्राटदारानी केलेल्या कामाचे प्रथम धावते देयक सन २००६-०७ ला सादर करण्यात आले. परंतु आर्थिक वर्षात निधी उपलब्ध नसल्यामुळे कंत्राटदारास विहित मुदतीत देयक अदा करण्यात आले नाही. सबब निधी उपलब्ध नसल्यामुळे व कंत्राटदाराने पुढील काम करण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे विभागाने सदर काम आहे त्या स्थितीत अंतिम करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे सदर झालेल्या कामाचे अंतिम मूल्यांकनानुसार कमी किमतीचे सुधारित प्राकलन तयार करण्यात आलेले होते, ते या सोबत जोडलेले आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २९ सप्टेंबर २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सुसुंद्री खैरी रस्त्याच्या कामातील समाविष्ट १९ बाबींपैकी प्रत्यक्षात ११ बाबी कार्यान्वित केल्याने या कामाची गुणवत्ता कशी राखली, या कामाचे एकूण अंदाजपत्रक रु. ९,९०,३९१ इतक्य रकमेचे असताना प्रत्यक्ष काम रु. ५,४६,३५० चे झाले, लेखासंहिता नियम १५२ (३) नुसार रिड्यूस एस्टिमेट करण्याची कार्यवाही का टाळण्यात आली, रस्त्याच्या कामामध्ये बी.बी.एम करून त्यावर डांबरीकरण व अस्तरीकरण न करता कामाची गुणवत्ता योग्य असल्याची खात्री कोणी व कशी केली, डांबरीकरण न केल्याने बी.बी.एम वरील खर्च निरर्थक ठरतो यास कोण जबाबदार आहे, या कामासाठी निधीची तरतूद असल्याची खात्री प्रशासकीय मान्यता देताना का केली नाही, कामास पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यासाठी कोणते प्रयत्न केले, यावर समितीस कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी असे विदित की केले की, सदर रस्त्याच्या कामासाठी १० लाख रूपयांची प्रशासकीय मान्यता होती, मूळ अंदाजपत्रक रु. ९,९०,३९१ इतक्या रकमेचे होते. प्रत्यक्षात काम सुरू केल्यानंतर यामध्ये फक्त ८ बाबी कार्यान्वित केल्या. वित्तीय वर्षात निधी उपलब्ध नसल्यामुळे सदर कामास ठेकेदाराने काम करण्यास असमर्थता दर्शविली. त्यामुळे विभागाने असा निर्णय घेतला की, जेवढे काम झाले त्याला सुधारित मान्यता घेऊन काम पूर्ण करावे.

संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी अशी विचारणा केली की, निधी नसताना प्रशासकीय मान्यता व वर्क ऑर्डर का दिली, निधी कमी प्रमाणात उपलब्ध होता तर मग जास्त कामाची वर्क ऑर्डर का दिली, लेखासंहितेच्या परिशिष्ट ४ मध्ये नमूद केले आहे की, निधी उपलब्ध झाल्याशिवाय किंवा निधी उपलब्ध करून देण्याची कमिटमेंट मिळाल्याशिवाय प्रशासकीय मान्यता देण्यात येऊ नये. अंदाजपत्रकात कामे असणे किंवा कार्यक्रम मंजूर असणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. जिल्हा परिषदेची प्रशासकीय मान्यता घेतली पाहिजे होती. प्रशासकीय मान्यता घेऊनच वर्क आर्डर दिली पाहिजे होती, यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, कामाचे अंदाजपत्रक ९ लाख रूपयांचे होते. सदर काम ५ लाख ४६ हजार रूपयांमध्ये पूर्ण केले. सदर रस्त्यावर फक्त खडीकरण केले, डांबरीकरण केलेच नाही. हे काम पूर्ण झालेच नाही. शासनाकडून निधी मिळेल असे गृहीत कसे धरले, रस्त्यांच्या कामांच्या संदर्भात अनियमितता झाली आहे. गुणवत्ता नियंत्रण विभागामार्फत संपूर्ण रस्त्याची तपासणी करावी, पाहणी अहवाल मागवून त्यामध्ये अनियमितता झाली असेल तर संबंधितांवर कडक कारवाई करावी. यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी समितीस विदित केले की, ठेकेदाराचे ६ लाख रूपयांचे देयक प्रलंबित होते. बी.बी.एम पर्यंत काम पूर्ण केले होते, सदरचा रस्ता वाहतुकीसाठी योग्य होता. बी.बी.एम केल्यावर काम पूर्ण केले. निधी उपलब्ध नव्हता. कारपेटच्या खालचे काम पूर्ण केले आहे. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी अशी विचारणा केली की, सन २००८-०९ मधील अर्धवट, जशीच्या तशी पूर्ण केलेली कामे किती आहेत, अर्धवट देयके देऊन कामे अंतिम करणे म्हणजे काम पूर्ण

झाले असे म्हणता येत नाही. त्याचा आढावा घेतला आहे का, हा खर्च निर्धारित धरू नये. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ३ कामे होती, जी आहे त्या स्थितीत बंद केली आहेत. काही कामे महानगर पालिकेच्या हद्दीत गेलेली आहेत. यावर पुढे समितीने असे निदेश दिले की, परिच्छेद क्रमांक ३.२४४, ३.२४५, ३.२४७ यांच्या संदर्भात चौकशी करून सविस्तर अहवाल समितीला सादर करावा. सदर कामांच्या बाबतीत अनियमितता आढळून आली तर संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) सुसुंद्री खैरी रस्त्याच्या कामासंदर्भात संपूर्ण चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार दोषींवर कोणती कार्यवाही करण्यात आली ?

(२) या कामाची गुणनियंत्रण विभागामार्फत (बांधकाम) संपूर्ण तपासणी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले, दोषी असल्यास संबधितांवर कोणती कार्यवाही केली, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदर कामाची चौकशी करण्यात आलेली असून चौकशीचे निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

(१) कामाची चौकशी उपलब्ध दस्तऐवजावरून करण्यात येऊन अहवाल सादर करण्यात आलेला आहे. निधी अभावी कामे आहे त्यास्थितीत अंतिम करून मोजमापानुसार देयके देण्यात आली आहेत. त्यामध्ये कोणतीही अनियमितता आढळून आलेली नाही.

(२) प्रधानमंत्री ग्रामसडक योजना टप्पा ६ अंतर्गत करण्यात आलेल्या कामामध्ये सदर ररत्याचा समावेश होता. त्यामुळे विचारधीन ररत्याचे उर्वरीत काम मूळ योजनेतून करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

समितीने वस्तुस्थिती लक्षात घेऊनसदर मुद्दा ग्राह्य धरून निकाली काढावा ही विनंती.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्राम विकास विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी मंत्रालयीन विभाग सहमत आहे.

**चौकशी अहवाल**

**पंचायत राज समिती लेखा आक्षेपाबाबत चौकशी अहवाल**

**(३.२४४ सुसुंद्री खैरी रस्त्याचे कामात निरर्थक खर्चाबाबत)**

(१) कामाचे नांव :— सुसुंद्री खैरी येथे रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण.

(२) मूळ प्रशासकीय मान्यता :— प्र.मा.क्र./तां./अ.अ./नि-२/प्र.मा./०५-०६/५९६, दिनांक ३ फेब्रुवारी २००५, रु. १०.०० लक्ष

(३) मूळ तांत्रिक मान्यता :— (१) तांत्रिक मान्यता क्र./१२/एस.आर.एफ./२००६-०७, रु. १०.०० लक्ष.

(२) सुधारित तांत्रिक मान्यता :— एस.आर.एफ./०८-०९ रु.५,४६,५००.

(४) कंत्राटदाराचे नांव :— श्री. एस. जे. परमल.

(५) कार्यरंभ आदेश क्रमांक व दिनांक :— जा.क्र.४७३९/जिपना/बांध/का-३/निविदा-२००६.

दिनांक १६ सप्टेंबर २००६, रु. ९,९०,३९१ (०.०१ टक्के कमी दराने).

(६) कामाची मुदत :— ३ महिने.

(७) प्रत्यक्षात काम सुरू केल्याचा दिनांक :— दिनांक १६ सप्टेंबर २००६ (कार्यारंभ आदेशान्वये).

(८) काम पूर्ण केल्याचा दिनांक :— दिनांक ०३ डिसेंबर २००६

(९) कामाला मुदत वाढ दिली आहे किंवा नाही :— नाही

(१०) मुदत वाढ दिली असल्यास दंड आकारला काय? :— नाही.

(११) अंतिम मूल्यांकन :— रु.५,४६,३५०.

(१२) अंतिम मोजमापे :— दिनांक १ डिसेंबर २००६/मोजमाप पुस्तिका क्र. १६८.

सदर काम हे ग्रामीण मार्ग क्र. ७४ वर सन २००४-२००५ मध्ये एस. आर. एफ कार्यक्रमांतर्गत रु. १०.०० लक्षाकरिता, प्रशासकीय मान्यता प्राप्त झाले. सदर कामाचा करारनामा श्री. एस. के. परमल यांचे नावाने जावक क्रमांक पत्राअन्वये ४७३९/जिपना/बांध/का-३/निविदा-२००६ दिनांक १६ सप्टेंबर २००६ अन्वये करण्यात आली. सदर रस्त्याचे काम कंत्राटदाराने बीबीएम थरापर्यंत केले. सोबतच साईट पट्टयाचे व नालीचे खोदकाम केले. केलेल्या कामाचे चालू देयक विभागीय कार्यालयास सादर केले. परंतु निधी उपलब्ध नसल्यामुळे कंत्राटदारास देयक अदा करता आले नाही व कंत्राटदारास देयक न मिळाल्यामुळे कंत्राटदाराने पुढील कारपेट व सील कोटचे काम केलेले नाही. परिणामी कंत्राटदाराचे काम बीबीएम पर्यंत झाल्यामुळे तसेच काम अंतिम करण्यात आले व निधी प्राप्त झाल्यावर कामावर रु. ५,४६,३५० खर्च करण्यात आला व रास्ता वाहतुकीस योग्य करण्यात आला. तद्नंतर प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेमधून राज्यमार्ग २४८ ते पारडी देशमुख खैरी सुसुंद्री सावली (खुर्द) वाढोणा (बुज.) धापेवाडा भडांगी बोरगाव रस्ता वर्ष सन २००६-०७ मध्ये रु. ३७७.०२ लक्ष रुपयाचे काम पूर्ण करण्यात आले. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना यांचेकडे गुणनियंत्रण करिता स्वतंत्र्य यंत्रणा असून वेळोवेळी कामाची तपासणी करण्यात येते.

**निष्कर्ष :—**

(१) सदर काम बी.बी.एम. स्तरापर्यंत पूर्ण करून रस्ता वाहतुकीस योग्य केलेला होता व निधी अभावी करारनामा अंतिम केलेला आहे.

(२) त्यास महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६८ मधील नियम ११४ अन्वये सुधारित अंदाजपत्रकास सक्षम अधिकाऱ्यांची मान्यता घेतलेली आहे.

(३) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना यंत्रणेचे सदर रस्त्यावर काम पूर्ण करून व त्यास राज्य गुणवत्ता नियंत्रक मार्फत वेळोवेळी कामाची तपासणी केलेली आहे व सद्यस्थितीत सुस्थिती आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ ऑक्टोबर २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, सुसुंद्री खैरी रस्त्याच्या कामासंदर्भात संपूर्ण चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली, संबंधित कामाची गुणनियंत्रण विभागामार्फत (बांधकाम) संपूर्ण तपासणी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले, दोषी असल्यास संबंधितांवर कोणती कारवाई केली, नसल्यास विलंबाची कारणे काय, यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, सुसुंद्री खैरी हे रस्त्याचे काम ३०५४ नुसार अंदाजपत्रकामध्ये होते. त्यासाठी प्रशासकीय मान्यता १० लाख रुपयांची होती. हे ९५० मीटरचे काम होते. त्याचा स्कोप रस्त्याच्या पॅचेसमध्ये डब्ल्यू.पी.एम. एम.पी.एम व कारपेट करणे असा होता. सदर काम ३ महिन्यांमध्ये पूर्ण करण्यात आले. त्याचे ५ लाख ४६ हजार रुपयांचे देयक प्रलंबित होते. यासाठी जिल्हा परिषदेकडे निधी उपलब्ध नव्हते. त्यामुळे कारपेटचे काम करण्यासाठी कंत्राटदाराने नकार दिला, निधी उपलब्ध नसल्यामुळे जिल्हा परिषदेने बी.बी.एम च्या स्तरावर हे काम अंतिम करून कंत्राटदाराला दिले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, यामध्ये कोण दोषी असू शकतो, यावर सचिव, मुख्यमंत्री, ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, यामध्ये कोणीही दोषी नाही. सदर काम बी.बी.एम.पर्यंत झाल्यानंतर प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये मंजूर झाले. जिल्हा परिषदेकडे ९५० मीटरचे काम होते, परंतु प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये सुमारे १० कि.मी. एवढे काम मंजूर होऊन पूर्ण केले. त्यातच ९५० मीटर काम कव्हर केले व यामध्ये अनियमितता झालेली नाही. यावर समितीने अशी विचारणा केली की, निधीच्या उपलब्धतेनुसार कंत्राटदाराने काम करावे असा करार झाला होता का, सदर कंत्राटदार पैसे नाहीत म्हणून काम सोडून गेला. ५ लाख ४६ हजार रुपयांचे देयक अदा करण्यात आले नाही. नंतर हा रस्ता प्रधानमंत्री ग्रामसडक योजने मधून मंजूर झाला शासनाचे ४ लाख रुपये वाया गेले. कारण हे काम प्रधानमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत कव्हर करण्यात आले. प्रत्येक महिन्याला कंत्राटदाराला एक देयक देणे अभिप्रेत आहे. यावर समितीने विचारणा केली की, प्रथम ३०५४ अंतर्गत या कामाला परवानगी दिली. निधीच्या उपलब्धतेनुसार काम करावे अशी काही अट करारनाम्यामध्ये आहे का, यासाठी जबाबदार कोण आहेत, कनिष्ठ अभियंता, कोण आहेत, कनिष्ठ अभियंता १०० टक्के पर्यवेक्षण करतात, तसेच उप अभियंता व कार्यकारी अभियंता हे देखील यामध्ये आहेत. त्यांनी या कंत्राटदाराला काम का बंद केले अशा आशयाची नोटीस त्यावेळी दिली होती का, यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, त्या कंत्राटदाराने असे मध्येच काम सोडायला नको होते. या प्रकरणामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता झालेली नाही. यामध्ये ९५० इतकाच रस्ता शिल्लक राहिला होता.

समितीने पुढे विचारणा केली की, याचा अर्थ या ९५० मीटर रस्त्याचे काम सोडून जे आयटम निश्चित केले ते प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये गेले असतील. यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये सर्व आयटम हेडनिहाय करतो त्यामध्ये जिल्हा परिषदेमार्फत सबलाईमचे काम केले जाते. रस्ता सुस्थितीत ठेवण्यासाठी त्यात डीबीएम असतील प्रधानमंत्री ग्रामसडक

योजनेमध्ये तांत्रिक गरज ज्यावेळी असते त्यानुसार डिझाईन तयार करतो त्यावेळी एक्झिस्टींग खर्चाचाही विचार केला जातो. त्यावेळी जो खर्च उपलब्ध आहे तो गृहित धरुनच ते काम करतो. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, यामध्ये ९५० मीटरचे काम केले असले तरी त्याला गृहित न धरता त्याबरोबर दुसरेही काम केलेले आहे. यावर सचिव, मुख्यमंत्री, ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, हे काम करणारा कंत्राटदार मध्येच काम सोडून गेला होता. त्याचे १० लाख रुपयांचे काम शिल्लक होते. यावर समितीने अशी विचारणा केली की, जर तो कंत्राटदार मध्येच काम सोडून देत असेल तर कनिष्ठ अभियंता किंवा उप अभियंता यांचे या कामावर देखरेख करण्याचे काम नव्हते काय, जिल्हापरिषदेच्या अधिकाऱ्यांनी संबंधित कंत्राटदाराला काम अर्धवट टाकून दिल्याबाबत नोटीस दिली होती का, यावर सचिव, मुख्यमंत्री, ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, त्या कंत्राटदाराला दिलेले काम त्याने तीन महिन्यांमध्ये पूर्ण केले आहे. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, म्हणजे तो ठेकेदार ते काम अर्धवट सोडून जाणार होता असे नाही, तर त्याला त्याने केलेल्या कामाचे पेमेन्ट वेळेवर न होता एक वर्षानंतर झाले. त्यामुळे तो मधल्या काळात काम सोडून गेला होता व पेमेंट मिळाल्यानंतर त्याने हे काम पूर्ण केले आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, असे असेल तर समितीला करारनाम्यातील अट बदलावी लागेल. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, त्यांना आर.ए. मिळाला नाही. जिल्हा परिषदेचे असे म्हणणे असेल तर राज्याच्या सीआरएफचा बजेटचे काम होणार नाही. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, कंत्राटदाराने केलेल्या कामाचे बिल सादर केले. मात्र निधी उपलब्ध नसेल तर आणि त्याला एक वर्षानंतर बिल अदा केले असेल तर त्यात त्याचा काय दोष आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, वर्क ऑर्डरचा कालावधी किती होता, यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, हे काम तीन महिन्यांच्या कालावधीचे होते. यावर समितीने अशी विचारणा केली की, मग त्याने हे काम मध्येच का सोडले त्याबद्दल त्याला नोटीस दिली होती काय, यावर सचिव, मुख्यमंत्री, ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, त्याला नोटीस देण्यात आली नव्हती. त्या ठेकेदाराचे ५.५९ कोटी रुपयांचे बिल थकित होते. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केली की, करारनामा दोन्ही बाजूने केलेला आहे. त्यानुसार ठेकेदाराने जर ते काम केले असेल तर त्याचे देयक दिले पाहिजे. कधी कधी कामाला सुरूवात करतो आणि त्यानंतर ठेकेदाराला देयके अदा केली जातात. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, मात्र करारनाम्यानुसार १० टक्के रक्कम त्याला आगाऊ देत असतो. देयक तर नंतरही देता येईल. मात्र त्याने काम पूर्ण केले पाहिजे. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, त्यामुळेच अडचण येते. कारण एकदा वर्क ऑर्डर दिल्यानंतर तो ठेकेदार कामाला सुरूवात करतो. यावर सचिव, मुख्यमंत्री, ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, करारनाम्यामध्ये ज्याप्रमाणे क्लॉज असतो त्यानुसार कामाच्या टप्प्यावरुन ठेकेदाराला देयक अदा करतो.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ग्राम विकास विभागामार्फत ज्या १४० योजना राबवितो त्यातील एखादी योजना बंद होत असेल तर त्यामधील निधी उपलब्ध असल्यास स्प्लीट बॅलन्स म्हणून ते विचारात घेऊन त्याप्रमाणे निश्चित करून ती रक्कम दिली पाहिजे. अनेक वेळा जिल्हा परिषदेच्या प्लड निधीच्या बाबत असे होते. यावर सचिव, मुख्यमंत्री, ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, हे काम जनरल एस.आर.मध्ये घेऊन सुधारणा केली पाहिजे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, समितीला वाटते धोरण बदलले पाहिजे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्हा परिषदेचे कनिष्ठ अभियंता, उप अभियंता यांनी या कामांची तपासणी करायला पाहिजे होती. कार्यकारी अभियंता यांच्या अधिपत्याखाली जे काम व्हायला पाहिजे होते ते नीट झालेले नाही. त्यामुळे ह्या यंत्रणेमध्ये सुधारणा केली पाहिजे. मागच्या काळात यंत्रणेमध्ये सुधारणा झाली आहे. बरेचदा टप्पाटप्प्याने निधीचे वितरण करतो. मात्र त्याचे ओव्हर लॅपिंग होता कामा नये, याची दक्षता पुढील कालखंडात घ्यावी. हे फार जुने प्रकरण आहे. हे जरी खरे असले तरी जेथे प्लड डॅमेजचा निधी आहे तेथे निधीचा अपव्यय होण्याची दाट शक्यता आहे. या चुका पुन्हा होऊ नयेत म्हणून संबंधितांना सक्त ताकिद दिली पाहिजे. पुढील काळामध्ये या निधीचा अपव्याय टाळण्याकरिता आणि शासनाचा निधी कशा पद्धतीने वाचेल आणि तो निधी दुसरीकडे कसा वापरता येईल, कारण ग्रामीण भागाची आर्थिक स्थिती वाईट आहे. जिल्हा परिषद, पंचायत समित्यांकडे निधी नाही. रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी अतिरिक्त निधी देतो. एका मतदार संघात साधारणपणे ५२५ गावे असतात. त्यांची कामे व्यवस्थित झाली पाहिजेत. या कामांमध्ये अनियमितता होणार नाही याची दक्षता पुढील कालखंडात घेतली पाहिजे, असे निदेश समितीने दिले.

## अभिप्राय व शिफारशी

सन २००४-२००५ मध्ये राज्य मार्ग निधीच्या माध्यमातून सुसुंद्री खैरी येथे रस्ता मजबुतीकरण व डांबरी करणाच्या कामाला १० लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता दिनांक ३ फेब्रुवारी २००५ रोजी प्राप्त झाली होती. सदरचे काम श्री.एस.जे.परमल या कंत्राटदाराला देण्यात आले होते. कामाची मुदत ३ महिने होती. या कामाच्या संदर्भात कंत्राटदाराने अंदाजपत्रकातील १९ पैकी ११ बाबी कार्यान्वित केल्या, बाब क्रमांक ९ वर प्रोव्हायडींग जाडी ७५ मी.मी. जाडी बीबीएम ३०१८ चौ.मी. केल्याचे नोंदवून ३,६१,७६८ रुपयांचे मूल्यांकन तांत्रिक दृष्ट्या योग्य नाही, सदर खर्च निरर्थक झाला तसेच अंदाजपत्रक ९,९०,३९१ रुपयांचे असताना फक्त ५,४६,३५० रुपये मूल्याचे काम करून काम अंतिम करतेवेळी रिड्युस इस्टीमेट केलेले नाही आदी आक्षेप लेखा परिक्षकांनी उपस्थित केले. सदरहू आक्षेपावर आर्थिक वर्षात निधी उपलब्ध नसल्यामुळे कंत्राटदारास देयक अदा करण्यात आले नसल्यामुळे कंत्राटदाराने पुढील कामे करण्यास असमर्थता व्यक्त केल्यामुळे विभागाने काम आहे त्या स्थितीत अंतिम केले असल्याचा खुलासा जिल्हा परिषदेने समितीस केला.

प्रस्तुत प्रकरणात कंत्राटदाराने रस्त्याचे काम बीबीएम थरापर्यंत केले सोबतच साईट पट्टयाचे व नालीचे खोदकाम केले. केलेल्या कामाचे देयक कंत्राटदाराने सादर केले परंतू निधी उपलब्ध नसल्यामुळे कंत्राटदारास देयक अदा करता आले नाही, त्यामुळे कंत्राटदाराने पुढील कारपेट व सीलकोटचे काम केले नाही. त्यामुळे विभागाने आहे त्या परिस्थितीत काम अंतिम केले. सदर कामाच्या वेळी कनिष्ठ अभियंता, उप अभियंता यांनी कामाची तपासणी करायला पाहिजे होती. कार्यकारी अभियंत्याच्या अधिपत्याखाली जे काम व्हायला पाहिजे ते नीट झालेले नाही. करारनाम्यानुसार कंत्राटदाराला १० टक्के रक्कम आगाऊ दिली जाते. प्रस्तुत प्रकरणात कंत्राटदाराला काम सोडल्यामुळे नोटीस देखील दिल्याचे समितीला दिसून आले नाही. सदर कामावर ५,४६,३५० रुपयांचा खर्च झाला असून तो निरर्थक गेला कारण नंतरच्या काळात प्रधानमंत्री, ग्रामसडक योजनेतून राज्यमार्ग २४८ ते पारडी देशमुख खैरी सुसुंद्री सावली (खुर्द) वाढीणा (बुज.) धापेवाडा, भडांगी, बोरगाव रस्त्याची एकूण लांबी १०.४७६ कि.मी. अंतर्गत सदर रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आले. त्यामुळे सदर रस्त्याचे उर्वरित काम मुळ योजनेतून पूर्ण करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तसेच या रस्त्याच्या कामात कोणीही दोषी नाही असे विभागीय सचिवांनी समितीला विदित केले आहे.

**तथापि,राज्य मार्ग निधी हे लेखाशीर्ष नंतरच्या काळात बंद झाल्यामुळे प्रस्तुतच्या प्रकरणातील चालू कामांना निधी मिळाला नाही त्यामुळे बांधकाम विभागाने आहे त्या परिस्थितीत काम अंतिम केले त्यामुळे संपूर्ण राज्यात राज्यमार्ग निधी (SRF) अंतर्गत चालू असलेली कामे प्रभावित झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे विभागीय सचिवांचे साक्षीदरम्यान समितीने ग्राम विकास विभागाच्या सचिवांचे लक्ष वेधून एस.आर.एफ. सारखे एखादे हेड बंद झाल्यानंतर त्या अंतर्गत चालू असलेली कामे पूर्ण करून घेण्याची विभागाचीच जबाबदारी आहे, तद्वतच यापुढील काळात योजना बंद करताना चालू कामे प्रभावित होणार नाहीत याची दक्षता घ्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, नागपूर

## शासन निर्देशाविरुद्ध परिपोषणाचे जादा प्रदानामुळे शासनाचे झालेले नुकसानाबाबत

**(परिच्छेद ३.८४३) (सन २००८-२००९)**

महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. विभशा-२००६/ प्र.क्र.११५/मावक-६, मंत्रालय, मुंबई, दिनांक २७ मे २००८ अन्वये अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळा मधील निवासी विद्यार्थ्यांसाठी परिपोषण दर रु. ६३०, दिनांक ०१ एप्रिल २००८ पासून लागू करण्यात आला आहे. आक्षेपातील निवासी शाळेचे सन २००७-०८ चे अनुदान निर्धारणाबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) संस्थेचे सन २००७-०८ या वर्षात प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची यादी.

२) संस्थेला सन २००७-०८ या वर्षात प्राधिकृत अधिकारी/कर्मचारी यांची विद्यार्थी पडताळणी संबंधी अचानक भेटीचा तपशीलावर अहवाल

३) सन २००७-०८ मध्ये केलेल्या जमा खर्चाची सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेला हिशोब तपासणी अहवाल.

४) समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे अनुदान निर्धारण आदेशात सन २००७-०८ मधील अनुदान मुख्य निर्धारण असे नमूद आहे.

वरील सर्व बाबी सन २००७-०८ या आर्थिक वर्षाच्या जोडण्यास आल्या आहेत. त्यामुळे सन २००७-०८ या वर्षातील परिपोषण दर रुपये ५०० आहे. त्याच दराने परिपोषण अनुदान प्रदान करणे योग्य आहे. संचालक, समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक अवि/मुनी/९५-९६ का/९/१७३०, दिनांक ०५ फेब्रुवारी १९९६ मध्ये अनुदान निर्धारण मागील वर्षाच्या खर्चाचे पुढील वर्षात अनुदान करून देय रकमांचे प्रदान करणेबाबत निर्देश नमूद आहे. विभागाने आक्षेपातील संस्थांचे सन २००७-०८ या आथिर्क वर्षाचे अनुदान निर्धारण सन २००८-०९ मध्ये करताना परिपोषणाचा मासिक दर रुपये ५०० असताना रुपये ६३० वाढीव दर निर्धारित करून संस्थांना रकमांचे प्रदान केले आहे. या नियमबाह्य प्रदानाबाबत लेखापरिक्षण चालू असताना अर्धसमास पत्र देऊन विभागाला विचारणा केली असता समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी खुलासा दिला की, अर्धसमासातील बाब बरोबर आहे. शासनाकडून मार्गदर्शन मागवून खुलासा करण्यात येईल. आक्षेपातील नमूद संस्थांना जादा अनुदान प्रदान झाले आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे रुपये ९,१६,८८२ व्याजासह वसूल होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

शासन निर्णय क्र. विमशा/२००६/प्र.क्र.११५/मावक-६, दिनांक २७ मे २००८ अन्वये निवासी शाळांचे परिपोषण अनुदान रु.५०० वरुन रु.६३० हे दिनांक ०१ एप्रिल २००८ पासून लागू करण्यात आलेले आहे.

विभागाने आक्षेपातील निवासी शाळांचे सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे अनुदान निर्धारण सन २००८-०९ मध्ये करताना परिपोषणाचा मासिक दर रु. ५०० असताना रु.६३० वाढीव दर निर्धारित करून परिपोषणाच्या रकमा प्रदान केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने या नियमबाह्य प्रदानाबाबत रु. ९,१६,८८२ ऐवजी रुपये ९,१२,३८२ वसूल होणे आवश्यक होते.

सदर अतिप्रदान झालेल्या रकमेचे रुपये ८,०२,५७१ सन २०१०-११ ते सन २०१४-१५ चे अंतिम मूल्य निर्धारणामध्ये एकूण आक्षेपित १७ निवासी शाळांचे रुपये ९,१२,३८२ वसूल करण्यात आलेले आहे. वसूलीचे विवरण पत्र जोडलेले आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २९ सप्टेंबर २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सन २००७-०८ मध्ये परिपोषण अनुदानाचा दर प्रति विद्यार्थी रुपये ५०० असताना तो ६३० रुपये असा घेण्यात आला. सन २००७-२००८ मध्ये अनुदान देताना निश्चित कोणत्या दराने देण्यात आला, समितीच्या प्रश्नांवर उत्तर देताना तत्कालीन अधिकारी यांनी खुलासा केला की, शासन निर्णय, २७ मे, २००८ नुसार निवासी शाळांचे परिपोषण अनुदान ५०० रुपयांवरुन ६३० रुपये करण्यात आले. सन २००७-०८ मध्ये ५०० रुपये दराने अनुदान देण्यात आले. सन २००८-०९ मध्ये वाढीव दराने अनुदान देण्यात आले. सन २००७-०८ चे अनुदान सन २००८-०९ मध्ये दिले. अतिप्रदान झालेल्या रकमेचे ९ लाख १२ हजार ३७८ रुपये वसूल केलेले आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी झालेली चूक मान्य केली. तत्कालीन समाज कल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सन २००७-०८ मध्ये १७ निवासी शाळा होत्या. या शाळांना ६३० रुपये परिषोषण अनुदान देण्यात आले नव्हते. सन २००८-०९ मध्ये ६३० यांप्रमाणे अनुदान काढण्यात आले. जे जादा अनुदान देण्यात आले होते ते पूर्ण वसूल करण्यात आले. सन २००८-०९ मध्ये अनुदान दिले आहे. ज्यावर्षी अनुदान दिले जाते, ते त्याच वर्षी खर्च केले जाते. त्यावेळी ६३० रुपये दर होता, त्यानुसार देयक काढण्यात आले. यावर समितीने निदेश दिले की, १०३ रुपयांचा जादा दर प्रदान केल्यामुळे ९.१६ लाख रुपयांपर्यंत रक्कम वाढली. ही अतिशय गंभीर बाब आहे. या संदर्भात संबंधितांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी लोकांकडून नव्हे तर पुढील वर्षीच्या अनुदानातून रक्कम वसूल केली आहे. या प्रकरणी संबंधित

संस्था चालकांचा फायदा करुन दिला आहे. याबाबत सविस्तर चौकशी करून दोषी असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुद्ध जबाबदारी निश्चित करुन एक महिन्याच्या आत समितीकडे अहवाल सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सन २००७-२००८ मध्ये परिपोषण अनुदानाचा दर प्रतिवर्षी रुपये ५०० एवढा असताना त्याचे सन २००८-२००९ मध्ये रुपये ६३० एवढ्या दराने प्रदान करण्यात आले त्यामुळे शासनाचे रुपये ९ लाख १६ हजार एवढ्या जादा रकमेच्या प्रदानाची वसूली विद्यार्थ्यांच्या पुढील वर्षाच्या अनुदानातून करण्यात आली, समितीने निदर्शनास आणून दिल्यानंतरच ही वसूली केली आहे. अन्यथा संस्था चालकांचा यामुळे फायदा झाला असता, ही बाब विचारात घेऊन जे अधिकारी यात संबंधित आहेत त्यांच्यावर कोणती कार्यवाही केली, नसल्यास त्याची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषद, नागपूर यांच्याकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

शासन निर्णय, क्र.विमशा/२००६/प्र.क्र.११५/मावक-६, दिनांक २७ मे २००८ अन्वये निवासी शाळांचे परिपोषण अनुदान रुपये ५०० वरून रुपये ६३० हे दिनांक १ एप्रिल २००८ पासून लागू करण्यात आलेले आहे. विभागाने आक्षेपातील निवासी शाळांचे सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे अनुदान निर्धारण सन २००८-०९ मध्ये करताना परिपोषणाचा मासिक दर रुपये ५०० असताना रुपये ६३० वाढीव दर निर्धारित करून परिपोषणाच्या रकमा प्रदान केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने या नियमबाह्य प्रदानाबाबत रुपये ९,१६,८८२ ऐवजी रुपये ९,१२,३८२ वसूल होणे आवश्यक होते व ती रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. वसूलीचे विवरण पत्र जोडलेले आहे.

**वसूलीचे विवरणपत्र**

सन २००८-०९ च्या स्थानिक निधी लेखा परिक्षण अहवालप्रमाणे सन २००७-०८ मध्ये परिपोषण अतिप्रदाने करण्यात आलेल्या शाळेंची यादी.

| अ.क्र. | अपंग शाळेचे नाव | सन २००७-०८ मध्ये अतिप्रदान केलेले परिपोषण अनुदान रक्कम | वसूल केलेली रक्कम | वसूल न केलेली रक्कम | कारणे |
|---|---|---|---|---|---|
| १ | शेल्टर्ड वर्कशॉप फॉर लाईव्ह दक्षिण अंबाझरी रोड, नागपूर | ४३,८०० | ४३,८०० | | |
| २ | श्रीमती रधाबाई अपंग मुकबधिर विद्यालय, कोंढाळी | ५२,००० | ५२,००० | | |
| ३ | ज्ञानज्योती अंध निवासी विद्यालय, मानेवाडा | ७१,५०० | ७१,५०० | | |
| ४ | मा कस्तुरबा अंध अपंग पुर्नवसन प्रशिक्षण केंद्र, नागपूर | ३२,५०० | ३२,५०० | | |
| ५ | कर्णबधिर विद्यालय, सोनेगाव | २१,२२६ | २१,२२६ | | |
| ६ | राजीव गांधी अंध विद्यालय, काटोल | ५७,८११ | ५७,८११ | | |
| ७ | स्नेहसदन अपंग मुलांची शाळा उंटखाना, नागपूर | ३९,७२८ | ३९,७२८ | | |
| ८ | संत गाडगे महाराज मुकबधिर निवासी विद्यालय, रामटेक | ५२,००० | ५२,००० | | |
| ९ | श्री.संत जनगाडे महाराज अपंग औद्योगिक संस्था, सिर्सी | ४९,४०० | ४९,४०० | | |
| १० | सुरज मतिमंद मुलामुलींची निवासी शाळा, काचुरवाही, ता.रामटेक | ४८,१०० | ४८,१०० | | |
| ११ | प्रेरणालय होम फॉर एजड ॲन्ड हॅन्डीकॉम, उंटखाना | ६५,००० | ६५,००० | | |
| १२ | मुकबधिर निवासी, शाळा सावनेर | ७२,८०० | ७२,८०० | | |
| १३ | श्री किसन मुकबधिर निवासी विद्यालय, नागपूर | ५२,००० | ५२,००० | | |
| १४ | सोनुताई अग्निहोत्री मुकबधिर निवासी शाळा, नागपूर | ५२,००० | ५२,००० | | |
| १५ | संत गाडगे महाराज मुकबधिर निवासी विद्यालय, शितलवाडी | ५२,००० | ५२,००० | | |
| १६ | निवासी मुकबधिर विद्यालय, हुडकेश्वर | १,३२,६०० | १,३२,६०० | | |
| १७ | लोकमान्य मतिमंद निवासी विद्यालय, नरखेड | १७,९१७ | १७,९१७ | | |
| | | ९,१२,३८२ | ९,१२,३८२ | | |

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय खालील प्रमाणे प्राप्त झाले.**

जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे अभिप्रायाशी सहमत.

## चौकशी अहवाल

उपरोक्त प्रकरणी स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंग शाळांना परिपोषण अनुदान वितरित करण्यात आले. सन २००८-२००९ मध्ये अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळा मधील विद्यार्थ्यांसाठी परिपोषण दर शासन निर्णय क्र. विमशा/२००६/प्र.क्र.११५/मावक-६, दि. २७ मे २००८ अन्वये निवासी शाळेचे परिपोषण अनुदान रु. ५०० वरुन रु. ६३० हे दि. ०१-०४-२००८ पासून लागू करण्यात आलेले होते. परंतु सन २००७-२००८ या आर्थिक वर्षाचे अनुदान निर्धारक करताना परिपोषणाचा मासिक दर ५०० ऐवजी ६३० गृहीत धरुन अनावधानाने १३० रुपयांनी जादा अनुदान निर्धारण करण्यात आलेले होते. अनुदान वितरण कार्यवाहीत लेखापरिक्षणा दरम्यान एकूण १७ शाळांना रुपये ९,१२,३८२ चे अतिप्रदान झालेले होते. सदर बाब कार्यालयाचे लेखापरिक्षणात निदर्शनास आल्यानंतर कार्यालयाकडून अतिप्रदान झालेले एकूण १७ शाळेची रक्कम रु. ९,१२,३८२ चे संबंधित शाळेचे त्यापुढील वर्षाचे अनुदान निर्धारणातून वसूल करण्यात आलेली आहे. वसूल केलेल्या शाळेनिहाय रकमेचे विवरणपत्र जोडलेले आहे. यात विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्याचे दिसून येत नाही किंवा संस्थेचा कोणताही फायदा झालेला नाही किंवा शासनाचे कोणतेही नुकसान झालेले नाही. उपरोक्त प्रमाणे सर्व बाबीची चौकशी करण्यात आलेली आहे.

**अभिप्राय** : स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंग शाळांना परिपोषण अनुदान वितरणात सन २००७-२००८ चे आर्थिक वर्षाचे अनुदान निर्धारण सन २००८-२००९ मध्ये करतांना परिपोषणाचा मासिक दर रुपये ५०० असतांना रुपये ६३० प्रमाणे करण्यात येईल रुपये १३० प्रमाणे वाढीव जास्तीचे नजरचुकीने अतिप्रदान झालेली रक्कम रुपये ९,१२,३८२ वसूली करण्यात आलेली आहे. यात विद्यार्थ्यांने नुकसान झाल्याचे दिसून येत नाही किंवा संस्थेचा कोणताही फायदा झालेला नाही किंवा शासनाचे कोणतेही नुकसान झालेले नाही. उपरोक्त प्रमाणे सर्व बाबींची चौकशी करण्यात आलेली आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, शासन निर्देशाविरुद्ध परिपोषणाच्या जादा प्रदानामुळे शासनाचे झालेले नुकसान सन २००७-०८ मध्ये परिपोषण अनुदानाचा दर प्रतिवर्षी रु. ५०० एवढा असताना त्याचे सन २००८-०९ मध्ये रुपये ६३० एवढ्या दराने प्रदान करण्यात आले, त्यामुळे शासनाचे रुपये ९ लाख १६ हजार एवढ्या जादा रकमेच्या प्रदानाची वसूली विद्यार्थ्यांच्या पुढील वर्षाच्या अनुदानातून करण्यात आली, समितीने निदर्शनास आणून दिल्यानंतरच ही वसूली केली आहे. अन्यथा संस्था चालकांचा या प्रकारामुळे फायदा झाला असता ही बाब विचारात घेऊन जे अधिकारी यात संबंधित आहेत, त्यांच्यावर कोणती कारवाई केली, नसल्यास त्याची कारणे काय आहेत, यावर सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी समितीस विदित केले की, सामाजिक न्याय विभागांतर्गत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित संस्थांमधील प्रवेशार्थीना दरमहा दरडोई परिपोषणासाठी अनुदान देण्यात येते. दिनांक २७.५.२००८ रोजी या संदर्भात निर्णय झाला. त्यानुसार ५०० रुपये परिपोषण अनुदान देण्यात येते, ते बदलून दरमहा दरडोई ६३० रुपये दिनांक १.४.२००८ पासून लागू करण्यास शासनाने मंजुरी दिली. अनुदान सन २००८-२००९ मध्ये देण्यात आले. मात्र ते सन २००७-२००८ च्या असेसमेंटचे (मूल्यांकनाचे) होते. सन २००७-०८ मध्ये परिपोषणाचा दर ५०० रुपये होता. एकूण १७ शाळांकडून जादा अनुदान घेण्यात आले, ते एकूण ९,१२,३८२ रुपये होते. १४ संस्थांकडून सन २०११-१२ मध्ये जादा अनुदान वसूल करण्यात आले. उर्वरित ३ संस्थाकडून सन २०१५-१६ मध्ये जादा अनुदान वसूल करण्यात आले. जादा प्रदान झालेली ९,१२,३८२ रुपये रक्कम संबंधित संस्थांकडून वसूल केली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ही चूक परिपत्रकामुळे झाली की नजरचुकीमुळे झाली. असेसमेंट सन २००७-०८ चे होते. संबंधितांने ५०० रुपये दिले पाहिजे होते, मात्र ६३० रुपये दिले, याचे कारण काय आहे, अकाऊंट ऑफिसर वगैरे कोणी तरी यासाठी जबाबदार असेलच. कारण त्यांनी ॲसेसमेंट नीट पाहिले नाही. मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांपासून कनिष्ठ स्तरावरील देयक अदा करणाऱ्यापर्यंत हे कोणाच्याही लक्षात येऊ नये, ही गंभीर बाब आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी हे तपासले पाहिजे होते. सचिवांनी या संदर्भात मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना विचारले आहे का, यावर सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी समितीस विदित केले की, दिनांक २७ मे, २००८ रोजी परिपत्रक काढले आणि परिपोषणाचा दर दिनांक १.४.२००८ पासून लागू केला. परिपोषण अनुदान सन २००८-०९ मध्ये दिले ते सन २००७-०८ च्या ॲसेसमेंटचे होते. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीला विदित केले की, पूर्वी हे तपासले होते, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले होते की, हे नजरचुकीने झाले आहे. यामध्ये कोणतेही मॅनिप्युलेशन नव्हते. रक्कम अगोदरच्या वर्षीची असून ती वसूल केली आहे. पूर्ण रक्कम परत केली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी आणि समाजकल्याण अधिकारी यांनी चौकशी केली असून सदरची बाब नजरचुकीने झालेली असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, संबंधितांना समज देऊन, कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे काय, खाजगी संस्था पैसे उचलतात एका विद्यार्थ्याची उपस्थिती ४ संस्थांत दाखविली जाते. जिल्हा परिषद हा पैसा वाचवू शकते. संबंधित विभागानेच निर्णय घेतला आहे की, बायोमेट्रिक बंधनकारक करून आधार लिंक करण्यात येणार आहे. सामाजिक न्याय विभागाच्या सर्व वसतिगृहांना एकत्रित करून पैसे दिले तर अनियमिततेस आळा बसेल, या संदर्भात शासनाने काही निर्णय घेतला आहे का किंवा शासनाच्या विचाराधीन आहे का, असेल तर, कधीपर्यंत करणार आहात, यावर सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी समितीस विदित केले की, सामाजिक न्याय विभागांतर्गत अपंगांच्या संस्था आहेत, त्यामध्ये बायोमेट्रिक यंत्रणा बंधनकारक केली आहे. त्यांचे अनुदान निर्धारण करताना बायोमेट्रिक मशिन लावली आहे का, याची खात्री केली जाते आणि नंतरच अनुदान दिले जाते. सर्व संस्थांमध्ये हे बंधनकारक केले आहे. बायोमेट्रिकची खात्री केल्यावरच देयके काढली जात आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, लेखा व वित्त अधिकारी ही यंत्रणा आहे. मग त्यांच्या निदर्शनास आले नाही का, मागच्या काळात उपरोक्त शासन निर्णयाच्या आधारे पैसे वाटप केले आहेत. त्यांनी सन २००७-०८ चे ६३० रुपयांच्या हिशोबाने का केले. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, त्यावर्षी दर बदलले आहेत. यावर सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी समितीस विदित केले की, तो ट्रान्समिशन फेज होता. ५०० रुपयांवरुन ६३० रुपये झाले होते त्यामुळे हे नजरचुकीने झाले आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २००८-०९ ला असेसमेंट होऊन सन २००७-०८ चे पैसे वितरित केले. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीला विदित केले की, सन २००७-०८ चे पैसे सन २००८-०९ ला वितरित केले आहेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २००८-०९ च्या स्थानिक लेखा परीक्षा अहवालाप्रमाणे सन २००७-०८ मध्ये परिपोषण अनुदान प्रदान करण्यात आले. यावर सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी समितीला विदित केले की, सन २००७-०८ चे पैसे दिले आहेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २००७-०८ चे लेखा परिक्षण सन २००८-०९ ला झाले तर ते सन २००८-०९ चे पैसे कसे देतील ? सन २००८-०९ ला अखर्चित रक्कम दाखविली पाहिजे होती. सन २००८-०९ पैसे खर्च झालेले दिसत आहेत, म्हणून आक्षेप आहे. सन २००८-०९ ला परिक्षण झाले आहे. खर्चाची नोंद आली, म्हणून आक्षेप घेतला आहे. सन २००८-०९ चे लेखा परिक्षण आहे. सन २००७-०८ ला पैसे वितरित झाले आहेत. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी समितीस विदित केले की, सन २००७-०८ च्या खर्चाचे ॲसेसमेंट सन २००८-०९ ला झाले आहे. सन २००८-०९ चे लेखापरिक्षण सन २००८-०९ च्या डिसेंबरमध्ये केले आहे. विभागाकडून करण्यात आलेली कार्यवाही बरोबर आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ही बाब निदर्शनास आल्यावर जिल्हा परिषदेने त्वरित कारवाई करणे अपेक्षित होते. पैसे रिलिज करताना या नस्तीला शासन निर्णय जोडला नव्हता का, यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीला विदित केले की, यामध्ये चूक झाली आहे हे मान्य आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, यामध्ये सचिवांची चूक नाही. सचिवांनी अशाप्रकारे मान्य केले तर अशा चुका राज्यभर वारंवार होत राहतील, पुन्हा पुन्हा असेच प्रश्न उपस्थित होत राहतील. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस आश्वासित केले की, अशा बाबींची पुनरावृत्ती होऊ नये याकरिताच मोजणी संगणकाद्वारे केली जाते. यावर समितीने असे निदेश दिले की, सचिवांनी सांगितल्याप्रमाणे या प्रकरणी चूक झालेली आहे मात्र वसूली देखील केलेली आहे. अशा चुका यापुढे होणार नाहीत या करिता सर्व स्तरावर दक्षता घ्यावी.

## अभिप्राय व शिफारशी

महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय दिनांक २७ मे, २००८ **(परिशिष्ट २.१)** अन्वये अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळा मधील निवासी विद्यार्थ्यांसाठी परिपोषण दर रुपये ६३० दिनांक १ एप्रिल, २००८ पासून लागू करण्यात आला. सन २००७-०८ या वर्षातील परिपोषण दर रुपये ५०० होता. परंतू विभागाने आक्षेपातील संस्थांचे सन २००७-०८ या आथिर्क वर्षाचे अनुदान निर्धारण सन २००८-०९ मध्ये करतांना परिपोषणाचा मासिक दर रुपये ५०० असतांना रुपये ६३० वाढीव दर निर्धारित करून संस्थांना रकमांचे प्रदान केले आहे. त्यामुळे रुपये ९,१६,८८२ व्याजासह वसूल होणे आवश्यक आहे असा आक्षेप लेखापरिक्षकांनी प्रस्तुत प्रकरणात घेतला. सदर आक्षेपावर जिल्हा परिषद, नागपूर यांनी निर्धारणामध्ये एकूण आक्षेपित १७ निवासी शाळांचे रुपये ९,१२,३८२ वसूल करण्यात आले असल्याचा लेखी खुलासा केला.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता प्रस्तुत प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन सुमारे ९,१२,३८२ रुपये अतिप्रदान करण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध सविस्तर चौकशी करून शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निदेश दिले होते. समितीच्या निदेशानुसार प्रस्तुत प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करून अहवाल सादर केलेला आहे. सदरहू अहवालात अतिप्रदान झालेली रक्कम वसूल केली नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्याचे दिसून येत नाही किंवा संस्थेचा कोणताही फायदा झालेला नाही असे अभिप्राय देण्यात आले आहेत. शासनाचे नुकसान झाले नाही किंवा अतिप्रदान झालेली रक्कम वसूल करण्यात आली आहे असे म्हणणे म्हणजे समितीची दिशाभूल करून दोषींना पाठीशी घालण्याचा प्रकार जिल्हा परिषदेकडून केला जात आहे. सन २००८-०९ या वर्षाच्या लेखा आक्षेपातील अतिप्रदानाची रक्कम समितीने सप्टेंबर, २०१५ मध्ये जिल्हा परिषदेस भेट देईपर्यंत वसूल करण्यात आलेली नव्हती. कारण वर नमूद वसूलीच्या विवरणपत्रात वसूली केव्हा झाली याचे दिनांक नमूद करण्यात आलेले नाही. याउलट समितीच्या भेटीच्या दरम्यान तब्बल ६ वर्षाच्या विलंबानंतर दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ रोजी व त्यादरम्यान आक्षेपित निवासी शाळांना लेखा आक्षेपातील अतिप्रदान वसूलीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. अतिप्रदान करण्यात आलेली सुमारे ९ लाखांपेक्षा अधिक असलेली रक्कम ६ वर्ष वसूल झाली नाही तरी देखील समाजकल्याण अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यामध्ये शासनाचे कोणतेही नुकसान झालेले नाही हे स्वाक्षरीनिशी कोणत्या आधारावर समितीस सांगतात हे अनाकलनिय आहे.

**अतः सन २००८-०९ या वर्षाचा लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवाल विधानमंडळास सादर झाल्यापासून प्रस्तुत प्रकरणातील अतिप्रदान झालेली रक्कम ६ वर्षे विलंबाने वसूल करण्यास जबाबदार असलेल्या तत्कालीन समाजकल्याण अधिकाऱ्यांवर याची जबाबदारी निश्चित करून महाराष्ट्र नागरी सेवा नियमाअंतर्गत योग्य ती कारवाई सामाजिक न्याय विभागाने करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, नागपूर

### मागासवर्गीय महिलांच्या विकासासाठी १०० टक्के अनुदानावर शिलाई मशीनचा पुरवठा करण्याबाबत (परिच्छेद ३.८४७) (सन २००८-२००९)

विभागाने आर्थिक वर्षात मागासवर्गीय महिलांना विकासासाठी १०० टक्के अनुदानावर शिलाई मशीन पुरवठा करणेकरिता रुपये १०,९७,६४९ खर्च करण्यात आला. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत :—

(१) महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखस/(२५१२)/उद्योग मंत्रालय, दिनांक ०२.०१.१९९२ तसेच मॅन्युअल ऑफ ऑफिस प्रोसिजर ऑफ परचेस ऑफ स्टोअर्स बाय दी गव्हर्नमेंट डिपार्टमेंट अन्वये शासनाने केलेल्या दरकरारानुसार संबंधितांकडून खरेदी करणे बंधनकारक असताना शासनाच्या दरकराराप्रमाणे खरेदी करण्यात आलेली नाही. सदर बाब गंभीर आहे.

(२) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग परिपत्रक क्र.झेडपीए-०८/प्र.क्र.४४६/वित्त-९, मंत्रालय, मुंबई दिनांक २०.०६.२००८ अन्वये योजनांच्या अंमलबजावणीकरिता नियोजनबद्ध रितीने आखणी केलेली नाही. सबब खुलासा करणे आवश्यक आहे.

(३) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. मागास/०९/प्र.क्र.४०८/३४/मंत्रालय, मुंबई दिनांक २०.०४.२००९ अन्वये समाजकल्याण समितीने लाभार्थी निवडीच्या ठरावास प्रसिद्धी देऊन सूचना आक्षेप मागविणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांच्याकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

(१) मागासवर्गीय महिलांना विकासासाठी १०० टक्के अनुदानावर शिलाई मशीनचा पुरवठा करण्यासाठी सन २००८-०९ मध्ये एम.झेड इंटरप्राईजेस, नांदेड यांचे गोदावरी कंपनीचे व सुत्राचे इंजि. लिमिटेड, सोलापूर यांचे कायना कंपनीच्या शिवण यंत्राच्या रु. २४९० चे दरकरार मंजूर होते. सन २००७-०८ या वर्षात एम.झेड इंटरप्राईजेस, नांदेड यांना दर करारानुसार शिवणयंत्र पुरवठा करण्यासाठी पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. परंतु त्यांनी पुरवठा केला नसल्याने जिल्हा परिषदेद्वारे जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे सहमतीने जाहीर निविदा प्रक्रिया द्वारे खरेदी करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार जाहिरात पत्र क्र. २२६२ दिनांक १.११.२००८ रोजी साहित्य खरेदीकरिता निविदा जाहिरात दैनिक लोकमत, दैनिक लोकमत टाईम्स व नवभारत समाचार या वृत्तपत्रात प्रकाशित करून एस.एस.मार्केटिंग अमरावती यांचे दर सर्वात कमी असल्याने यांना पुरवठा आदेश देऊन खरेदी केलेली आहे. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दि. २१.२.२००९ अन्वये समाजकल्याण विभागाच्या वरील खरेदीस मान्यता प्रदान करून दरकरारापेक्षा कमी दराच्या खरेदीस मंजुरी प्रदान केली.

(२) सदर योजनेच्या नियोजनबद्ध अंमलबजावणीकरिता प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी प्राप्त करून त्यानंतर पंचायत समितीकडून लाभार्थी अर्ज मागवून व लाभार्थी यादी मंजूर करण्यात येऊनच निविदा प्रक्रियेद्वारे खरेदी करून लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे. आर्थिक वर्ष संपण्याआधी सदर योजनेचा मागासवर्गीयांना वेळेत लाभ देणे असा जिल्हा परिषदेचा हेतू आहे.

(३) लाभार्थ्यांची निवड करण्यापूर्वी लाभार्थ्यांचे अर्ज गटविकास अधिकाऱ्याकडून प्रसिद्धी देऊन प्राप्त होतात. तसेच जिल्हा परिषदेचे सर्व सदस्यांना तसेच पंचायत समिती सदस्य यांना याद्या निरिक्षणासाठी अवलोकनार्थ ठेवण्यात येऊन त्यांचे आक्षेप असल्यास दुरुस्ती करण्यात येते. वरील प्रक्रिया केल्यानंतर लाभार्थी यादी मंजुरीस्तव विषय समिती मध्ये ठेवण्यात येते. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक २२.१२.२००८ नुसार पात्र मंजूर लाभार्थी यादीस सर्वानुमते विषय क्र. ६ अन्वये मंजुरी प्रदान केली आहे, त्याची प्रत सोबत जोडली आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २९ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, शिलाई मशीन खरेदी दर कराराऐवजी जाहीर निवेदेद्वारे केली आहे. निविदेद्वारे कोणत्या कंपनीच्या शिलाई मशिन्स खरेदी केल्या व शिलाई मशिनच्या गुणवत्तेची खात्री कोणी व कशी केली, ग्राम विकास विभाग व जलसंधारण विभागाच्या दिनांक २० एप्रिल, २००९ च्या शासन निर्णयानुसार लाभार्थी निवडीस प्रसिद्धी देऊन सूचना/आक्षेप मागविणे आवश्यक होते, ही कार्यवाही कोणत्या प्राधिकारान्वये डावलली, यावर समाज कल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, आरसी नुसार ८ दिवसांच्या अवधीत खर्च करणे आवश्यक होते. परंतु पुरवठादाराने पुरवठा न केल्यामुळे जाहिरात देऊन, निविदा काढून लवकरात लवकर खर्च करावा असा सन २००८-०९ मध्ये जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत निर्णय घेण्यात आला व त्यानुसार कार्यवाही करण्यात आली. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, ३ वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात देण्यात आली, त्यामुळे खर्च वाढला आहे. तसेच समितीने अशी विचारणा केली की, कोणत्या वर्तमानपत्रात जाहिरात दिली होती, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विचारणा केली की, नागपूर लोकमत या स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात दिली होती. या संदर्भात अनावश्यक प्रक्रिया झाली आहे. जिल्हा परिषदेने या संदर्भात चौकशी केली आहे. परंतु सदर नस्ती सापडत नाही. यावर समाजकल्याण

अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, १५ ते २० दिवसांपासून आम्ही सातत्याने शोध घेऊनही सदर नस्ती सापडली नाही. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, नस्ती न सापडणे, ही अतिशय गंभीर बाब आहे. या संदर्भात सविस्तर चौकशी करून संबंधितांविरुद्ध जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारार्थी उत्तर दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

मागासवर्गीय महिलांना विकासासाठी १०० टक्के अनुदानावर शिलाई मशीन खरेदी प्रकरणी लोकमत या स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात दिली होती. या संदर्भातील नस्ती सापडत नसल्या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यानुसार दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, दिनांक २० जून २००८ अन्वये जिल्हा परिषदांच्या स्वतःच्या उत्पन्नातून राबविण्यात येणाऱ्या योजनांकरिता साहित्य खरेदीच्या प्रक्रियेतील विलंब टाळण्यासाठी खरेदी करावयाच्या साहित्य/ वस्तू संबंधी दर करार अस्तित्वात नसल्यास खुल्या बाजारातूंन निविदा मागवून साहित्य खरेदीची प्रक्रिया वेळेतच पूर्ण करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार पत्र क्र. २२६२, दिनांक १/११/२००८ अन्वये साहित्य खरेदीकरिता दैनिक लोकमत या स्थानिक वृत्तपत्रात निविदा सूचना प्रकाशित करण्याबाबत पत्र देण्यात आले त्यावेळी शिलाई मशीनसाठी शासकीय दर करार अस्तित्वात नव्हता. उद्योग विभागाने दिनांक ३ नोव्हेंबर २००८ चे आदेशान्वये शिलाई मशीन खरेदीकरिता दि.३/११/२००८ ते ३०/६/२००९या कालावधीकरिता दर करार निश्चित केलेला होता.

लेखापरिक्षणाच्या कालावधीत या संदर्भातील नस्ती जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद या कार्यालयाकडून परिक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात आली नाही व नस्ती गहाळ झाल्याचे कारण सांगून तत्कालीन जिल्हा समाजकल्याण अधिकारी व त्या कालावधीत सदर योजनेची कार्यभार असलेल्या समाजकल्याण निरिक्षकांना कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागविण्यात आला होता. तत्कालीन समाजकल्याण निरीक्षक, श्रीमती एस.आर. नान्हे, गृहपाल यांनी प्रादेशिक उपायुक्त, नागपूर कार्यालयाकडे केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने सदर नस्तीचा शोध घेण्याकरिता प्रादेशिक उपायुक्त, नागपूर कार्यालयाचे आदेश क्र.३२६०, दिनांक ११.७.२०१६ अन्वये सदर नस्ती शोधण्याकरिता ४ सदस्यांची समिती गठित करून नस्तीचा शोध घेण्यात आला व उक्त नस्ती जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचे कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेखामध्येच दि.१३.७.२०१६ रोजी सापडलेली आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नागपूर यांनी त्यांच्या दिनांक १२.१.२०१७ च्या पत्रान्वये कळविले आहे की, सदरची नस्ती सापडल्यामुळे तत्कालीन समाजकल्याण अधिकारी, श्री. माधव झोड यांच्या विरुद्ध करण्यात आलेली पोलीस तक्रार मागे घेण्यात आलेली आहे. त्यामुळे श्री.झोड यांचेवर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

तरी सदरचा खुलासा योग्य असल्याने शासन त्याच्याशी सहमत आहे.

**चौकशी अहवाल**

उपरोक्त प्रकरणी सन २००८-०९ मध्ये मागासवर्गीय महिलांच्या विकासासाठी १०० टक्के अनुदानांवर शिलाई मशीन पुरवठा करणे ही योजना राबविण्यात आली. सदर योजनेवर सन २००८-०९ मध्ये ११ लक्ष तरतूद करण्यात आली. त्यानुसार सदर योजनेस जिल्हा परिषद, विशेष सभा विषय क्र. ६ व ७ दि. २२.१२.२००८ अन्वये ११ लक्ष खर्चास मंजुरी प्राप्त झाली. त्यानुसार ४४१ मागासवर्गीय महिलांना शिलाई मशीन वाटपाच्या यादीला जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली असल्याचे इतिवृत्तावरुन दिसून येते.

(१) सन २००८-०९ वर्षात महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने शिलाई मशीन पुरवठा करणेबाबत दरकरार केलेला होता. सन २००८-०९ या वर्षात शासन दरकरात शिलाई मशीन रु. २४९० प्रती नग किंमत होती.

(२) शासनाचे दरकरारात ए.झेड इंटरप्राईजेस, नांदेड

(३) व सुत्रावे ईंजिनिअरींग लि. सोलापूर या फार्मचे दरकरार होते.

(४) सन २००७-०८ या वर्षात तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर सर्व बाबींची पूर्तता करून ए. झेड इंटरप्राईजेस, नांदेड दरकरारानुसार शिलाई मशीन पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतु त्यांनी त्या वर्षात पुरवठा केलेला नसल्याने जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दि. २१.०२.२००९ रोजी महिला व बाल कल्याण विभागाने सर्व प्रकारची प्रक्रिया करून ज्या पुरवठा धारकांकडून शिलाई मशीन खरेदीची कार्यवाही केली. त्यानुसार मे. एस.एम.मार्केटिंग, अमरावती यांचे दर वरील शासनाचे दरकरारापेक्षा रु. ०१ कमी असल्याने (खेतान कंपनी) जिल्हा परिषद, सर्वसाधारण सभेच्या सहमतीने समाजकल्याण विभागाने सुद्धा शिलाई मशीन खरेदी पुरवठ्याची कार्यवाही केली आहे.

निर्णय क्र. २, जानेवारी, १९९२ अन्वये शासनांनी केलेला दर करारानुसार संबंधिताकडून खरेदी करणे बंधनकारक आहे. सदर वर्षात शिलाई मशीन पुरवठा करण्याबाबत दर करार झालेला होता. सदर दर करार सुत्रावे इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि., चिंचोळी, सोलापूर यांचा होता. परंतु सन २००७-०८ मध्ये त्यांनी पुरवठा न केल्यामुळे जि.प. चे सर्वसाधारण सभेचे सहमतीने जाहीर निविदा प्रक्रियाद्वारे खरेदी करुन मागासवर्गीय महिलांना लाभ देण्यात आलेला आहे. उपयोगिता प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल यासोबत जोडण्यात येत आहे. परंतू सदर योजनेची नस्ती चौकशीच्या वेळेस सापडलेली नव्हती. सदर प्रकरणी संबंधित तत्कालीन अधिकारी व कर्मचारी तसेच त्रिस्तरीय समिती गठित करून सुद्धा सदर नस्तीचा शोध लागलेला नव्हता. त्यामुळे पोलीस स्टेशनला एफ.आय.आर देण्यात आलेला होता. दिनांक १२ फेब्रुवारी २०१६ रोजी सदर नस्ती समाज कल्याण विभागाच्या अधिनस्त असलेल्या अपंग बाल विकास गृहातील अभिलेख्यामध्ये आढळून आलेली आहे. त्यामुळे दोषीवर कार्यवाही करण्यात आलेली नाही. सदर बाब वगळून योजनेच्या खरेदीत कोणतीही अनियमितता झालेली नाही.

सदर आर्थिक वर्षातच मागासवर्गीय महिलांना विकासासाठी/उन्नतीसाठी लाभ देणे हा कार्यालयाचा हेतू होता. दर करार असतांना इतर प्रक्रियेद्वारे खरेदी न करण्याबाबत संबंधित विभागाला निर्देश देण्यात आलेले आहे. तसेच तत्कालीन अधिकारी, कर्मचारी यांना नस्ती गहाळ असल्याबाबत नोटीस देण्यात आलेली होती. समिती गठित करुनही नस्तीचा शोध लागलेला नव्हता. त्यामुळे सदर पोलीस स्टेशन मध्ये याबाबत एफ.आय.आर. दाखल केलेला होता. परंतु, पुन्हा नस्तीचा शोध घेतला असता दिनांक १२ फेब्रुवारी, २०१६ रोजी सदर नस्ती समाज कल्याण विभागाच्या अधिनस्त असलेल्या अपंग बाल विकास गृहातील अभिलेख्यामध्ये आढळून आलेली आहे. त्यामुळे दोषींवर कार्यवाही करण्यात आलेली नाही. सदर बाब वगळून योजनेच्या खरेदीत कोणतीही अनियमितता झालेली नाही.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, मागासवर्गीय महिलांना विकासासाठी १०० टक्के अनुदानावर शिलाई मशीन खरेदी प्रकरणी लोकमत या स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात दिली होती. या संदर्भातील नस्ती सापडत नसल्याप्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, या प्रश्नावर जिल्हा परिषदेने नस्ती सापडली आहे व त्यामुळे ही कारवाई मागे घेतल्याचे कळविलेले आहे. यावर सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी समितीला विदित केले की, सदर नस्तीचा शोध घेण्याकरिता दिनांक ११ जुलै २०१६ रोजी चार सदस्यांची चौकशी समिती गठित करुन नस्तीचा शोध घेण्यात आला, सदरहू नस्ती दिनांक १३ जुलै २०१६ रोजी सापडली आहे.

### अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, नागपूर अंतर्गत सन २००८-०९ या आर्थिक वर्षात मागासवर्गीय महिलांच्या विकासासाठी १०० टक्के अनुदानावर शिलाई मशिनचा पुरवठा करण्याकरिता रुपये १०,९७,६४९ खर्च करण्यात आला. याबाबत लेखा परिक्षकांनी आक्षेप उपस्थित केला की, शासनाने केलेल्या दरकरारानुसार संबंधितांकडून खरेदी करणे बंधनकारक असताना शासनाच्या दरकराराप्रमाणे खरेदी करण्यात आलेली नाही, योजनांच्या अंमलबजावणी करण्याकरिता नियोजनबद्ध रितीने आखणी केलेली नाही तसेच समाज कल्याण समितीने लाभार्थी निवडीच्या ठरावास प्रसिद्धी देऊन सूचना आक्षेप मागविण्यात आले नाहीत. सदर आक्षेपावर दर करारानुसार शिवणयंत्र पुरवठा करण्यासाठी पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. परंतु, त्यांनी पुरवठा केला नसल्याने निविदा प्रकाशित करुन दरकरारापेक्षा कमी दराच्या खरेदीस मंजुरी प्रदान केली. नियोजनबद्ध अंमलबजावणी करुनच लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे, तसेच लाभार्थ्यांचे अर्ज गट विकास अधिकाऱ्याकडून प्रसिद्धी देऊन प्राप्त होतात असा लेखी खुलासा जिल्हा परिषदेने समितीकडे केला.

प्रस्तुत प्रकरणात दर करारातील पुरवठादाराने पुरवठा आदेश देऊनही विहित मुदतीत पुरवठा केला नाही त्यामुळे सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने जाहीर निविदेद्वारे खरेदी करण्यात आली असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. सदर खरेदी ही दर करारापेक्षा कमी दराने करण्यात आलेली असल्यामुळे समिती जिल्हा परिषदेचा खुलासा मान्य करते. परंतु, दर करारातील पुरावठादारांना पुरवठा आदेश देऊनही त्यांनी पुरवठा केला नसल्यामुळे त्यांना काळ्या यादीत टाकणे इत्यादी कारवाई करणे आवश्यक आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे.

सन २००८-०९ च्या आक्षेपाधिन प्रकरणाची नस्ती समितीच्या भेटीच्या वेळीपर्यंत सापडली नसल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदीत केले. सदर नस्ती शोधण्याकरिता जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांनी चार सदस्यांची समिती गठित करुन नस्तीचा शोध घेतल्याची नविनच बाब समितीसमोर आली आहे. सदरहू समितीला देखील नस्ती सापडली नसल्यामुळे समाजकल्याण अधिकाऱ्यांनी नस्ती शोध समितीतील सदस्यांना

ताकीद दिल्याचेही समितीला आढळून आले. वस्तुतः पंचायती राज समितीसमोर आलेल्या आक्षेपाची नस्ती ज्या कर्मचाऱ्याच्या अभिरक्षेत होती ती गहाळ झाल्याप्रकरणी त्याचेवर जबाबदारी निश्चित करता आली असती परंतु, तत्कालिन समाजकल्याण अधिकारी, श्री. माधव झोड यांच्याविरुद्ध प्रशासनाने पोलीस तक्रार केली. अशा प्रकारची पोलिसांत तक्रार देण्याची घटना नवीन नाही परंतु, सेवानिवृत्तीस आलेल्या जेष्ठ व ज्यांचा सेवा कालावधी निष्कलंक पार पडला आहे अशा विभाग प्रमुखावर ते ही नियमानुसार सदर नस्ती त्याच्या अभिरक्षेत असते किंवा कसे याचा विचार न करता त्यांचे बदलीनंतर बऱ्याच कालावधीनंतर पोलीस तक्रार दाखल करणे व मागावून नस्ती सापडल्यानंतर ती पोलीस तक्रार मागे घेणे असा प्रकार अयोग्य असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे.

**प्रस्तुत प्रकरणात मागासवर्गीय महिलांच्या विकासासाठी ४४१ शिलाई मशीन खरेदी करुन वाटप करण्यात आलेल्या असल्यामुळे तसेच त्याबाबतचा फलश्रृती अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र समितीला सादर केले असल्यामुळे समिती प्रस्तुत प्रकरणातील आक्षेपावरील अनुपालनास मान्यता देते व नस्ती गहाळ प्रकरणी नस्ती शोध समिती किंवा तत्कालिन कर्मचाऱ्यांविरुद्ध पोलीस तक्रारी इत्यादी प्रकार पुन्हा घडू नये याकरिता दक्षता घ्यावी अशी शिफारस समिती करीत आहे.**

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, नागपूर

### सन २००३-२००४ व २००५-२००६ मध्ये राबविण्यात आलेल्या योजनेवरील थकित प्रदानाबाबत

**(परिच्छेद ३.९२२) (सन २००८-२००९)**

सन २००३-०४ व २००५-०६ या आर्थिक वर्षामध्ये विविध लेखाशीर्षा अंतर्गत लाभार्थी यांना सायकल वाटप व शिलाई मशीन वाटपासंबंधी योजना राबविण्यात आली असून या योजनेकरिता खरेदी करण्यात आलेल्या साहित्यावरील प्रलंबित असलेली थकित रक्कम प्रदान करण्यापुर्वी शासनाची पूर्व मंजुरी प्राप्त करुन न घेता तसेच थकित रक्कम प्रदान करण्यासंबंधात शासनासोबत पत्र व्यवहारामार्फत पाठपुरावा न करता पुरवठा धारकांना नियमबाह्यरित्या रुपये २१,६५,११३ प्रदान करण्यात आले आहे. सदर प्रदानासंबंधी अनुषंगिक दस्ताऐवजासह लेखापरिक्षणास खात्री पटविणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २००३-०४ या वर्षातील सायकल पुरवठा पुढील वर्षात २००४-०५ मध्ये करण्यात आल्याने तसेच २००५-०६ या वर्षातील पुरवठा पुढील वर्षात म्हणजेच सन २००६-०७ (पुरवठा दिनांक १८ ऑगस्ट २००६) ला केल्याने उपरोक्त पुरवठा रक्कम संबंधित वर्षात अदा करता आली नाही. तथापि, सदर प्रलंबित रक्कम चालू वर्षातील निधीतून अदा करणेसाठी या कार्यालयीन पत्र क्र. ८३५, दिनांक २९ जून २००७ ला आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे यांना रक्कम अदा करण्याकरिता मंजुरी मागविण्यात आली आहे.

उपरोक्त कालावधीत पुरवठादाराला रक्कमेचे शोधन न झाल्यामुळे पुरवठादाराने रक्कम १८ टक्के व्याजासह मिळणेकरिता दि. २३ जानेवारी २००९ ला विभागीय आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण) यांना कायदेशीर नोटिस दिली. त्यामुळे रकमेचे शोधन करण्याकरिता कार्यालयीन पत्र क्र. १९३ दिनांक २० फेब्रुवारी २००९ नुसार सचिव, आदिवासी विभाग यांना व पत्र १९१ व १९४ नुसार आयुक्त, महिला व बाल कल्याण, पुणे यांना सन २००३-०४ व सन २००५-०६ ची देयके सन २००८-०९ मधील तरतूदीतून अदा करण्याबाबत मंजूर करण्यास्तव विनंती करण्यात आली आहे. तसेच पत्र क्र. ९१९/दिनांक ३ जुलै २००९ पत्रान्वये सचिव, महिला व बाल विकास, मुंबई यांना कार्योत्तर मंजुरी मागविण्यात आली आहे. त्याबाबतचे दस्तऐवज यासोबत जोडण्यात आले आहे.

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात शासनाकडून विविध योजने अंतर्गत अनुदान प्राप्त झालेले असून सदर अनुदानातून पुरवठादारास साहित्य पुरवठा केल्याबाबत देणे असलेली थकित रक्कम अदा करणेबाबत जिल्हा परिषद सभेची तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुरवठादाराची रक्कम प्रदान करणेकरिता मान्यता प्रदान केलेली आहे.

सन २००३-०४ व २००५-०६ या कालावधीत साहित्याचा पुरवठा करुनही जिल्हा परिषदेने पुरवठाधारकाचे देयक अदा न केल्यामुळे पुरवठादाराने दिनांक १५ जानेवारी २००९ ला थकित रक्कम १८ टक्के दंडनीय व्याजासह मिळण्याकरिता जिल्हा परिषद प्रशासनाला कायदेशीर नोटीस दिल्यामुळे विभागाने तसेच जिल्हा परिषदेने सर्वसाधारण सभा दिनांक ११ फेब्रुवारी २००९ चे मंजुरी नुसार उपलब्ध असलेल्या अनुदानातून पुरवठादारास थकित रक्कम अदा करण्यात आली.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २९ सप्टेंबर २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सन २००३-०४ व २००५-०६ मध्ये शिलाई मशीन व सायकल पुरवठ्याचे आदेश अनुक्रमे दिनांक ३१ मार्च २००४ व ३१ जानेवारी २००६ अन्वये दिले होते. साहित्याचा अनुक्रमे दिनांक २६ ऑगस्ट २००४ व १२ ऑगस्ट २००६ रोजी पुरवठा केला होता. साहित्य पुरवठ्याची मुदत किती होती, पुरवठा विलंबाने झाला आहे का, ज्या त्या वर्षातील पुरवठा पूर्ण झाल्यानंतर त्याच वर्षात पुरवठादास प्रदान करण्यास कोणत्या अडचणी आल्या होत्या, त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण) यांनी समितीस खुलासा केला की, सन २००३-०४ मध्ये सायकल खरेदी केल्या, सन २००५-०६ मध्ये सायकल व शिलाई मशिन खरेदी केल्या. सन २००३-०४ मध्ये केलेल्या खरेदीचा पुरवठा आदेश दिनांक ३१ मार्च २००४ होता, तो पुरवठा सन २००३-०४ मध्ये होऊ शकला नाही. त्यामुळे सन २००३-०४ मध्ये खरेदी करता आली नाही. सन २००५-०६ मध्ये शिलाई मशिन व सायकलची खरेदी केली होती. दोन्हीचे पुरवठा आदेश दिनांक २९ मार्च २००६ चे होते. त्यामुळे सन २००५-०६ मध्ये पुरवठा झाला नाही. त्याचे प्रदान सन २००५-०६ मध्ये करू शकलो नाही. कारण संबंधित पुरवठादाराने नोटीस दिली होती की, १८ टक्के व्याजाने वसूली का करण्यात येऊ नये, साहित्य खरेदी केले असल्याने त्याला प्रदान करणे आवश्यक होते. त्यामुळे सन २००८-०९ मध्ये सदर योजनांसाठी प्राप्त झालेल्या अनुदानातून थकित प्रदान करण्यात आले. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, दोन्ही वर्षांच्या खरेदी संदर्भात पुरवठा आदेश कधी दिले आणि पुरवठा कधी झाला, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व

बालकल्याण विभाग) यांच्याकडून समितीस अशी माहिती देण्यात आली की, सन २००३-०४ ची टी.एस.पी. योजनेची रुपये ८१२४ रक्कम वजा केली आहे. वित्तीय वर्षाचा पुरवठा दिनांक ३१.०३.२००४ आहे. सन २००५-०६ चा पुरवठा आदेश दिनांक २९.०३.२००६ रोजी दिला असतांना पुरवठा झालाच नाही, सदरहू पुरवठा सन २००६-०७ मध्ये झाल्याने प्रदान करू शकलो नाही. समितीने पुढे अशी विचारणा केली की, दिनांक ३१.०३.२००४ व दिनांक ३.०१.२००६ ला आदेश दिले आणि साहित्य अनुक्रमे दिनांक २६.०८.२००४ व दिनांक १२.०८.२००६ ला पुरवठा झाला. यास ७ महिन्यांचा विलंब झाला सदरहू रक्कम कधी प्रदान करण्यात आली, त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण) यांनी खुलासा केला की, दंड वसूल झाला आहे. रक्कम सन २००८-०९ मध्ये प्रदान केली. पुरवठा पुढील वर्षामध्ये झाल्यामुळे सन २००५-०६ मध्ये प्रदान करू शकलो नाही. थकित रक्कम प्रदान करण्याची परवानगी मागितली होती. परंतु, मंजुरी काही प्राप्त झाली नाही. रक्कम प्रदान करण्यात यावी आणि त्यावर १८ टक्के व्याज द्यावे अशी सन २००८-०९ मध्ये ठेकेदाराने नोटीस पाठविली. संबंधित ठेकेदारांकडून माल खरेदी केलेला असल्यामुळे त्याला रक्कम प्रदान करणे आवश्यक आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, थकित रक्कम देण्यासाठी शासनाची अनुमती घेतली का, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) यांनी समितीस विदित केले की, शासनाची अनुमती घेतली नाही. यावर समितीने विचारणा केली की, थकित रक्कम कोणत्या प्राधिकारात दिली, यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर यांनी समितीस विदित केले की, सन २००८ मध्ये जिल्हा परिषदेला एका वित्तीय वर्षात ३१ मार्चपर्यंत अनुदान खर्च करण्याची अट होती. आता २ वर्षांची मुदत केली आहे, त्यामुळे जिल्हा परिषद ते अनुदान पुढील ३१ मार्चपर्यंत खर्च करू शकतो. सन २००८ पूर्वी त्या वर्षात पैसे व्यपगत होत होते. त्यावेळी ऑर्डर दिली, मात्र पैसे व्यपगत झाले. खरेदी केली होती. ठेकेदाराने १८ टक्के व्याजाने वसूली का करण्यात येऊ नये अशी नोटीस दिली, त्यावेळी जिल्हा परिषदेने शासनाला वारंवार विचारणा करुन आम्हाला परवानगी द्या नाही तर १८ टक्के दराने व्याज द्यावे लागेल असे सांगितले होते. दंड लागू नये म्हणून चालू वर्षी जे अनुदान आले होते त्यातून पैसे दिले. पूर्वीचे अनुदान शासनाला समर्पित केले होते. यावर समितीने अशी विचारणा केली की, सन २००३-०४ चे ५८ लाख रुपये दिले. कार्यवाही पूर्ण केली मग देयक अदा का केले नाही, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ३१ मार्चला पेमेंट करणे गरजेचे होते, पुरवठा करून घेतला, मात्र पेमेंट ३१ मार्चपर्यंत झाले नाही. ऑर्डर ३१ मार्चला दिली असल्यामुळे २ वेळा निधी व्यपगत झाला. शासनाच्या परवानगी शिवाय रक्कम खर्च करता येत नाही. त्यामुळे सन २००८-०९ मध्ये जे अनुदान आले त्यातून मागचे देणे दिले आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, मग १८ टक्के दंडाची रक्कम दिली का, प्रवीण ॲण्ड कंपनी यांच्याकडून कोणती खरेदी केली होती, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, देयक अदा केल्यामुळे दंडाची रक्कम द्यावी लागली नाही. सन २००३-०४ मध्ये त्यांच्याकडून सायकली खरेदी केल्या होत्या आणि सन २००५-०६ मध्ये सायकली व शिलाई मशिन खरेदी केल्या होत्या. यावर संचालक (स्थानिक निधी लेखा) यांनी विचारणा केली की, सन २००३-०४ मध्ये तो डिफॉल्टर होता. मग सन २००५-०६ मध्ये त्याला ऑर्डर का दिली, पुरवठा आदेश किती तारखेचा आहे, पुरवठादाराने वेळेवर पुरवठा केला नाही. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण) यांनी नकारार्थी उत्तर दिले. पुरवठा आदेशाचा दिनांक ३१.०३.२००४ आहे. यावर संचालक (स्थानिक निधी लेखा) यांनी विचारणा केली की, तो एकाच दिवशी पुरवठा कसा करू शकेल, पुरवठा होणे शक्य नाही तर मग पुरवठा आदेश का दिला, ३१ तारखेनंतर निधी व्यपगत होतो तर मग पुरवठा आदेश द्यायला नको होते. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, ३१ मार्चला पुरवठा आदेश द्यायला नको होता. निधी तसा व्यपगतच होणार होता, त्यामुळे ऑर्डर द्यायला नको होती. यावर समितीने अशी विचारणा केली की, अखर्चित निधीच्या प्रकरणांच्या संदर्भात जिल्हा परिषद शासनाला वारंवार मागणी करतात परंतु शासन त्यांना मान्यता देत नाही. शासनाकडून मान्यता न मिळण्याचे किंवा विलंब होण्याचे कारण काय आहे, यावर उप मुख्य कार्यकारी, नागपूर यांनी समितीला अशी माहिती दिली की, पूर्वी अखर्चित निधीच्या संदर्भात नियोजन विभागाला नस्ती पाठविण्यात येत होती. परंतु शासनाच्या नवीन निर्णयाप्रमाणे या संदर्भातील अधिकार संबंधित विभागाला दिले आहेत. शासनाने दिनांक २५ ऑगस्ट २०१५ ला निर्णय घेतला की, नियोजन विभागाकडे प्रलंबित असलेल्या सर्व अखर्चित रकमेच्या नस्ती मागवून घ्याव्यात. सदर विषयाच्या संदर्भात चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सन २००३-२००४ व २००५-२००६ या वित्तीय वर्षात शिलाई मशीन व सायकल पुरवठा आदेश अनुक्रमे दिनांक ३१ मार्च २००४ व दिनांक ३१ जानेवारी, २००६ रोजी दिले होते. तथापि, सदर पुरवठा अनुक्रमे दिनांक २६ ऑगस्ट, २००४ व दिनांक १२ ऑगस्ट, २००६ रोजी करण्यात आला, या प्रकरणी राज्य शासनाच्या दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये काय कारवाई करण्यात आली ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सन २००३-२००४ टी.एस.पी, ओ.टी.एस.पी व एस.सी.पी अंतर्गत सायकल वाटप योजनेसाठी अनुक्रमे रुपये ९०००, ३३३३ व ५०,००० एवढी तरतूद उपलब्ध होती. सदर तरतूद संबंधीत वर्षात साहित्याचा पुरवठा न झाल्याने अदा करण्यात आली नाही व ती अखर्चित होती. त्याचप्रमाणे सन २००५-०६ मध्ये सायकल खरेदीसाठी एस.सी.पी व ओ.टी.एस.पी. अंतर्गत प्रत्येकी १०.०० लाख याप्रमाणे रु. २०.०० लाख तरतूद उपलब्ध होती तर शिलाई मशिन करिता सर्वसाधारण व विशेष घटक योजनेअंतर्गत अनुक्रमे रु. ४,००,००० व रु.७,७५,००० तरतूद उपलब्ध होती. सदर सायकल व शिलाई मशिनचा पुरवठा २००५-०६ मध्ये न झाल्याने सदरची तरतूद अखर्चित राहिली.

जिल्हा परिषद, नागपूर अंतर्गत विशेष मोहीमे अंतर्गत सन १९९९-२००० ते २००७-०८ पर्यंतच्या सर्व अखर्चित रक्कमा दिनांक ०२/०२/२०१० रोजी शासन खात्यात जमा करण्यात आल्या, त्यानुसार महिला व बाल कल्याण विभागाने २,४२,२५,७३७ इतकी रक्कम जमा करण्यात आली. दि. २५/०८/२०१५ चे शासन निर्णयात अखर्चित निधी खर्च करण्याची कार्यप्रणाली विषद केलेली आहे. तसेच अखर्चित निधी शासनास जमा करण्याबाबत निर्देशीत करण्यात आलेले आहे. उपरोक्त अखर्चित रक्कम अगोदरच शासन खाती जमा करण्यात आल्यामुळे संबंधीत शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्याची आवश्यकता भासली नाही.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात मंत्रालयीन विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**महिला व बाल विकास विभाग -** जिल्हा परिषद, नागपूर यांनी दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे.

**चौकशी अहवाल**

संबंधित परिच्छेदांचे अनुषंगाने कार्यालयांत उपलब्ध नस्ती तसेच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेशी चर्चा करून खालील प्रमाणे चौकशी अहवाल सादर करण्यात येत आहे.

जिल्हा परिषद नागपूर अंतर्गत २००३-०४ मध्ये शाळेत जाणाऱ्या मुलींसाठी सायकल वाटप योजना (१० टक्के लाभार्थी हिस्सा) राबविण्यात आली. सदर योजनेत सन २००३-०४ साठी पुढील प्रमाणे तरतूद उपलब्ध होती.

| अ.क्र. | योजना | सन २००३-०४ उपलब्ध तरतूद | ९०% | १०% | एकूण पुरवठा आदेश |
|---|---|---|---|---|---|
| १. | जि.प.सेस | ८१०००० | ८०९२२५ | ८९९१४ | ८९९१३९ |
| २. | TSP | ९००० | ८१२४ | ९०३ | ९०२७ |
| ३. | OTSP | ३०३३३ | २९२४९ | ३२४९ | ३२४९८ |
| ४. | SCP | ५०००० | ४८७४८ | ५४१६ | ५४१६४ |
| | **एकूण** | **८९९३३३** | **८९५३४६** | **९९४८२** | **९९४८२८** |

सदर उपलब्ध तरतूदीमधून शाळेत जाणाऱ्या मुलींसाठी सायकल वाटप योजनेअंतर्गत पुरवठा आदेश दिनांक ३१-३-२००४ रोजी देण्यात आला. याकरिता शासन दर करार क्रमांक-एसपीसी/आरसीपी/बायसिकल/५-२००३-०४सी/११४११, दिनांक १७-३-२००३ नुसार दरकरार ठरविण्यात आला होता. यानुसार एकूण १३ पंचायत समितीसाठी ५५१ सायकली पुरवठा करण्यांचा आदेश मे.प्रविण ॲण्ड कंपनी, मुंबई यांना देण्यात आला. पुरवठादाराने सदर सायकलींचा पुरवठा पुढील वर्षात म्हणजेच सन २००४-०५ मध्ये दिनांक २८-८-२००४ पर्यंत पूर्ण केला. सन २००३-०४ हे आर्थिक वर्षात पुरवठा न होवू शकल्याने व सन २००३-०४ या आर्थिक वर्षाचे लेखे बंद झाल्याने पुरवठ्यांची रक्कम अदा करता आली नाही. त्यामुळे सदर रक्कम जिल्हा परिषदकडे थकीत होती. यापैकी सन २००४-०५ मध्ये पुरवठा झाल्याने जिल्हा परिषदेने आपले स्वनिधीतून अर्थात जिल्हा परिषद सेस फंडातून दंडाची रक्कम रु. १४७०० कापून रु.८०९२२५ देयक अदा केले परंतू TSP, OTSP, SCP, या शासनाकडुन प्राप्त अनुदानाची प्रदान करता आले नाही. त्यामुळे सन २००३-०४ या वर्षाचे सायकल पुरवठा या योजनेतील १८५६०५ रुपये जिल्हा परिषदकडे थकीत होते.

वित्तीय वर्षे सन २००५-०६ मध्ये शाळेत जाणाऱ्या मुलींना सायकल पुरवठा व आर्थिकदृष्ट्या कमकुवत स्त्रियांकरिता शिलाई मशिन पुरवठा या योजना राबविण्यांत आल्या. वित्तीय वर्षे सन २००५-०६ मध्ये विविध लेखाशिर्ष अंतर्गत सायकल खरेदी तसेच शिलाई मशिन खरेदी करिता पुढील प्रमाणे तरतूद उपलब्ध होती.

**सायकल खरेदी**

| अ.क्र. | योजना | सन २००५-०६ उपलब्ध तरतूद | ९०% | १०% | एकूण पुरवठा आदेश |
|---|---|---|---|---|---|
| १. | सेस फंड | ७२५००० | ६५२३४७ | ७२४८३ | ७२४८३० |
| २. | विघयो | १०००००० | ८९९१८१ | ९९९०९ | ९९९०९० |
| ३. | OTSP | १०००००० | ८९९१८१ | ९९९०९ | ९९९०९० |
| | **एकूण** | **२७२५०००** | **२४५०७०९** | **२७२३०१** | **२७२३०१०** |

## शिलाई मशिन

| अ.क्र. | योजना | सन २००५-०६ उपलब्ध तरतूद | ९०% | १०% | एकूण पुरवठा आदेश |
|---|---|---|---|---|---|
| १. | सेस फंड | १०००००० | ८९८८९७ | ९९८७८ | ९९८७७५ |
| २. | म.बा.क.पुणे (सर्वसाधारण) | ४००००० | ३५८६२७ | ३९८४८ | ३९८४७५ |
| ३. | वि.घ.यो. | ७७५००० | ६९७०७२ | ७७४५३ | ७७४५२५ |
| | **एकूण** | **२१७५०००** | **१९५४५९६** | **२१७१७९** | **२१७१७७५** |

उपरोक्त उपलब्ध तरतूदीतून दरकरार उपलब्ध असलेली सायकल व शिलाई मशिन यांचे पुरवठा आदेश देण्यात आले. सायकल व शिलाई मशिन खरेदीसाठीचे पुरवठा आदेश दिनांक २९/३/२००६ रोजी देण्यांत आले. सदर साहित्याचा पुरवठा हा संबंधित वित्तीय वर्षात म्हणजेच सन २००५-०६ मध्ये होऊ शकला नाही व दिनांक ३१.३.२००६ ला संबंधित वित्तीय वर्षाचे लेखे बंद झाल्यामुळे पुरवठ्याची रक्कम अदा करता आली नाही. सायकल तसेच शिवण यंत्र यांचे डिलिव्हरी मेमो पुरवठारादाराने दिनांक १८.८.२००६ ला कार्यालयास सादर केली. त्यामुळे सन २००६-०७ च्या उपलब्ध फंडातून जिल्हा परिषदेने आपले स्वनिधीतून सेस फंडाअंतर्गत देय असणारी रक्कम अनुक्रमे रु.६,५२,३४७ व रु.८,९८,८९७ अदा केली यामध्ये पुरवठा उशिरा केल्यामुळे लागू असणारी दंडाची रक्कम प्रत्येकी रु.१४,००० वसूल करून संबंधित प्रदान करण्यांत आले. तथापि शासनाकडुन उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून अदा करावयाची रक्कम जिल्हा परिषदेकडे थकीत होती.

दरम्यानचे काळांत वित्तीय वर्षे सन २००७-०८ मध्ये आयुक्त, महिला व बाल विकास यांना या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/मबाक/८३५/ दिनांक २९ जून, २००७ नुसार व या कार्यालयाचे पत्र क्र. जिपना/मबाक/८३६/०७ दिनांक २९ जून, २००७ नुसार कार्यासन अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सन २००५-०६ करिता प्राप्त अखर्चित तरतूद खर्च करण्याची मंजुरी मागण्यांत आली व उपरोक्त प्रलंबित देयके सन २००५-०६ मधिल अखर्चित तरतूदीतून सन २००७-०८ मध्ये पारीत करण्यास्तव विनंती करण्यांत आली. परंतु याबाबत आवश्यक मंजुरी न मिळाल्याने सदरची प्रलंबित रक्कम सन २००७-०८ मध्ये अदा करता आली नाही.

सन २००८-०९ या वर्षापर्यंत पुरवठादाराला सन २००३-०४ मधिल सायकल पुरवठा तसेच सन २००५-०६ मधिल सायकल व शिलाई मशिन पुरवठा या योजनेअंतर्गत थकीत असलेली रक्कम अदा केलेली नव्हती. त्यामुळे पुरवठदाराने दि. १५ जानेवारी, २००९ ला जिल्हा परिषदेला थकीत प्रदानाची रक्कम १८ टक्के वार्षिक व्याजासह प्रदान करण्याबाबत नोटिस दिली. जिल्हा परिषदेने उपरोक्त साहित्याची खरेदी केलेली होती व संबंधित पुरवठादाराने साहित्याचा पुरवठा केलेला होता. त्यामुळे पुरवठादारास रक्कम अदा करणे क्रमप्राप्त होते. याकरिता सन २००८-०९ या वित्तीय वर्षात संबंधित शासकीय योजनेअंतर्गत प्राप्त निधीतून थकीत देयके प्रदान करण्यास्तव या कार्यालयाचे पत्र क्रमांक-१९३ व पत्र क्र.१९२ दि.२०-२-२००९ नुसार सचिव, आदिवासी विकास विभाग व पत्र क्र.१९१ व पत्र क्र.१९४ दि. २० फेब्रुवारी, २००९ नुसार आयुक्त, महिला व बाल विकास यांना मंजुरी प्रदान करण्याबाबत विनंती करण्यात आली. त्याचप्रमाणे सन २००८-०९ मध्ये उपलब्ध अनुदानातून सन २००३-०४ व सन २००५-०६ मधिल थकीत रक्कम प्रदान करण्यास्तव जिल्हा परिषद सभेने व तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी मंजुरी दिली आहे. त्यानुसार खालील प्रमाणे सन २००८-०९ मध्ये विविध शासकीय लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध अनुदानातून पुरवठादारास थकीत रक्कम प्रदान करण्यात आली.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | उपलब्ध अनुदान | प्रदान केलेली रक्कम |
|---|---|---|---|
| १. | २२३५२३७८ (बिगर आदि.सर्वसाधारण) | रु.१०,००,००० | रु.३,५६,८२७ |
| २. | २२३५-२२९७ (टीएसपी) | रु.२,००,००० | रु.८,१२४ |
| ३. | २२३५-२२९७ (ओटीएसपी) | रु.१०,००,००० | रु.८,९९,१८१ |
| ४. | २२३५-२३७८ (विशेष घटक योजना) | रु.१०,००,००० | रु.८,९९,१८१ |
| | **एकूण :-** | **रु.३२,००,०००** | **रु.२१,६५,११३** |

सन २००३-०४ व सन २००५-०६ मधील उपरोक्त थकीत प्रदान सन २००८-०९ मध्ये केल्याने त्याची कार्योत्तर मंजुरी या कार्यालय पत्र क्र.९१९ दिनांक ३.७.२००९ अन्वये सचिव, महिला व बाल विकास यांना मागविण्यात आली आहे.

सन २००३-०४ व सन २००५-०६ या कालावधीत दिलेल्या पुरवठा आदेशानुसार साहीत्याचा पुरवठा झाल्याने पुरवठादर व्याजाचे रकमेसह कायदेशीर नोटिस बजावल्याने पुरवठादारास थकीत प्रदान अदा करणे आवश्यक होते.

वित्तीय वर्षे सन २००३-०४ व सन २००५-०६ मध्ये अनुक्रमे सायकल व शिलाई मशिन तसेच सायकल खरेदी पुरवठा आदेश दिले होते. त्यावेळी अनुदान चालू वित्तीय वर्षातच खर्च करणे अनिवार्य होते. पुरवठा आदेशाप्रमाणे संबंधित वित्तीय वर्षात पुरवठा न झाल्याने अनुदान अखर्चित राहिले. तथापि जिल्हा परिषदेने स्वनिधीतून देय असणारे अनुदान पुढील वित्तीय वर्षात अदा केले. परंतु शासकीय अनुदान अदा करणेबाबत आवश्यक मंजुरी नसल्याने संबंधित अनुदान अदा होवू शकले नाही. याबाबत विभागाने सन २००७-०८ व २००८-०९ मध्ये अखर्चित तरतूद खर्च करण्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांना मंजुरी मागितली परंतू सदर मंजुरी प्राप्त झाली नाही. पुरवठादाराने दिनांक १५ जानेवारी, २००९ ला थकीत प्रदानाची रक्कम १८ टक्के वार्षिक व्याजासह प्रदान करण्याची नोटिस दिली त्यानुसार व्याजाच्या रकमेचा बोजा जिल्हा परिषदवर पडू नये याकरिता व संबंधित पुरवठादाराला रक्कम अदा करणे कायद्याने बंधनकारक असल्यामुळे व्याज न देता वित्तीय वर्षे सन २००८-०९ मधील उपलब्ध अनुदानातून सदर रक्कम अदा करण्यांत आली. यामध्ये कुठल्याही प्रकारची आर्थिक अनियमितता झाली नसल्याचे तसेच यामधून जिल्हा परिषदेला आर्थिक अनियमितता झाली नसल्याने चौकशी अंती आढळून येते.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, सन २००३-२००४ व सन २००५-२००६ या वित्तीय वर्षात शिलाई मशिन व सायकल पुरवठा आदेश अनुक्रमे दिनांक ३१ मार्च, २००४ व दिनांक ३१ जानेवारी, २००६ रोजी दिले होते. तथापि, सदर पुरवठा अनुक्रमे दिनांक २६ ऑगस्ट, २००४ व दिनांक १२ ऑगस्ट, २००६ रोजी करण्यात आला. याप्रकरणी राज्य शासनाच्या दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये काय कारवाई करण्यात आली, तसेच सावनेर शहरातील मातांच्या बाबतीत सर्वसामान्य आणि गोरगरीब व्यक्तींसाठी शासनाकडून निधी येतो. त्यांना या योजनेतून निधी येत असताना सन २००३-०४ पासून ते २००६-०७ आणि २००७-०८ या आर्थिक वर्षामध्ये सुमारे २.५० कोटी रुपयांचा निधी खर्च झालेला नाही. त्यासंबंधी सविस्तर खुलासा करण्यात येवून हा निधी अखर्चित राहण्यामागे जे कोणी अधिकारी संबंधित असतील त्यांच्यावर शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे किंवा कोणत्या अधिकाऱ्यांना तशा प्रकारच्या नोटीसा दिल्या आहेत याचा खुलासा करण्यात यावा. एखाद्या वेळेस चूक झाली असेल तर समजू शकतो. परंतु हे सातत्याने तीन वर्षे झाले आहे. जिल्हापरिषदेने हा निधी अखर्चित ठेवला त्यामुळे शासनास परत केला, मात्र हा निधी अखर्चित राहण्यामागील कारणे सांगितली नाहीत. कारण जिल्हापरिषदेने दरकरार आला नसताना खुल्या निविदा का काढल्या याचाही खुलासा व्हावा, यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, हे खरे आहे की, नागपूर जिल्हा परिषदेने सन १९९९-२००० या वर्षी अखर्चित राहिलेला निधी शासनाला सर्मपित केला आहे. हा निधी २.४० कोटी इतका आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, हा निधी अखर्चित राहण्याची कारणे कोणती आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांनी समितीस विदित केले की, सन २००३-०४ मध्ये वेगवेगळया हेडखाली निधी उपलब्ध होता. त्यामध्ये जिल्हा परिषद सेसचा निधीही होता. यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, सन १९९९-२००० सालापासून ते सन २०१० पर्यंत जो निधी अखर्चित राहिला तो रुपये २.४२ कोटी इतका आहे. सदरचा अखर्चित राहिलेला निधी त्यांनी शासनाला सर्मपित केला आहे. हा निधी अखर्चित का राहिला याबद्दल विभागाने सन २००८ पूर्वी शासनाचा निधी खर्च करण्याची विहित पद्धत वेगळी होती. एका वर्षामध्ये हा निधी खर्च करण्याबाबतचे अधिकार संबंधित जिल्हा परिषदेला होते. त्याची जी कार्यपद्धती आहे त्यानुसार जिल्हा परिषदेतील महिला व बालविकास समितीसमोर प्रस्ताव आणून त्यास मंजुरी देऊन निविदा काढणे आणि लाभार्थ्यांसाठी ज्या वस्तू खरेदी करावयाच्या आहेत त्यांचे वाटप करण्यासाठी सुरूवातीला एक वर्षाकरिता शासनाने मान्यता दिली होती. मात्र ती प्रक्रिया विहित वेळेत पूर्ण होऊ शकली नाही, म्हणून हा निधी अखर्चित राहिलेला आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, शासनाकडून प्राप्त झालेला निधी त्या त्या १२ महिन्यांमध्ये कोणत्या काळात कोणत्या कामासाठी खर्च केला पाहिजे हे पाहण्याची जबाबदारी त्या वेळेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची नव्हती काय, त्या चौकशी अहवालात हा निधी अखर्चित राहण्याची कारणे का दिलेली नाहीत. यासाठी शासनाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे हा निधी खर्च करण्यासाठी का काळजी घेतली नाही. १ एप्रिल ते ३१ मार्च या वित्तीय वर्षाप्रमाणे वेळापत्रक निश्चित केलेले आहे. शासनाने दिलेल्या निधीची रक्कम अखर्चित राहू नये यासाठी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या योजनेला मान्यता देणे वगैरे या सर्व बाबी तपासल्या होत्या काय, पुरवठा आदेश कधी निघाले, याबद्दलची जबाबदारी खाते प्रमुखांची असते. असे असताना या बाबींकडे लक्ष का दिले नाही. जर ठरलेल्या वेळापत्रकाप्रमाणे १ एप्रिलपासून ते ३१ मार्चपर्यंत ही कामे पूर्ण केली असती तर कदाचित हा निधी अखर्चित राहिला नसता आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना शासनाच्या योजनांपासून वंचित रहावे लागले नसते. याला जबाबदार कोण आहे. निधी केव्हा प्राप्त झाला यापासून ही सर्व प्रक्रिया सुरू होते. विलंबाच्या प्रकरणाबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे. हा आदिवासी आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या संदर्भातील विषय आहे. या प्रकरणी गांभीर्याने काम केले असते तर

या निधीचा योग्य रितीने विनियोग झाला असता या प्रकरणी १८ जणांनी निविदा भरल्या होत्या, त्यावेळी कामाचे वेळापत्रक नव्हते का, शासनाचा निधी अखर्चित का राहतो आणि त्यासाठी कोणकोणते अधिकारी जबाबदार आहेत, त्यासंबंधी कोणावर कार्यवाही केली पाहिजे याचे उत्तर समितीला देण्यात यावे. २० लाख रुपये रक्कमेच्या खालील खर्चास मुख्य कार्यकारी अधिकारी यांना खर्च करण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे कार्यपालन समिती याला जबाबदार होऊ शकत नाही, कारण त्यावेळी २० लाख रुपये रकमेच्या खालील खर्च करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अधिकार होते. फक्त लाभार्थी निवडण्याचे अधिकार समितीला होते. तरीही निधी खर्च झालेला नाही. जिल्हा परिषदेने चौकशी अहवाल सादर करताना त्यामध्ये संबंधितांवर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. जे कोणी जबाबदार असतील त्याचे उत्तरदायित्व निश्चित केले पाहिजे. चौकशीअंती निष्कर्ष निघणे आवश्यक आहे. यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीला विदित केले की, हे प्रकरण सन १९९९ पासून ते सन २००७ -०८ पर्यंत अखर्चित राहिलेल्या निधीसंदर्भात आहे. समितीच्या माध्यमातून ज्या सूचना केल्या आहेत. त्यानुसार विभागनिहाय कोणकोणते प्रस्ताव होते. कोणकोणत्या कामामध्ये दिरंगाई झालेली आहे आणि कोणकोणत्या योजनांचा निधी अखर्चित राहिला आहे. परंतु ज्या कोणत्या प्रकरणांमध्ये विलंब झालेला आहे, त्यामुळे हा निधी अखर्चित राहिला त्यासंबंधीची संपूर्ण चौकशी करून त्याचा अहवाल विभागामार्फत समितीला सादर करण्यात येईल. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, यामध्ये कोणकोणत्या अधिकाऱ्यानी विलंब केला आहे, त्या अधिकाऱ्यांचा सुद्धा अहवालात समावेश होणे आवश्यक आहे. यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, ही संपूर्ण चौकशी शासन स्तरावर करण्यात येणार आहे. यामध्ये कागदपत्रे तपासणीचा सर्वात मोठा विषय आहे. या बाबतीत सन १९९९ पासून ते २००७-०८ या वित्तीय वर्षापर्यंत ८ वित्तीय वर्षातील कामकाजाची तपासणी करावी लागणार आहे. या अहवालामध्ये कोणत्या वर्षामध्ये किती निधी उपलब्ध होता व त्यापैकी किती निधी खर्च करण्यात येऊन किती निधी अखर्चित राहिला आहे. सदरचा निधी नागपूर जिल्हा परिषदेला कोणकोणत्या तारखेला वितरित झाला व त्यानंतर नागपूर जिल्हा परिषदेने कोणकोणते प्रस्ताव महिला व बालविकास विभागाकडे सादर केले आणि ते कोणकोणत्या वर्षी केले सदर प्रस्तावांचे पुढे काय झाले व त्याची निविदा निघणे, त्यानुसार कामाचे आदेश देणे त्यानंतर झालेली कार्यवाही, निधी अखर्चित राहिला असल्यास त्याची कारणे कोणती व त्यासाठी जबाबदार कोण होते यासंबंधी सविस्तर अहवाल समितीला देण्यात येईल. यावर समितीने असे निदेश दिले की, यासंबंधी विभागीय स्तरावर कार्यवाही करून समितीला हा अहवाल या येत्या १५ दिवसात सादर करण्यात यावा यावर सचिव महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, विभागाला इतक्या कमी अवधीमध्ये हा अहवाल देणे शक्य होणार नाही. त्यामुळे हा अहवाल समितीला सादर करण्यास १ महिन्याचा कालावधी द्यावा.

## अभिप्राय व शिफारशी

सन २००३-०४ व २००५-०६ या आर्थिक वर्षामध्ये विविध लेखाशीर्षांतर्गत लाभार्थी यांना सायकल वाटप व शिलाई मशीन वाटपासंबंधी योजना राबविण्यात आली. या योजनेकरिता खरेदी करण्यात आलेल्या साहित्यावरील प्रलंबित असलेली थकित रक्कम प्रदान करण्यापुर्वी शासनाची पूर्व मंजुरी प्राप्त करून न घेता पुरवठा धारकांना नियमबाह्यरित्या रुपये २१,६५,११३ प्रदान करण्यात आले असा प्रमुख आक्षेप प्रस्तुत प्रकरणात लेखा परिक्षकांनी घेतला. प्रस्तुत आक्षेपावर दिनांक २९ जून, २००७ रोजी आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे यांना रक्कम अदा करण्याकरिता मंजुरी मागविण्यात आली असल्याचे तसेच पुरवठादाराने रक्कम १८ टक्के व्याजासह मिळणेकरिता कायदेशीर नोटिस दिली. त्यामुळे रक्कमेचे शोधन करण्याकरिता सचिव, आदिवासी विकास विभाग यांना व आयुक्त, महिला व बाल कल्याण, पुणे यांना सन २००३-०४ व सन २००५-०६ ची देयके सन २००८-०९ मधील तरतूदीतून अदा करण्याबाबत मंजूर करण्यास्तव विनंती करण्यात आली असल्याचा खुलासा जिल्हा परिषदेने समितीकडे केला. एवढेच नव्हे तर सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कार्योत्तर मंजुरी मागविण्यात आली असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली.

सन २००३-२००४ टी.एस.पी., ओ.टी.एस.पी व एस.सी.पी अंतर्गत सायकल वाटप योजनेसाठी रक्कम उपलब्ध होती. सदर तरतूद संबंधित वर्षात साहित्याचा पुरवठा न झाल्याने अदा करण्यात आली नाही. त्याचप्रमाणे सन २००५-०६ मध्ये सायकल खरेदीसाठी एस.सी.पी व ओ.टी.एस.पी. अंतर्गत उपलब्ध असलेली तरतूद देखील पुरवठा न झाल्याने अखर्चित राहिली. समितीच्या मते अशाप्रकारे निधी अखर्चित राहण्याची कारणे काय व तो खर्च करण्यासाठी शासनाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार खर्च न होण्यास कोणते अधिकारी जबाबदार आहेत याची माहिती समितीला अखेरपर्यंत प्राप्त झाली नाही. केवळ नागपूर जिल्हा परिषदच नव्हे तर राज्यातील इतर जिल्हा परिषदांमध्ये कमी अधिक प्रमाणात शासकीय अनुदान अखर्चित राहण्याचे प्रमाण मोठे आहे. परिणामी जिल्ह्यातील महिला, विद्यार्थी, अपंग आणि मागासवर्गीय लाभार्थी शासनाच्या कल्याणकारी योजनांपासून वंचित राहतात. शासनाने अखर्चित निधी जिल्हा परिषदांकडून परत घेण्याकरिता विशेष मोहिम हाती घेतली होती. जिल्हा परिषद, नागपूर अंतर्गत विशेष मोहीमेंतर्गत सन १९९९-२००० ते सन २००७-०८ पर्यंतच्या सर्व अखर्चित रक्कमा दिनांक ०२/०२/२०१० रोजी शासन खात्यात जमा करण्यात आल्या, त्यानुसार केवळ एकट्या महिला व बाल कल्याण विभागाने २ कोटी ४२ लाख २५ हजार ७३७ एवढी रक्कम शासनाकडे परत केली. यावरुन स्थानिक स्वराज्य संस्था शासनाचा अखर्चित निधी वेळेवर परत करण्यामध्ये किती तत्परता दाखवितात याचा प्रत्यय येतो.

महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने दिनांक २६ सप्टेंबर, २००५ दिनांक ३१ ऑगस्ट, २००७, दिनांक १५ नोव्हेंबर, २००७, दिनांक ६ जून, २००८ आणि दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी **(परिशिष्ट ४.१ ते ४.५)** शासन निर्णय निर्गमित करून शासनाने जिल्हा परिषदांना वितरित केलेल्या निधीपैकी वर्षअखेर अखर्चित राहिलेला निधी खर्च करण्याची कार्यप्रणाली विशद केली आहे. जिल्हा परिषदांना वितरित केलेला निधी त्या आर्थिक वर्षानंतरच्या पुढील एका वर्षात खर्च करण्याची मुभा आहे. त्यानंतर मात्र शासनाची मान्यता आवश्यक असते. अशा अखर्चित निधीबाबत विभागाकडून आढावा घेऊन व अखर्चित निधी खर्च करण्याची परवानगी देत असताना प्रत्यक्ष निधीची उपलब्धता, प्रत्यक्ष काम झाले आहे किंवा नाही, त्याच कामावर एकाहून अधिक स्त्रोतातून निधी खर्च होत नाही या बाबींची तपासणी करून मान्यता देणे आवश्यक असते. परंतू जिल्हा परिषद, नागपूर यांनी वारंवार अशा प्रकारे निधी खर्च करण्यास शासनाकडे विनंती करूनही जिल्हा परिषदेला निधी खर्च करण्याची परवानगी मिळालेली नाही. शासन स्तरावरुन अशा प्रकारे परवानगी देण्यास झालेल्या विलंबामुळे प्रस्तुत प्रकरणी पुरवठादाराने कायदेशीर नोटीस दिल्याबरोबर जिल्हा परिषदेने तातडीने त्याचे देयक अदा केले आहे. असे करताना त्यांनी शासनाची परवानगी घेणे आवश्यक होते. परंतू दिनांक ११ फेब्रुवारी, २००९ रोजीच्या जिल्हा परिषदेच्या सर्व साधारण सभेत प्रस्ताव मंजूर करून उपलब्ध असलेल्या अनुदानातून पुरवठादारास थकित रक्कम अदा करण्यात आली. अशा प्रकारे नियमबाह्य प्रदान करून त्या प्रदानास कार्योत्तर मान्यता घेण्याकरिता जिल्हा परिषदेने दिनांक ३ जुलै, २००९ रोजी सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विनंती केलेली आहे. परंतू अद्यापही जिल्हा परिषदेला अशी कार्योत्तर मान्यता देण्यात आलेली नाही ही बाब समितीला अनाकलनीय वाटते. त्याचबरोबर समितीने दिलेल्या निदेशानुसार प्राप्त झालेल्या चौकशी अहवालात देखील प्रस्तुत प्रकरणात कुठल्याही प्रकारची अनियमितता झाली नसल्याचे अभिप्राय समितीला प्राप्त झाले. एवढेच नव्हे तर ग्राम विकास विभागाने देखील नागपूर जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमती दर्शविलेली आहे. **असे करून ग्राम विकास विभाग नियमबाह्य खर्च आणि अखर्चित निधीच्या संदर्भात जिल्हा परिषद व त्यातील अधिकाऱ्यांच्या चुकांवर पांघरुन घालण्याचाच प्रयत्न करीत असल्याचे समितीचे मत आहे. अतः प्रस्तुत प्रकरणातील अखर्चित निधी विहित मुदतीनंतर शासनाच्या परवानगी शिवाय खर्च करण्यासहित महिला व बालविकास विभागाच्या २ कोटी ४२ लाख रुपयांचा निधी शासनास परत करण्यास जबाबदार असलेल्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन महिन्यांत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, नागपूर

## लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करणेबाबत

**परिच्छेद ३.३४ :- यशवंत ग्रामसमृद्धी योजनेअंतर्गत खर्चातील अनियमितता, जिल्हा परिषद, नागपूर, सन २००८-०९ (परिच्छेद क्र.४९)**

पंचायत समिती, सावनेर येथे सन २००८-०९ मध्ये यशवंत ग्रामसमृद्धी योजनेअंतर्गत सिमेंट रस्ता बांधकामावर रुपये ३८,६२,२०० चा खर्च नोंदविण्यात आला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. झेडपीए-२०००/प्र.क्र-१८/वित्त ९, दिनांक १४/०१/२००१ तथा झेडपीए-२००९/प्र.क्र.४७४/वित्त-९, दिनांक २ मार्च, २००९ अन्वये ग्रामपंचातीने बांधकामावर केलेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या रकमेपैकी ५% रक्कम ग्रामनिधीत जमा करणे आवश्यक आहे, मात्र याबाबत दस्ताऐवज लेखा परिक्षणास प्राप्त झाला नसल्याने बचतीबाबत खात्री करता आली नाही. शासन निर्देशांचे पालन झाले किंवा कसे याबाबत शहानिशा करता येत नाही.

(२) यशवंत ग्रामसमृद्धी योजनेचे बँक खाते क्र.८७१४१०१००१६६१३, बँक ऑफ इंडिया, शाखा, सावनेर मध्ये दिनांक २९-१०-२००८ रोजी रुपये १३४८ व दिनांक ३१/३/२००९ ला रुपये २५,७४४ असे एकूण २७,०९२ रुपये जमा रकमेवर व्याज प्राप्त झाले आहे. ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन पत्र क्र.यग्रावि/२००५/प्र.क्र.११६७/पंरा-६ (४७), दिनांक १२/१०/२००५ अन्वये जमा झालेल्या व्याजाची रक्कम ०५१५ इतर ग्रामीण विकास कार्यक्रम-८०० इतर जमा रक्कम ०५१५००३१०० या शिर्षाखाली जमा करणे व तत्संबंधी माहिती शासनास कळविणेबाबत निर्देश आहेत. परंतू उपरोक्त रक्कम शासन निर्देशाप्रमाणे जमा करण्यात आलेली आहे. तरी जमा केल्याबाबत अनुषंगिक दस्तऐवजासह खात्री पटविणे आवश्यक आहे.

(३) रस्ता बांधकाम पूर्ण झाल्याची खात्री करून उपयोगिता प्रमाणपत्रासह खात्री पटविणे आवश्यक आहे.

(४) शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग निर्णय क्रमांक यग्रावि-२००१/प्र.क्र.१९४/पंरा (६) (४७) दिनांक २७/८/२००२ व यग्रावि-२००८/प्र.क्र.२४०/पंरा (६) दिनांक २५/०६/२००८ अन्वये लोकसहभागाची रक्कम ग्रामपंचायतीकडे जमा करण्याबाबत अनुषंगिक दस्तऐजवजासह खात्री पटविणे आवश्यक आहे. तसेच रस्ता बांधकाम संबंधीचे मोजमाप पुस्तिका, पुर्णत्वाचे प्रमाणपत्र, अंदाजपत्रक लेखा तपासणीत उपलब्ध करून दिले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) पंचायत समिती, सावनेर कार्यालयाने सन २००८-०९ या वर्षामध्ये यशवंत ग्रामसमृद्धी योजनेअंतर्गत खाली नमूद केलेल्या ग्रामपंचायतींना एकूण रुपये ३८,६२,२०० एवढे अनुदान सिमेंट रस्ता बांधकामाकरिता खर्च करण्यात आले व खर्च रोख पुस्तीकेत नोंदविण्यात आला. खर्च खालील प्रमाणे आहे :—

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम | ग्रामपंचायतीचे नाव | तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| (१) | ०१ | ९.९.२००८ | ४,००,००० | वाकी | सिमेंट रस्ता |
| (२) | ०२ | १२.९.२००८ | ६३,००० | चिचोली खा | सिमेंट रस्ता |
| (३) | ०३ | २६.९.२००८ | १,०८,००० | भानेगाव | सिमेंट रस्ता |
| (४) | ०४ | २६.९.२००८ | ५४,००० | सिल्लोरी | सिमेंट रस्ता |
| (५) | ०५ | २६.९.२००८ | ६२,२०० | गोसेवाडी | सिमेंट रस्ता |
| (६) | ०६ | १.१०.२००८ | १,३६,००० | गुमागाव | सिमेंट रस्ता |
| (७) | ०७ | ४.१०.२००८ | १,२०,००० | काटोडी | सिमेंट रस्ता |
| (८) | ०८ | ४.१०.२००८ | १,२०,००० | कोथळूना | सिमेंट रस्ता |
| (९) | ०९ | ४.१०.२००८ | २,७२,००० | पाटणसावंगी | सिमेंट रस्ता |
| (१०) | १० | ४.१०.२००८ | ४,२५,००० | पोटा (चन) | सिमेंट रस्ता |
| (११) | ११ | ४.१०.२००८ | ३,१०,००० | रोहणा | सिमेंट रस्ता |
| (१२) | १२ | ४.१०.२००८ | ५,४०,००० | उमरीभ | सिमेंट रस्ता |

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम | ग्रामपंचायतीचे नाव | तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| (१३) | १३ | २०.१.२००८ | २,००,००० | वाकी | सिमेंट रस्ता |
| (१४) | १४ | २०.१०.२००८ | २,१७,००० | चानपा | सिमेंट रस्ता |
| (१५) | १५ | २४.११.२००८ | ३,४०,००० | कोची | सिमेंट रस्ता |
| (१६) | १६ | २०.०२.२००९ | १,००,००० | बडेगाव | सिमेंट रस्ता |
| (१७) | १७ | ०६.०३.२००९ | २,००,००० | रोहणा | सिमेंट रस्ता |
| (१८) | १८ | ०६.०३.२००९ | २,००,००० | पोटा | सिमेंट रस्ता |
| (१९) | १९ | ०९.०३.२००९ | १,३६,००० | पाटणसावंगी | सिमेंट रस्ता |
| (२०) | २० | २०.०३.२००९ | ८०,००० | गुमागाव | सिमेंट रस्ता |
| (२१) | २१ | ३१.०३.२००९ | ६०,००० | कोटोडी | सिमेंट रस्ता |
| (२२) | २२ | ३१.०३.२००९ | २,०५,००० | बिचवा | सिमेंट रस्ता बांधकाम |
| | | **एकूण** | **३८,६२,२००** | | |

शासन निर्णयाप्रमाणे ५% बचत निधी ग्रामपंचायतीने त्याच वाढीव कामावर खर्च केला आहे. याबाबत पंचायती समिती, सावनेर कार्यालयाने जिल्हा परिषद, नागपूर यांना पत्र क्रमांक पंरासा/पंचा/५०४९, दिनांक २५/१०/२००१ अन्वये माहिती सादर केलेली आहे.

(२) यशवंत ग्रामसमृद्धी योजना सन २००८-०९ या वर्षात योजनेचे पासबुक खाते क्रमांक ८७१४१०१००१६६१३, बँक ऑफ इंडिया, सावनेर मध्ये जमाव्याज रक्कम खालील धनादेशाद्वारे जिल्हा परिषद, नागपूर वित्त विभागास जमा करण्यात आले आहे.

दिनांक २८/०२/२०११ चेक क्र.९७४९४६ व्याज रक्कम रुपये १३४८

दिनांक २८/०२/२०११ चेक क्र.९७४९६५ रुपये २५,७४४

असे एकूण रुपये २७,०९२ या कार्यालयाचे पत्र क्र.पंससा/पंचा/५०४९, दिनांक २५/१०/२०११ अन्वये व्याजाची रक्कम ०५१५ इतर ग्रामीण विकास कार्यक्रम-८०० जमा करण्याकरिता जिल्हा परिषद, नागपूर वित्त विभागास वरील प्रमाणे धनादेश जमा करण्यात आले आहे.

(३) यशवंत ग्रामसमृद्धी योजना सन २००८-०९ या वर्षात २२ ग्रामपंचायतींना केलेल्या कामाची मोजमाप पुस्तिकेनुसार व पूर्णत्वाचे दाखले तसेच उपयोगिता प्रमाणपत्र हे पंचायत समिती, सावनेर येथे उपलब्ध असून ते पुढील लेखा परिक्षणास सादर करण्यात येईल. तसेच त्याच्या सत्यप्रती सोबत जोडल्या आहेत.

(४) मुद्दा क्रमांक ४ नुसार, शासन निर्णयाप्रमाणे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर वस्तीत योजनेअंतर्गत ग्राम पंचायतीने जमा केलेली लोकवर्गणी ग्राम पंचायतीच्या खात्यात खालील प्रमाणे जमा झाल्याची खात्री करून बांधकामाचे अनुदान ग्राम पंचायतीला प्रदान करण्यात आले आहे. २२ ग्राम पंचायतीची लोकवर्गणी जमा १०.१३ व ४.७० लाख असे एकूण १४.८३ लाख जमा झाली, त्याबाबत सोबत प्रपत्रात माहिती सादर करण्यात आली आहे. सोबत लोक सहभागाची नोंदीबाबत पासबुक, रोकड पुस्तिका, यांच्या सत्यप्रती जोडल्या आहेत.

**परिच्छेद क्रमांक ३.१०१ :- शालेय पोषण आहार योजना व राष्ट्रीय माध्यान्ह भोजन योजनाअंतर्गत अनियमिततेबाबत, नागपूर सन २००८-०९ (परिच्छेद क्र.५२)**

मध्यान्ह भोजन योजना व शालेय पोषण आहारावर सन २००८-०९ वित्तीय वर्षात प्रमाणक क्रमांक २९६९/२९७०/१३.०२.२००९ व ४२२७/४२२८/४२२९, दिनांक ३१/३/२००९ नुसार रक्कम रुपये ८,१६,७५,००० एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ २००८/प्र.क्र.२६४/प्राशि-४, दिनांक ०८/०८/२००८ च्या तरतूदीनुसार शालेय पोषण आहाराची रक्कम पंचायत समितीअंतर्गत असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेला वितरीत करण्यात आली, सदर अनुदानातून आलेल्या नाहीत. परिणामी विद्यार्थ्यांना उपरोक्त नियमानुसार ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे भोजन प्राप्त झाले किंवा कसे याची खात्री पटविता आली नाही.

(२) उपरोक्त शासन तरतूदीनुसार आठवड्यातून किमान एकदा भोजनामध्ये मुलांना केळी, बिस्कीटे अथवा मांसाहार अथवा अंडी द्यावयाचे आहे. सदर खाद्यान्न दिले असल्याची स्वतंत्र नोंद घेतल्याची नोंदवही ठेवावयाची आहे, परंतु अशी नोंदवही ठेवण्यात आल्याचे दिसत नाही.

(३) शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांचे आदेश क्र.शापोआ-२००५-२००६/प्राशिसं ३०२/दिनांक ०९/०९/२००५ नुसार टक्केवारीच्या प्रमाणात २५ टक्के व ७५ टक्के इंधन, मजुरी व साहित्यावर खर्च केल्याबाबत नोंदवही सादर करण्यात आलेली नाही.

(४) शाळेने विद्यार्थ्यांना आर्यन व कॅल्शीयमयुक्त औषधी गोळ्या शासन निर्देशाप्रमाणे दिल्याबाबत नोंदवही सादर करण्यात आलेली नाही.

(५) सदर योजनेकरिता शासन निर्देशानुसार शालेय पोषण आहार योजना योग्यरित्या राबविण्यात येते किंवा नाही याकरिता जिल्हा परिषद व पंचायत समितीचे अधिकारी यांचेकडून तपासणी करणे आवश्यक आहे. मात्र तसा तपासणी अहवाल लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेला नाही.

(६) शालेय पोषण आहार योजनेचे मूल्यमापन करणे गरजेचे आहे. मात्र मूल्यमापनाबाबत कार्यवाही केल्याबाबतचा अहवाल अभिलेख्यावरुन दिसून येत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) शासनातर्फे प्राप्त झालेला निधी जिल्हा निधीतून सदर योजनेकरिता गटस्तरावर वितरीत करण्यात आलेला आहे व गट स्तरावरुन संबंधित शाळांना अदा करण्यात आलेला आहे. वर्ग १ ते ५ वयोगटाप्रमाणे १०० ग्रॅम तांदुळ व वर्ग ६ ते ८ करिता १५० ग्रॅम तांदुळ तसेच पालेभाज्या, इतर डाळी इ. शिजवून विद्यार्थ्यांना आहार देण्यात आलेला आहे. याबाबतचा खर्च व आहार शिजविण्यासाठी वापरण्यात आलेल्या पदार्थांच्या नोंदी ह्या शाळास्तरावर असलेल्या नोंदवहीमध्ये नोंदविलेल्या आहेत. सदर अभिलेख जिल्हा स्तरावर ठेवण्यात येत नाही. त्यामुळे याबाबतची खात्री जिल्हा स्तरावरील अभिलेख्यांवरुन करता आली नाही. आहार पदार्थाचा वापर केल्याचा नमुना पुरावा सोबत जोडलेला आहे.

(२) शासन तरतूदीनुसार आठवड्यातून किमान एकदा भोजनामध्ये मुलांना केळी, बिस्कीटे अथवा मांसाहर अथवा अंडी द्यावयाचे आहे. सदर आहारापैकी एक आहार आठवड्यातून किमान एकदा देण्यात आला असून त्याबाबतची नोंद शाळास्तरावर दैनंदिन आहार वापराच्या नोंदवहीमध्ये घेतलेली आहे. नोंदवही नमुन्याची सत्यप्रत सोबत जोडलेली आहे.

(३) शासन निर्णयानुसार जिल्हा स्तरावरुन तालुकास्तरावर अनुदान वाटप करतांना २५% व ७५% च्या प्रमाणात अनुदान वाटप केले जाते. परंतु तालुका स्तरावरुन अनुदान वाटप करतांना २५% व ७५% च्या प्रमाणात अनुदान वाटप न करता शाळांनी सादर केलेल्या देयकानुसार एकत्रित अनुदान वाटप केले जाते. त्यामुळे शाळास्तरावर सुद्धा अनुदान खर्च करताना २५% व ७५% च्या प्रमाणात अनुदान खर्च न करता एकत्रित अनुदान खर्च केले जाते याबाबत अनुदान वितरण आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

(४) शाळेत विद्यार्थ्यांना लोह व कॅल्शिअमच्या गोळयांचा पुरवठाशासनामार्फत झालेला असून शासन निर्देशानुसारच विद्यार्थ्यांना गोळयांचे वाटप करण्यात आलेले आहे. वाटपाबाबत खात्री केल्याची शाळा भेटीची व नोंदवहीची प्रत सोबत जोडलेली आहे.

(५) शासन निर्देशानुसार शालेय पोषण आहार योजना योग्यरित्या राबविण्याकरिता शिक्षणाधिकारी (प्राथमिक) गट शिक्षणाधिकारी, अधीक्षक (शालेय पोषण आहार), शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्र प्रमुख या सनियंत्रण अधिकाऱ्यांकडून शाळा तपासणी अंतर्गत सदर योनजेची तपासणी केली जाते. त्यानुसार उपरोक्त सनियंत्रण अधिकाऱ्यांनी शाळा तपासणी केलेल्या भेटीच्या नोंदवहीची सत्यप्रत सोबत जोडली आहे.

(६) शालेय पोषण आहार योजनेच्या मूल्यमापनाकरिता वेळोवेळी शासनातर्फे त्रयस्थ समिती नेमली जाते. उदा. भारतीय शिक्षण संस्था, पुणे सन २००८-०९ मध्ये याप्रकारे त्रयस्थ समितीद्वारे शालेय पोषण आहार योजनेचे मूल्यमापन झालेले असून सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केलेला आहे.

**५० टक्के अनुदानावर नॅपसॅक स्प्रे व पावर स्प्रे वाटप योजनेतील अनियमिता :**

**परिच्छेद क्रमांक ३.६८५ (सन २००८-२००९)**

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांच्या पुरवठा आदेशाप्रमाणे महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांनी एकूण ११७८ नॅपसॅक स्प्रे व २२६ नग पावर स्प्रे पुरवठा केल्यापोटी रुपये १०,०६,०७० प्रदान केलेले आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.पं.रा.स.१०९०/सीआर-१६३३/५७, दिनांक १६/०१/१९८५ नुसार पुरवठा आदेश देण्यापूर्वी लाभार्थी हिस्सा वसूल करणे आवश्यक असतांना शासन निर्णयाविरुद्ध विलंबाने लाभार्थी हिस्सा जमा केलेला आहे.

(२) ग्राम विकास विभाग परिपत्रक क्र.१०८६/५५३४ दिनांक ५/१०/१९८९ अन्वये मास्टर रजिस्टर ठेवलेले नसल्यामुळे लाभार्थ्यांना दुबार लाभ दिला किंवा कसे याबाबत खात्री पटलेली नाही. सबब साधार खात्री पटविणे आवश्यक आहे.

(३) मार्गदर्शक सूचनेप्रमाणे लाभार्थी निवड करण्यात आल्याबाबत अनुषंगिक दस्ताऐवजासह खात्री पाठविलेली नाही. सबब साधार खात्री पटविणे आवश्यक आहे.

(४) शासन निर्देशाप्रमाणे योजनेचे विनियोग दाखले, मूल्यमापन, फलश्रुती अहवाल तयार करण्यात आलेला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

५० टक्के अनुदानावर केंद्रपुरस्कृत सधन कापूस विकास कार्यक्रमाअंतर्गत नॅपसॅक स्प्रे व पावर स्प्रे वाटप पुरविणेबाबत चे खालील प्रमाणे अनुपालन सादर करण्यात येत आहे.

(१) केंद्र पुरस्कृत सधन कापूस विकास कार्यक्रम २००८-०९ अंतर्गत या कार्यालयाचे पत्र क्र.२८७५/०८ दिनांक ७/१०/२००८ चे सुचनेनुसार पंचायत समितीने मागणी केलेल्या लाभार्थीकरिता, साहित्य खरेदीचा पुरवठा आदेश देण्यात आला. पंचायत समिती स्तरावर साहित्य पुरवठा झाल्यानंतर साहित्याची उचल करण्यापूर्वी शेतकरी लाभार्थी हिस्याची रक्कम जमा करतात. त्यामुळे शासन निर्णयाप्रमाणे पुरवठा आदेश देण्यापूर्वी लाभार्थ्यांकडून लाभार्थी हिस्याची रक्कम वसूल करणे शक्य झाले नाही. परंतु शेतकऱ्यांकडून लाभार्थी हिश्श्याची रक्कम जमा केल्याशिवाय पंचायत समितीकडून साहित्याचे वाटप करण्यात आले नाही.

(२) गावनिहाय लाभार्थीनिहाय रजिस्टर पंचायत समिती कार्यालयात ठेवण्यात येत असून संबंधितांस दुबार लाभ दिलेला नसल्याची खात्री पंचायत समितीस्तरावर करूनच लाभ दिलेला आहे.

(३) मार्गदर्शक सुचनेप्रमाणे १६ टक्के एससी, ८ टक्के एसटी व २० टक्के महिला लाभार्थींना लाभ दिल्याची खात्री पंचायत समिती स्तरावर करण्यात आलेली असून तसे प्रमाणपत्र सोबत जोडलेले आहे.

(४) योजनेचे फलश्रृती अहवाल व विनियोजन प्रमाणपत्र सोबत जोडलेले आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.६८६ :- नवीन विहीर व इतर लाभ प्रदानातील अनियमितताबाबत, जिल्हा परिषद, नागपूर (परिच्छेद क्र.७४) सन २००८-०९**

जिल्हा परिषद, नागपूरचे सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात नवीन विहीर व इतर लाभाच्या प्रदानाकरिता रुपये ७,८०,३७२ खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहे.

(१) विशेष घटक योजनेअंतर्गत विहीर बांधकाम योजनेसंदर्भात मंजूर विहीरीची स्थळ पाहणी करून विहीर सुरू करण्याचे व मुदत देण्यात आली नाही. विहीर बांधकाम सुरू झाल्याचा अहवाल दप्तरी नाही. सन २००८-०९ मध्ये ४८ विहीरीची कामे लेखापरिक्षण कालावधीपर्यंत सुरू झालेले नाही. बऱ्याच विहीरी अपूर्ण आहेत. याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

(२) स्प्रे पंप, विद्युत मोटारपंप, एचडीपीई पाईप व ताडपत्री पुरवठा योजनेअंतर्गत दिनांक ३१.०३.२००९ नंतर शिल्लक असल्याने ५२ नगाची नाहक गुंतलेली रक्कम रुपये ५१,९९१ ची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. ग्राम विकास शासन निर्णय क्र.व्ही.पी.आर./१०८८/सी.आर/७९४ दिनांक २६.०१.१९८९ व शासन निर्णय दिनांक ०१.०९.१९९३ अन्वये मंजूर लाभ व खरेदी केलेले साहीत्य त्याच वित्तीय वर्षात वाटप होणे आवश्यक आहे. परंतू नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ च्या नियम ८७ नुसार चाचणी अहवालाशिवाय केलेले रक्कमेचे प्रदान हे नियमबाह्य ठरत असताना साहित्याची गुणनियंत्रण विभागाकडून तांत्रिक तपासणी करण्यात आली नाही. तसेच नियम ८३ (३) अन्वये खरेदी साहीत्याची दर्जाबाबत तपासणी विभाग प्रमुखांकडून करणे आवश्यक असताना याबाबत कार्यवाही केलेली नाही.

(४) साठा नोंदवहीवर साहित्य वाटपाचा दिनांक नमूद नाही. तसेच गट विकास अधिकारी यांची नोंदवहीवर स्वाक्षरी नाही.

(५) ग्राम विकास विभाग व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.झेडपीए-२०००/प्र.क्र.४१/३३ दिनांक १७.०१.२००१ नुसार योजना सफल होण्यासाठी वेळापत्रकानुसार कार्यवाही केली नाही.

(६) ताडपत्री वाटपाच्या लाभार्थी यादीस पंचायत समितीच्या ठरावामध्ये मंजुरी घेतलेली नाही. त्यामुळे निवड केलेले लाभार्थी व प्रत्यक्षात लाभार्थी एकच असल्याबाबत खात्री पटत नाही. सबब साधार खुलासा होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

विशेष घटक योजनेअंतर्गत विहीर बांधकाम योजनेसंदर्भात खालील प्रमाणे अनुपालन देण्यात येत आहे.

(१) कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) यांनी स्थळ पाहणी करून गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भिवापूर यांचे पत्र क्र.१६९/०९ दिनांक २३/०१/२००९ अन्वये मंजूर विहीरीच्या लाभार्थीना मुदतीत विहीरीचे काम पूर्ण करण्याचे लेखी सुचना देण्यात आलेल्या होत्या. सन २००८-०९ मध्ये ६४ विहीरींना मंजुरी प्राप्त असून लेखा परिक्षणापर्यंत २५ विहीरी पूर्ण झालेल्या होत्या व ३९ विहीरी अपूर्ण होत्या, त्यापैकी २७ विहीरीची काम पूर्ण झालेली असून अशी एकूण ५२ विहीरींची कामे पूर्ण झालेली आहे व सन २००८-०९ चे १२ विहीरी अपूर्ण आहेत. त्यापैकी ४ लाभार्थीनी थोड्या प्रमाणात काम केले असून त्याचे मूल्यांकनानुसार लाभार्थ्यांस रक्कम अदा करण्यात आलेली आहे. त्यानंतरच्या खोदकामाचा खर्च करण्याची लाभार्थीची आर्थिक स्थिती नसल्याने प्राकलनाच्या तरतूदीनुसार लाभार्थी विहीरीचे काम पूर्ण करु शकले नाही व उर्वरित ८ लाभार्थीना वारंवार सुचना देऊनही कामाची सुरूवात केलेली नाही.

(२) स्प्रे पंप, विद्युत मोटारपंप, एचडीपीई पाईप व ताडपत्री पुरवठा योजनेअंतर्गत दिनांक ३१.०३.२००९ पर्यंत लाभार्थ्यांनी उचल न केल्याने ५२ नग शिल्लक होते, तथापि सदर लाभार्थीनी त्यानंतर उर्वरित साहित्याची उचल केली असून साठा निरंक आहे (साठा रजिस्टरची छायांकित प्रत संलग्न)

(३) शासन स्तरावरुन महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादेत नागपूर यांच्याशी झालेल्या दरकरारानुसार साहित्य गुणवत्तेनुसार पुरवठा करण्यात आले असून महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ८७ व नियम ८६ (३) नुसार पुरवठापूर्व तांत्रिक तपासणी अहवाल व विभागप्रमुखाचा तांत्रिक तपासणी अहवाल घेण्यात आलेला आहे.

(४) साठा नोंदवहीवर साहीत्य वाटपाचा दिनांक नमूद करून अद्ययावत करण्यात आलेला आहे व गट विकास अधिकारी यांची साठा नोंदवहीवर स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे.

(५) सदर योजनेअंतर्गत जिल्हा निवड समितीद्वारे लाभार्थीची निवड करण्यात आलेली असून कृषि विभागाकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या अनुदानाच्या अधिन राहून लाभ देण्यात आलेला आहे. मंजूर प्रक्रियेस तांत्रिक अडचणीमुळे विलंब होत असल्याने वेळापत्रकानुसार कार्यवाही करता आली नाही. तथापि भविष्यात निश्चितच वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्यातची दक्षता घेण्यात येईल.

(६) जिल्हा निवड समितीद्वारे लाभार्थीची निवड होत असल्याने पंचायत समिती ठरावाचा मार्गदर्शक सुचनेत उल्लेख नसल्यामुळे मंजुरी घेतलेली नाही.

**परिच्छेद क्रमांक ३.७५१ : ५०% टक्के अनुदानावरील शेळीगट वाटपातील अनियमितता :-**

**(परिच्छेद क्र.३२) सन २००८-०९**

पशुसंवर्धन विभागाअंतर्गत अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांकडून प्रत्येकी रुपये २३,४०० लाभार्थी हिस्सा जमा करून ६ शेळी गटाचे वाटप करण्यात आले. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) लाभार्थीचा विहीत नमुन्यातील करारनामा स्टॅम्प पेपरवर घेण्यात आला नाही.

(२) लाभार्थीना व्यवसायाची आवड व अनुभव असल्याबाबत दाखले नाही.

(३) सदर गटाचा लाभ धारकासोबतचा फोटो काढून दफ्तरी ठेवण्यात आला नाही.

(४) लाभार्थ्याचे लाभार्थी हिश्श्याच्या रक्कमेच्या पावत्या देण्यात आले नाही.

(५) लाभार्थीचे अर्ज, जातीचे दाखले, शेती असल्याचा दाखला दफ्तरी नसल्याने लाभार्थी निवडीबाबत खात्री पटली नाही.

(६) कार्यालयाने मास्टर रजिस्टर ठेवले नसल्याने लाभार्थीस दुबार लाभ दिला किंवा कसे याबाबत खात्री पटली नाही.

(७) उपयोगिता प्रमाणपत्र / फलश्रुती अहवाल पंचायत दफ्तरी उपलब्ध नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) लाभार्थीच्या रु.२० च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून लाभार्थीची स्वाक्षरी करून घेण्यात आलेली आहे.

(२) लाभार्थीना व्यवसायाची आवड व अनुभव असल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडलेले आहे.

(३) सदर गटाच्या लाभधारकाच्या सोबत फोटोची झेरॉक्स प्रत जोडलेली आहे.

(४) लाभार्थी हिस्सा लाभार्थ्यांकडून वसूल करून त्याबाबतच्या पावत्या लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या आहे व जमा झालेली संपूर्ण रक्कम चालान क्र.५६ अन्वये नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा रामटेक येथे रु.८४,०७२ भरण्यात आलेले आहे. चालानाची सत्यप्रत जोडलेली आहे.

(५) लाभार्थीचे मंजूर यादी ही जिल्हा पशुसंवर्धन अधिकारसजिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. सोबत सत्यप्रत जोडलेली आहे.

(६) पंचायत समितीस्तरावर पशुसंवर्धन विभागअंतर्गत मास्टर रजिस्टर ठेवण्यात आलेले असून लाभार्थ्यांना दुबार लाभ दिलेला नाही, याची खात्री करूनच संबंधित लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे.

(७) लाभार्थ्यांकडून उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यात आलेले असूनया योजनेची फलश्रुती नक्कीच झालेली आहे. सोबत पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती, रामटेक यांचा योजनेच्या फलश्रुतीबाबतचा अहवाल जोडलेला आहे.

**परिच्छेद क्र. ३.८४५ दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत रस्ता बांधकामातील अनियमितता :-**

**(परिच्छेद क्र.६) सन २००८-०९**

(१) शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.झेडपीए-२०००/प्र.क्र.-१८/बिच-९, दिनांक १९.०१.२००१ तथा झेडपीए-२००९/प्र.क्र.१८/४७४ वित्त-९, दिनांक ०२.०३.२००९ अन्वये ग्रामपंचायत स्वतः जी कामे करील त्या प्रत्यक्ष खर्चाची ५ टक्के रक्कम ग्रामनिधीत जमा करणे बाबत शासनाचे निर्देश आहे. मात्र ५ टक्के रक्कम भरणा केल्याबाबत कुठलाही दस्तावेज लेखा तपासणीत उपलब्ध करून दिला नाही.

(२) अनुदानाच्या पावत्या नं. ७ तपासणीस उपलब्ध झाले नाही.

(३) काम करण्यास ग्रामपंचायत सक्षम असल्याची आवश्यक कागदपत्रे उपलब्ध झाली नाही.

(४) स्वामित्व धनाची रक्कम भरणा केली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सन २००७-०८ मध्ये समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नागपूर द्वारे पत्र क्र. जिपना/सकवि/दवसु/प्र.मं/५७९९/२००८ दि. २९/०३/२००८ ला ७२ कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली होती. त्याप्रमाणे सन २००७-०८ व २००८-०९ मध्ये सर्व रस्ते व नालींचे बांधकामे ग्रामपंचायतमार्फत पूर्ण करण्यात आलेले आहे. तसेच शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.झेडपीए-२००९/प्र.क्र.४७४/वित्त -९ दि. ०२-०३-२००९ अन्वये नंतर ग्रामपंचायतीने स्वतःची कामे केलेली आहे, त्यात ५ टक्के रक्कम ग्रामपंचायतीने आपले स्तरावर कपात केलेली आहे.

(२) ग्रामपंचायतींना दिलेल्या अनुदानाच्या सामान्य पावत्या ग्राम पंचायतींकडून नमुना ७ मध्ये घेण्यात आलेल्या आहेत व त्याची छायाप्रत सोबत जोडलेली आहे.

(३) शासन निर्णय ग्रा.वि.वि. क्र.झेडपीए-२००८/प्र.क्र-४७२/वित्त ९(३३) दिनांक ०९/०२/०९ नुसार जर ग्रामपंचायतीं रस्त्याचा कामासाठी लागणारे औजारे व यंत्रे भाड्याने घेवू शकतील तर त्यांना रस्त्याचे कामे देण्यात यावी असे नमूद आहे.सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचे बांधकामाकरिता आवश्यक यंत्रसामुग्री भाडे तत्वावर उपलब्ध असल्यामुळे व पंचायत समितीचे तांत्रिक कर्मचारी वर्ग उपलब्ध असल्यामुळे ग्रामपंचायतींनी सदर कामे स्वतः केलेले आहे.

(४) साहित्य पुरवठा पंजीकृत पुरवठादाराकडूनच खरेदी करण्यात आला आहे. पुरवठादाराने गौण खनिजावरील स्वामित्व धनाची राशी जमा केलेली आहे. सर्वच कामे पूर्ण झालेली आहेत. लेखा परिक्षणाचे वेळी अपूर्ण असलेले डुमरीकलार, साटक, पारशिवनी वार्ड क्र.१, पालोरा व गोंडेगाव येथील रस्ता बांधकामे पूर्ण झाल्याबाबत पूर्णत्वाचे प्रमाणपत्रांची छायाप्रत जोडण्यात आलेली आहे.

**परिच्छेद क्रमांक - ३.८४६ दलित वस्ती सुधार योजना व १२ व्या वित्त आयोगाअंतर्गत सिमेंट रस्ता बांधकामातील अनियमितता :-**

**जिल्हा परिषद, नागपूर (परिच्छेद क्र. ८) सन २००८-०९**

सन २००८-०९ या वित्तीय वर्षामध्ये दलित वस्ती सुधार योजना व १२ वा वित्त आयोगाअंतर्गत सिमेंट रस्ता बांधकाम, अंगणवाडी पाणी पुरवठ्याची पाईप लाईन, नाली बांधकाम, समाज मंदिर बांधकाम यावर दलित वस्ती योजनाअंतर्गत रुपये ४४,८९,००० व १२ वा वित्त आयोगा अंतर्गत रुपये १६,४६,७३८ एवढा खर्च नोंदविण्यात आलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. झेडपीए-२०००/प्र.क्र.-१८/बिच-९, दिनांक ०२.०३.२००९ अन्वये ग्रामपंचायत ने स्वत, जी कामे करील त्या कामावरील प्रत्यक्ष खर्चाची ५ टक्के ग्रामनिधीत जमा करणेबाबत शासनाचे निर्देश आहे. मात्र ५ टक्के रक्कम भरणा केल्याबाबत कुठलाही दस्तावेज लेखा तपासणीत उपलब्ध करून दिला नाही. त्यामुळे जमा रक्कम झाली किंवा कसे याबाबत खात्री करता आली नाही. तरी अनुषंगिक दस्तावेजासह खात्री पाठविण्यात यावी.

(२) शासन महसुल व वन विभाग, अधिसुचना क्र. गौखनि/१०/०२०६/पत्र क्र. ५७/खं (२), दिनांक १५.१२.२००६ अन्वये बांधकामाकरिता वापरण्यात आलेल्या खनिज संपत्तीचा वापर करण्यात आला आहे. मात्र त्या संबंधात भरणा करावी लागणारी स्वामित्व धनाची रक्कम भरणा केल्याबाबत अनुषंगिक दस्तावेजासह खात्री पटवून दयावी. अन्यथा वापरण्यात आलेल्या खनिज संपत्तीवर रॉयल्टीची परिगणना करून चालनच्या प्रतीसह खात्री पटवून दयावी.

(३) ग्रामपंचायतीकडून सामान्य पावत्या नमुना ७ प्राप्त न करणेबाबत -

दलित वस्ती सुधार योजना व १२ व्या वित्त आयोगांतर्गत ग्रामपंचायतीना जे अनुदान प्रमाणकान्वये प्रदान करण्यात आले त्याकरिता विहित सामान्य पावत्या नमुना - ७ संबंधित ग्रामपंचायतीकडून प्राप्त केलेल्या नसल्याने त्या प्राप्त करून पूर्तता दर्शवावी.

(४) ग्राम पंचायतीकडे पुरेशी अवजारे व यंत्र उपलब्ध नसणेबाबत-

शासन ग्राम विकास व जलसंवर्धन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक दिनांक २६.८.२००२ मधील तरतूदीनुसार ग्रामपंचायतींना सिमेंट रस्ता बांधकामे देतांना त्यांच्याकडे पुरेशी अवजारे व यंत्रसामुग्री असतील तरच कामे द्यावयाची तरतूद असताना ती ग्रामपंचायतीकडे पुरेश्या प्रमाणात उपलब्ध असल्याबाबत कागदपत्रासह खात्री पटवावी. अन्यथा याबाबत समर्थनिय कारणे स्पष्ट करावीत.

उपरोक्त त्रुटीची पूर्तता करून बांधकामाचे मोजमाप पुस्तिका, अंदाजपत्रक, काम पूर्णत्वाचे प्रमापणपत्रासह खर्च नियमानुसार योग्य असल्याची खात्री पटवावी व तसे अनुपालन सादर करावे. तोपर्यंत दलित वस्ती सुधार योजनाची खर्चाची एकूण रक्कम रु.४४,८९,००० व १२ वित्त आयोगा अंतर्गत खर्चाची एकूण रक्कम रु.१६,४६,७३८ आक्षेपाधीन ठेवण्यात येते.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) दलित वस्ती सुधार योजना व १२ वा वित्त आयोग योजनेअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर सन २००८-०९ या वर्षात सिमेंट रस्ता व नाली बांधकामाकरिता अनुदान वितरित केले होते. सदर योजनेअंतर्गत बांधकाम पूर्ण झालेल्या कामाची काम निहाय ग्रामपंचायत ५ टक्के कामाची रक्कम बचत करून ग्रामनिधी मध्ये जमा केलेली आहे. सदर जमा केलेल्या रकमेबाबत नमुना-७ च्या पावत्या यासोबत संलग्न आहेत.

(२) दलित वस्ती सुधार योजनेमधून सर्व कॉंक्रीट नालीचे कामे घेण्यात आली आहे. सदर कामाला लागणारी रेती, गिटटी ही शासनाच्या लिलाव झालेल्या रेतीघाट तसेच गिट्टी खदानीमधून ग्रामपंचायतींनी पंजीकृत पुरवठादाराद्वारे खरेदी केल्यामुळे गौन खनिजाची रक्कम शासनाकडे जमा केलेली आहे.

(३) आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे दलित वस्ती सुधार योजना व १२ वा वित्त आयोगअंतर्गत ग्रामपंचायतीचा सन २००८-०९ या आर्थिक वर्षात पंचायत समिती कडून देण्यात आलेल्या अनुदानाचे ग्रामपंचायतकडून सामान्य पावती (नमुना-७) घेण्यात आलेले आहेत.

(४) शासन निर्णय ग्रा.वि.वि. क्र.झेडपीए-२००८/प्र.क्र-४७२/वित्त ९,(३३) दिनांक ०९/०२/०९ मुददा क्र. ४ अन्वये जर ग्रामपंचायतींना रस्त्याच्या कामासाठी लागणारे औजारे व यंत्रे भाड्याने घेवू शकतील तर त्यांना रस्त्याचे कामे देण्यात यावी असे नमूद आहे. त्यानुसार ग्रामपंचायतींनी यंत्रे व औजारे उदा. मशिन, लोखंड, सेंट्रींग, व्हायब्रेटर इ. भाड्याने घेऊनकामे केली.

**परिच्छेद क्रमांक ३.९२३ शिलाई मशिन वाटप योजनेतील गंभीर अनियमितता :-**

**जिल्हा परिषद, नागपूर (परिच्छेद क्र. ६ व ७) सन २००८-०९**

पंचायत समिती, नरखेड व मौदा येथे महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद नागपूरचे पत्र २०८ दिनांक २४/२/२००९ अन्वये शिलाई मशिनची योजना राबविण्यांत आली आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) पुरवठा आदेशाप्रमाणे साहित्य पुरवठा केल्यासंबंधिचे डिलेव्हरी चलान लेखापरिक्षणास उपलब्ध न करणे.

(२) साहित्याचा पुरवठा नमूद आदेशाप्रमाणे विहित कालावधीत न करता विलंबाने करणे व दंडात्मक रक्कमेची वसूली पुरवठाधारकांना अंतिम प्रदानातून न करता पूर्णतः शोधन केल्याने पंचायत समिती, नरखेड व मौदा यांचे अनुक्रमे रुपये ८००० + ८००० = १६,००० वसूली होणे आवश्यक आहे.

(३) लाभधारकांच्या मंजूर यादीपैकी पंचायत समिती नरखेड येथे २७ पैकी २३ लाभार्थ्यांना लाभ देण्यांत आला आहे व पंचायत समिती मौदा येथील ३० पैकी २८ लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात आला. उर्वरित ६ लाभार्थ्यांना लाभ न देण्याबाबत समर्पक खुलासा होणे आवश्यक आहे.

(४) साहित्य वितरण रजिस्टरला एकात्मिक बालविकास प्रकल्प व पंचायत सदस्य यांच्या स्वाक्षऱ्या न घेता साहित्य प्रदान करणे.

(५) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ८७ अन्वये साहित्य चाचणी अहवाल प्राप्त केला नाही.

(६) लाभार्थ्यांचे अर्ज लेखापरिक्षणास उपलब्ध करून दिली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना, प्रकल्प नरखेड अंतर्गत सन २००८-२००९ मध्ये महिला व बाल कल्याण समिती जिल्हा परिषद, नागपूर द्वारे महिलांना शिलाई चा पुरवठा करण्याबाबतची योजना राबविण्यांत आली होती.

१) आदेशानुसार साहित्य प्राप्त झाल्याबाबत पोचपावती यासोबत जोडण्यात येत आहे.

२) निविदेतील अटी व शर्तीनुसार पुरवठा आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांचे आत पुरवठा करणे बंधनकारक होते. पुरवठा आदेश दि.२४.२.२००९ चे असून पुरवठादारासोबत दिनांक ३-३-२००९ रोजी झालेल्या करारनाम्याप्रमाणे दि.३१.३.२००९ नंतर पुरवठा झाल्यास दंड वसूलीची अट विहित होती. त्यामुळे पुरवठादाराकडून दोन प्रकल्पांना दि.३१.३.२००९ रोजी पुरवठा झाल्याने दंडात्मक रक्कमेकची वसूली करण्यांत आली नाही

३) पंचायत समिती नरखेड येथील मंजुर सर्व २७ लाभार्थांना साहित्याचे वाटप करण्यात आले आहे, सोबत साठा पंजी ची छायांकित प्रत देण्यात येत आहे. मंजुर २७ लाभार्थीपैकी ४ लाभार्थ्यांच्या नावात बदल असल्यामुळे त्याची रीतसर महिला व बाल कल्याण समिती ची दिनांक ३०.१०.०९ व १२.१.२०१० रोजी मंजुरी घेवून, ४ मंजुर लाभार्थींना साहित्याचे वाटप करण्यात आले आहे, सोबत लाभार्थ्यांचे अर्जाची छायांकित प्रत तसेच लाभार्थांच्या नावात बदल केल्याबाबत महिला व बाल कल्याण समिती चे कार्यवृत्ताची छायांकित प्रत देण्यात येत आहे.

४) साहित्य विवरण रजिष्टरला बालविकास प्रकल्प अधिकारी, नरखेड हे सक्षम अधिकारी असल्याने त्यांच्या स्वाक्षरी घेण्यात आल्या आहेत सोबत छायांकित प्रत जोडण्यात येत आहे.

५) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ८७ अन्वये महाराष्ट्र शासन औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर यांचे कडून शिलाई मशिन नमुन्याची तपासणी अहवाल तथा औद्योगिक प्रशिक्षण संस्था कळमेश्वर यांचे कडून सुद्धा शिवणयंत्राचा तांत्रिक तपासणी अहवाल प्राप्त करण्यात आला आहे.

६) मंजुर २७ लाभार्थांचे अर्ज व लाभार्थ्याची यादी सोबत जोडण्यात येत आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजना, प्रकल्प मौदा अंतर्गत सन २००८-२००९ मध्ये महिला व बाल कल्याण समिती, जिल्हा परिषद, नागपूर द्वारे महिलांना शिलाई मशिनचा पुरवठा करण्याबाबतची योजना राबविण्यांत आली होती.

१) आदेशानुसार साहित्य प्राप्त झाल्याबाबत पोंचपावती यासोबत जोडण्यात येत आहे.

२) निविदेतील अटी व शर्तीनुसार पुरवठा आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांचे आंत पुरवठा करणे बंधनकारक होते. पुरवठा आदेश दिनांक २४-२-२००९ चे असून पुरवठा- दारासोबत दिनांक ३.३.२००९ रोजी झालेल्या करारनाम्याप्रमाणे दि.३१.३.२००९ नंतर पुरवठा झाल्यांस दंड वसूलीची अट विहित होती. त्यामुळे पुरवठादाराकडून दोन प्रकल्पांना दि.३१.३.२००९ रोजी पुरवठा झाल्याने दंडात्मक रक्कमेची वसूली करण्यांत आली नाही.

३) मंजुर सर्व ३० लाभार्थांना साहीत्याचे वाटप करण्यात आले आहे, सोबत साठा पंजीची छायाकिंत प्रत देण्यांत येत आहे. मंजुर ३० लाभार्थीपैकी २ लाभार्थींनी साहित्याची उचल उशीरा केल्याने सबंधितांना साहित्य वाटपास विलंब झालेला आहे.

४) साहित्य विवरण रजिस्टरला बाल विकास प्रकल्प अधिकारी, मौदा हे सक्षम अधिकारी असल्याने त्याच्या स्वाक्षरी घेण्यात आल्या आहेत सोबत छायाकिंत प्रत जोडण्यात येत आहे.

५) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ८७ अन्वये महाराष्ट्र शासन औद्योगिक प्रशिक्षण संस्था नागपूर यांचे कडून शिलाई मशिन नमुन्याची तपासणी अहवाल तथा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कळमेश्वर यांचेकडून पुरवठा केलेल्या शिवणयंत्राचा तांत्रिक तपासणी अहवाल प्राप्त करण्यात आला आहे. मंजुर ३० लाभार्थांचे अर्जाची यादी, व अर्ज सोबत जोडण्यात येत आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.९२५ अंगणवाडी खेळणी साहित्य पुरविण्याबाबत :-**

**जिल्हा परिषद, नागपूर (परिच्छेद क्र.१४) सन २००८-०९**

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) अंगणवाडी खेळणी पुरविण्याकरिता वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार ६ पुरवठाधारकांचे दरपत्रक प्राप्त झाले. त्यामध्ये एस.एस. मार्केटींग यांचे अ.क्र. २ मधिल १) व २) चे दर रुपये १५.५० असतांना कस्तुरी सप्लायर्स यांचे दरपत्रकामध्ये दर रु. ४४.७५ व ४२.७५ असे असतांना वाटाघाटी करतांना केवळ, कस्तूरी सप्लायर्स यांना बोलावून ४१ रुपये प्रती नग प्रमाणे मान्य करण्यांत आले. त्यामुळे कमी दरपत्रक अस्वीकृत करण्यात आल्याने दर फरकाचे रक्कम रुपये २५.५० प्रमाणे १६३४ नग तहानलेला कावळा व टोपी विक्या या पुस्तक खरेदीवर रुपये ८३,३३४ चा शासनाचा निरर्थक खर्च झालेला आहे.

२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिताचे नियम ८७ नुसार साहित्य चाचणी अहवाल प्राप्त केलेला नाही.

३) योजनेची नस्ती तपासणीमध्ये प्रकल्पस्तरावर ठेवण्यात आलेल्या साठा पंजी साहित्य प्राप्ती संबंधीचे डिलीव्हरी मेमो तथा साहित्य वितरणा संबंधीचे दस्ताऐवज लेखापरिक्षणास सादर केले नाही. तरी अनुषंगिक दस्ताऐवजासह लेखापरिक्षणास खात्री पटविणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) मे. एस. एस. मार्केटिंग अमरावती यांनी निविदा प्रक्रियेत भाग घेतला. परंतु पुरविण्यात येणाऱ्या वस्तुंचे सॅम्पल त्यांनी कार्यालयास सादर केले नाही. त्यामुळे त्यांचे दर स्वीकृत करण्यात आले नाही. सोबत तांत्रिक बाबीचा तुलनात्मक तक्ता जोडलेला आहे.

२) तहानलेला कावळा व टोपी विक्या हे अंगणवाडी बालकांचे खेळणी साहित्य तांत्रिक स्वरुपाचे नसल्यामुळे सदरहू साहित्याची कार्यालय स्तरावरच तपासणी करण्यात आली.

३) संबंधित साहित्य वाटपाचे प्रकल्प स्तरावर ठेवण्यांत आलेल्या साठा पंजीच्या सत्यप्रती व डी.एम. यासोबत जोडण्यात येत आहे.

**प्रकरण क्र.३.९२६, आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या स्त्रियांसाठी शिलाई मशिन पुरविण्याबाबत :-**

**जिल्हा परिषद, नागपूर (परिच्छेद क्र.१७) सन २००८-०९**

मे. एस. एस. मार्केटींग अमरावती यांचेकडून खेतान कंपनीची शिलाई मशिन प्रति रुपये २,४८९ प्रमाणे ४०१ नग खरेदी करण्यांत आले. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) पुरवठा आदेशातील अटीनुसार शिलाई मशिनचा क्रमांक/बिल/ डिलीव्हरी मेमोमध्ये नमूद नाही.

२) साठा पुस्तकाच्या तपासणीमध्ये शिलाई मशिन दिनांक ३१-३-२००९ ला प्राप्तीची नोंद असून वाटप मात्र उशिरा करण्यात आले. त्यामुळे योजनेचा उद्देश सफल झाला नसल्याचे दिसून येते.

३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या नियम ८७ अन्वये चाचणी अहवाल घेण्यांत आला नाही. त्यामुळे शिलाई मशिनचा दर करारात नमूद तपशील पाहता त्याच दर्जाचा पुरवठा झाल्याची खात्री पटत नाही.

४) लाभार्थ्यांची निवड यादी अध्यक्ष तथा सभापती तर्फे देण्यांत आली परंतू यादी सोबत लाभार्थ्यांचे शिलाई मशिन प्रशिक्षण डिप्लोमा व बीपीएल क्रमांकाचा दाखला नाही.

५) प्रकल्प नरखेडचे साठा पुस्तकातील लाभार्थी निवड यादी बाहेरील ४ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला परंतू सदर लाभार्थींची सुधारित निवड यादी सादर न केल्यामुळे गरजूंना लाभ दिल्याची खात्री पटत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) लेखा आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे सादर करण्यात येते कि, मे. एस. एस. मार्केटींग अमरावती यांचेकडून खेतान कंपनीची शिलाई मशिन प्रति रुपये २,४८९ प्रमाणे ४०१ नग खरेदी करण्यात आले. डिलेवरी मेमो मध्ये नगाची संख्या जास्त असल्यामुळे मशिनचा क्रमांक टाकण्यात आला नाही.

२) संबंधित लाभार्थी ग्रामीण पातळीवर असल्यामुळे संबंधितांना कळविल्यानंतरही शिलाई मशिनची उचल लवकर करण्यांत आली नाही. संबंधित लाभार्थ्यामुळे वाटप करण्यास उशीर झाला. परंतु लाभार्थ्यांना शिलाई मशिन मिळाल्यामुळे योजनेचा उद्देश सफल झाला.

३) मे. एस.एस. मार्केटिंग यांनी पुरवठा केलेली मशिन ही आय. एस. आय.प्रमाणित आहे. तसेच नमुने स्पेसीफिकेशनप्रमाणे असल्याबाबत आय. टी. आय. नागपूर यांचा तपासणी अहवाल या सोबत जोडण्यात आलेला आहे. तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कळमेश्वर यांचा तपासणी अहवाल या सोबत जोडण्यात आला आहे.

४) संबंधित योजनेसाठी लाभार्थी हा कमी उत्पन्न गटातील (रु.२०००० पेक्षा कमी), प्रशिक्षण डिप्लोमा असणे, ग्रामीण रहिवासी असणे, ह्या मुख्य अटी असल्याने लाभार्थ्यांचे कमी उत्पन्न गटातील असल्याचे प्रमाणपत्र व प्रशिक्षण प्रमाणपत्र घेतलेले आहे. तसेच लाभार्थ्याची निवड महिला बाल कल्याण समितीद्वारे करण्यात आलेली आहे.

५) प्रकल्प नरखेड येथील मंजूर २७ लाभार्थ्यांपैकी ४ लाभार्थ्यांचे नावात बदल असल्यामुळे त्याची रीतसर महिला व बालकल्याण समितीची सभा दिनांक ३०.१०.२००९ व दिनांक १२.१.२०१० अन्वये मंजुरी घेतलेली असून मंजूर लाभार्थ्यांनाच साहित्याचे वाटप झाले आहे. सोबत अर्ज जोडले आहेत.

**परिच्छेद क्रमांक ३.९८१ पुरक पोषण अनुदाना अंतर्गत बचत गटांनी केलेल्या खर्चाबाबत अनियमितता :-**

**जिल्हा परिषद, नागपूर सन २००८-०९ (परिच्छेद क्रमांक-२२)**

पंचायत समिती कामठी सन २००८-०९ या वित्तीय वर्षात एकूण ७ प्रमाणकान्वये रक्कम रुपये ३७,६१,५८९ बचत गटांनी आहार शिजवून दिल्याबाबत रक्कम अदा करण्यात आलेली आहे. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहे.

१) महिला व बालकल्याण विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२००४/प्र.क्र. २३३/ का-५, मुंबई-३२ दिनांक १८-१०-२००५ नुसार बचत गटाची निवड महिला ग्रामसभा/ ग्रामसभा ठरावाद्वारे केल्याबाबतचे ठराव प्रती लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेली नाही. सबब ग्रामसभेच्या ठरावासह बचत गटांची निवडीबाबत खात्री पटवावी.

२) उपरोक्त शासन निर्णयानुसार आहाराच्या नमुन्याची स्थानिक प्रयोगशाळेकडून वर्षातून दोन वेळा तपासणी केल्याची साधार खात्री पटवावी.

३) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मविआ/१०९९/प्र.क्र. ३४५/२४, दिनांक २४-५-१९९९ अन्वये ५ टक्के अभिकरण शुल्क रुपये २,३१,०५० जिल्हा परिषदेकडे जमा केल्याची खात्री पटविणे आवश्यक आहे.

४) अखर्चित रक्कम रुपये ६,२८,६३१ खर्च न करणेबाबत समर्पक खुलासा होणे आवश्यक आहे. वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ६ जून २००८ अन्वये अखर्चित निधी शासनास परत करण्यांची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कामठी येथे महिला व बालकल्याण विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२००४/प्र.क्र. २३३/ का-५, मुंबई-३२ दिनांक १८-१०-२००५ नुसार बचत गटाची निवड ग्रामसभा ठरावाद्वारे करण्यात आली असून याबाबतचे दस्ताऐवज संलग्न आहे.

२) पंचायत समिती, कामठी येथे प्रयोगशाळा नसल्याने आहाराची तपासणी करता आली नाही. तथापि २७ मार्च २००८ चे पुरक पोषण आहाराचे नमुना तपासणी बाबतच्या शासन निर्णयानुसार स्थानिक माता समितीकडून आहाराची नियमित तपासणी होते. यासोबत अहवाल संलग्न आहे.

३) ५ % अभिकरण शुल्काची रक्कम रुपये २,३१,०५० शासनाकडून प्राप्त झालेली आहे, परंतु अनावधानाने ती जमा करण्याचे राहून गेलेले आहे. उपरोक्त रक्कम जिल्हा परिषदेच्या खात्यात जमा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

४) दिनांक ३१.३.२००९ च्या नंतर प्रकल्प कार्यालयाला प्राप्त झालेले सन २००८-०९ चे आहाराचे शोधन न झालेले देयक हे सन २००९-१० मध्ये सदर अखर्चित रक्कमेतून अदा केलेले आहे.

**३.९८२ पुरक पोषण आहार योजनेतील अनियमितता :-**

**जिल्हा परिषद, नागपूर सन २००८-०९ (परिच्छेद क्र.३४) :-**

प्रकल्प नरखेड येथील १२७ अंगणवाड्यांना १२७ बचत गटामार्फत मुलांना पुरक पोषण आहाराचे वाटप करण्यात आले. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

१) शासन निर्णय क्रमांक एबावि-२००४/प्र.क्र.२३३/का-५, दिनांक २८-१०-२००५ अन्वये पुरक पोषण आहार नमुन्याची तपासणी स्थानिक प्रयोगशाळेतून वर्षातून दोन वेळा करायची आहे. परंतु आहाराची तपासणी करण्यात आली नाही.

२) महिला बालकल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक एबावि-२००४/प्र.क.२२३/ का-५ दिनांक २८-१०-२००५ अन्वये महिला ग्रामसभेच्या मदतीने बचत गटाची निवड करुन जिल्हा समितीची मंजुरी घेण्यांत यावी, असे निर्देश असतांना गटाची निवड करण्यांत आली नाही.

३) पोषण आहाराची उपयोगिता प्रमाणपत्रे प्रकल्प दप्तरी उपलब्ध नाही. प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना, प्रकल्प नरखेड अतर्गत कार्यरत १२७ अंगणवाडी केंद्राला १२७ बचत गटामार्फत आहार पुरवण्याचे काम देण्यात आले होते.

१) शासन निर्णय क्रमांक एबावि-२००४/प्र.क्र.२३३/का-५, दिनांक २८-१०-२००५ अन्वये अंगणवाडीस आहार पुरवठा करणाऱ्या बचत गटांना वर्षातून दोन वेळा आहार नमुन्याची तपासणी स्थानिक प्रयोगशाळेतून करायची होती परंतु स्थानिक आहार तपासणी प्रयोग शाळा नरखेड येथे उपलब्ध नसल्यामुळे अंगणवाडी स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या माता समितीमार्फत आहाराची तपासणी करण्यात येत होती, आहाराची तपासणी केल्याबाबत माता समिती चा अहवाल सोबत जोडण्यात आला आहे.

२) महिला व बालकल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक-एबावि-२००४/प्र.क.२२३/ का-५ दिनांक २८-१०-२००५ च्या शासन निर्णयानुसार ग्राम सभेच्या मदतीने बचत गटाची निवड करुन जिल्हा समितीची मंजुरी घेण्यात आली आहे. सोबत दिनांक ३०.७.२००७ च्या समितीची छायांकित प्रति जोडण्यात आली आहे. सदर मंजुरी ही माहे डिसेंबर २००८ ला संपली व पुन्हा बचत गट निवडीची कार्यवाही करण्यांत आली आहे.

३) पोषण आहाराची उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध असून सादर करण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.३.१०३७ जिल्हा परिषदेने लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे :- (परिच्छेद क्र.५८)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरविले जाते त्या तारखेसबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस सबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/ पंचायत समित्यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो तरी सुद्धा लेखा परिक्षणास कागदपत्रे अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व सबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाचे आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांर्भियाने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे सबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करुन देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करुन देवून सुद्धा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

**स्थानिक निधी लेखा मूळ परिच्छेद क्रमांक ५८ :—**

लेखा परिक्षण वेळी ग्रामपंचायतींना काम वाटप करणेबाबत सादर प्रस्ताव उत्पन्न व ५ टक्के बचतीबाबत दस्ताऐवज सादर करणेबाबत सुचित केले असता जिल्हा परिषद स्तरावर सदस्य सचिव, आदीवासी विभाग यांचेकडे सादर केल्याचे नमूद केले. यावर लेखापरिक्षणाचे पुढील आक्षेप आहेत.

१) मागणी प्रस्ताव उत्पन्नाबाबत दस्ताऐवज सादर करणे (म.आ. आदीवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. टीएसपी-२००४/प्र.क्र.-२३/का-१४, दिनांक २ जून २००४ व शासन निर्णय क्र. आदसु-२००६/प्र.क्र. ७२/का-१४, दिनांक २६ जून २००६ अन्वये ग्रामपंचायतीतील काम देणे पुर्वी त्यांच्या मागणी व उत्पन्नाचा प्रस्ताव सदस्य सचिव, आदिवासी विभाग यांना सादर करणेबाबत कोणतेही निर्देश नसून, केवळ ग्रामपंचायतींनी सुचविलेल्या कामांना अनुक्रम व प्रशासकीय मान्यता देणे एवढेच निर्देश असल्याने लेखापरिक्षण वेळी केलेला खुलासा योग्य नसल्याने सदर आक्षेप कायम करण्यात आला.

२) ५ टक्के बचतीबाबत - ग्राम विकास व जल संधारण विभाग आदेश क्र. झेडपीआर-२०००/प्र.क्र.१८/३३, दि. १९ जाने. २००९ अन्वये ५ टक्के रक्कम बचत करणेबाबत निर्देश असल्याने एकूण रकमेच्या ५ टक्के म्हणजेच रू . १,९२,००० बचत केल्याबाबत नमुना ६ सह खात्री पटवावी. कामाच्या ठिकाणी बोर्ड लावणेबाबत म.आ. आदिवासी विभाग शासन परिपत्रक क्र. टीएसपी-२००६/प्र.क्र.१४/का-६ दिनांक २४ एप्रिल २००६ अन्वये कामाच्या ठिकाणी फलक लावणेबाबत निर्देश असल्याने लेखापरिक्षण वेळी आवश्यक दस्ताऐवज नसल्याने खात्री करता आली नाही. तरी उपरोक्त आक्षेपानुसार खुलासा करावा, तोपर्यत रू. ३८,००,००० लेखा मान्य नाही.

**स्थानिक निधी लेखा मूळ परिच्छेद क्रमांक २७ :-** अभिलेख उपलब्ध न करुन देणेबाबत :-

सन २००८-२००९ या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षण करतांना असे निदर्शनास आले की, सेस फंडामध्ये खालील तपशिलान्वये एकूण रक्कम रु. १,०६,९४० चा खर्च नोंदविला आहे. मात्र त्याबाबतचा अभिलेख लेखा परिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आला नाही. याबाबत अर्धसमास पत्र

क्रमांक क्यु दिनांक २८/१२/२००८ अन्वये सदर अभिलेख उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली असता सुद्धा अभिलेख प्राप्त न झाल्यामुळे झालेल्या खर्चाची सत्यता लेखा परिक्षणास पडताळून पाहता आली नाही, त्यामुळे सदर खर्च लेखापरिक्षणात तात्पुरता आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. खर्च तपशिल खालील प्रमाणे :-

| प्रमाणक | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| १४५० | १८/०३/०९ | १५,८४० | ल.सिं.उप.वि.कुही Fixing needles |
| १५४९ | ३१/०३/०९ | १६,००० | ल.सिं.उप.वि.कुही Fixing needles |
| १९०७ | ३१/०३/०९ | २०,७०० | ल.सिं.उप.वि.कुही Fixing needles |
| १९०८ | ३१/०३/०९ | १४,७०० | ल.सिं.उप.वि.कुही Fixing needles |
| १९०९ | ३१/०३/०९ | २५,१०० | ल.सिं.उप.वि.कुही Fixing needles |
| १९१० | ३१/०३/०९ | १४,६०० | ल.सिं.उप.वि.कुही Fixing needles |
| | **एकूण** | **१,०६,९४०** | |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

**उमरेड ५८ .-** लेखा परिक्षणास सादर न केलेले अभिलेखे व दस्ताऐवज अद्यावत करून पंचायत समिती, उमरेड कार्यालयात उपलब्ध असून पुढील होणाऱ्या लेखा परिक्षणाच्या वेळी लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यात येतील.

**कुही २७** .- लेखा परिक्षणास सादर न केलेले अभिलेखे व दस्ताऐवज अद्यावत करून उप विभाग, कुही कार्यालयात उपलब्ध असून पुढील होणाऱ्या लेखा परिक्षणाच्या वेळी लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यात येतील.

**परिच्छेद क्रमांक ३.१०४० (५) ८३/८५ जिल्हा परिषद, नागपूर**

**सन २००८-०९ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी.**

**परिच्छेद क्र.८३, अफरातफर प्रकरणात गुंतलेल्या रकमांच्या वसूलीबाबत.**

पंचायत समिती, मौदाचे सन ०८-०९ चे लेखा परिक्षणात खालील दर्शविलेल्या रकमा ग्रामपंचायतींच्या अफरातफर प्रकरणात गुंतलेल्या असल्याचे निदर्शनास आले.

**तक्ता (सोबत जोडलेल्या आक्षेपानुसार)**

उपरोक्त सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार दर्शविल्या प्रमाणे रुपये ३,१९,३६५ ग्रा.पं. अफरातफर नोंदवही सादर करण्यात न आल्यामुळे प्रत्यक्षात खात्री करता आलेली नाही. सबब उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे अफरातफर प्रकरणात गुंतलेल्या रकमांची वसूली करुन वसूली पावतीसह अनुपालन दर्शवावे.

| जि.प. चे नाव | जि.प. विभागाचे नाव | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| नागपूर | सामान्य प्रशासन विभाग | ८३ | ३,१९,३६५ |
| | | ८४ | १३,५३,१८५ |
| | | ८५ | १,६२,६०३ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदानुसार एकूण प्रलंबित रक्कम रु.३,१९,३६५ दर्शविण्यात आलेली असून प्रत्यक्ष रक्कम रु.२,२७,०६९ आहे. ग्रामसेवकांकडून वसूलपात्र रक्कमेची खालील प्रमाणे वसूली करण्यात आली आहे.

| अ.क्र. | ग्रामसेवकाचे नावे | वसूलीची रक्कम | वसूली झालेली रक्कम | प्रमाणक क्र. व दिनांक | शिल्लक वसूली |
|---|---|---|---|---|---|
| (१) | बी.डी. खडसे | १२,७३६ | १,२०,७३६ | ३६५/०८,३१.०३.०८ | - |
| (२) | एम.पी. चावरीया | १९,८०० | १९,८०० | ६७३,१३.०९.१२ | - |
| (३) | एम.डब्ल्यू. खडतकर | २,०६५ | २०,६५ | ३२,११.०९.०७ | - |
| (४) | टी.पी. तागडे | १८,३०८ | १८,३०८ | ध.क्र.००२६४१,२७.०८.१५ | - |
| (५) | श्री.साकुळे | १,९५३ | - | - | १९५३ परिच्छेदात नमूद ग्रामसेवक हे श्री.साकुळे नसुन श्री.साळोख असून सद्यः स्थितीत ते जि.प.च्या नोकरीत कार्यरत नाहीत. |
| (६) | जी.एम.ठाकरे | - | - | - | परिच्छेदानुसार श्री.ठाकरे यांचेकडे वसूली प्रलंबित नाही. |
| (७) | व्ही.जी.पोतदार | ३,४६६ | ३,४६६ | ९५,३१.३.१२ | - |
| (८) | सी.एम.वैद्य | ५,३२५ | ५,३२५ | सा.पा.क्र.४१/४२१५.०९.०९ | परिच्छेदात नमूद वसूलीची रक्कम रु. ६०,५४१ नसुन रु. ५,३२५ आहे. |
| (९) | डब्ल्यू. बी. ठाकरे | १७,५४० | १८,००० | उप. मु.का.अ. पंचायत यांचे आदेश क्र.९३९ नुसार वसूलीची कार्यवाही पुर्ण | - |
| (१०) | व्ही.एम. उईके | २६,८९० | १३,५०० | आदेश क्र.५४९९ दि..२३.९.१५ | उर्विरित रक्कम रु.१३,३९० पुढील वेतनातून कपात करण्यात येत आहे. |
| (११) | बी.एस. चीचाटे | १०,९८६ | १०,९८६ | से.नि.उपदानातून वसूल | - |
| | **एकूण** | २,२७,०६९ | २,१२,१८६ | | १५,३४३ |

उर्वरित वसूलीची कार्यवाही करण्यात येत आहे.

**सन २००८-०९ या वर्षास जिल्हा परिषद व पंचायत समिती मध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी.**

**परिच्छेद क्र.८५ अफरातफर प्रकरणात गुंतलेल्या रकमांबाबत.**

पंचायत समिती, मौदाचे सन २००८-०९ च्या लेखा परीक्षणात खालील प्रमाणकान्वये प्रदान करण्यात आलेली प्रवास देयके ही १ वर्षावरील आहेत. तपशिल खालील प्रमाणे :-

**तक्ता (सोबत जोडलेल्या आक्षेपानुसार)**

उपरोक्त बाबत अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

(१) उपरोक्त प्रवास देयके ही १ वर्षावरील असल्यामुळे नियम ४४ (४) अन्वये मुदतबाह्य बिले नाकारण्यात यावी असे असतांना सदर देयके मंजूर करण्यात आली.

(२) प्रवास देयके नोंदवही ले.प.स. उपलब्ध करुन देण्यात न आल्यामुळे सदर प्रवास झाला, तसेच शेवटच्या प्रवासाच्या दिनांकापासून १ वर्षाच्या आत सदर देयके सादर केली किंवा कसे? याबाबत खात्री करता आलेली नाही.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ४४(१) अन्वये प्रवास देयके १ वर्षाच्या आत सादर केले नाही तर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी आवश्यक राहील. परंतु उपरोक्त प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी घेण्यात न आल्याचे निदर्शनास आले.

उपरोक्त नियमबाह्यतेबाबत साधार खुलासा करुन अनुपालन दर्शवावे.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.

(१) परिच्छेतांर्गत नमूद प्रवास भत्ता देयके ही एक वर्षाचे आत नियमानुसार सादर केलेली आहे.

(२) प्रवास देयके नोंदवही कार्यालयाच्या स्तरावर ठेवण्यात आलेली असून काही अपरिहार्य कारणामुळे लेखा परीक्षणाच्या वेळी उपलब्ध करता आलेली नाही. सदर देयके ही एक वर्षाच्या आत सादर केलेली आहेत याबाबत खात्री करण्यात आलेली आहे.

(३) सदर देयके एक वर्षाच्या आत सादर केलेली असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुरीची आवश्यकता भासलेली नाही.

**परिच्छेद क्र. ३.१०४० (१८) .- सन २००८-०९ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (परिच्छेद क्र. १६)**

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र. १६ | गुंतलेली रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| १ | नागपूर | स्वामित्व धन (आयकर / विमा वसूली मूल्या वर्धित कर वसूली मुद्रांक शुल्क) | ३४,८२६ |

**मूळ परिच्छेद क्र.१६**

रॉयल्टी रक्कम कमी कपात केल्याबाबत :-

सदर कामाच्या अंतिम मोजमापानुसार खालील प्रमाणे गौण खनिजाचा वापर करण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| बाब क्र २. ९० एमएमए खडी | ३२४.०० क्यु.मी. |
| बाब. क्र.३ ४० एमएम खडी | १४८.५० क्यु.मी |
| बाब क्र.४ मुरूम | १००७.४० क्यु.मी. |
| बाब क्र.१२ बि.बी.एम ७५ एमएम खडी | १२९.५० क्यु.मी. |
| एकूण गौण खडी | १६०५.०५ क्यु.मी. |

शासन निर्देशाप्रमाणे १६०५.०५ क्यु.मी.साठी प्रती क्यु.मी. रु.३५.३० प्रमाणे रु.५६.६५८ रक्कम वसूल करणे आवश्यक होते. परंतु सदर कामाच्या देयकातून रु.२१.८३२ रक्कम वसूल केल्याचे आढळून आले. कमी वसूल केलेली रक्कम रु.३४.८२६ संबंधिताकडून वसूल करून दाखवा रु.३४.८२६ अंतिम अमान्य.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदर काम सन २००६-२००७ या वर्षात मंजूर झाले आहे व कामाचा करारनामा दिनांक १९ सप्टेंबर २००६ रोजी करण्यात आला. सदर प्राकलन तयार करत असताना त्यावेळी प्रचलित असलेले स्वामित्वधनाचे दर रु.१७.६५ प्रती घन मीटर होते व त्यावर आधारित प्राकलनाचे दर निर्धारित करण्यात आले होते. शासनाचे सुधारित दर १५ डिसेंबर, २००६ मध्ये प्रकाशित झाले. परंतू कार्यारंभ आदेश त्यापूर्वीच (१९ सप्टेंबर २००६) रोजी देण्यात आला होता. त्याप्रमाणे कंत्राटदाराने गोळा केलेल्या गौण खनिजावर प्राकलनातील मंजूर दरानुसार म्हणजे रु.१७.६५ प्रती घन मीटर प्रमाणे स्वामित्व धनाची कपात केली आहे.

**सन २००८-०९ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमाबह्य बाबी (परिच्छेद क्र.१९)**

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्र. १९ | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | नागपूर | स्वामित्व धन (आयकर / विमा वसूली/मूल्यावर्धितकर वसूली/मुद्रांक शुल्क) | १७,१७७ |

**परिच्छेद क्र. १९ (४) सार्वजनिक बांधकाम**

करारनामा क्रमांक : बी-१/२७४/एस.आर./२००८-०९

अंदाजपत्रकीय मूल्य- ४,९८,०००

प्रशासकीय मान्यता : कार्यकारी अभियंता

तांत्रिक मान्यता : कार्यकारी अभियंता, ता.क्र.२७/एस.आर/०८-०९

कार्यादेश क्रमांक : क्र. ८३७, दि. ०४/०२/२००९

कालावधी : १ महिना

कंत्राटदाराचे नाव : श्री.अभिषेक गुप्ता

प्रमाणक क्रमांक : ३४४७, दि. २६/३/२००९, रक्कम ४,९९,१५४ प्रथम अपिल

अंतिम मोजमापे :- मो.पु.क्रमांक ८०, पान क्र. १३८ ते १४०

अंतिम मूल्यांकन : रु. ४,९९,१५३

काम पूर्ण दिनांक : ०३/०३/२००९

वरील कामाबाबत संबंधितांस रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे. यावर खालील प्रमाणे लेखा परीक्षणाचा अभिप्राय देण्यात येत आहे.

**रॉयल्टी स्वामित्व धनाची रक्कम कमी कपात न केल्याबाबत :-**

सदर कामासाठी अंतिम मोजमापाप्रमाणे ४० एम.एम.खडी, मुरुम, रेती असे एकूण ७२२ क्यु.मी.गौण खनिजांचा वापर करण्यात आला. नियमाप्रमाणे ३५.३० क्यु.मी. प्रमाणे रु. २५,४१४ रक्कम कपात होणे आवश्यक आहे. तरी कमी कपात केलेली रक्कम रु. १७,१७७ संबंधितांकडून वसूल करावी किंवा भरणा केली असल्यास चलान दाखविण्यात यावी. वरील बाबींची योग्य पूर्तता करून अनुपालन सादर करावे. रु. १७१७७ अंतिम अमान्य.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.

सदर कामासाठी ८० एम. एम खडी, मुरुम, रेती असे एकूण ७२२ घ.मी.गौण खनिजाचा वापर करण्यात आला असून कंत्राटदार यांनी मोजमाप पुस्तिका क्रमांक ८०, पान क्र. १४२ प्रमाणे ४८८.६७ घ.मीटर स्वामित्वधन वाहतूक परवाना जोडलेले होते. त्यामुळे उर्वरित २३३.३३ घ.मी.गौण खणिजाचे रु.३५.३० प्रति घ.मी.प्रमाणे रु.८,२३७ वसूल करण्यात आले.

देयकासोबत स्वामित्व धन वाहतूक परवानाच्या पावत्या जोडलेल्या होत्या, त्यामुळे रु. १७,१७७ ची वसूली करण्यात आलेली नाही. सोबत मोजमाप पुस्तिका पान क्र.१४२/१४३ मध्ये नोंद असून अवलोकनार्थ सत्य प्रत सोबत जोडलेली आहे.

**परिच्छेद क्र. ४.३४ यशवंत ग्रामसमृद्धी योजनेअंतर्गत अनुदानाचे वाटपातील अनियमितता**

**परिच्छेद क्र. १४**

पंचायत समिती, कळमेश्वर (जिल्हा नागपूर) - सन २००८-०९ या आर्थिक वर्षात यशवंत ग्रामसमृद्धी योजनेअंतर्गत विविध ग्रामपंचायतींना रुपये २३,६९,३२० च्या अनुदानाचे वाटप करण्यात आले. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) अनुदान प्राप्त झालेल्या ग्रामपंचायतीने संबंधित प्रयोजनार्थ वापर केल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरिक्षणास उपलब्ध करून दिलेले नाही.

(२) तालुक्यांच्या प्रत्येक विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्यांनी १०० टक्के कामाची तपासणी करणे बंधनकारक असताना तपासणी अहवाल उपलब्ध करून न दिल्यामुळे १०० टक्के तपासणी केल्याबाबत खात्री पटत नाही.

(३) शासन निर्देशात नमूद वेळापत्रकानुसार ग्रामपंचायतीना अनुदानाचे वाटप करण्यात आले नाही.

(४) रक्कम काढण्यापूर्वी खंड विकास अधिकारी यांची मान्यता / मंजुरी घेणे आवश्यक असताना कोणत्याही ग्रामपंचायतीने तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

(५) सदर योजनेअंतर्गत ग्रामपंचायतीचे परिपूर्ण प्रस्ताव व यादीनुसार अनुदान वाटप केल्याबाबत खात्री पटत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती, कळमेश्वरनी सन २००८-०९ या आर्थिक वर्षात यशवंत ग्रामसमृद्धी योजनेअंतर्गत ग्रामपंचायतींना मंजूर अनुदानाप्रमाणे अनुदान वाटप करण्यात आले होते.

(१) सदर योजनेअंतर्गत रुपये २३,६९,३२० अनुदान एकूण १६ ग्रामपंचायतींना वाटप करण्यात आले असून १६ ग्रामपंचायतींनी प्राप्त अनुदानाचे उपयोगीता प्रमाणपत्र सादर केलेले आहे. ग्राम पंचायतीचे नस्तीला सदर प्रमाणपत्र उपलब्ध असून प्रमाणपत्राची प्रत यासोबत जोडलेली आहे.

२) पंचायत समिती स्तरावरील उप अभियंता (बांधकाम) यांनी ग्रामपंचायतीचे कामनिहाय १००% तपासणी केलेली आहे. कामनिहाय तपासणी केल्यावरच निधीचे वितरण करण्यात आलेले आहे. सोबत मोजमाप पुस्तिकेच्या प्रती जोडलेल्या आहे.

३) ग्रामपंचायतीने केलेल्या कामाचे प्रगती नुसारच वेळोवेळी अनुदान वाटप करण्यात आलेले आहे.

४) गट विकास अधिकारी यांची मान्यता घेतल्यानंतरच ग्रामपंचायतींनी रक्कम काढण्याची कार्यवाही केलेली आहे.

५) सदर योजनेअंतर्गत ग्रामपंचायतीकडून प्राप्त प्रस्तावांची पंचायत समिती स्तरावर सविस्तर तपासणी करून प्रस्ताव परिपूर्ण असल्याची खात्री पटल्यानंतरच गट विकास अधिकारी यांची मंजुरी घेऊन अनुदान अदा करण्यात आलेले आहे.

**परिच्छेद क्रमांक- ४.१५८, हातपंप साहित्य खरेदी व विहीर खोलीकरण योजनेतील अनियमितता (परि.क्र.४) :-**

विभागाने हातपंप दुरुस्तीच्या साहित्य खरेदी व विहीर खोलीकरणाकरिता एकूण ४ प्रमाणकान्वये रक्कम रुपये १,२६,७५० चा रोख पुस्तकात खर्च नोंदविण्यात आलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत :—

१) पंचायत समिती सेस फंडातून अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार ९ सार्वजनिक अभियांत्रिकी शीर्षांतर्गत हातपंप दुरुस्तीच्या कामाकरिता साहित्याच्या खरेदीबाबत कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद यांना रक्कम रुपये ६७,२५० धनादेशाने प्रदान करण्यात आले. मात्र सदर विभागाकडून अद्यापही साहित्याचा पुरवठा करण्यात आलेला नाही. त्यामुळे दुरुस्तीची कामे आर्थिक वर्षात झालेली नसल्याचे स्पष्ट होते. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

२) ग्रामपंचायत विहिर खोलीकरणसाठी एकूण रुपये ५९,५०० वितरण करण्यात आलेले आहे. मात्र संबंधित ग्रामपंचायतीकडून अनुदान प्राप्तीच्या नमुना-७ सामान्य पावत्या तसेच विहिर खोलीकरण केल्याबाबतचा खर्चाचा अहवाल अद्यापही प्राप्त झालेला नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक ०२, दि. ३० ऑक्टोबर २००९ अन्वये विचारणा करण्यात आलेली आहे.

३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ४ परिशिष्ट २ तथा महाराष्ट्र ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२०००/ प्र.क्र.-४४४/ वित्त-९, दि. १५ जुलै २००८ अन्वये योजनेला तांत्रिक मंजुरी घेण्यात आल्याचे दिसत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) पंचायत समिती सेस फंड २००८-०९ मध्ये रु.६७,२५० धनादेश क्र. ०८१००६ दि.२३ मार्च २००९ अन्वये कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, नागपूर यांना अदा करण्यात आलेले आहे. विहिर दुरुस्तीकरिता पंचायत समिती कुही पत्र क्र. लेखा/१२७४/०९, दि.२४ मार्च २००९ अन्वये साहित्य मागणी व सदर साहित्य उप अभियंता (यांत्रिकी) भूजल सर्वेक्षण विभाग यांनी त्यांचे स्तरावरून खरेदी करून दि.१२ जुलै २०१० रोजी पंचायत समिती कार्यालयास उपलब्ध करून दिलेले आहे. याबाबत सदर विभागाकडून साहित्य प्राप्त बाबत देवाण घेवाण पावतीची छायांकित प्रत संबंधित विभागाकडून करण्यात आलेल्या साहित्य खरेदीबाबतचे अभिलेखाच्या छायांकित प्रती संलग्न आहेत.

२) पंचायत समिती सेस फंड २००८-०९, लेखाशीर्ष - सार्वजनिक अभियांत्रिकी खाली विहिर खोलीकरण करिता रु.६८००० इतकी तरतूद करण्यात आली होती. सदर तरतूदीपैकी रु.५९५०० इतके अनुदान ग्रामपंचायत स्तरावरून विहिर खोलीकरण व अनुषंगिक विषयावर खर्च करण्यात आलेले असून खालील प्रमाणे ग्रामपंचायतींस अनुदान वितरित करण्यात येऊन त्याबाबत त्यांचेकडून नमुना-७ पावत्या घेण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर अनुदान ग्रामपंचायतींनी विहीर खोलीकरण या बाबीवर खर्च केली असून तसा खर्च अहवाल रोख पुस्तक, प्रमाणके व उपयोगिता प्रमाणपत्रासह सादर केला असून छायांकित प्रतिसोबत जोडलेल्या आहेत.

| अ.क्र. | ग्रा.प.चे नाव | अनुदान रु. | धनादेश क्र. व दिनांक | नमुना-७ पावती क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | राजोला | ३४००० | १३/३१/०३/२००९ | ०१६/दि.१६/०१/१० |
| २ | अडम | ८५०० | १४/३१/०३/२००९ | ००८/दि.२१/०८/०९ |
| ३ | तितूर | ८५०० | १५/३१/०३/२००९ | ००२/दि.१३/०८ ०९ |
| ४ | तुडका | ८५०० | १६/३१/०३/२००९ | ००४/दि.१३/०७/०९ |
| | एकूण | ५९५०० | | |

सदर अनुदान तरतुदीनुसार विहीर खोलीकरण बाबीवर खर्च झाले असून तसा अहवाल सादर करण्यात आला आहे. तरी सदर खर्च नियमानुसार झाला आहे.

३) प्रस्तुत योजना पंचायत समिती सेस फंड २००८-०९ मधून राबविण्यात आली असून सार्वजनिक अभियांत्रिकी लेखाशीर्षाखाली हातपंप दुरुस्तीकरिता लागणारे साहित्य खरेदीकरिता आवश्यक तांत्रिक मंजुरी सक्षम प्राधिकारी उप अभियंता (यांत्रिकी), यांत्रिकी उप विभाग जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून त्यांचेकडील पत्र क्रमांक जा.क्र./उपअभि/३३८/०९, दि. १९ मार्च २००९ अन्वये घेण्यात आली आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.१६९, ५० टक्के अनुदानावर ग्रामपंचायतींना पुरविण्याबाबत ब्लिचींग पावडर खरेदी प्रक्रियेमधील अनियमितता :-**

पंचायत समिती काटोल, जिल्हा नागपूर सन २००८-०९ (परिच्छेद क्र. १०) दिनांक ३१/०३/२००९ नुसार रक्कम रुपये ५८,८७५ ब्लिचींग पावडर खरेदी करून उपरोक्त प्रमाणकान्वये पुरवठादारास रक्कम अदा करण्यात आलेली आहे. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

१) ब्लिचींग पावडर खरेदी करताना खंड विकास अधिकारी पंचायत समिती काटोल यांनी स्थानिक रीत्या दरपत्रके / निविदा करून कार्यवाही करणेबाबत निर्देश दिलेले असताना तशी कार्यवाही न करता पंचायत समिती नरखेड यांनी मंजूर केलेल्या दरपत्रकातील पुरवठादारास ब्लिचींग पावडरचा पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे. सदर कार्यवाही पंचायत समिती महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक १० जुलै १९९३ नुसार करण्यात आलेली नाही सक्षम अधिकारी यांचे आदेशानुसार दरपत्रके/निविदा मागविण्याची कार्यवाही केलेली नाही.

२) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-१०२०/पत्र क्र. दिनांक ०९ फेब्रुवारी २००१ नुसार लाभार्थी हिस्सा वसूल करण्यात आलेला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) ५० टक्के अनुदानावर ग्रामपंचायतींना ब्लिचींग पावडर पुरविण्याबाबत सन २००८-०९ या आर्थिक वर्षात रुपये ६०,००० ची तरतूद ही माहे जानेवारी, २००९ ला करण्यात आल्यामुळे तसेच उन्हाळ्याच्या दिवसातील साथरोग नियंत्रणाचे दृष्टीने योजना राबविण्याकरिता कालावधी कमी पडत असल्यामुळे नजिकच्या पंचायत समिती, नरखेड येथील मंजूर केलेल्या दरपत्रकानुसार ब्लिचींग पावडर खरेदी करण्यात आली. प्रत्यक्ष खरेदीपूर्वी स्थानिक बाजारपेठेतील दरपत्रके मागवून तुलना केली असता पंचायत समिती, नरखेड यांचे मंजूर दर कमी असल्यामुळे त्या दराने खरेदी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

२) लाभार्थी हिश्याची रक्कम जमा करण्यास विलंब होत असल्यामुळे ब्लिचींगसाठा लाभार्थी हिस्सा रक्कम जमा करण्याआधी वाटप करण्यात आला व नंतर लाभार्थी हिस्सा जमा करण्यात आला. यापुढे शासन परिपत्रकातील निर्देशानुसार लाभार्थी हिस्सा जमा करून त्यानंतरच साहित्य वाटपाची कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येईल.

**परिच्छेद क्रमांक - ४.१९६, ५० टक्के सुटीवरल ताडपत्री योजना शासन निर्देशाचे पालन न करणे**

**पंचायत समिती भिवापूर, जिल्हा नागपूर सन २००८-२००९ (परिच्छेद क्र. ४)**

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक कमांक १०९३, प्रमाणक क्र.१२३९/३४ दिनांक १ सप्टेंबर २००३ मधील निर्देशानुसार वैयक्तिक लाभार्थी योजना राबविण्यापूर्वी लाभार्थी संख्या निश्चित करणे अनिवार्य आहे. तसेच महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/१०२०/प्र.क./१४ दिनांक ९ फेब्रुवारी २००१ अन्वये योजनेचे साहित्य खरेदीपूर्वी लाभार्थी हिस्सा वसूल करण्याचे निर्देश आहे. विभागाने दोन्हीही शासन निर्णयाची अवहेलना करून निवड प्रक्रिया व लाभार्थी हिस्सा वसूल केल्याचे दिसून येत नाही.

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. १०९३/प्रक./१२३६३/३४, दि. १ सप्टेंबर १९९३ व क. १०८२/ ६४५/३६६/३४ दि. २१ जुलै १९८९ मधील अनुक्रमे योजना ज्या वित्तीय वर्षात राबविणेबाबत निर्देश असून व योजनेचे मूल्यमापन करण्याबाबत निर्देश असतांना दोन्ही शासन निर्देशाचे पालन केलेले नाही. त्यामुळे शासनाच्या विकासात्मक हेतूकडे दुर्लक्ष करून योजना राबविणे गंभीर बाब आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २००८-०९ पंचायत समिती सेस फंड योजनेअंतर्गत रु.७६,००० सुधारित अंदाजपत्रकामध्ये तरतूद करण्यात आली होती. पंचायत समितीच्या मासिक सर्वसाधारण सभा दि. १० फेब्रुवारी २००९ रोजी ठराव क्र. ८ नुसार ५९ लाभार्थीची संख्या निश्चित करण्यात आली. साहित्य खरेदीपूर्वी लाभार्थी हिस्सा वसूल करण्याचे निर्देश आहे. योजनेची सुधारित तरतूद उशीरा झाल्यामुळे व लाभार्थ्यांनी मुदतीच्या आत लाभार्थी हिस्सा जमा न केल्यामुळे योजना त्याच वित्तीय वर्षात राबविता आली नाही. तथापि, निवड केलेल्या लाभार्थीकडून लाभार्थी हिस्सा जमा करण्यात आलेला असून अनुदान तथा लाभार्थी हिस्सा पुरवठादार अनुदान तथा लाभार्थी हिस्सा पुरवठादार संस्थेला अदा करण्यात आलेले आहे व संपूर्ण प्राप्त ताडपत्री मंजूर लाभार्थीना वाटप करण्यात आलेली असून साठा निरंक आहे. सोबत साठापंजी व चालानच्या प्रती जोडण्यात आलेल्या आहेत. योजनेचे मूल्यमापन करण्यात आले असून मूल्यमापन अहवाल सोबत जोडण्यात आला आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.२७८, प्रशिक्षित मागासवर्गीय महिलांना १०० टक्के अनुदानावर शिलाई मशिनचा पुरवठा करणे योजनेतील अनियमितता : -**

प्रमाणक क्रमांक १६ दि. ३१ मार्च २००९ रक्कम रु. ६९,६९२ सन २००८-०९ या वर्षात पंचायत समिती सेसफंड अंतर्गत समाज कल्याण विभागासाठी मागासवर्गीय महिलांना १०० टक्के अनुदानावर शिलाई मशिनचा पुरवठा करणे या योजनेकरिता सुधारित तरतूद रु. ७१००० केली असता विभागाने पत्र क्र./पंसना/पंचा/१२५७/०९, दि. २ मार्च २००९ नुसार मे. खेतान कंपनीची आयएसआय मार्क २८ नग शिलाई मशिन किंमत प्रती नग रु. २४८९ प्रती शिलाई मशिन प्रमाणे जि.प. चे दर कर धारक मे. एस.एस. मार्केटिंग बोराडे मार्ग नमूना गल्ली नं. १ अमरावती यांना पुरवठा आदेश दिला असता साहित्य पुरवठाबाबत उपरोक्त प्रमाणकान्वये संबंधित पुरवठाधारकाला शोधन करण्यात आले. याबाबत लेखापरिच्छेदाचे आक्षेप खालील प्रमाणे आहे.

१) विभागाने दिलेल्या पुरवठा आदेशातील अटी व शर्ती नुसार शिलाई मशिनचा पुरवठा दि. १७ मार्च २००९ पर्यंत करण्याबाबत निर्देश दिलेले असता पुरवठाधारकाने शिलाई मशिनचा पुरवठा केल्याचे पोहच पत्र नस्तीत आढळून आलेले नाही. त्यामुळे साहित्य विहित कालावधीत पंचायत समितीला पुरवठा केल्याबाबत लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही. तथापि साठा पुस्तकातील पृष्ठ क्र. ५८ वर साहित्य प्राप्त नोंद दिनांक ३१ मार्च २००९ ला घेतलेली असल्यामुळे शिलाई मशिनचा पुरवठा १३ दिवस विलंबाने केलेला असल्याचे लेखापरिक्षणाचे मत आहे. विभागाने उपरोक्त प्रमाणकाद्वारे पुरवठाधारकाला पुरविलेल्या साहित्याचे पूर्ण शोधन केलेले असल्यामुळे संबंधित पुरवठाधारकावर कुठलीही दंडात्मक कार्यवाही केलेली नाही. तरी पुरवठाधारकाने साहित्याचा निश्चितपणे कधीही पुरवठा केल्याबाबत साहित्य पोहोच पावती लेखापरिक्षणास सादर करून पुरवठा विहित कालावधीत केल्याची लेखापरिक्षणाची खात्री करवून घ्यावी. अथवा साठा पुस्तकात साहित्य प्राप्तीबाबत नोंद घेतल्याची तारीख ग्राह्य धरून १३ दिवस विलंबाने साहित्य पुरवठा केल्याबाबत पुरवठाधारकाकडून शासन नियमाप्रमाणे १/२ टक्के प्रती आठवड्याप्रमाणे रु. ६९७ दंडाची रक्कम योग्य त्या शीर्षात भरणा करून तसे लेखापरिक्षणास अनुपालन सादर करावे.

२) संबंधित योजनेच्या नस्तीचे अवलोकन केले असता नस्तीमध्ये लाभार्थ्यांचे अर्ज, लाभार्थ्यांचे निवड केलेली व पंचायत समिती सभेची मंजुरी प्रदान केलेली यादी इ. अभिलेखे लेखा परिक्षणास आढळून आलेली नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग परिपत्रकझेडपीए-२०००/प्रक्र./४१/३३, दि. १७ जानेवारी २००१ अन्वये ३० सप्टेंबर पूर्वी लाभार्थी निवड करणे बाबतचे निर्देशाचे पालन झाले असल्याचे लेखापरिक्षणास तपासणी करता आली नाही. त्याचप्रमाणे लेखापरिक्षणापर्यंत साठा पुस्तकातील नोंदी नुसार २८ पैकी २० नग शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले असून ८ नग अद्याप वाटपाविना शिल्लक असल्याचे दिसून आले. त्यामुळे शिलाई मशिनची किंमत रु. २४८९ प्रमाणे ८ नग शिलाई मशिनची एकूण रु. १९९१२ पंचायत समितीचा निधी अकारण गुंतून आहे. याबाबत जबाबदारी निश्चित करून केलेल्या कार्यवाहीबाबत लेखापरिक्षणास अवगत करावे व शिल्लक ८ नग शिलाई मशिन योग्य लाभार्थ्यांना त्वरित वाटप करून पंचायत समिती निधी रक्कम मोकळी करावी. तरी वर नमूद प्रमाणे आवश्यक ती पूर्तता करून आवश्यक अभिलेखासह लेखा परिक्षणास अनुपालन सादर करावे. वसूलीची रक्कम ६९७.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

प्रशिक्षित मागासवर्गीय महिलांना १०० टक्के अनुदानावर शिलाई मशिनचा पुरवठा करणे योजनेतील अनियमितताबाबत :—

१) पं.स. नागपूरचे पुरवठा आदेश क्र./पंसना/पंचा/१२५७/०९, दि. २ मार्च २००९ अन्वये मे. एस.एस. मार्केटिंग, बोराडे मार्ग नमुना गल्ली नं. १, अमरावती यांना दि. १७ मार्च २००९ पर्यंत साहित्य पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतु संबंधित पुरवठाधारकाकडे संपूर्ण जिल्ह्यातील साहित्य पुरविण्याचे आदेश असल्याने त्यांनी १३ दिवस विलंबाने साहित्याचा पुरवठा केला. त्यामुळे संबंधित पुरवठाधारकाकडून नियमाप्रमाणे १/२ टक्के प्रती आठवड्याप्रमाणे रु. ६९७ वसूल करून पंचायत समिती सेस फंड खात्यामध्ये जमा करण्यात आलेली आहे.

२) पंचायत समिती सेस फंड सन २००८-०९ चे लाभार्थ्यांचे अर्ज त्याच प्रमाणे पंचायत समिती नागपूरची सर्वसाधारण सभा दि. २९ नोव्हेंबर २००८ विषय क्रमांक १० अन्वये मंजुरी घेण्यात आलेली आहे. लाभार्थी निवड प्रक्रियेस तसेच पंचायत समितीतील सर्वसाधारण सभेची मंजुरी इत्यादी कारणामुळे थोडाफार विलंब झाला. तथापि, त्यानंतर विहित वेळापत्रकानुसारच कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहे. लाभार्थ्यांना सन २००८-०९ या वर्षांत २० नग शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले व उर्वरित लाभार्थी साहित्याची उचल करण्याकरिता आले नाही. त्यामुळे लेखापरिक्षणा पर्यंत ८ नग साहित्य शिल्लक होते. त्यानंतर सर्व लाभार्थ्यांना शिलाई मशिनचे वाटप करण्यात आलेले असून कोणतेही साहित्य शिल्लक राहिलेले नाही.

**परिच्छेद क्रमांक ४.२७९ : प्रोत्साहनपर शौचालय अनुदान वाटप करणे.**

**पंचायत समिती, उमरेड (जिल्हा नागपूर) सन २००८-०९**

प्रमाणक क्रमांक ३ दिनांक १६ ऑक्टोबर २००८ अन्वये ग्रामपंचायत डव्हा अंतर्गत दारिद्र्य रेषेखालील लाभार्थीनी वैयक्तिक शौचालय बांधकाम केल्याबाबत प्रती लाभार्थी रुपये १,२०० प्रमाणे ३१ लाभार्थीना रुपये ३७,२०० प्रोत्साहनपर अनुदान म्हणून वाटप करण्यात आले याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

संपूर्ण स्वच्छता अभियान अंतर्गत दारिद्र्य रेषेखालील लाभार्थींनी महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन परिपत्रक क्र. २००८/प्र.क्र. ७२/पा.पु.१६, दिनांक २५ मार्च २००८ अन्वये वैयक्तिक शौचालय बांधकाम केल्याबाबतचे दस्ताऐवज लेखापरिक्षणास सादर केले नसल्याने दिलेल्या लाभाची खात्री करता आली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

अनुपालन सादर करण्यात येते की, ग्रामपंचायत डव्हा अंतर्गत बी.पी.एल. लाभार्थींना स्वच्छतागृह बांधकाम केल्यानंतर लाभार्थी बी.पी.एल. मध्ये असल्याची खात्री करून तसेच पिवळे रजिस्टर नमुना-२८ नुसार स्वच्छतागृह बांधकाम पूर्ण झाल्यानंतर बी.पी.एल. लाभार्थींना प्रोत्साहनपर शौचालय अनुदान वाटप करण्यात आलेले आहे.

अनुपालनासोबत दस्ताऐवजाच्या सत्यप्रती खालील प्रमाणे :

१. बी.पी.एल. लाभार्थींची यादी.

२. पिवळे रजिस्टर नमुना-२८

३. शौचालय पूर्ण केल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र

**परिच्छेद क्रमांक ४.२८० : ९० टक्के अनुदानावर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जेन्ट्स सायकलचा पुरवठा योजनेमधील अनियमितता.**
**पंचायत समिती, कळमेश्वर (जिल्हा नागपूर) सन २००८-२००९ (परिच्छेद क्र.११)**

पंचायत समिती सेसफंड अंतर्गत ९० टक्के अनुदानावर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ७ नग जेन्ट्स सायकलचा पुरवठा करणेसाठी जिल्हा परिषद नागपूर दरकरारधारक मे. बाहेती ब्रदर्स, नागपूर यांना प्रति नग रु. २,५१० प्रमाणे अदा करण्यात आले. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत :–

१) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. झेडपीए २०००/ प्र.क्र.४१ /३३ दिनांक १७ जानेवारी २००१ नुसार योजनांची निवड, तांत्रिक व प्रशासकीय मान्यता, लाभार्थी निवड इत्यादी बाबी ३० जून ते १ नोव्हेंबर या कालावधीत पूर्ण करावयास पाहिजे. शासन परिपत्रकानुसार योजनेचे वेळापत्रक राबविलेले नाही.

२) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जेन्ट्स सायकलचा पुरवठा करणे या योजनेस पंचायत समिती सभेने तरतूदीसह मंजुरी प्रदान केली आहे. परंतू ७ पैकी २ विद्यार्थीनींना जेन्ट्स सायकलचा पुरवठा करण्यात आला. जेन्ट्स सायकलचा वापर विद्यार्थीनींनी स्वतः केला किंवा कसे ? याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

३) पुरवठा आदेशात नमूद केल्याप्रमाणे पुरवठा दिनांक २७ मार्च २००९ पर्यंत करणे आवश्यक होते. तथापि, साहित्य निर्धारित कालावधीत पुरवठा झाल्याबाबत खात्री पटलेली नाही. सबब अनुषंगिक दस्ताऐवजासह खात्री पटविणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) सन २००८-०९ च्या पंचायत समिती सेस फंडाचे मुळ अंदाजपत्रकात ९० टक्के अनुदानावर बाहेर गावी शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकलचा पुरवठा करणेबाबत अर्थसंकल्पिय विशेष सभा दिनांक ११ फेब्रुवारी २००८ चे कार्यवृत्तांत विषय क्रमांक अन्वये टोकन क्र. १ अन्वये तरतूद रु. १०० ठेवण्यात आली होती. त्यामुळे शासन निर्णयानुसार योजनेचे वेळापत्रक राबविणे शक्य झाले नाही. सन २००८-०९ चे सुधारित अंदाजपत्रक ठराव क्र.१० दिनांक ५ फेब्रुवारी २००९ च्या विशेष सभेत मंजूर करण्यात आले. त्यानुसार योजना राबविण्यात आली तसेच तांत्रिक व प्रशासकीय मान्यता मंजुरी आदेश क्रमांक ७५७ दिनांक ९ मार्च २००९ अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. लाभार्थ्यांच्या यादीला तत्कालीन सभापती व गट विकास अधिकारी यांनी मंजुरी प्रदान केलेली आहे. त्याबाबतचे आवश्यक दस्ताऐवज सोबत जोडण्यात आलेले आहे.

२) सदर योजनेअंतर्गत उपलब्ध निधीनुसार ७ सायकलचा पुरवठा करण्यात आलेला होता त्यानुसार सातही सायकलचे वाटप मंजूर लाभार्थ्यांना करण्यात आलेले असून सदरहू विद्यार्थीनींना त्यांचे मागणीनुसार सायकलचा पुरवठा करण्यात आला असून सदर विद्यार्थीनींनी सायकलचा उपयोग शाळेमध्ये जाणेऱ्येणे करिताच केलेला आहे. त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र यासोबत जोडलेले आहे.

३) पुरवठा आदेशात नमूद केल्याप्रमाणे पुरवठा दिनांक २७/०३/२००९ पर्यंत करणे आवश्यक होते, परंतु सदरचा पुरवठा दिनांक ३१/०३/२००९ रोजी (४ दिवस उशीरा झाला). सायकल पुरवठा सुस्थितीत प्राप्त झाला असून त्याची नोंदसाठा नोंद वहीवर पान क्रमांक २६ वर घेण्यात आली असून त्याबाबतचे दस्ताऐवज यासोबत जोडलेले आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.२८१ : ९०% अनुदानावर शिलाई मशीन योजनेतील गंभीर अनियमितता. पंचायत समिती, हिंगणा (जि. नागपूर) सन २००८-२००९ :-**

योजनेसाठी खरेदी करण्यात आलेल्या शिलाई मशीनचा डिलीव्हरी मेमो तपासणीकरिता उपलब्ध करून न दिल्यामुळे दंडात्मक रकमेची परिगणना करता आली नाही.

पुरवठा करण्यात आलेल्या शिलाई मशीन गुणवत्ता पूर्ण असल्याबाबत कुठलाही अभिलेख तपासणीमध्ये दाखविण्यात आला नाही. तसेच लाभार्थी हिस्सा रु.६,२२५ सुद्धा वसूल केलेली रक्कम लेख्याबाहेर ठेवण्यात आली आहे.

ज्या लाभार्थीना लाभ दिला आहे त्या १४ लाभार्थीचे करारनाम्यावर नाव नमूद नाही. तसेच ३ लाभार्थ्याचा करारनामासुद्धा केलेला नाही. शिलाई मशीनची साठा नोंदवही पोलीस स्टेशनला जमा असल्याचे निदर्शनास आले.

शिलाई मशीन ज्या गोडावून मध्ये ठेवण्यात आल्या त्या गोडावूनमधून चोरी झाल्यामुळे तसेच साठापंजी पोलीस स्टेशनला जमा असल्यामुळे वितरणाचा हिशोब तपासता न आल्यामुळे योजना राबवितांना योग्य प्रशासकीय नियंत्रणाचा अभाव असल्यामुळे खर्च निरर्थक झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

**मुद्दा क्र.१ -** योजेनेसाठी खेरेदी करण्यात आलेले शिलाई मशीन एकूण २५ नगचे पोहच पावती क्र.१० दिनांक १४.०३.२००९ ची प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे.

**मुद्दा क्र.२ -** पुरवठा करण्यात आलेल्या शिलाई मशीन गुणवत्तापूर्ण असल्याबाबत पुरवठा आदेश क्र.३१०, दि.२४.२.२००९ याजनेअंतर्गत अटी व शर्ती स्पेसिफीकेशन नुसार आय.एस.आय. प्रमाणिम मालाचा पुरवठा केल्यानुसार संबंधित पुरवठाधारकाकडून आय.एस.आय. ची प्रत लेखापरिक्षणासाठी सोबत जोडण्यात आलेली आहे. तसेच शिलाई मशीन वाटप झाल्यानुसार वसूलपात्र १०% रक्कम रुपये २४९ प्रमाणे २५ लाभार्थ्यांचे एकूण रुपये ६२२५ एस.एस.मार्केटिंग, अमरावती यांना दिनांक ३१.३.२००९ ला प्रदान करण्यात आले असून संबंधित पुरवठा धारकाची पावती सोबत जोडण्यात आलेली असून लेखापरिक्षणासाठी सादर करण्यात येत आहे.

**मुद्दा क्र.३ -** ज्या लाभार्थ्यांना लाभ दिला त्या १४ लाभार्थीच्या करारनाम्यावर नाव नमूद नाही. तसेच ३ लाभार्थीचे करारनामा सुद्धा केलेला नाही ही बाब सत्य आहे. शिलाई मशिनची साठा नोंदवही पोलीस स्टेशनला जमा असल्याने सदर प्रकरण पूर्तता करता आली नाही.

**मुद्दा क्र.४** - प्रकल्प हिंगणा कार्यालयात शासकीय साहित्याची चोरी झाल्यामुळे सदर प्रकरणी पोलीस हिंगणा येथे गुन्हा क्रमांक १३६/०९ दिनांक १५/०७/२००९ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस विभागामार्फत सविस्तर तपास करण्यात येऊन प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. साहित्याचे वाटप रजिस्टर पोलीस स्टेशनला जमा असल्यामुळे लेखापरिक्षणाच्या वेळी दाखविण्यात आले नाही. याबाबत खात्री करण्यात आली आहे. एफ.आय.आर. प्रत सोबत जोडली आहे. सदर प्रकरणामध्ये श्री.विजय राठोड, परिचारक, एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प, हिंगणा यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे आदेश क्र. जिपना/ साप्रवि / स्था-३ (१)/११६५७/२००९ दिनांक २३/१२/२००९ नुसार निलंबित करण्यात आले तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचा आदेश क्र. जिपना/साप्रवि/स्था-३ (४)/सी.आर-२४/८६८८/२२०१२, दिनांक १०/०७/२०१२ नुसार आरोप पूर्तता सिद्ध झाल्याने सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.२८२ : ९० टक्के अनुदानावर मागास शेतकऱ्यांना पी.व्ही.सी. पाईपचा पुरवठा करणे या योजनेतील अनियमिततेबाबतः-**

पंचायत समिती काटोल (जिल्हा नागपूर) सन २००८-२००९ (परिच्छेद क्रं ७ - पंचायत समिती सेसफंडातून अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार समाजकल्याण शिर्षाअंतर्गत प्रमाणक क्रमांक २७ दिनांक ३१.३.२००९ नुसार रक्कम रुपये १,०८,८६४ चा पी.व्ही.सी.पाईप खरेदीवर खर्च करण्यात आलेला आहे याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत :–

(१) पुरठादाराने साहित्य केव्हा पोहोचविले. पोच पत्रावर दिनांक नमूद नाही साहित्य साठा पुस्तक पान क्रंमाक २७ वर नोंदविलेला आहे. मात्र साहित्य केव्हा प्राप्त झाले. त्याबाबत दिनांक सुद्धा नमूद नाही त्यामुळे साहित्य विलंबाने प्राप्त झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापि आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी अनुदान व्यपगत होऊ नये या दृष्टीने साहित्य प्राप्त होण्यापूर्वी नियमबाह्य पुरठादारास रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

(२) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण परिपत्रक क्र. झेडपीए-२०००/प्र.क्र.-४१/दिनांक १७ जानेवारी, २००१ नुसार निर्देशाचे पालन केल्याचे दिसत नाही. तसेच महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण परिपत्रक क्रं झेडपीए-१०२०/प्र.क्र.-१४/३८, दिनांक ९/२/२००१ मधील तरतूदीकडे पूर्णतः दुर्लक्ष करण्यांत आलेले आहे.

(३) विभागाने सदर देयक प्रमाणक नमुना ८३ जमा परतावा आदेश मध्ये तयार करण्यांत आलेले आहे जेव्हा की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ७९ नुसार आकस्मिक खर्चाचे देयक नमुना २९ मध्ये तयार करून मंजुरी घेणे आवश्यक आहे परंतु तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(४) एकूण ३३० नग पी.व्ही.सी.पाईप पैकी १५० नग लेखापरिक्षण दिनांकापर्यंत वाटपाशिवाय साठा पुस्तकांत प्रलंबित असल्याचे दिसून येते यावरून असे दिसते की, शासन निर्णय दिनांक १९//२००१ नुसार निवड प्रक्रिया व लाभार्थी हिस्सा वसूल न करता शासकीय अनुदान खर्च करणे ही नियमबाह्य बाब आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) शासन दर करारानुसार महाराष्ट्र राज्य लघुउद्योग महामंडळ विभागीय कार्यालय नागपूर यांचे कडून एकूण ४८० नग, पी.व्हि.सी. पाईप या पंचायत समितीला दिनांक २५.३.२००९ ला प्राप्त झाले त्याची नोंद साहित्य साठा नोंदवही पृष्ठ क्रमांक २७ वर घेण्यांत आलेली आहे. सदर साहित्य दिनांक २५.३.२००९ ला प्राप्त झाले व त्यानंतर साहित्य लाभार्थीस वाटप करण्यांत आले आहे.

(२) पंचायत समिती सभा दिनांक ३१.१.२००९ नुसार सदर योजनेकरिता सुधारित तरतूद उपलब्ध केल्यामुळे महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण परिपत्रक क्रमांक झेडपीए-२०००/प्र.क्र.-४१, दिनांक १७ जानेवारी, २००१ तसेच परिपत्रक क्रमांक झेडपीए-१०२०/प्र.क्र-१४/३८, दिनांक ९/२/२००१ मधील तरतूदीचे पूर्णतः पालन करता आले नाही. सदर योजनेअंतर्गत पंचायत समितीद्वारे लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. निवड प्रक्रियेस तांत्रिक अडचणीमुळे विलंब होत असल्याने वेळापत्रकानुसार कार्यवाही करता आली नाही. तथापि भविष्यात निश्चितच वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

(३) पुरवठादाराला अनावधानाने नमुना ८३ वर देयक मंजुरीस सादर करण्यात आले यापुढे आकस्मिक खर्चाचे देयक नमुना २९ मध्ये सादर करण्याची नोंद घेण्यात येत आहे.

(४) सन २००८-२००९ यावर्षात एकून ४८० पी.व्ही.सी. पाईप पंचायत समितीला प्राप्त झाले असून ३३ लाभार्थीस प्रत्येकी १० नग याप्रमाणे ३३० नग या प्रमाणे लाभ दिलेला आहे. सन २००८-०९ मध्ये मंजूर लाभार्थ्यांना वाटप करण्याकरिता प्राप्त झालेले साहित्य मार्च २००९ अखेरीस प्राप्त झाले व तात्काळ उचल करण्याबाबत लाभार्थ्यांना सूचित करून देखील लाभार्थ्यांनी साहित्याची उचल वेळीच केली नसल्याने साहित्य कार्यालयात शिल्लक होते. त्यानंतर लाभार्थ्यांनी पूर्ण साहित्याची उचल केलेली आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.२८३ : वर्ग ५ ते १० मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ९० टक्के सुटीवर सायकल वाटप योजनेतील अनियमितता :-**

वर्गातील वर्ग ५ ते १० ला शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना २ किमी पेक्षा जास्त अंतरावरील शाळेत शिकण्याकरिता ९० टक्के सुटीवर ४४ नग सायकलचा पुरवठा करण्यात आला याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) खंड विकास अधिकारी यांचे आदेश क्रं. ५१८५/०५, दिनांक ११/११/२००८ अन्वये रुपये ६६,००० ची प्रशासकिय व तांत्रिक मंजुरी घेण्यात आली. परंतु योजनेकरिता ४४ नग प्रति रुपये २,५०० प्रमाणे रुपये १,१०,००० खर्च करण्यात आला. रुपये ४४,००० रकमेकरिता प्रशासकिय व तांत्रिक मंजुरीस सक्षम अधिकाऱ्याचे आदेश प्राप्त करणे आवश्यक आहे.

(२) सदर योजनेस ४४ लाभार्थ्याचे अर्ज प्राप्त होऊन सायकल वाटप करण्यात आले परंतु मा.सभापती यांची मंजुरी लाभार्थी निवड यादीस प्राप्त झाली नाही.

(३) जिल्हा परिषद, नागपूर यांचे पुरवठा आदेश क्र. ३६१७, दिनांक २५/०२/२००९ अन्वये मे. जय सेल्स कॉर्पोरेशन, यांचेशी करारनामा केला परंतु पुरवठादारास पंचायत समितीने स्वतः पुरवठा आदेश दिलेले नाही. पुरवठादाराची डिलीव्हरी चालान उपलब्ध नाही. सायकलीचा चेसीस क्र. साठा पुस्तिकेत साहित्य प्राप्तीचा दिनांक नमूद नाही याबाबत पडताळणी करता आली नाही.

(४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम क्र. ५० (अ) नुसार लाभार्थी हिस्सा वसूल केल्यानंतर संबंधित लाभार्थ्यांना विहित नमुन्यातील पावती देणे आवश्यक होते. परंतु अशी पावती लाभार्थ्यांना देण्यात आली नाही.

(५) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ८७ अनुसार गुणनियंत्रक विभागाकडून साहित्याची तांत्रिक तपासणी/चाचणी करणे आवश्यक आहे. साहित्याची चाचणी करण्यात आली नाही.

(६) लाभार्थी हिस्सा आर्थिक वर्षात वसूल न करता पुढील वर्षात सन २००९-१० मध्ये वसूल करण्यात आला आहे. शिल्लक ४ लाभार्थ्यांचा हिस्सा वसूल न करणे याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

(७) योजना मागासवर्गीयाकरिता असल्यामुळे अर्जासोबत एकूण ५ लाभार्थ्याचे जातीचे प्रमाणपत्र जोडलेले नाही. जातीचे प्रमाणपत्र प्राप्त करून पात्र लाभार्थ्यांनाच लाभ दिल्याची खात्री पटवावी.

(८) पुरवठाधारकासोबत केलेल्या करारनाम्यावर केवळ लाभार्थ्यांची स्वाक्षरी असून खंड विकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. खंड विकास अधिकारी यांची करारनाम्यावर स्वाक्षरी करून पूर्तता करावी.

(९) सन २००८- ०९ या आर्थिक वर्षात पुरवठादारास रुपये ९९,००० ऐवजी रुपये १,००,००० म्हणजेच रुपये १,००० चे जादा शोधन करण्यात आले, तसेच प्रदान रुपये १,००,००० ची रीतसर पावती घेण्यात आली नाही.

(१०) भारत सरकार आयकर अधिनियम १९६१ चे कलम १९६ (ब) अन्वये रुपये २०,००० वरील प्रदानाकरिता आयकर अधिभारासह कपात करून रक्कम शासन खजिन्यात दाखल करणे आवश्यक असतांना कपात केली नाही.

(११) ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक दिनांक ५/१०/१९८९ तथा दिनांक २/९/१९९३ अन्वये लाभार्थ्याचे गावनिहाय मास्टर रजिस्टर ठेवणे आवश्यक आहे. रजिस्टर अद्यावत करून लाभार्थ्यास दुबार लाभ दिला नसल्याची खात्री पटत नाही.

(१२) शासन परिपत्रक क्रं. ४४६, दिनांक २०/०६/२००८ अन्वये योजना राबवितांना कार्यवाहीबाबतचे वेळापत्रक आखून दिले आहे, त्याप्रमाणे सदर योजनेत कार्यवाही न केल्याने योजनेचा लाभ लाभार्थ्यांना आर्थिक वर्षात प्राप्त झाला नाही, तरी वेळापत्रकाचे पालन न करणेबाबत समर्थनीय कारणे स्पष्ट करावी.

(१३) शासन परिपत्रक दिनांक २९/०७/१९८९ अन्वये राबविलेल्या योजनेचे मूल्यांकन करणे आवश्यक असतांना मूल्यमापन न केल्याने योजनेचा मूळ उद्देश सफल झाला नाही व लाभार्थ्याचे उपयोगिता अहवाल प्राप्त करून घेणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) खंड विकास अधिकारी यांचे आदेश क्रं ५१५८/०८, दि. ११/११/२००८ अन्वये तांत्रिक मंजुरी रु. ६०,००० व १० टक्के लाभार्थी हिस्सा रुपये ६,००० असे एकूण ६६,००० ला तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी घेण्यात आली. परंतु रुपये ६०,००० ही तरतूद सन २००८-०९ च्या अंदाज पत्रात ठेवण्यात आली होती. दिनांक २८/०१/२००९ रोजी सुधारित तरतूद रुपये २०,००० ठेवण्यात आली असून सन २००७-०८ या आर्थिक वर्षातले रुपये ८०,००० अनुशेष असे एकूण १,००,००० व १० टक्के लाभार्थी हिस्सा १०,००० असे एकूण १,१०,००० ची तरतूद करण्यात आली असून लेखापरिक्षणाच्या वेळेस अनावधानाने रुपये १,१०,००० तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी दाखविण्यात आलेली नव्हती. पत्र क्रं.पंसपा/६०५/०९ दि.१३/०२/२००९ अन्वये तांत्रिक व प्रशासकिय मंजुरी घेण्यात आली आहे. याबाबतची प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे.

(२) सदर योजनेस ४४ लाभार्थीचे अर्ज प्राप्त झाले असून सभापती यांची लाभार्थी यादीवर स्वाक्षरी घेऊन मंजुरी घेण्यात आली आहे.

(३) जिल्हा परिषद, नागपूर यांचे दर कराराप्रमाणे आदेश क्र.३६९७, दि.२५/०२/२००९ अन्वये मेसर्स जय सेल्स कॉर्पोरेशन या पुरवठादारास या कार्यालयाने पत्र क्रं./पंसपा/पंचा/१०३९/०९ दि.१५/०३/२००९ अन्वये पुरवठा आदेश दिला असून साठा पुस्तकेत पान क्रमांक ३१ वर साहित्य पुरवठा दिनांक २९/०३/२००९ ला केला आहे व साठा पुस्तकात सायकल चेचीस क्रमांकासह नोंद जरी नसली तरी सायकल प्राप्त झाल्याची स्पष्ट नोंद साठा वहीत घेतली आहे. त्यावेळी सायकलचे चेचीस क्रमांक नमूद करण्यात आले नाही. यापुढे सदर बाबीची पूर्तता करण्याची दक्षता घेण्यात येते.

(४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम क्रं.५० (अ) नुसार लाभार्थी हिस्सा १०% वसूली परस्पर बँकेत भरणा केली असल्यामुळे पावती देण्यात आली नव्हती. यापुढे सदर बाबीची दक्षता घेण्यात येत आहे.

(५) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ८७ नुसार गुण नियंत्रक विभागाकडून साहीत्याची तांत्रिक तपासणी करणे आवश्यक होते. परंतु दर करार जिल्हा परिषद नागपूर ने केल्यामुळे तांत्रिक तपासणी अहवाल जोडले नाही.

(६) लाभार्थी हिस्सा लेखापरिक्षण दिनांकापर्यंत वसूल केला नाही. परंतु दि.२९/०३/२००९ ला सायकल प्राप्त झाल्यामुळे सायकल वाटप एप्रिल, २००९ पासुन करण्यात आल्यामुळे लाभार्थी हिस्सा २००९-१० मध्ये जमा करण्यात आले आहे व त्यानंतरच संबंधित पुरवठादारास १०% लाभार्थी हिस्सा प्रदान करण्यात आलेला आहे.

(७) लेखापरिक्षण अहवालात नमूद ५ लाभार्थ्यांचे जातीचे प्रमाणपत्र सादर करण्यात आले असून मागासवर्गीय लाभार्थ्यांनाच लाभ देण्यात आल्याची खात्री पटविण्यात आली आहे.

(८) करारनाम्यावर अर्जदाराची स्वाक्षरी आहे. अर्जदाराच्या वैयक्तिक अर्जावर खंड विकास अधिकारी यांची स्वाक्षरी घेतलेली आहे.

(९) सन २००८-०९ मध्ये पुरवठाधारकास प्रती नग सायकल रुपये २,५०० प्रमाणे एकूण ४४ सायकलचे रु.१,१०,००० होत असून ९० टक्के हिस्सा रु. ९९,००० इतका होता. पुरवठाधारकास रु.१,००,००० शोधन करण्यात आले आहें. शोधन झाल्याबाबत पावती घेण्यात आली आहे. जादा शोधन करण्यात आलेली रक्कम पंचायत समिती सेसफंडात रु. १,००० जमा करण्यात आलेली आहे.

(१०) सदरचा सायकल पुरवठा हा मे.जय सेल्स कार्पोरेशन द्वारा केला असून सदरची संस्था ही पुरवठाधारक (सप्लायर) असल्याने आयकराची कपात करण्यात आली नाही.

(११) लाभार्थ्याचे गावनिहाय मास्टर रजिस्टर लेखा परिक्षणाचे वेळेस ठेवण्यात आलेले नव्हते त्यानंतर लाभार्थीचे योजना निहाय रजिस्टर ठेवण्यात आले. असून लाभार्थीला दुबार लाभ दिला नसल्याची खात्री पटविल्या नंतरच लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.

(१२) लाभार्थी निवड करणे, पंचायत समिती सभेची मंजुरी प्राप्त करणे इत्यादी प्रशासकिय प्रक्रिया पूर्ण करण्यास थोडाफार विलंब झाला. यापुढे शासन परिपत्रक क्रं.४४६, दि.२०/०६/२००८ अन्वये योजना राबविण्याची कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहे. राबविलेल्या योजनेचे लाभ गरजू व्यक्तीना देण्यात आले आहे. त्यामुळे योजनेचे उद्दिष्ट पूर्ण झाले.

(१३) शासन नियमानुसार फलश्रुती करण्यात आले असून या योजनेमुळे वर्ग ५ ते १० मध्ये शिकणाऱ्या विदयार्थ्यांना सायकली मिळाल्याने शाळेत जायला सुविधा झाली. मुलांचे गळतीचे व अनुपस्थितीचे प्रमाण कमी झाले व सायकलच्या आकर्षणामुळे एकूणच शाळेतील मागासवर्गीय मुलांची उपस्थिती वाढली ही या योजनेची फलश्रुती आहे. लाभार्थ्यांचे उपयोगिता अहवाल वेळीच प्राप्त करून घेण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३१८ : १०० टक्के अनुदानावर महिलांना शिलाई मशिन पुरविणे योजनेतील अनियमितता :-**

**पंचायत समिती कुही (जिल्हा नागपूर) सन २००८-०९ (परिच्छेद क्र.१२) -**

पंचायत समिती सेस फंडातून महिला व बाल कल्याण या शीर्षातंर्गत प्रमाणक क्रमांक १६, दि.३१/०३/२००९ नुसार रक्कम रु.३४,८४६ एकूण १४ शिलाई मशिन मेसर्स एम एस मार्केटिंर, अमरावती यांचेकडून दरकरारानुसार खरेदी करण्यात आलेल्या असून रक्कम संबंधित पुरवठादारास अदा करण्यात आलेली आहे. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) लाभार्थ्यांचे अर्ज लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेले नाही. त्यामुळे लाभार्थ्यांची निवड योग्य झाल्याची खात्री करता आली नाही.

(२) पुरवठादाराने साहित्याचा पुरवठा पंचायत समितीला करताना डिलीव्हरी मेमोची प्रत देणे गरजेचे आहे. ज्या वाहनाने साहित्याचा पुरवठा पंचायत समितीला करताना डिलीव्हरी मेमोची प्रत देणे गरजेचे आहे. ज्या वाहनाने साहित्याचा पुरवठा केला त्याचे वाहन क्रमांक नमूद केलेले असते. परंतु, तशी प्रत अभिलेख्यात आढळली नाही. साठा पुस्तकात दिनांक ३१/०३/२००९ रोजी साहित्य प्राप्त झाल्याची नोंद घेण्यात आलेली आहे. असे असताना डिलेव्हरी मेमो इ. सादर न केल्याने साहित्याचा प्राप्तीबाबत खात्री करता येत नाही. अटी व शर्तीनुसार साहित्याचा पुरवठा विहित मुदतीत पूर्ण न केल्यास ५ टक्के दराने तरतूद करण्यात आलेली आहे. तशी कार्यवाही सुद्धा केल्याचे दिसत नाही.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ८७ अन्वये साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त करण्यात आलेला नाही.

(४) पुरवठादारास इन्व्हॉईस बिल सादर करून देयक पारीत करण्यात आलेले आहे. सादर केलेल्या देयकावर शिलाई मशिनचे चेसिस नंबर नमूद करण्यात आलेले नाही. त्यामुळे साहित्याचे वाटप लाभार्थ्यांना कशाप्रकारे केले याबाबत पडताळणी करता आली नाही.

(५) ग्राम विकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक ०५/१०/१९८९ तथा दिनांक ०२/०९/१९९३ अन्वये मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

(६) ग्राम विकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९, दि.२०/०६/२००८ अन्वये जिल्हा परिषदेकडील वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना वेळापत्रकाचे पालन करण्यात आले नाही.

(७) ग्राम विकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.१०८२/६४५/३४, दि.२९/७/१९८९ अन्वये योजनेचे मूल्यमापन केल्याचे दिसत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती सेस फंड सन २००८-०९ मधील अर्थसंकल्पिय तरतूदीनुसार १००% अनुदानावर महिलांना शिलाई मशिन पुरविणे ही योजना राबविण्यात आली होती. सदर योजनेमधून मे. एस.एस.मार्केटिंग, अमरावती या पुरवठा धारकाकडून आय एस आय प्रमाणित असलेल्याच शिलाई मशिन खरेदी करण्यात आलेल्या असून त्या १४ गरजू व पात्र लाभार्थीना वाटण्यात आलेल्या आहेत.

१) पंचायत समिती सेस फंड २००८-०९ मधील अर्थसंकल्पीय तरतूदीनुसार १००% अनुदानावर महिलांना शिलाई मशिन पुरविणे या योजनेस पंचायत समिती विशेष सभा दिनांक १८/२/२००९ ठराव क्रमाकं ६ नुसार मंजुरी प्रदान करण्यात आली. सदर योजनेकरिता लाभार्थीची निवड पंचायत समितीस प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून शासनाच्या लाभार्थी निवडीसंबधाने असलेल्या निकषानूसार करण्यात आलेली असून गरजू लोकांनाच लाभ देण्यात आला. लाभार्थीची यादी नस्तीमध्ये संलग्न असून अर्जाच्या छायांकित प्रती व दिनांक १८/०२/२००९ च्या विशेष सभेचे इतिवृत्ताची छायांकित प्रत सोबत जोडलेली आहे.

(२) सदर योजनेस दिनांक १०/०२/२००९ च्या आदेशानूसार तांत्रिक व दि. १८/०२/२००९ ला प्रशासकीय मंजुरी घेण्यात आली. तसेच जिल्हा परिषद नागपूर यांनी मंजूर केलेल्या दरानूसार मे. एस.एस. मार्केटींग, अमरावती यांचेकडून आय एस आय मार्क असलेले १४ शिलाई मशिन पुरवठा करणेबाबत दि.२४.०२.२००९ चे पुरवठा आदेश देण्यात आला. त्यानुसार एस एस मार्केटिंग, अमरावती यांनी दि.३१.०३.२००९ रोजी खेतान कंपनीचे आय एस आय प्रमाणित असलेल्या १४ शिलाई मशिनचा पुरवठा केला. शिलाई मशीन दिलेल्या आदेशातील कंपनीच्या व आय एस आय प्रमाणित असल्याबाबत खात्री करून सदर साहित्य प्राप्ती बाबत पुरवठाधारकास पोच पावती देण्यात आली परंतू अनावधानाने वाहनाचा क्रमांक टाकण्यात आलेला नाही. पोच पावतीच्या स्थळ प्रती नस्तीमध्ये संलग्न असून छायाप्रत सोबत संलग्न आहेत. प्राप्त व वाटप झालेल्या साहित्याची नोंद साठा नोंदवहीत घेण्यात आलेली आहे. साहित्याचा पुरवठा विहीत मुदतीचे आत झालेला असल्याने ५ टक्के दंड आकारण्यात आला नाही.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती १९६८ चे नियम ८७ नुसार बांधकाम करण्याकरिता वापरावयाचे साहित्याची चाचणी करून वापरण्याबाबत नमूद आहे. परंतू लाभार्थीकरिता खरेदी करण्यात आलेल्या खेतान कंपनीच्या शिलाई मशीन आय एस आय प्रमाणित असल्याने पुनःश्च चाचणी करण्यात आली नाही.

(४) पुरवठाधारक मे एस.एस. मार्केटींग, अमरावती यांचेकडून पुरवठा करण्यात आलेल्या १४ शिलाई मशिन्स सुस्थितीत व आय एस आय मार्कसह असल्याने, पुरवठाधारकाने सादर केलेल्या देयकाचे शोधन प्रमाणक क्रमांक १६ दिनांक ३१/३/२००९ रोजी त्याच आर्थिक वर्षात करण्यात आलेले आहे.

(५) लेखापरिक्षणातील सुचनेची नोंद घेऊनशासन ग्राम विकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दि.०५/१०/१९८९ तथा दि. ०२/०९/२००३ अन्वये लाभार्थ्यांची गांवनिहाय मास्टर नोंदवही या कार्यालयात सन २००८-०९ पासून ठेवण्यात आलेली असून नोंदवहीनुसार कोणत्याही लाभार्थ्यास दुबार लाभ प्रदान झाला नसल्याची खात्री करण्यात आली आहे. तसेच सदर नोंदवहीमध्ये वेळोवेळी अद्यावत नोंदी घेण्यात येत आहेत, समर्थनार्थ सदर मास्टर नोंदवहीची छायांकीत प्रत सविनय सादर.

(६) पंचायत समितीची मंजुरी, लाभार्थी निवड व इतर काही अपरिहार्य कारणांमुळे, शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, यांचेकडील परिपत्रक दि.२०/०६/२००८ अन्वये निश्चित करण्यात आलेले वेळापत्रक पालन करता आले नाही ही बाब खरी आहे. मात्र भविष्यात काटेकोर पालन होईल याची पूर्ण दक्षता घेण्यात येत आहे.

(७) निवड झालेल्या १४ लाभार्थीना शिलाई मशीनचे वाटप केल्यानंतर त्यांचे मूल्यमापन केले असता त्यांना स्वयंरोजगार प्राप्त झाला असून त्यांचे उत्पन्नात वाढ झालेली आहे. त्यामुळे त्यांचे जीवनमान या योजनेमुळे आर्थिकदृष्ट्या उंचावले आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३५२ (४) : सन २००८-२००९ या वर्षात पंचायत समिती मध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी.**

**नियमबाह्य रित्या अग्रीम मंजूर केल्याबाबत/धनादेश न देणे /न वटवलेले धनादेश /रद्द न करणे अतिप्रदान वसूली रु. ५४९४१७ मूळ परिच्छेद क्र.३ (सन २००८-०९) अवितरित धनादेशाबाबत :-**

पंचायत समिती रामटेकचे सन २००८-०९ चे लेखा परिक्षण करतांना सामान्य रोखपुस्तकासोबत जोडलेल्या स्थळप्रतीचे रेखाकंन करताना असे निदर्शनास आले की, सोबत जोडलेल्या विवरण पत्रात नमूद केल्याप्रमाणे लेखा परिक्षणापर्यत काही धनादेश अवितरीत असल्याचे निदर्शनास येते. त्यात ३ ते ४ महिन्याच्या धनादेशाचा समावेश असून त्यात नळपाणी पुरवठा, आमदार सहाय्यक अनुदान, वृद्धांना मानधन अशी अनेक प्रकारची प्रदाने केवळ रोकडवहीला शोधन करून ठेवल्याची दिसून येतात.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती संहिता १९६८ चे नियम २७ नुसार तात्काळ अदायीगीच्या रक्कमेची गरज असल्याशिवाय खंड विकास अधिकारी यांनी धनादेशावर स्वाक्षरी करू नये असे स्पष्ट निर्देश आहेत असे असतांना सुद्धा प्रत्यक्ष योजना न राबविता आलेले अनुदान व्यपगत होऊ नये या करिता धनादेश तयार करून रोकडवहीत खर्चाचे शोधन केल्याचे दिसून येते.

तसेच ज्यांचे नावे धनादेश काढले आहेत त्यांना सुचित करण्यात आल्याचे दिसत नाही. तरी सदर नियमबाह्य व्यवहाराबाबत समर्थनिय कारणे स्पष्ट करावे व सर्व धनादेश वितरीत करून अनुपालन सादर करावे तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | धनादेश क्र. | दिनांक | रक्कम | तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | ०९६११५ | ३०-३-२००९ | ३३०० | |
| २ | ०९६१६० | ३०-३-२००९ | १०५० | |
| ३ | ०९६२०२ | ३०-३-२००९ | १३०० | |
| ४ | ०९६२६७ | ३०-३-२००९ | १५९५ | |
| ५ | ०९६२६९ | ३०-३-२००९ | ७८२५४ | |
| ६ | ०९६२९३ | ३०-३-२००९ | १९३६ | |
| ७ | ०९६५१७ | ३०-३-२००९ | ११५७ | |
| ८ | ०९६५२५ | ३०-३-२००९ | १२०६ | |
| ९ | ०९६५३२ | ३०-३-२००९ | ९८५९ | |
| १० | ०९६५४४ | ३०-३-२००९ | २३५१ | |
| ११ | ०९६५४७ | ३०-३-२००९ | ५३४६ | |
| १२ | ९६५४८ | ३०-३-२००९ | १०५३६ | ग्रा.प. बोथिया पालोरा आ.सा.अनुदान |
| १३ | ०९६५४९ | ३०-३-२००९ | ५०१० | ग्रा.प. बोरडाआ.सा.अनुदान |
| १४ | ०९६५५० | ३०-३-२००९ | ५३४६ | ग्रा.प. बेल्दा आ.सा.अनुदान |
| १५ | ०९६५३५ | ३०-३-२००९ | २८४१ | ग्रा.प. महादुला आ.सा.अनुदान |
| १६ | ०९६५५४ | ३०-३-२००९ | २८४१ | ग्रा.प. मुसेवाडी आ.सा.अनुदान |
| १७ | ०९६५५५ | ३०-३-२००९ | १००२० | ग्रा.प. मनसर आ.सा.अनुदान |
| १८ | ०९६५५६ | ३०-३-२००९ | ५३४६ | ग्रा.प. किरणापुर आ.सा.अनुदान |
| १९ | ०९६५५८ | ३०-३-२००९ | ५३४६ | ग्रा.प. पिंडकापार आ.सा.अनुदान |
| २० | ०९६५६० | ३०-३-२००९ | २८४१ | ग्रा.प. चिचाळा आ.सा.अनुदान |
| २१ | ०९६५६१ | ३०-३-२००९ | ५०१० | ग्रा.प. भंडारबोडी आ.सा.अनुदान |
| २२ | ०९६५६४ | ३०-३-२००९ | ७८५१ | ग्रा.प. पटगोवारी आ.सा.अनुदान |
| २३ | ०९६५६५ | ३०-३-२००९ | २८५१ | ग्रा.प. सोनेघाट आ.सा.अनुदान |
| २४ | ०९६५६७ | ३०-३-२००९ | ५३४६ | ग्रा.प. उमरी आ.सा.अनुदान |
| २५ | ०९६५६९ | ३०-३-२००९ | ७८५१ | ग्रा.प. देवलापार आ.सा.अनुदान |
| २६ | ०९६५७१ | ३०-३-२००९ | ५३४६ | ग्रा.प. नवरगाव आ.सा.अनुदान |
| २७ | ०९६५७३ | ३०-३-२००९ | ५३४६ | ग्रा.प. लोहडोंगरी आ.सा.अनुदान |
| २८ | ०९६५७४ | ३०-३-२००९ | ५३४६ | ग्रा.प. बांद्रा आ.सा.अनुदान |
| २९ | ०९६५७७ | ३०-३-२००९ | २८४ | ग्रा.प. आजनी आ.सा.अनुदान |
| ३० | ०९६५७९ | ३०-३-२००९ | ५३४६ | ग्रा.प. बोरी आ.सा.अनुदान |
| ३१ | ०९६५८० | ३०-३-२००९ | ५३४६ | ग्रा.प. काद्री आ.सा.अनुदान |
| ३२ | ०९६५६२ | ३०-३-२००९ | ७८५१ | ग्रा.प. डांगरी आ.सा.अनुदान |
| ३३ | ०९६५६८ | ३०-३-२००९ | २८४१ | ग्रा.प. शिवनी आ.सा.अनुदान |
| ३४ | ०९६५८७ | ३०-३-२००९ | ५३४६ | ग्रा.प. दहोदा आ.सा.अनुदान |
| ३५ | ०९६५८९ | ३०-३-२००९ | ५३५२ | ग्रा.प. पिंडकापार आ.सा.अनुदान |

| अ.क्र. | धनादेश क्र. | दिनांक | रक्कम | तपशील |
|---|---|---|---|---|
| **अभिकरण** | | | | |
| १ | ०८९९९५ | ३१/०३/२००९ | २५० | श्री. हगरु गणपत गोगंले |
| २ | ०९६६११ | ३१/०३/२००९ | ३००० | श्री.चांगदेव बापुूराव भागवत (वृद्ध मानधन) |
| **जि.प. सेसफंड** | | | | |
| १ | ०८०५८८ | ३१/०३/२००९ | २१९ | श्री. रामचंद शहाणे |
| **प. स. सेसफंड** | | | | |
| १ | ०८०९०८ | ३१/०३/२००९ | ९५०० | बालाजी सेल्स नागपूर |
| २ | ८०९१३ | ३१/०३/२००९ | २००० | सनोती शंकर भलावी (वि.नि.महिला) |
| ३ | ८०८१४ | ३१/०३/२००९ | २००० | मंजु गोविद मसराम (वि.नि.महिला) |
| ४ | ८०९१५ | ३१/०३/२००९ | २००० | लताबाई अनुपचंद नेवारगाडे (वि.नि.महिला) |
| **संपूर्ण ग्रामस्वच्छता अभियान** | | | | |
| १ | २४०२९१ | ३१/०३/२००९ | १०००० | ग्रा.पं. पुसदा |
| २ | २४०२९२ | ३१/०३/२००९ | १०००० | ग्राम शिक्षण समिती हिवरा हिवरी |
| ३ | २४०२९४ | ३१/०३/२००९ | २४००० | ग्रा.पं.भिलेवाडा |
| ४ | २४०२९४ | ३१/०३/२००९ | ४८००० | ग्रा.पं. बोरडा |
| ५ | २४०२९७ | ३१/०३/२००९ | २४००० | ग्रा.पं.डोंगरी |
| ६ | ०४४१५१ | ३१/०३/२००९ | २४००० | ग्रा.पं.डोंगरी |
| ७ | ०४४१५२ | ३१/०३/२००९ | ४८००० | ग्रा.पं.कटटा |
| ८ | ०४४१५४ | ३१/०३/२००९ | २४००० | ग्रा.पं.मांद्री |
| ९ | ०१४१५७ | ३१/०३/२००९ | ३६००० | ग्रा.पं. पिपरीया |
| १० | ०१४१५८ | ३१/०३/२००९ | ४८०००० | ग्रा.पं.सोनेघाट |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पारित केलेल्या देयकाची प्रदाने संबंधितांना त्वरीत करण्याकरिता तातडीने धनादेश तयार करण्यात आलेले होते. अवितरीत धनादेश ग्रामपंचायतीच्या अनुदानाचे असून माहे मार्च अखेर अनुदान प्राप्त झाल्यामुळे व मार्च महिन्यातील कामाच्या व्यस्ततेमुळे ग्राम पंचायतकडून धनादेशाची उचल करण्यास उशीर झालेला आहे.

आक्षेपातील नमूद सर्व अवितरीत धनादेशाचे संबंधितांना वाटप करण्यात आले असून आक्षेपात नमूद धनादेशासमोर बॅकेतून धनादेश वटल्याची तारीख नमूद आहे. सोबत बँकेच्या ताळमेळाचे विवरणपत्र व रोकडवहीमधील न वटलेल्या धनादेशाचे गोषवाऱ्याची प्रत जोडलेली आहे. आक्षेपित सर्व धनादेश वितरीत झालेले आहेत.

| | धनादेश क्रमाक | धनादेश वटविण्यात आलेली तारीख |
|---|---|---|
| १) | ०९६११५ | ५/८/२००९ |
| २) | ०९६१६० | ५/८/२००९ |
| ३) | ०९६२०२ | २२/७/२००९ |
| ४) | ०९६२६७ | ५/८/२००९ |
| ५) | ०९६२६९ | ३०/७/२००९ |
| ६) | ०९६२९३ | ५/८/२००९ |

| | धनादेश क्रमांक | धनादेश वटविण्यात आलेली तारीख |
|---|---|---|
| ७) | ०९६५१७ | २३/७/२००९ |
| ८) | ०९६५२५ | ५/८/२००९ |
| ९) | ०९६५३२ | १४/८/२००९ |
| १०) | ०९६५४४ | २८/८/२००९ |
| ११) | ०९६५४७ | ५/८/२००९ |
| १२) | ०९६५४८ | ५/८/२००९ |
| १३) | ०९६५४९ | ३०/७/२००९ |
| १४) | ०९६५५० | ३/९/२००९ |
| १५) | ०९६५३५ | २६/६/२००९ |
| १६) | ०९६५५४ | ३०/७/२००९ |
| १७) | ०९६५५५ | २८/८/२००९ |
| १८) | ०९६५५६ | १/८/२००९ |
| १९) | ०९६५५८ | २१/८/२००९ |
| २०) | ०९६५६० | १२/८/२००९ |
| २१) | ०९६५६१ | २०/८/२००९ |
| २२) | ०९६५६४ | २७/७/२००९ |
| २३) | ०९६५६५ | १४/८/२००९ |
| २४) | ०९६५६७ | १४/८/२००९ |
| २५) | ०९६५६९ | ३/९/२००९ |
| २६) | ०९६५७१ | १६/९/२००९ |
| २७) | ०९६५७३ | १/८/२००९ |
| २८) | ०९६५७४ | ५/८/२००९ |
| २९) | ०९६५७७ | २५/९/२००९ |
| ३०) | ०९६५७९ | २५/९/२००९ |
| ३१) | ०९६५८० | २५/९/२००९ |
| ३२) | ०९६५६२ | १०/७/२००९ |
| ३३) | ०९६५६८ | ५/८/२००९ |
| ३४) | ०९६५८७ | १४/९/२००९ |
| ३५) | ०९६५८९ | १४/९/२००९ |

**अभिकरण**

| | | |
|---|---|---|
| १) | ०८९९९५ | ३/९/२००९ |
| २) | ०९६६११ | १७/१२/२००९ |

| | धनादेश क्रमांक | धनादेश वटविण्यात आलेली तारीख |
|---|---|---|
| **जि.प. सेसफंड** | | |
| १) | ०८०५८८ | ३०/७/२००९ |
| **प. स. सेसफंड** | | |
| १) | ०८०९०८ | २८/८/२००९ |
| २) | ८०९१३ | ३/१०/२००९ |
| ३) | ८०८१४ | ५/८/२००९ |
| ४) | ८०९१५ | १५/९/२००९ |
| **संपूर्ण ग्रामस्वच्छता अभियान** | | |
| १) | २४०२९१ ( २४२९१ ) | १२/८/२००९ |
| २) | २४०२९२ ( २४२९२ ) | ११/९/२००९ |
| ३) | २४०२९४ ( २४२९४ ) | ४/८/२००९ |
| ४) | २४०२९४ ( २४२९६ ) | २२/७/२००९ |
| ५) | २४०२९७ ( २४२९७ ) | २२/८/२००९ |
| ६) | ०४४१५१ | २८/७/२००९ |
| ७) | ०४४१५२ | ६/११/२००९ |
| ८) | ०४४१५४ | १५/९/२००९ |

**परिच्छेद क्रमांक ३.१३० : जिल्हा परिषद शाळांकरिता दरी पंजा पुरविण्याबाबत :-**

**जिल्हा परिषद नागपूर सन २०११-२०१२ (परिच्छेद क्रमांक २)**

**सदर योजनेवर रु. ३६,७१,२४७ इतका खर्च केला असून याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत :—**

१) दर करार हा दिनांक ३०.०६.२०११ पर्यंत असून पुरवठा आदेश दिनांक ३०.०६.२०११ ला दिल्याचे निदर्शनास येते. परंतू सदर आदेश दि.३०.०६.२०११ ला निर्गमित होवून पुरवठादाराला पोहचता झाला किंवा कसे? तसेच सन २०१०-११ चे दरकरात सन २०११-१२ च्या तुलनेत रु. १७२.२३ जादा दर असल्यामुळे १७२.२३ × ७९१ = रु. १३६२३३ चे जादा प्रदान झाल्याचे दिसते.)

२) तांत्रिक मंजुरी व प्रशासकीय मंजुरी या दोन्ही पत्राचा जावक क्रमांक एकच देण्यात आला आहे. जावक नोंदवही सादर करण्यात आलेली नाही.

३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, मर्या., नागपूर यांनी वेगळे सॅम्पल पाठविल्याचा अभिलेख लेखा तपासणीस सादर करण्यात आला नाही. त्यामुळे सॅम्पल टेस्टींग पुरवठाधारकानेच करून तपासणी अहवाल सादर केला किंवा कसे ? याची खात्री करता आली नाही.

४) आयकर टिडीएस कपातीतून सुट मिळविण्यासाठी पत्र क्र. हातमाग लेखा/आयकर/२७४२ दिनांक २०.०३.२०१३ अन्वये आयकर अधिनियम १९६१ चे कलम १९४ अंतर्गत सुट देण्याबाबत पत्र व्यवहार सुरू असल्याचे दिसते, मात्र आयकर विभागाची मंजुरी प्राप्त झाल्याबाबतचा दस्ताऐवज सदर महामंडळाने सादर केला नसतांना जिल्हा परिषदेने आयकर कपात केली नसल्याचे दिसते.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, नागपूर तर्फे प्राथमिक शाळांकरिता दरी पंजा महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित, नागपूर यांचेकडून खरेदी करण्यात आलेली असून सदर महामंडळ महाराष्ट्र शासनाचा उपक्रम आहे.

१) पुरवठा आदेश पुरवठादाराकडे दि. ३०.६.२०११ रोजी स्वःहस्ते देण्यात आला. त्याची पोहोच संलग्न आहे.

| अ.क्र. | दर कराराचा शासन निर्णय क्र. व दि. | प्रशासकीय मान्यता क्र. व दि. | पुरवठा आदेश क्र. व दि. | दर रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | शा. नि. क्र. बी. ५७५१ दि. २९.३.२०११ | ६५६४ / दि. २८.६.२०११ | ६६६०/ दि.३०.६.२०११ | २४६३.२३ |
| २. | शा. नि. क्र. बी. १७००३दि. ३.९.२०११ | १९६० / दि. ७.३.२०१२ | १९६१/ दि. ७.३.२०१२ | २२९१ |

प्रथम सन २०११-१२ ची खरेदी दिनांक २९-३-२०११ च्या दरकरारानुसार तर द्वितीय खरेदी दिनांक ३-९-२०११ च्या दरकरारानुसार करण्यात आली. प्रथम पुरवठा आदेश दिनांक ३०-६-२०११ ला निर्गमित करण्यात आले, तर द्वितीय पुरवठा आदेश दिनांक ७-३-२०१२ ला देण्यात आला. वरील बाबीवरून असे स्पष्ट होते की, दोन पुरवठा आदेशामधील व दोन्ही दरकरारामधील अनुक्रमे पुरवठा आदेशात नऊ महिन्यांचा व दरकरारामधील सहा महिन्यांचा कालावधी आहे. तसेच भविष्यातील दरकरारामध्ये वाढ होईल की घट होईल हे निश्चित ठरविता येत नसल्याने तसेच ही बाब शासनस्तरावरील असल्याने व दुसरी खरेदी कमी दराने झाल्याने यात कोणतीही अनियमितता झालेली नाही.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ०७.३.२०१२ रोजी मान्य केलेल्या टिपणीमध्ये तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेला एकत्रित मंजुरी प्रदान केली आहे, त्यामुळे दोन्ही प्रकारच्या मान्यतेच्या पत्राला अनावधानाने एकच जावक क्रमांक देण्यात आलेला आहे.

३) प्रथम पुरवठ्याचा नमुना पत्र क्रमांक ६८४१ दिनांक ०६-०७-२०११ अन्वये व द्वितीय पुरवठ्याचा नमुना पत्र क्र. २००८ दि. ०९-०३-२०१२ नुसार पाठविण्यात आला व त्याचा अहवाल सुद्धा स्वतंत्ररित्या प्राप्त झालेला आहे.

४) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित यांचे पत्र क्रमांक ७८२ दि. २९.०३.२०११ व क्र.२७४२ दिनांक २०-०३-२०१२ अन्वये आयकर कायदा १९६१ चे कलम १९४ सी नुसार सुट असल्याचे कळविण्यात आले, त्यामुळे आयकर कपात करण्यात आली नाही.

**परिच्छेद क्रमांक ३.१३१: जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचे बैठक व्यवस्थेकरिता डेस्क बेंच (स्टिल) खरेदीबाबत :- जिल्हा परिषद नागपूर सन २०११-१२ (परिच्छेद क्रमांक ४)**

जिल्हा परिषद नागपूर यांनी वाढीव उपकरातून शिक्षण विभागामार्फत जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचे बैठक व्यवस्थेकरिता डेस्क बेंच (स्टील) खरेदी करिता रक्कम ४३,६२,७२० रुपये खर्च नोंदविलेला असून याबाबत जिल्हा परिषद, नागपूर यांनी वाढीव उपकरातून शिक्षण विभागामार्फत जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचे बैठक व्यवस्थेकरिता डेस्क बेंच (स्टील) खरेदी करिता रक्कम ४३,६२,७२० रुपये खर्च नोंदविलेला असून याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत :—

१) जिल्हा परिषद, स्थायी समितीने २ सीटर चे ८०३ नग व ३ सीटर चे ८०४ नग असे एकूण १६०७ डयुल डेस्क बेंच खरेदीकरिता मंजुरी असतांना शिक्षण विभागाने फक्त ३ सीटर १४६४ नग डेस्क बेंच खरेदी केले असल्यामुळे ६६० नग ३ सिटर डेस्क बेंचची खरेदी नियमबाह्य ठरते. त्यामुळे यावर केलेला खर्च रुपये ९,६६,२४० वसूल होणे आवश्यक आहे.

२) प्रशासकीय मान्यतेच्या पत्रात थ्री सिटर डेस्क बेंचचा दर खर्च रुपये २९७० नमूद आहे. परंतु प्रत्यक्षात प्रदान रु. २९८० प्रमाणे केल्याचे दिसते, त्यामुळे १४६४ नग डेस्क बेंच करिता रुपये १० प्रमाणे १४,६४० चे जादा प्रदान झालेले आहे. १४६४ पैकी ८०४ थ्री सिटर डेक्स बेंचकरिता प्रशासकीय मंजुरी आढळून आली. उर्वरित ६६० करिता प्रशासकीय मंजुरी नसल्यामुळे रक्कम रुपये ६,०८० जादा प्रदान झालेले आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर तर्फे प्राथमिक शाळांकरिता डेक्स बेंच ची खरेदी महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित, नागपूर यांचेकडून करण्यात आलेली असून, सदर महामंडळ महाराष्ट्र शासनाचा उपक्रम आहे.

जिल्हा परिषद स्थायी समिती सभा दिनांक ८/२/२०११ मध्ये डेक्स बेंच खरेदीकरिता चर्चेत ठेवण्यात आलेल्या विषयानुसार टू सीटर व थ्री सीटर डेक्स बेंचच्या दरानुसार खरेदीबाबत चर्चा करण्यात आली. स्थायी समितीने ठराव क्रमांक १० अन्वये सेस फंड योजना सन २०१०-११ मध्ये महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाचे दरकरारावर एकूण रु.४३,६५,००० चे डेस्क बेंच खरेदी खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे.

यानंतर जिल्हा परिषद शिक्षण समिती दि. २२/३/२०११ मधील ठराव क्रमांक ९ अन्वये दरकरारातील अनुक्रमांक १४ वरील नमूद प्री लॅमिनेटेड टॉप थ्री सीटर स्टील डयुएल डेस्क बेंचचा नमुना समितीने मंजुर केल्यामुळे सदर साहित्याची खरेदी करण्याचे ठरविण्यात आले, या कार्यालयाचे आदेश क्रमांक २९३८ दिनांक ३१/३/२०११ च्या पुरवठा आदेशान्वये थ्री सीटर डेस्क बेंच १४६४ नग प्रति नग रु.२९८०प्रमाणे रु. ४३,६२,७२० ची खरेदी केलेली आहे. त्यामुळे ही खरेदी नियमबाह्य झालेली नाही.

स्थायी समिती सभा दिनांक ८/२/२०११ मधील ठराव क्रमांक १० नुसार त्यांचे अधिकारात खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे व त्यामध्ये दर करारानुसार खरेदी करावी असे नमूद आहे. शिक्षण समिती दि. २२/३/२०११ मधील ठराव क्रमांक ९ अन्वये थ्री सीटर डेस्क बेंचचा नमुना शिक्षण समितीने सर्वानुमते मंजुर केल्यामुळे स्थायी समितीद्वारा मान्य केलेल्या खर्चाच्या मर्यादेत वरील खरेदी करण्यात आलेली आहे. शासन दरकरारातील दर हा रु. २९८० इतका असल्याने कोणतेही अतिप्रदान झालेले नाही.

**परिच्छेद क्रमांक ३.१३२ : शालेय पोषण आहार योजना सन २०११-१२ वर्ग १ ते ८ च्या विद्यार्थ्यांना शिजविलेले अन्न पुरविण्याबाबत :- जिल्हा परिषद, नागपूर सन २०११-१२ (परिच्छेद क्रमांक १४)**

जिल्हा परिषद नागपूर यांनी इयत्ता पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेंतर्गत रु.५,९८,७९,०४१ केन्द्र + रु. १,९४,२१,६७० राज्य = रुपये ७,९३,००,७११ चा खर्च केलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) महाराष्ट्र शासन, क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक २०१०/प्र.क्र.१८/प्राशि ४/दिनांक ०२.०२.२०११ अन्वये अन्न शिजविणाऱ्या यंत्रणांनी आठवड्यातून किमान एक दिवस पुरक आहार उदा. फळे, सोयाबिस्कीटे, दुध, चिक्की, राजगिरा लाडू, गुळ शेंगदाणे इत्यादी देण्यात यावे असे स्पष्ट निर्देश असतांना प्रत्यक्ष तपासणीत आठवड्यातून एक दिवस सर्व शाळेत हा नियम पाळल्याचे आढळून आल्याचे दिसत नाही.

२) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.शापोआ-२०१०/ प्र.क्र.३८१/ प्रा.शा.४ दिनांक २०.०८.२०१० अन्वये सदर योजनेंतर्गत शाळांमध्ये शुद्ध पिण्याचे पाणी पुरविण्याबाबत निर्देश आहेत. मात्र याबाबतचा कोणताही अभिलेखा परिक्षणास सादर करण्यात आला नाही.

३) उपयोगिता प्रमाणपत्रानुसार शिल्लक अनुदान खर्च करण्यास शासनाची मंजुरी घेऊन सादर करावी किंवा अखर्चित अनुदान शासनास परत करावे.

४) अखर्चित अनुदान केन्द्र रु.२०,६८,८७,८७७ राज्य रु.६,६७,८१,४६२.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

१) शालेय पोषण आहार योजने अंतर्गत महाराष्ट्र शासन, क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक २०१०/प्र.क्र.१८/प्राशि ४/ दिनांक ०२.०२.२०११ अन्वये प्रत्येक शाळेमध्ये आठवड्यातून किमान एक दिवस विद्यार्थ्यांना पुरक आहार उदा. फळे, सोयाबिस्कीटे, दुध, चिक्की, राजगिरा, गुळ - शेंगदाणे इत्यादी दिला जातो. त्याबाबतच्या वापराच्या नोंदी दैनंदिन साहित्य वापर नोदवह्यामध्ये घेतल्या जातात. नमुन्यादाखल नोंदवहीची सत्यप्रत सोबत जोडली आहे.

२) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.शापोआ-२०१०/प्र.क्र.३८१/प्रा.शा.४/ दिनांक २०.०८.२०१० अन्वये नागपूर जिल्ह्यातील १३ तालुक्यांतील शाळांना शुद्ध पिण्याच्या पाण्याकरिता एकूण १४४५५० मेडिक्लोर (एम) द्रावणाच्या बॉटलचा पुरवठा करण्यात आलेला होता. तसेच जिल्हा परिषद सेसफंड योजनेतून नागपूर जिल्ह्यातील १३ तालुक्यातील ७७४ शाळांना थेट पुरवठ्याअंतर्गत वॉटर फिल्टर चा पुरवठा करण्यात आलेला आहे. पुरवठा आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

३) तालुकानिहाय प्राप्त उपयोगिता प्रमाणपत्रानुसार शिल्लक अनुदान हे शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांचे कडून प्राप्त परवानगीनुसारच खर्च केला जातो. सन २०१०-११ ची रक्कम सन २०११-१२ मध्ये शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांचे पत्र क्र. ४६८८ दिनांक १२.०७.२०११ च्या परवानगीने खर्च करण्यात आली होती. परवानगीची सत्यप्रत सोबत जोडलेली आहे.

मूळ परिच्छेदात उल्लेख केल्याप्रमाणे पंचायत समिती नरखेडच्या सन २०११-१२ चे उपयोगिता प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

४) अखर्चित अनुदान केन्द्र हिस्सा रु.२०,६८,८७,८७७ व राज्य हिस्सा रु. ६,६७,८१,४६२ दर्शविण्यात आलेले आहे. परंतु सदर रक्कम ही अखर्चित अनुदान नसून सन २०११-१२ मध्ये जिल्हानिधीतून प्रमाणक निहाय शोधन करण्यात आलेल्या देयकांची रक्कम आहे. त्याअन्वये उपरोक्त रक्कम ज्या बाबींसाठी प्राप्त झाली होती ती त्याच बाबींवर खर्च करण्यात आल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

**परिच्छेद ३.५१३ : अखर्चित शासकीय अनुदानाची रक्कम परत करणेबाबत तसेच अभिकरण शुल्काचे कपातीबाबत :- जिल्हा परिषद, नागपूर सन २०११-२०१२ (परिच्छेद क्रमांक-३)**

शासनाची अखर्चित रक्कम रुपये २७५.०५ लक्ष जमा करणेबाबत तसेच अभिकरण शुल्काची रक्कम कपातीबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहे :—

१) चार टक्के अभिकरण शुल्काची रक्कम कपात करून जिल्हा परिषद, सेस फंडात जमा केल्याचा दस्ताऐवज सादर केला नाही त्यामुळे जिल्हा परिषद, सेस फंडाचे नुकसान झाले असल्याची शक्यता आहे.

२) सन २००५-२००६ ते २०११-२०१२ या वित्तीय वर्षात प्राप्त अनुदान झालेला खर्च व अखर्चित अनुदान कपात केल्याचा अभिकरण शुल्काचा तपशील व प्रत्यक्षात मागणी न केलेल्या अभिकरण शुल्काचा तपशील सादर करण्यात यावा.

३) मागील सात वर्षांत रु. ३७९२.१२ लक्ष एवढे अनुदान प्राप्त झाले असून खर्च रु. ३५१७.०७ झाला आहे. अखर्चित रक्कम रु.२७५.०५ लक्ष शिल्लक दिसून येते सदर रक्कम शासनास परत केली किंवा कसे याची खात्री होत नाही.

४) पंचायत समिती स्तरावरुन फक्त ४ टक्के अभिकरण शुल्क कपात दर्शविलेली आहे. १ टक्का अभिकरण शुल्काच्या मागणीबाबत पंचायत समितीच्या विवरणपत्रात माहिती नमूद नाही. कृषी विभाग व पंचायत समितीने दर्शविलेली ४ टक्के व १ टक्के मागणी अचूक काढलेली दिसत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

कृषी विभाग जिल्हा परिषद, नागपूर विशेष घटक योजना/ओटीएसपी /टिएसपी योजना सन २०११-१२ शासनाची अखर्चित रक्कम रु.२७५.०५ लक्ष जमा करण्याबाबत व अभिकरण शुल्क कपातीबाबत अनुपालन अभिप्रायाचा तपशील.

१) सदर योजनेमध्ये अनुदान पंचायत समिती स्तरावर देण्यात येत असून ४ टक्के अभिकरण शुल्क कपातीचे दस्ताऐवज त्यास्तरावर उपलब्ध ठेवण्यात आलेले आहे. तालुका स्तरावरुन सन २०११-१२ मध्ये विशेष घटक योजना अंतर्गत रु. ६३९.७५ लक्ष निधी प्राप्त झालेला असून रु. ५२९.१९ लक्ष खर्च झालेला आहे खर्चाचे ४ टक्के अभिकरण शुल्क व १ टक्का असे एकूण रु.२६.४६ लक्ष जमा करणे होते. सन २०११-१२ मधील रु.२६.४६ लक्ष व उर्वरित अभिकरण शुल्क रु.२.७० लक्ष मागील वर्षातील आहे असे एकूण रु.२९.१६ लक्ष जिल्हा परिषद सेस फंडात जमा करण्यात आले तसेच ओटीएसपी योजना अंतर्गत १७०.०० लक्ष निधी प्राप्त झालेला होता. खर्च रु.१५२.६३ लक्ष खर्च झालेला असून अभिकरण शुल्क रु.७.६३ लक्ष जमा करणे होते त्यापैकी रु.२.५९ लक्ष जिल्हा परिषद सेस फंडात जमा करण्यात आले आहे. शिल्लक असलेल्या अभिकरण शुल्काची रक्कम जमा करण्याची कार्यवाही सुरू आहे. करिता जिल्हा परिषद सेस फंडाचे नुकसान झालेले नाही.

२) सन २००५-२००६ ते २०११-२०१२ या वित्तीय वर्षात प्राप्त अनुदान झालेला खर्च वित्तीय वर्षात अखर्चित अनुदान कपात अभिकरण शुल्क याचा तपशील (सन २००५-२००६ ते २०११-२०१२ पर्यंत अभिकरण शुल्काबाबतचे विवरण सोबत जोडलेले आहे.) रक्कम शासनास परत करण्यात आलेली नाही.

३) सन २००५-०६ ते २००७-२००८ या तीन वित्तीय वर्षात रु.८५९.३९ लक्ष निधी प्राप्त झालेला होता. त्यापैकी रु.८५८.७६ लक्ष निधी खर्च झालेला आहे. तसेच सन २००८-२००९ ते २०११-२०१२ या चार वित्तीय वर्षात रु. २९३२.७३ लक्ष निधी प्राप्त झालेला होता. त्यापैकी रु.२६५८.३१ लक्ष निधी खर्च झालेला आहे. सदर योजनेअंतर्गत सन २००८-२००९ पासून निवडलेल्या लाभ धारकांना २ वर्षांत लाभ देण्याच्या सूचना आहेत त्यामुळे वित्तीय वर्षात अखर्चित रक्कम लगतच्या वित्तीय वर्षात खर्च होत असल्याने अखर्चित रक्कम शासनास परत करण्यात आलेली नाही.

४) पंचायत समिती स्तरावरुन सन २०११-२०१२ मधील वित्तीय वर्षात ४ टक्के व १ टक्का अभिकरण शुल्क जिल्हा परिषद सेस फंडात जमा करण्यात आली असून विवरण पत्रात दर्शविल्याप्रमाणे अचूक आहे.

**परिच्छेद ३.५१४, ५० टक्के अनुदानावर ५ एच.पी डिझेल ऑईल इंजिन आणि ३ व ५ एच.पी. सबमर्सिबल पंपसेट वाटपाबाबत :-**

जिल्हा परिषद, नागपूर, सन २०११-२०१२ (परिच्छेद क्रमांक-६) जिल्हा परिषद सेस निधी सन २०११-१२ अंतर्गत शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर ५ हॉर्सपॉवर डिझेल ऑईल इंजिन आणि ३ व ५ हॉर्सपॉवर ओपनवेल सबमर्सिबल पंप सेट पुरवठा करणेबाबत खर्च रक्कम रुपये २२,९२,६४० करण्यात आला. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत :—

१) ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्र.झेडपीए २०००/प्रक्र.-४१/३३ दिनांक १७.०१.२००१ अन्वये योजना राबविताना पाळावयाचे वेळापत्रकाचे पालन करण्यात आले नाही.

२) लाभार्थी निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यावर त्यांचेकडून ५० टक्के लाभार्थी हिस्सा पुरवठा आदेश देण्यापुर्वी वसूल करून जिल्हा परिषद सेस फंडात जमा करणे आवश्यक होते, मात्र अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

३) पुरवठा आदेशातील अटीनुसार तपासणी अहवाल प्राप्त झाल्यावर ३० दिवसात ९० टक्के व गुणवत्ता अहवाल प्राप्त झाल्यानंतर १० टक्के रक्कम प्रदानाची अट जिल्हा परिषदेने शिथील करून घेतल्याबाबत अभिलेख लेखापरिक्षणास सादर केला नाही.

४) ग्राम विकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.झेडपीए/१०८८/सीआर/७८६/३० दिनांक २६.१०.१९८९ नुसार दर वर्षाचे साहित्य खरेदी केले त्याच वर्षात वाटप करणे आवश्यक आहे. परंतु प्रत्यक्षात वाटप त्याच वित्तीय वर्षात झालेले नाही.

५) पुरवठाधारकाने साहित्याचा पुरवठा पंचायत समिती निहाय केला, त्यामुळे प्राप्त साहित्यातून रॅन्डम पद्धतीने साहित्याची निवड करून गुणवता तपासणी करणे आवश्यक होते, परंतु रॅन्डम पद्धतीने तपासणी केल्याचे अहवाल तपासणीस उपलब्ध झालेले नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

५० टक्के अनुदानावर ५ एच.पी डिझेल इंजिन आणि ३ व ५ एच.पी. सबमर्सिबल पंपसेट वाटप करण्याबाबतचे अनुपालन पुढील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१) जिल्हा परिषद सेस फंड योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर ५ हॉर्सपॉवर डिझेल ऑईल इंजिन आणि ३ व ५ हॉर्सपॉवर ओपनवेल सबमर्सिबल पंप सेट पुरवठा करणेबाबत पुरवठा आदेश दिनांक ०३.०१.२०१२ रोजी देण्यात आलेला होता व सर्व साहित्याचा पुरवठा दिनांक १७.०२.२०१२ पर्यंत पंचायत समिती स्तरावर करण्यात आला. जिल्हा परिषद, स्तरावर योजना राबवितांना जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा, स्थायी समिती सभा तसेच कृषी विषय समिती सभेची रीतसर मंजुरी प्राप्त करणे, तसेच दरपत्रकाची उपलब्धता लाभार्थी निवड इ. विविध कारणामुळे वेळापत्रकाचे पालन करण्यात विलंब झालेला आहे, भविष्यात याबाबत दक्षता घेण्यात येईल.

२) पंचायत समिती स्तरावर साहित्य पुरवठा झाल्यानंतर साहित्याची उचल करण्यापूर्वी शेतकरी लाभार्थी हिस्याची रक्कम जमा करतात. त्यामुळे शासन निर्णयाप्रमाणे पुरवठा आदेश देण्यापुर्वी लाभार्थ्याकडुन लाभार्थी हिस्याची रक्कम वसूल करणे शक्य झाले नाही. परंतु शेतकऱ्यांकडून लाभार्थी हिस्याची रक्कम जमा करूनच पंचायत समितीकडून साहित्याचे वाटप करण्यात आले आहे.

३) देयकाचे शोधन करताना पुरवठा आदेशातील अटीनुसार तपासणी अहवाल व गुणवत्ता चाचणी अहवाल प्राप्त झालेला असल्यामूळे आक्षेपानुसार ९० टक्के व १० टक्के रक्कम अशी विभागणी न करता देयकाचे पूर्ण शोधन केलेले आहे.

४) पुरवठादाराने साहित्याचा पुरवठा दिनांक १७.०२.२०१२ पर्यंत पंचायत समिती स्तरावर करण्यात आला. परंतु दिनांक ३१/३/ २०१२ पर्यंत काही लाभार्थिनी साहित्याची उचल न केल्यामूळे साठा शिल्लक होता, तथापी सदर लाभार्थींनी त्यानंतर उर्वरित साहित्याची उचल केली असून साठा निरंक आहे (साठा रजिस्टरची झेरॉक्स प्रति जोडण्यात आलेली आहे.)

५) साहित्याची गुणवत्ता तपासणी करण्याची जबाबदारी पुरवठा आदेशात नमूद केल्याप्रमाणे पुरवठाधारक संस्थेची असल्यामुळे साहित्याची गुणवत्ता तपासणी त्यांचे मार्फत करण्यात आली. जिल्हा परिषद स्तरावरुन पंचायत समिती, नागपूर व पंचायत समिती, कळमेश्वर येथे रॅन्डम पद्धतीने तपासणी केलेली असून पुरवठा आदेशात नमूद केल्याप्रमाणे साहित्य आढळून आले. सदर साहित्य खरेदी आय एस आय मार्क असल्याने गुणवत्ता तपासणीची आवश्यकता नाही.

**परिच्छेद क्र. ३.८१२, लेखा परिक्षणास प्रमाणके उपलब्ध न करणेबाबत :-**

जिल्हा परिषद, नागपूर मध्ये वित्त विभागाचे सन २०११-१२ ह्या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षण करीत असतांना सोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये रेखांकन करीत असतांना प्रमाणके उपलब्ध करून देण्यात आले नाही. सदरहु प्रमाणकासंबंधी अनेकदा मौखिक मागणी करून देखील प्रमाणके लेखा परिक्षणास सादर करण्यांत आलेली नाहीत. याबाबत अखेरीस अर्धसमास पत्र क्रमांक ३ दिनांक १२.२.२०१३ अन्वये विचारणा केली असता लेखा परिक्षण संपेपर्यंत उत्तर सुद्धा देण्यात आले नाही. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**अभिकरण योजना**

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| १०२७ | २९.१२.२०११ | ३३००००० |
| १०३४ | २०.१२.२०११ | ७३६५८९ |
| १०३६ | २०.१२.२०११ | ७२१२०७५ |
| १०९५ | २७.१२.२०११ | ४११००० |

**सेस फंड**

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| १४१८ | २१.१२.२०११ | २८३ |
| १०२६ | ०२.११.२०११ | ४७२७ |

**जिल्हा निधी**

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| १६३९ | १४.११.२०११ | ७५५५८८९ |
| १६०० | ०४.११.२०११ | ३९८४५ |
| १६८२ | १७.११.२०११ | २००१००० |
| १६९४ | १८.१२.२०११ | ६४६००००० |
| १८४८ | ०१.१२.२०११ | १५७५२५ |
| २९१३ | ०७.०३.२०१२ | ७९०६ |
| ३१३९ | २७.०३.२०१२ | ६३६० |
| ३८८७ | ३१.०३.२०१२ | ४४८८ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

जिल्हा परिषदेमार्फत प्रदान झालेली प्रमाणके लेखे तयार करतांना प्रत्यक्ष हाताळण्यांत येतात. त्याचप्रमाणे प्रिया सॉफ्ट, संगणकीय प्रणालीमध्ये लेखा नोंद करण्याकरिता महाऑनलाईन तर्फे हाताळली जातात. दोन्ही लेख्यांमध्ये सदर प्रमाणकांची नोंद झालेली आहे. त्यानंतर विभाग निहाय प्रमाणकांची नस्ती तयार करण्यात आली. मात्र विभाग निहाय प्रमाणकांच्या नस्ती करताना सदरची प्रमाणके दुसऱ्या विभागाच्या नस्तीस अनावधानाने लावल्या गेल्यामुळे त्यावेळी लेखा परिक्षणासाठी उपलब्ध होऊ शकली नव्हती.

सदरहू एकूण १४ प्रमाणकांचा शोध घेण्यांत आला असून दफ्तरी ठेवण्यांत आले आहेत. सदरची प्रमाणके पंचायत समित्यांना वित्त प्रेषणाद्वारे पाठविण्यांत आलेल्या रक्कमा, कर्मचाऱ्यांची वेतन देयके व किरकोळ खर्चाची देयके आहेत.

**प्रकरण ४.३३, पर्यावरण संतुलित ग्रामसमृद्धी योजना, ग्रामपंचायतींना अनुदान वितरण मधील अनियमितता :-**

सन २०११-२०१२ (परिच्छेद क्र.१०) सन २०११-२०१२ मध्ये एकूण ५५ ग्राम पंचायतीपैकी ४५ ग्राम पंचायतीना रु.२०,४५,००० अनुदान वितरीत केले. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत :-

१) ४५ ग्राम पंचायतीकडून रक्कम प्राप्तीबाबत नमुना ७ पावती घेण्यात आली नाही.

२) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.व्हिपीएम/२६१०/प्र.क्र.१/पंरा-४, दिनांक २८.९.२०१० अन्वये पर्यावरण विकास आराखडा व उपयोगीता प्रमाणपत्रे प्राप्त केली नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) एकूण ४५ ग्राम पंचायतीना अनुदान वितरीत करण्यात आले. मात्र ग्राम पंचायतीकडून नमुना नंबर ७ च्या पोच पावत्या लेखा परिक्षणाच्या वेळी उपलब्ध नव्हत्या. त्या पोच पावत्या प्राप्त करून घेतलेल्या आहे. या सोबत सलग्न करण्यात येत आहे.

२) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.व्हिपीएम/२६१०/प्र. क्र.१/पंरा-४, दि. २८.९.२०१० अन्वये पर्यावरण विकास आराखडा व उपयोगीता प्रमाणपत्रे घेणे आवश्यक आहे. त्यानुसार उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आले आहे व पर्यावरण विकास आराखडा ग्राम पंचायतीकडे उपलब्ध आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २९, ३० सप्टेंबर, व १ ऑक्टोबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये लेखापरिक्षणास अभिलेख उपलब्ध करून देण्यात आले नाही असे आक्षेप ३४ परिच्छेदांमध्ये घेतल्याचे समितीस आढळून आले. समितीने या सर्व परिच्छेदांमधील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये दंडात्मक कारवाई करून त्यांच्या सेवापुस्तकात नोंद घ्यावी. त्यांची एक वेतनवाढ थांबवावी, त्यांच्या गोपनीय अहवालात नोंद घ्यावी अशा कर्मचाऱ्यांची नावे व त्यांच्याकडून वसूल केलेल्या रक्कमेबाबतचा अहवाल समितीस सादर करावा असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करणे :-

सन २००८-२००९ तसेच सन २०११-१२ च्या वार्षिक लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाची स्थानिक निधी लेखा परिक्षकांद्वारा तपासणी करीत असताना ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी लेखापरिक्षणास त्या त्या वर्षातील मुद्यांबाबतची कागदपत्रे दाखविली नाहीत अशा अधिकारी व कर्मचारी यांचेविरुद्ध मा.समिती प्रमुखांनी दिलेल्या निदेशानुसार महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये दंड तसेच त्यांच्या सेवापुस्तिकेत याबाबतची नोंद घेतली आहे काय, असल्यास अशा सर्व अधिकारी/कर्मचारी यांची नावे, दंडाची रक्कम ती केव्हा वसूल केली, याबाबत विभाग निहाय तसेच उपरोक्त नमूद वर्ष निहाय माहिती/अहवाल समितीस सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मा.समिती प्रमुखांनी दिलेल्या निर्देशाचे अनुषंगाने नमूद करण्यात येते की, सन २००८-०९ तसेच सन २०११-१२ च्या स्थानिक निधी लेखा परिक्षणावेळी लेखा परीक्षकांस तपासणी करीत असतांना ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी कागदपत्रे दाखविली नाहीत अशा अधिकारी व कर्मचारी यांचेविरुद्ध महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये दंड रक्कम रुपये १०० पर्यंत तसेच सुधारित अधिनियम दिनांक १० मार्च, २०११ अन्वये रुपये २५००० पर्यंत दंड रक्कम वसूल करण्याची तरतूद आहे. याबाबतचा तपशील खालील तक्यात नमूद केल्याप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | दंडित कर्मचारी | आयुक्तांकडे सादर केलेल्या प्रकरणांमधील कर्मचारी |
|---|---|---|---|
| १) | २००८-०९ | ४१ | ५ |
| २) | २०११-१२ | - | ७ |
| | | ४१ | १२ |

सन २००८-०९ मधील परिच्छेद क्र.३.१०४० (१८)/१६ व ३.१०४० (१८)/१९ तसेच सन २०११-१२ मधील परिच्छेद क्र.३.१३०, ३.१३१ व ३.१३२ संदर्भातील कागदपत्रे लेखापरिक्षणावेळी उपलब्ध करण्यात आलेली असल्याने कर्मचाऱ्यांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात आलेली नाही, त्याच प्रमाणे सन २००८-०९ मधील परिच्छेद क्र.३.६८६, ४.१६९, ४.१९६ व ४.२८२ या परिच्छेदांमध्ये लेखा परिक्षणाचे वेळी कागदपत्रे उपलब्ध केली नसल्यासंबंधीचा लेखा आक्षेप नसल्याने कर्मचाऱ्यांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात आलेली नाही.

सन २००८-०९ मधील परिच्छेद क्र. ४.२८१ या संदर्भात नमूद करण्यात येते की, लेखा परिक्षणावेळी मागणी केलेली कागदपत्रे पोलीस स्टेशन, हिंगणा येथे गुन्हा क्र. १३६/०९ संदर्भाने जमा केलेली असल्याने लेखापरिक्षणा वेळी कागदपत्रे उपलब्ध करून देणे शक्य नव्हते, त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात आलेली नाही.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्राम विकास विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायती राज समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने लेखा परिक्षणास अभिलेखे सादर करण्यासंदर्भात सुधारीत परिपत्रक दि. ३०.३.२०१६ रोजी निर्गमित केले आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर माहिती घेण्यासाठी दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने ३४ प्रकरणांत लेखा परिक्षणासाठी अभिलेख न दर्शविणे या संबंधात विचारणा केली असता यासंदर्भात कार्यवाही झालेली असल्याने समितीने समाधान व्यक्त केले.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २००८-२००९ आणि सन २०११-२०१२ या वर्षाच्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालावर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. सदर दोन्ही अहवाल वर्षातील " लेखापरिक्षेस अभिलेख उपलब्ध करून दिले नसणे " या समान आक्षेपावर समितीने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियमातील कलम ७ अन्वये दंडात्मक कारवाई करून त्यांच्या सेवापुस्तकात नोंद घेऊन त्यांची वेतनवाढ थांबविण्याबाबत निदेश देऊन तत्संबंधीत अहवाल सादर करण्याचे समितीने निदेश दिले.

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीस प्राप्त झालेल्या माहितीवरुन दिसून येते की, सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ या वर्षातील ४१ कर्मचारी महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियमाच्या कलम ७ नुसार दंडित झालेले आहेत, याबाबत समिती समाधान व्यक्त करते. दंड आकारण्यात आलेली किंवा सेवापुस्तकात नोंद घेण्यात आलेले कर्मचारी हे ग्रामसेवक व सहाय्यक इत्यादी कनिष्ठ कर्मचारी आहेत. परंतु परिच्छेद क्रमांक ३.६८५ मधील तत्कालिन कृषी विकास अधिकारी श्री.कोलते व श्री.गरुड यांच्यावरील कारवाईचा प्रस्ताव अद्याप विभागीय आयुक्त स्तरावर दिनांक २ फेब्रुवारी, २०१६ पासून प्रलंबित आहे. अशा प्रकारे विभागीय आयुक्त स्तरावर (परिच्छेद क्रमांक ३.८१२) मधील संबंधित अधिकारी यांच्यावरील कारवाईचा प्रस्ताव अद्याप विभागीय आयुक्तांकडे प्रलंबित आहे. याबाबत समिती सखेद आश्चर्य व्यक्त करते. वस्तुतः महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० कलम ७ नुसार दंड करण्याबाबत विभागीय आयुक्तांना अधिकार असून त्यांचेकडून वेळेवर कारवाई होत नसेल तर शासनाने असा विलंब होण्याचे कारण शोधणे आवश्यक आहे. **महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ प्रमाणे आयुक्तांचे अधिकार हे न्यायीकवत *(Quasi Judicial)* अधिकार असल्यामुळे समिती त्यांचेवर कारवाईची शिफारस करणार नाही. परंतु कार्यबाहुल्यामुळे आयुक्ताला हे अधिकार वापरता येत नसतील तर त्यांचे अधिकारांचे विकेंद्रीकरण करून ते मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावर देता येतील काय, यावर वित्त विभागाने विचार करावा आणि त्यासंबंधात आवश्यक वाटल्यास महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियमात यथोचित सुधारणा करून कलम ७ अन्वये करावयाची कार्यवाही तातडीने निकाली काढण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, नागपूर

## थकित आगाऊ रकमांबाबत (थकित अग्रिम)

**(१) परिच्छेद ३.१०३९ (३९) (सन २००८-०९)**

जिल्हा परिषदांमध्ये निरनिराळ्या योजना, बांधकाम वगैरे बाबी कार्यान्वित करण्यासाठी संबंधित ठेकेदार, विभाग प्रमुख अगर कर्मचारी यांना वेळोवेळी आगाऊ रकमा देण्यात येतात. अशा प्रकारे दिलेल्या रकमांचे संबंधित वर्षाअखेर खर्चाची प्रमाणके व हिशेब देऊन समायोजन/वसूली करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे अगोदर दिलेल्या आगाऊ रकमांचे समायोजन/वसूली झाल्यावर नवीन आगाऊ रकमा देता येतात. परंतु जिल्हा परिषदांकडील आगाऊ रकमांच्या नोंदवह्या पाहता वेळोवेळी दिलेल्या आगाऊ रकमांचे समायोजन/वसूली होत नसल्याचे आढळून येते. अशा थकीत आगाऊ रकमांमध्ये फार जुन्या म्हणजेच १९६२ पासूनच्या आगाऊ रकमांचे समायोजन/वसूली थकीत असल्याचे दिसून येते. उदाहरणादाखल पुढील जिल्हा परिषदांमध्ये सन २००८-२००९ अखेर खाली दिल्याप्रमाणे आगाऊ रकमा समायोजन/वसूलीअभावी थकीत होत्या.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषद विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र. | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | नागपूर | ग्रामीण पाणीपुरवठा विभाग | ३२ | ११,३१,४७९ |

**(२) परिच्छेद ३.१०३९ (४०)**

जिल्हा परिषदांमध्ये निरनिराळ्या योजना, बांधकाम वगैरे बाबी कार्यान्वित करण्यासाठी संबंधित ठेकेदार, विभागप्रमुख अगर कर्मचारी यांना वेळोवेळी आगाऊ रकमा देण्यात येतात. अशा प्रकारे दिलेल्या रकमांचे संबंधित वर्षाअखेर खर्चाची प्रमाणके व हिशेब देऊन समायोजित/वसूली करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे अगोदर दिलेल्या आगाऊ रकमांचे समायोजन/वसूली झाल्यावर नवीन आगाऊ रकमा देता येतात. परंतु जिल्हा परिषदेकडील आगाऊ रकमांच्या नोंदवह्या पाहता वेळोवेळी दिलेल्या आगाऊ रकमांचे समायोजन/वसूली होत नसल्याचे आढळून येते. अशा थकीत आगाऊ रकमांमध्ये फार जुन्या म्हणजेच १९६२ पासूनच्या आगाऊ रकमांचे समायोजन/वसूली थकीत असल्याचे दिसून येते. उदाहरणादाखल पुढील जिल्हा परिषदांमध्ये सन २००८-२००९ अखेर खाली दिल्याप्रमाणे आगाऊ रकमा समायोजन/वसूलीअभावी थकीत होत्या.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषद विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र. | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ४०. | नागपूर | आरोग्य विभाग | ५५ | २,९९,७०८ |

**(३) परिच्छेद ३.१०३९ (४१)**

जिल्हा परिषदांमध्ये निरनिराळ्या योजना, बांधकाम वगैरे बाबी कार्यान्वित करण्यासाठी संबंधित ठेकेदार, विभाग प्रमुख अगर कर्मचारी यांना वेळोवेळी आगाऊ रकमा देण्यात येतात. अशा प्रकारे दिलेल्या रकमांचे संबंधित वर्षाअखेर खर्चाची प्रमाणके व हिशेब देऊन समायोजित/वसूली करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे अगोदर दिलेल्या आगाऊ रकमांचे समायोजन/वसूली झाल्यावर नवीन आगाऊ रकमा देता येतात. परंतु जिल्हा परिषदांकडील आगाऊ रकमांच्या नोंदवह्या पाहता वेळोवेळी दिलेल्या आगाऊ रकमांचे समायोजन/वसूली होत नसल्याचे आढळून येते. अशा थकीत आगाऊ रकमांमध्ये फार जुन्या म्हणजेच १९६२ पासूनच्या आगाऊ रकमांचे समायोजन/वसूली थकीत असल्याचे दिसून येते. उदाहरणादाखल पुढील जिल्हा परिषदांमध्ये सन २००८-२००९ अखेर खाली दिल्याप्रमाणे आगाऊ रकमा समायोजन/वसूलीअभावी थकीत होत्या.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषद विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र. | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ४१. | नागपूर | कृषि विभाग | ७२ | २,०१,७८१ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

(१) ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या योजनांची कामे पुर्ण करण्याकरिता वेळोवेळी अग्रिम घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने सन १९७३ पासून विविध विकास कामासाठी घेतलेले अग्रिम या कार्यालयाकडे प्रलंबित आहे. यापैकी खालील अग्रिमांचे पुढीलप्रमाणे समायोजन करण्यात आलेले आहे.

१. प्रमाणक क्रमांक १००७ दिनांक २८ मार्च २०१३ रु. ५०,०००

२. प्रमाणक क्रमांक १५९ दिनांक २८ मे २०१४ अन्वये रु. ५०,०००

३. प्रमाणक क्रमांक ३९३ दिनांक ३/३/२०१३ ला रु.५०,००० च्या अग्रिमाचे समायोजन करण्यात आले आहे.

उर्वरित प्रलंबित अग्रिमाबाबतचे समायोजनाची कार्यवाही सुरू आहे.

(२) आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे प्रलंबित अग्रिमाचे समायोजन खालील प्रमाणे झालेले आहे :—

| अ.क्र. | अग्रिम वर्ष | तपशिल | एकूण अग्रिम | सन ०८-०९ अखेर शिल्लक अग्रिम | समायोजन झाल्याचे प्रमाणक क्र. | दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ०४-०५ | चर्तुर्थ श्रेणी कर्मचारी यांना गणवेश खरेदी. | १०,२०८ | १०,२०८ | ३५३ | १९ जुलै २०१० |
| २. | ०६-०७ | हिवताप, कांजण्या भरती प्रक्रिया. | १,००,००० | १,००,००० | २३३० | ६ जानेवारी २०११ |
| ३. | ०७-०८ | वाहनचालकांना गणवेश खरेदी | १२,५०० | १२,५०० | २८३५ | १२ मार्च २०१० |
| ४. | ०७-०८ | वाहनचालकांना गणवेश खरेदी | ५,००० | ५,००० | २८३५ | १२ मार्च २०१० |
| ५. | ०७-०८ | रिक्त पदांची भरती प्रक्रिया | २२,००० | २२,००० | २७४० | २२ फेब्रुवारी २०१२ |
| ६. | ०७-०८ | श्री. चौधरी वैद्य अग्रिम | १,५०,००० | १,५०,००० | ११६५ | १४ सप्टेंबर २०१५ |
| | | एकूण . . | | २,९९,७०८ | | |

(३) कृषि विभाग, जिल्हा परिषद, नागपूर या कार्यालयाकडे सन १९६३-६४ ते १९८०-८१ पर्यंत रु.२,०१,७८१ प्रलंबित असल्याचे अग्रिम नोंदवहीवरून दिसून येते. सदर प्रलंबित अग्रिमाला ३५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्यामुळे अभिलेखाअभावी समायोजनाचे देयकांची पडताळणी करता आली नाही. त्यामुळे अग्रिम वसूली करता आली नाही. अभिलेखाचा शोध घेणे सुरू असून त्यानुसार वसूलीची/निर्लेखनाची कार्यवाही करण्यात येईल.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २९ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडे १९७३ पासून विविध कामासाठीचा अग्रिम रु.११,३१,४७९ इतकी रक्कम प्रलंबित राहण्याचे कारणे काय आहेत, अग्रिम वेळीच समायोजित / वसूल होण्यासाठी खात्याने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत, मागील अग्रिम वसूल / समायोजित झालेला नसताना नवीन अग्रिम कोणत्या प्राधिकारान्वये देण्यात आला, यावर कार्यकारी अभियंता (ग्रापापु) यांनी समितीस विदित केले की, २० ते २५ वर्षांपूर्वीचे जुने रेकॉर्ड आहे. जास्तीत जास्त अग्रिम शोधून त्याचे समायोजन केले जाईल. यावर समितीने असे निदेश दिले की, या प्रकरणी संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देऊन कळविण्यात यावे की, एक महिन्याच्या अवधित सदर रक्कम न दिल्यास संबंधितांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारार्थी उत्तर दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सदर प्रकरणी दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर रक्कमेचे स्वरुप पाहून (मोठे व गांभीर्ययुक्त) करावा व सदर रक्कम व्याजासह वसूली करण्यासंबंधी योग्य ती कार्यवाही करावी. तसेच या प्रकरणी संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देऊन कळविण्यात यावे. एक महिन्याच्या अवधित सदर रक्कम न दिल्यास फौजदारी गुन्हा दाखल या समितीच्या निर्देशाच्या अनुषंगाने शासन स्तरावर काय कारवाई केली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडे सन १९७३ पासून एकूण २० प्रकरणाचे प्रलंबीत असलेल्या आक्षेपात नमूद रुपये ११,३१,४७९ (सन २००८-०९ पर्यंत) एवढया रक्कमेचे अग्रिमासंबंधीची वस्तुस्थिती खालील प्रमाणे आहे. एकूण प्रलंबीत अग्रिम रु. ११,३१,४७९)

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | अग्रिमाचे स्वरुप | मुळ रक्कम | समायोजन झालेली रक्कम | शिल्लक | समायोजन दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ११४४ | २४ एप्रिल २०१२ | डिझेल व ऑईल खरेदी | ९०,००० | ९०,००० | ०.०० | २२ मार्च २०१३ |
| २. | २८७५ | १२ ऑक्टोबर २०१२ | टायर टयुब खरेदी | १६,००० | १६,००० | ०.०० | २२ मार्च २०१३ |
| ३. | १००७ | २८ मार्च २०१३ | वाहनांचे इंधन व दुरुस्ती | ५०,००० | ५०,००० | ०.०० | २८ मे २०१४ |
| ४. | ३०४ | २९ जानेवारी २००९ | दिवाणी न्यायालयात क्र. ४ येथे भरणा. | ३,१२,००८ | ३,१२,००८ | ०.०० | १० फेब्रुवारी २०१५ |
| ५. | १६३८ | ५ जुलै १९७४ | कामगाराचे वेतन | ५२६२ | ५२६२ | ०.०० | २०००-०१ |
| ६. | ४११३ | २७ नोव्हेंबर १९७७ | भोंदेवाडा पा.पु.यो.दु. | २७,००० | २७,००० | ०.०० | २०००-०१ |
| ७. | १४१८ | ७ जुलै १९८७ | सिमेंट खरेदी | ३०,५२५ | ३०,५२५ | ०.०० | १२ एप्रिल १९९८ |
| ८. | २७०६ | ९ सप्टेंबर १९८७ | टायर खरेदी | ४,८१० | ४,८१० | ०.०० | १२ एप्रिल १९९८ |
| ९. | ५१०४ | ७ डिसेंबर १९८७ | बॅटरी खरेदी | १,६०० | १,६०० | ०.०० | १२ एप्रिल १९९८ |
| १०. | ६६३ | २८ फेब्रुवारी १९९१ | टायर टयुब खरेदी | ७२,४४२ | ७२,४४२ | ०.०० | ०९ फेब्रुवारी २००५ |
| ११. | १८२ | ७ ऑगस्ट १९९१ | ईनवेल बोअर करिता | २०,००० | २०,००० | ०.०० | ३० मार्च २००२ |
| १२. | - | ४ जुलै १९७३ | भुसंपदान करिता | २१,७७५ | २१,७७५ | ०.०० | निर्लेखन |
| १३. | ३३८६ | १० मार्च १९८६ | टुलपंप दुरुस्ती | १९,४०० | १९,४०० | ०.०० | निर्लेखन |
| १४. | १८६५ | १८ जुलै १९८८ | सिमेंट खरेदी | १७,०९९ | १७,०९९ | ०.०० | निर्लेखन |
| १५. | ३०३२ | ९ सप्टेंबर १९८८ | सिमेंट | १८,८१४ | १८,८१४ | ०.०० | निर्लेखन |
| १६. | ४३९७ | २८ नोव्हेंबर १९८६ | पाणी टंचाई मदत | ५५,००० | ०.०० | ५५,००० | ३० डिसेंबर २००२ |
| १७. | ५१६६ | २४ डिसेंबर १९८६ | हत्यारे खरेदी | २०,००० | ०.०० | २०,००० | संबंधितांना वसुलीबाबत नोटीस देण्यात आली आहे. |
| १८. | १९७१ | ३१ मार्च १९८७ | सिमेंट खरेदी | २,६०,५३५ | ०.०० | २,६०,५३५ | समायोजनाची कार्यवाही सुरू आहे. |
| १९. | २२६७ | २६ नोव्हेंबर १९८७ | टायर टयुब खरेदी | ९९,०९७ | ०.०० | ९९,०९७ | निर्लेखनाची कार्यवाही सुरू आहे. |
| २०. | ३२९३ | ८ सप्टेंबर १९९९ | टायर टयुब खरेदी | १६,१३० | ०.०० | १६,१३० | संबंधितांना वसूली बाबत नोटीस देण्यात आली आहे. |
| | | | एकूण . . | ११,५७,४९७ | | | |

आक्षेपात नमूद अ.क्र. १ ते ११ व अ.क्र. १६ चे अग्रिमाचे समायोजन करण्यात आले असून अ.क्र. १२ ते १५ चे अग्रिम निर्लेखित करण्यात आले आहे. उर्वरित अ.क्र. १७ व २० बाबत संबंधिताना नोटीस बजावण्यात आली असून अ.क्र. १८ बाबत समायोजनाची कार्यवाही सुरू आहे. तसेच अ.क्र. १९ बाबत निर्लेखनाची कार्यवाही सुरू आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात मंत्रालयीन विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्राम विकास व जलसंधारण (ग्राम विकास) विभाग :—**

थकीत अग्रिम वसूलीबाबत ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्र.झेडपीए-२००९/प क्र.५२२/ वित्त-९, दिनांक १० डिसेंबर, २०१० अन्वये सर्व जिल्हा परिषदांना स्पष्ट सुचना दिलेल्या आहेत.

## चौकशी अहवाल

## ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नागपूर

### विषय : प्रलंबित अग्रिमाचे समायोजन करणेबाबत.

ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नागपूर येथे सन १९७३ पासून मोठ्या प्रमाणात अग्रिम प्रलंबित आहेत. सदर अग्रिम समायोजनाबाबत कार्यवाही होणेकरिता वेळोवेळी काय कार्यवाही केली याबाबत अहवाल सादर करण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांनी समिती स्थापन केली त्याबाबतचा चौकशी अहवाल सादर करण्यात येत आहे.

ग्रामीण पाणीपुरवठा विभाग हे १९९७ पूर्वी लघुसिंचाई विभाग डिव्हिजन विभाग डिव्हिजन या नावाने कार्यरत होते. त्यावेळी संपूर्ण १३ पंचायत समित्यांमध्ये प्रत्येकी १ उप विभाग कार्यरत होते व या उप विभागांमार्फत योजना राबविण्यात येत होत्या व सदर योजना राबविण्याकरिता मोठ्या प्रमाणात रोख रकमेची उलाढाल होत होती व सदर कामाकरिता मोठ्या प्रमाणात अग्रिम उचलून योजना राबवून सदर अग्रिमाचे समायोजन होत असल्याचे अग्रिम रजिस्टरचे अवलोकन केले असता दिसून येते. तरीसुद्धा सदर अग्रिमापैकी खालील प्रमाणे अग्रिमाचे समायोजन झाल्याचे दिसून येत नाही.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | अग्रिमाचे स्वरुप | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | | ४ मार्च १९७३ | जमीन अधिग्रहण | २१७७५ |
| २. | १६३८ | ५ जुलै १९७४ | कामगारांचे वेतन | ५२६२ |
| ३. | ४११३ | ४ नोव्हेंबर १९७७ | भांडेवाडी पा पू योजना | २७००० |
| ४. | ३३८६ | १० मार्च १९८६ | देखभाल दुरूस्तीकरिता अग्रिम | १९४०० |
| ५. | ४३९७ | २८ नोव्हेंबर १९८६ | मध्यम कालवा, आगरी करिता | ५५००० |
| ६. | ५१६६ | २४ डिसेंबर १९८६ | टुल पंप रिपेअर | २०००० |
| ७. | १४१८ | ७ जुलै १९८७ | सिमेंट खरेदी | ३०५२५ |
| ८. | १९७१ | ३१ मार्च १९८७ | सिमेंट खरेदी | २६०५३५ |
| ९. | २७०६ | ९ सप्टेंबर १९८७ | टायर खरेदीकरिता अग्रिम | ४८१० |
| १०. | ५१०४ | ७ डिसेंबर १९८७ | जिपकरिता बॅटरी खरेदी | १६०० |
| ११. | १८६५ | १८ जुलै १९८८ | सिमेंट खरेदी | १७०९९ |
| १२. | ३०३२ | १९ सप्टेंबर १९८८ | सिमेंट खरेदी | १८८१४ |
| १३. | ६६३ | २८ फेब्रुवारी १९९१ | टायर ट्युब खरेदी | ७२४४२ |
| १४. | १८२ | १९ सप्टेंबर १९९१ | इनवेल बोअरींग करणे | २०००० |
| १५. | २२६७ | २६ नोव्हेंबर १९९७ | टायर ट्युब खरेदी | ९९०९७ |
| १६. | ३२९३ | ८ सप्टेंबर १९९९ | टायर ट्युब खरेदी | १६१३० |

**मुद्दा क्र. १ :** प्रमाणक क्र. दिनांक ४ जून १९७३ अन्वये विशेष भुमापन अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांना रु. २१७७५ एवढी रक्कम तात्पुरता अग्रिम थकित देण्यात आलेला होता. विभागाच्या माहितीनुसार सदर प्रस्ताव ४२ वर्ष जुन्या कागदपत्राची शोध केल्यानंतरही कागदपत्रे उपलब्ध होवू शकली नाही.

**मुद्दा क्र. २ व ३ :** प्रमाणक क्र. १६३८, दिनांक ५ जुलै १९७४ अन्वये कार्यकारी अभियंता, लघु सिंचन विभाग क्र. १, जिल्हा परिषद, नागपूर यांना रुपये ५,२६२ एवढा अग्रिम देण्यात आला होता. सदर अग्रिम हा कामगाराच्या पेमेंटकरिता घेण्यात आले होते. सदर अग्रिम हा विभागाची अग्रिम नोंदवही पान क्र.४ वर समायोजन झाल्याचे निदर्शनास येते. तथा प्रमाणक क्र. ४११३ दिनांक २७ नोव्हेंबर १९७८ अन्वये कार्यकारी अभियंता, लघु सिंचाई विभाग-१, जि.प. नागपूर यांना रुपये २७,००० एवढा अग्रिम देण्यात आला होता. सदर अग्रिम भांडेवाडी पाणीपुरवठा योजना दुरूस्ती-करिता देण्यात आला होता. सदर अग्रिम हा विभागाची अग्रिम नोंदवही पान क्र. ४ वर समायोजन झाल्याचे निदर्शनास येते.

**मुद्दा क्र. ४ :** प्रमाणक क्र. ३३८६, दिनांक १० मार्च १९८६ अन्वये कार्यकारी अभियंता, लघु सिंचन विभाग क्र. १, जिल्हा परिषद, नागपूर यांना रुपये १९४०० एवढा अग्रिम देण्यात आला होता. सदर प्रस्तावाची नोंदीचा शोध केला असता कुठेही नोंद आढळली नाही. सदर प्रस्ताव २९ वर्ष जुने असल्याने सदर अग्रिम समायोजनाबाबत प्रस्ताव तयार करून सादर करण्यात यावा.

**मुद्दा क्र. ५ :** प्रमाणक क्र. ४३९७, दिनांक २१ ऑगस्ट १९८६ अन्वये श्री. मडगे (कनिष्ठ अभियंता), प्रकल्प सिंचाई विभाग, नागपूर यांना रु. ५५००० तात्पुरता अग्रिम प्रदान करण्यात आल्याची नोंद आहे. अग्रिम नोंदवहीत पृष्ठ क्र. १० वर नोंद आहे. तथापि, सदर प्रस्ताव २९ वर्ष जुना असून समायोजन केल्याचे निदर्शनास येत नाही. करिता रुपये ५५००० रक्कमेची वसूली करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**मुद्दा क्र.६ :** प्रमाणक क्र. ५१६६, दिनांक ७ डिसेंबर १९८६ अन्वये श्री. शेख, कक्ष अधिकारी, लघु सिंचन विभाग क्र. १, जिल्हा परिषद, नागपूर यांना रुपये २०००० तात्पुरता अग्रिम देण्यात आल्याची नोंद पृष्ठ क्र. १० (अग्रिम नोंदवही) निदर्शनास येते. सदर रकमेचे समायोजन करण्याबाबतचा पुरक नोंद शोधन उपलब्ध होत नसल्याने सदर रकमेची वसूली करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**मुद्दा क्र.७ :** प्रमाणक क्र. १४१६, दिनांक ७ जुलै १९८७ अन्वये कार्यकारी अभियंता लघु सिंचन विभाग क्र. १, जिल्हा परिषद, नागपूर यांना रुपये ३०५२५ एवढा अग्रिम देण्यात आला होता. सदर अग्रिम हा सिमेंट खरेदीकरिता अदा करण्यात आला आहे. सदर अग्रिमाची रक्कम ही दिनांक १२ एप्रिल १९९८ ला एकूण चालन रुपये १,६५,२६६ अन्वये भरणा करण्यात आलेली आहे. असे अग्रिम नोंदवही पान क्र. ११ वर नमूद आहे.

**मुद्दा क्र. ८ :** प्रमाणक क्र. १९७१, दिनांक ३१ जुलै १९८७ ला रुपये २,६०,५३५ अन्वये श्री. डी. बी. चौधरी कार्यकारी अभियंता, लघु सिंचन विभाग क्र.१, जिल्हा परिषद, नागपूर यांना अग्रिम देण्यात आला होता. त्याअनुषंगाने संबंधित भांडार नस्तीचे अवलोकन केले असता पृष्ठ क्र. ६ वर सदर रक्कम ही रुपये २७९.३० मेट्रीक टन सिमेंट खरेदी करण्याकरिता अग्रिम देण्यात आले होते. या अनुषंगाने भांडार शाखा नोंदवही मध्ये सिमेंटची नोंद दिनांक १८ ऑगस्ट १९८७ ला ३३ मेट्रीक टन व दिनांक १७ ऑगस्ट १९८७ ला १०८.५ मेट्रीक टन सिमेंट दिनांक २१ ऑगस्ट १९८७ ला १४१.५ मेट्रीक टन सिमेंट या प्रमाणे प्राप्त झालेले असून कामाकरिता वितरीत करण्यात आलेले होते. त्यामुळे दिलेल्या अग्रिमाचा योग्य तो वापर झाल्याचा दिसून येते. तथापि दिलेल्या अग्रिमाचे समायोजन न केल्यामुळे, सदर प्रकरणात वित्तीय नियमांचे उल्लंघन झाल्याचे दिसून येते. करिता सदर अग्रिम समायोजन करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा.

**मुद्या क्र. ९ व १० :** प्रमाणक क्र. २७०६, दिनांक ७ डिसेंबर १९८७ अन्वये कार्यकारी अभियंता, लघु सिंचन क्र. १, जिल्हा परिषद, नागपूर यांना रुपये ४८१० एवढी अग्रिम वाहनाकरिता टायर खरेदी करण्याकरिता देण्यात आलेला होता. सदर अग्रिमाची रक्कम ही दिनांक १२ एप्रिल १९९८ ला एकूण चालन रुपये १,६५,२६६ अन्वये भरणा करण्यात आलेली आहे असे अग्रिम नोंदवही पान क्र. ११ वर नमूद आहे. तसेच प्रमाणक क्र. ५१०४, दिनांक ७ डिसेंबर १९८७ अन्वये कार्यकारी अभियंता, लघु सिंचन क्र. १, जिल्हा परिषद, नागपूर यांना रुपये १६०० एवढा अग्रिम जीप बॅटरी करणेकरिता देण्यात आला आहे. सदर अग्रिमाची रक्कम ही दिनांक १२ एप्रिल १९९८ ला एकूण चालन क्र. १,६५,२६६ अन्वये भरणा करण्यात आले आहे असे अग्रिम नोंदवही पान क्र.११ वर नमूद आहे.

**मुद्दा क्र. ११ व १२ :** प्रमाणक क्र. १८६५, दिनांक १८ जुलै १९८८, प्रमाणक क्र. ३०३२, दिनांक १९ सप्टेंबर १९८८ अन्वये कार्यकारी अभियंता, लघु सिंचन क्र. १, जिल्हा परिषद, नागपूर यांना अनुक्रमे रुपये १७०९९ व रुपये १८८१४ एवढी अग्रिम सिमेंट खरेदी करण्याकरिता देण्यात आल्याचे अग्रिम नोंदवही पृष्ठ क्र. १० वर नमूद आहे. भांडार नस्तीवरील पृष्ठ क्र. ६ नमूद नोंदीवरून १३ मेट्रिक टन सिमेंट व अनुक्रमे १९ मेट्रिक टन सिमेंट व १९ मेट्रिक टन सिमेंट प्राप्त झाल्याची नोंद आहे. सदर सिमेंट हे संबंधित कामासाठी वितरित करण्यात आले आहे. सदर सिमेंट वितरणाची नोंद घेण्यात आलेली आहे. त्यामुळे दिलेल्या अग्रिमाचा योग्य तो वापर झाल्याचा दिसून येते. तथापि, दिलेल्या अग्रिमाचे समायोजन न केल्यामुळे, सदर प्रकरणात वित्तीय विनियमांचे उल्लंघन झाल्याचे दिसून येते. करिता सदर अग्रिम समायोजन करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

**मुद्दा क्र. १३ :** प्रमाणक क्र. ६६३, दिनांक २८ फेब्रुवारी १९९१ अन्वये उप अभियंता, यांत्रिकी, भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (भुसविय), नागपूर यांना टायर ट्युब विकत घेण्याकरिता रुपये ७२४४२ अग्रिम नोंदवही वरील पृष्ठ क्र. ५९ नोंदणीवरून निदर्शनास येते. सदर अग्रिमाचे समायोजन प्रस्ताव उप अभियंता, यांत्रिकी, भुसंविय, नागपूर यांचे पत्र क्र. १२० दिनांक ९ फेब्रुवारी २००५ ला देयक नोंदवहीतील पृष्ठ क्र. ५२ सादर केल्याची नोंद आहे. सबब, अग्रिम समायोजन करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**मुद्दा क्र. १४ :** प्रमाणक क्र. १८२, दिनांक १९ सप्टेंबर १९९१ अन्वये उप संचालक, भुसंविस, नागपूर विभाग, नागपूर यांना पुर्नवसन वसाहतीतील इनवेल बोअर करण्याकरिता रुपये २०,००० अग्रिम मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे मंजुरीने प्रदान करण्यात आले याची नोंद अग्रिम नोंदवही मध्ये पृष्ठ क्र. ७३ वर नोंद आहे. सदर प्रबंधक हे उप संचालक, भुसर्विय, नागपूर अंतर्गत वरिष्ठ भूवैज्ञानिक, भुसर्विय येथे कार्यरत होते. सदर अग्रिमाची समायोजन प्रमाणक क्र. २३७, दिनांक ३० मार्च २००२ अन्वये झाल्याचे नोंदवही पान क्र. १५ वर नोंद आहे.

**मुद्दा क्र.१५ :** प्रमाणक क्र. २२६७, दिनांक २ फेब्रुवारी १९९७ अन्वये कार्यकारी अभियंता, लघु सिंचन क्र. १, जिल्हा परिषद, नागपूर यांना रुपये ९९०९७ एवढा अग्रिम वाहनांचे टायरट्युब खरेदी करण्याकरिता उप अभियंता, यांत्रिकी भुसविंय, नागपूर यांना अदा करण्यात आला होता. सदर अग्रिम समायोजन झाल्याबाबतचे आवश्यक कागदपत्रे ही यांत्रिकी उप विभाग, नागपूर यांचेकडून प्राप्त करून अग्रिम समायोजनाची कार्यवाही करावी लागेल.

**मुद्दा क्र.१६ :** प्रमाणक क्र. ३२९३, दिनांक ८ सप्टेंबर १९९९ अन्वये लघु सिंचाई विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांना टायर ट्युब खरेदी करण्याकरिता अग्रिम रुपये १६१३० प्रदान करण्यात आले आहे असे विभागाने कळविले आहे. त्यानुसार सदर अग्रिमाचे समायोजनाबाबत लघु सिंचन विभाग, जि.प., नागपूर यांनी समायोजनाची कार्यवाही करावी.

निर्देशित करण्यात आलेले अग्रिम हे जवळ जवळ २० ते ४० वर्षे जुने असल्यामुळे अग्रिमाबाबतची कागदपत्रे विभागाला उपलब्ध होत नसल्याचे व सन १९९७ पूर्वी सदर विभागाचे लघुसिंचाई विभाग व ग्रामीण पाणीपुरवठा विभाग असे दोन विभाग पडल्याने तथा सन २०१३ या वर्षी ग्रामीण पाणीपुरवठा व सिंचाई विभागाचे नविन इमारतीत स्थंलातरण झाल्याने अग्रिमबाबतची कागदपत्रे उपलब्ध होत नाहीत असे विभागाचे म्हणणे आहे.

सबब सदर अग्रिमापैकी फार जुने असलेल्या अग्रिमाची वित्तीय नियमानुसार समायोजन तात्काळ करावे लागेल या निष्कर्षाप्रत समिती आलेली आहे. सबब वरील अग्रिमापैकी ज्या अग्रिमाचे समायोजन होऊ शकणार आहे अशा अग्रिमाचे समायोजन करण्यात यावे. सदर अग्रिमाचे समायोजन झाल्याबाबत लेखापरिक्षक स्थानिक निधी, लेखापरिक्षक पथक, नागपूर यांना या संबंधीचा सर्व दस्ताऐवज उपलब्ध करून सदर लेखा आक्षेपाचे संबंधाने पंचायत राज समितीमध्ये घेतलेल्या आक्षेप वगळण्याबाबत विभागाने कार्यवाही करावी असे समितीचे मत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ ऑक्टोबर २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, सदर प्रकरणी दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर रकमेचे स्वरुप पाहून (मोठे व गांभीर्य युक्त) फौजदारी गुन्हा दाखल करावा व या प्रकरणी संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देऊन सदर रक्कम व्याजासह वसूल करण्यासंबंधी योग्य ती कार्यवाही करावी. या समितीच्या निर्देशाच्या अनुषंगाने शासन स्तरावर काय कारवाई केली आहे, अनेक वर्षापासून हा निधी थकित आहे. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, सन १९६३ पासूनच्या या रकमा आहेत. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, पूर्वी या रकमा समायोजित केल्या जात नव्हत्या. यामध्ये कोणतीही अनियमितता झालेली नाही. पण या रकमा निर्लेखित केल्या पाहिजेत. यापैकी बऱ्याच रकमा या अधिकाऱ्यांकडून गाड्यांच्या इंधनासाठी, पेट्रोल किंवा डिझेल खरेदी करण्यासाठी आगाऊ स्वरुपात रकमा घेतल्या जात होत्या. मात्र त्यांची देयके त्या त्या वेळी सादर केली जात नसल्यामुळे या रकमा आहेत.

सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, त्यावेळी अधिकाऱ्यांनी वाहनांवर केलेल्या खर्चाची देयके देऊन ती तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांमार्फत समायोजित करण्यात आली नाहीत. यावर समितीने अशी विचारणा केली की, या ठिकाणी सन १९९७ पासून आतापर्यंत कार्यवाहीच सुरू आहे असे नमूद आहे, सदर प्रकरणी ५८ लाख रुपयांचा ताळमेळ घालायचा आहे. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, दोन तीन लाख रुपये या रक्कमेतून वगळण्यात येतील. मात्र उर्वरित निधी शासनाला वसूल करावाच लागणार आहे. खात्याकडून आलेला निधी वेळच्या वेळी अदा केला पाहिजे. हा निधी संबंधित अधिकाऱ्यांकडून वसूल करणार आहोत. त्या अधिकाऱ्यांना आगाऊ रकमा दिल्या होत्या आणि त्यासंबंधीची देयके त्यांनी सादर करायला हवी होती. एखाद्या अधिकाऱ्याला टायर टयूब बदली करण्यासाठी आगाऊ रक्कम म्हणून २००० रुपये दिले असतात. त्यानुसार ते काम करून त्या रक्कमेचा विनियोगही केला जातो. मात्र त्यासंबंधीची देयके सादर करायला हवी होती अशा स्वरुपाची देयके त्या त्या वेळी कार्यालयास देण्यात आली नसल्यामुळे या रकमा निदर्शनास येत आहेत. एखाद्या खाते प्रमुखाने आगाऊ घेतलेल्या १० हजार रक्कमेचे देयक दिलेले नसेल तर विभाग ती रक्कम संबंधीतांकडून वसूल करण्यात येईल. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, या बाबतीत डीडीओंना अधिकार नाहीत काय, यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, हे अधिकार खाते प्रमुखांना असतात. यावर समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, संचालक स्थानिक निधी लेखा हे सचिवांच्या म्हणण्याशी सहमत आहेत की नाही यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस खुलासा केला की, त्यांनी जर आगाऊ रक्कम घेतली असेल तर ती खर्ची पडते, तो निधी ज्या पद्धतीने जमा होतो. त्यानुसार कार्यवाही झालेली आहे. पण ते हा निधी समायोजित झाल्याचे म्हणत नाहीत. जिल्हा परिषदेकडे जोपर्यंत त्या खर्चाची देयके प्राप्त होत नाहीत तोपर्यंत तो निधी खर्ची पडत नाही.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, याठिकाणी हत्यारे खरेदी, सिमेंट खरेदी आणि ट्यूब व टायर्स खरेदी करणे अशा प्रकारची कामे करण्यासाठी हा निधी अग्रिम स्वरुपात सन १९७७ पासून ते २०१३ पर्यंत घेतल्याचे निदर्शनास येत आहे. या खर्चाची कार्यवाही अद्यापही सुरू आहे, अशी कार्यवाही आणखी किती दिवस सुरू राहणार आहे. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, या तक्त्यामध्ये एकूण २० प्रकरणे दिसतात. त्यातील अग्रिम स्वरुपात दिलेल्या रकमा वसूल करून निर्लेखित करावयाच्या आहेत. नागपूर जिल्हा परिषदेमध्ये ५८ लाख रुपयांचे समायोजन होणे अपेक्षित आहे. आक्षेपात नमूद अनुक्रमांक १ ते ११ व अनुक्रमांक १६ चे अग्रिमाचे समायोजन करण्यात आले असून अनुक्रमांक १२ ते १५ चे अग्रिम निर्लेखित करण्यात आले आहे. उर्वरित अनुक्रमांक १७ व २० बाबत संबंधितांना नोटीस बजाविण्यात आली असून अनुक्रमांक १८ बाबत समायोजनाची कार्यवाही सुरू आहे तसेच अनुक्रमांक १९ च्या बाबतीत निर्लेखनाची कार्यवाही सुरू आहे. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, अशा प्रकारे ९० टक्के केसेसमध्ये वेळच्या वेळी समायोजन केले जात नाही.

समितीने असे मत व्यक्त केले की, या रकमा संबंधिताच्या खात्यामधून समायोजित केल्या पाहिजेत. यासंदर्भात जबाबदारी निश्चित करून योग्य ती कारवाई होणे अपेक्षित होते. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, हत्यारे विकत घेतलेली आहेत, त्याची बिले सादर करून निधी समायोजित केला नाही. या रकमांची जबाबदारीने वसूली केलेली आहे. वसूली केल्यानंतर निदर्शनास आले की, ८० टक्के काम झाले नव्हते. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, संबंधित दोषी अधिकारी कारवाईस पात्र आहेत का, यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, यासंदर्भात निश्चितच निष्काळजीपणा झालेला आहे, हे शासन म्हणून विभागाला मान्य आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, विभागाची मागणी कोणी मान्य केली. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, खातेप्रमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी मागणी मान्य केलेली आहे. अग्रिमाचे समायोजन झाले नाही, यावर समितीने असे मत व्यक्त केले की, संचालकांना पाच हजार रुपयाच्या वर खर्च करण्याचे अधिकार किंवा मंजुरी देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत का, यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस अशी माहिती दिली की, नियम २१०-ब प्रमाणे १००० रुपयाच्या वर अग्रिम पाहिजे असल्यास प्रकल्प व तदानुषंगिक बाबीकरिता ज्या ज्या काही योजना, त्यांची कामे असतील त्यांना सर्वप्रथम प्रशासकीय मंजुरी असली पाहिजे. त्याकरिता संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याची प्रशासकीय मंजुरी असणे आवश्यक आहे. नियम १२८ प्रमाणे प्रकल्पाला प्रशासकीय मंजुरी असणे आवश्यक आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या खात्यामधील रक्कम खर्च करण्याचे अधिकार कोणाला आहेत, यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस विदित केले की, अग्रिम देण्याकरिता संबंधित योजना मंजूर असणे आवश्यक आहे. जर कोणत्याही कामाकरिता सिमेंट खरेदी करायचे असेल तर कामांना मंजुरी असणे आवश्यक आहे. त्याशिवाय जिल्हा परिषदेच्या खात्यामधून निधीचा अग्रिम सक्षम प्राधिकारी यांनाही काढता येत नाही. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, या संदर्भात कोणत्या कामासाठी सिमेंट खरेदी केले होते, याची काही माहिती आहे का, यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, ही प्रकरणे १९८७ ची माहितीमध्ये असेल, ती नस्ती आता शोधून माहिती संकलित करावी लागेल. त्यानंतर त्याप्रमाणे पडताळून वसूली करावी लागेल. अशा प्रकारच्या ८० टक्के केसेसमध्ये हे सर्व पैसे नियोजित कामाकरिता खर्च झालेले असतात, ते पैसे त्याच कामासाठी वापरलेले असतात, परंतु पावत्या विहित कालावधीत सादर न केल्यामुळे सदरहू रकमांचे समायोजन केले गेले नाही.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, नागपूर अंतर्गत निरनिराळ्या योजना, बांधकामे इत्यादी बाबी कार्यान्वित करण्यासाठी ठेकेदार, विभागप्रमुख किंवा कर्मचारी यांना सन १९६२ पासून वेळोवेळी आगाऊ रकमा देण्यात आल्या आहेत. अशा प्रकारे देण्यात आलेल्या रकमांचे संबंधित वर्ष अखेर खर्चाची प्रमाणके व हिशोब देवून नियमितरित्या समायोजन/वसूली करणे आवश्यक होते. परंतु सन २००८-०९ अखेर सुमारे १६,३२,९६८ रुपयांच्या रकमांपैकी केवळ १,५०,००० चे समायोजन/वसूली झालेली होती.

ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडे सन १९७३ पासून प्रलंबित असलेल्या २० प्रकरणांमध्ये ११,३१,४७९ एवढ्या रक्कमेचे अग्रिम समायोजित/ वसूल होणे प्रलंबित होते. विभागीय सचिवांचे साक्षीपर्यंत बहुतांशी अग्रिमांचे समायोजन व निर्लेखन झालेले आहे. परंतु हत्यारे खरेदीतील २०,००० व टायर ट्युब खरेदीतील १६,१३० या अग्रिमांची वसूली अद्याप करण्यात आलेली नाही. तसेच ग्रामीण सद्यस्थितीतील ग्रामीण पाणीपुरवठा विभाग व सन १९९७ पूर्वीचा लघुसिंचाई विभाग देण्यात आलेल्या अग्रिमांचे समायोजन मात्र अद्याप झालेले नाही याबाबत समिती तीव्र खेद व्यक्त करीत आहे. बहुतांश प्रकरणात जुन्या नस्तीच प्राप्त झालेल्या नाहीत तर जेथे नस्ती आहेत तेथे अद्याप समायोजनाची/वसूलीची कारवाई करण्यात आलेली नाही. **लघुसिंचाई विभागातील दिनांक १२ एप्रिल, १९९८ रोजीचे चलन क्रमांक १,६५,२६६ या नुसार अनेक वेगवेगळ्या दिनांकांच्या वेगवेगळ्या अग्रिमांचा भरणा केल्याचे समितीस सांगण्यात आले आहे परंतु सदर चलनाद्वारे कोणत्या अग्रिमांच्या रकमा भरणा करण्यात आल्या आहेत याची खात्री सह संचालक, स्थानिक निधी लेखा, नागपूर यांच्याकडून जिल्हा परिषदेने करून घ्यावी व त्यासंबंधातील लेखा परिक्षकांचा स्वयंस्पष्ट अहवाल घेऊन त्यानुसार वसूलीची कारवाई करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

नागपूर जिल्हा परिषदेकडून प्रलंबित अग्रिमांचे समायोजन करण्याची कार्यवाही सुरू असल्याने जरी सांगण्यात येत असले तरी दिनांक १० डिसेंबर, २०१० च्या परिपत्रकात विशेष योजनाबद्ध मोहिमेचे आयोजन करून सदर अग्रिमे वसूल करण्याच्या सूचना असूनही जिल्हा परिषदेकडे तब्बल रुपये १६ लक्ष या रकमेचे समायोजन/वसूली होणे बाकी होते. जिल्हापरिषदेचा कोणताही कर्मचारी/अधिकारी सेवानिवृत्त होत असताना त्याच्या येणे/देणे ना दाखल्याशिवाय सेवानिवृत्ती वेतन दिले जात नाही ही कार्यपद्धती आहे. तरीही कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन अदा केलेली असून आता त्या कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून अग्रिमांची वसूली करण्यात येत आहे. उक्त नमूद परिपत्रक हे केवळ वैयक्तिक अग्रिमांच्या वसूलीबाबत असून त्यामध्ये खातेनिहाय अग्रिमांबाबत उल्लेख नाही असे समितीचे मत आहे. **एखादा कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापूर्वी जे " ना देय " प्रमाणपत्र घेणे आवश्यक असते ते ना देय प्रमाणपत्र संबंधितांनी सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून घेतले नाही व अग्रिम घेणाऱ्या कर्मचाऱ्यास सेवानिवृत्त होऊ देण्यास मदतच केली या प्रकरणी ना देय प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर देखील कारवाई करण्यात यावी तसेच भविष्यात अग्रिम रकमेची वसूली केल्यानंतरच निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यास/व्यक्तीस ना देय प्रमाणपत्र देण्याबाबत विभागाने सत्वर कारवाई करावी अशी समितीची शिफारस आहे.**

सदरहू आक्षेपात अग्रिमांच्या समायोजन/ वसूलीबाबत जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. संबंधित कर्मचारी/अधिकाऱ्यांने विभागांतर्गत अग्रिमांचा विनियोग त्यांच्या कामासाठी करून खर्चाची प्रमाणके व हिशोब देवून त्याच्या नोंदी नोंदवहीमध्ये अचूक ठेवल्या असत्या व त्या त्या वर्षाची अग्रिमे त्या त्या वर्षी वेळेवर समायोजित झाली असती, तसेच लेखा संहितेतील नियमाप्रमाणे पूर्वीच्या अग्रिमांचे समायोजन/वसूली झाल्याखेरीज दुसऱ्यांदा अग्रिम देवू नये या नियमाचे पालन झाले असते तर अशा प्रकारचा लेखा आक्षेप समितीसमोर आला नसता. **एका जिल्हापरिषदेचा जवळपास १६ लक्ष रुपयांचा निधी नाहक थकित अग्रिमात गुंतला नसता असे समितीचे ठाम मत आहे. त्यामुळे प्रकरण निहाय थकीत अग्रिमांच्या प्रकरणी सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर नियमानुसार कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यांत समितीस पाठविण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण सात

## जिल्हा परिषद, नागपूर

### जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या बैठक व्यवस्थेकरिता डेस्क बेंच (स्टील) खरेदीबाबत

**(परिच्छेद ३.१३१/४) (सन २०११-२०१२)**

जिल्हा परिषद, नागपूर यांनी वाढीव उपकरातून शिक्षण विभागामार्फत जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचे बैठक व्यवस्थेकरिता डेस्क बेंच (स्टील) खरेदी करिता रक्कम ४३,६२,७२० रुपये खर्च नोंदविलेला असून याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) जिल्हा परिषद स्थायी समितीने २ सीटरचे ८०३ नग व ३ सीटरचे ८०४ नग असे एकूण १६०७ डयुल डेस्क बेंच खरेदीकरिता मंजुरी असताना शिक्षण विभागाने फक्त ३ सीटर १४६४ नग डेस्कबेंच खरेदी केले असल्यामुळे ६६० नग ३ सिटर डेस्क बेंचची खरेदी नियमबाहय ठरते, त्यामुळे यावर केलेला खर्च रुपये ९,६६,२४० वसूल होणे आवश्यक आहे.

(२) प्रशासकीय मान्यतेच्या पत्रात थ्री सिटर डेस्कबेंचचा दर खर्च रुपये २,९७० नमूद आहे. परंतु प्रत्यक्षात प्रदान रु. २,९८० प्रमाणे केल्याचे दिसते, त्यामुळे १४६४ नग डेस्क बेंच करिता रुपये १० प्रमाणे १४,६४० चे जादा प्रदान झालेले आहे. १४६४ पैकी ८०४ थ्री सिटर डेस्क बेंचकरिता प्रशासकीय मंजुरी आढळून आली. उर्वरित ६६० करिता प्रशासकीय मंजुरी नसल्यामुळे रक्कम रुपये ६,०८० जादा प्रदान झालेले आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, नागपूर तर्फे प्राथमिक शाळांकरिता डेक्स बेंचची खरेदी महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित, नागपूर यांचेकडून करण्यात आलेली असून सदर महामंडळ महाराष्ट्र शासनाचा उपक्रम आहे.

(१) जिल्हा परिषद स्थायी समिती सभा दिनांक ८ फेब्रुवारी २०११ मध्ये डेक्स बेंच खरेदी करिता चर्चेत ठेवण्यात आलेल्या विषयानुसार टू सीटर व थ्री सीटर डेक्स बेंचच्या दरानुसार खरेदीबाबत चर्चा करण्यात आली. स्थायी समितीने ठराव क्रमांक १० अन्वये सेस फंड योजना सन २०१०-११ मध्ये महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाचे दरकरारावर एकूण रु. ४३,६५,००० चे डेस्कबेंच खरेदी खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. यानंतर जिल्हा परिषद शिक्षण समिती दिनांक २२ मार्च २०११ मधील ठराव क्रमांक ९ अन्वये दरकरारातील अनुक्रमांक १४ वरील नमूद प्री लॅमिनेटेड टॉप थ्री सीटर स्टील डयुएल डेस्क बेंचचा नमुना समितीने मंजूर केल्यामुळे सदर साहित्याची खरेदी करण्याचे ठरविण्यात आले. या कार्यालयाचे आदेश क्रमांक २९३८, दिनांक ३१ मार्च २०११ च्या पुरवठा आदेशान्वये थ्री सीटर डेस्कबेंच १४६४ नग प्रति नग रु. २९८० प्रमाणे रु. ४३,६२,७२० ची खरेदी केलेली आहे, त्यामुळे ही खरेदी नियमाबाहय झालेली नाही.

(२) स्थायी समिती सभा दिनांक ८ फेब्रुवारी २०११ मधील ठराव क्रमांक १० नुसार त्यांचे अधिकारात खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे व त्यामध्ये दर करारानुसार खरेदी करावी असे नमूद आहे. शिक्षण समिती दि. २२ मार्च २०११ मधील ठराव क्रमांक ९ अन्वये थ्री सीटर डेस्क बेंचचा नमुना शिक्षण समितीने सर्वानुमते मंजूर केल्यामुळे स्थायी समितीव्दारा मान्य केलेल्या खर्चाच्या मर्यादेत वरील खरेदी करण्यात आलेली आहे. शासन दरकरारातील दर हा रु. २,९८० इतका असल्याने कोणतेही अतिप्रदान झालेले नाही.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २९ सप्टेंबर २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, टू सीटर ऐवजी थ्री सीटर डेस्क (बेंच) खरेदीबाबतचा समितीचा ठराव लेखापरिक्षणाच्या वेळी का दाखविण्यात आला नाही, एकूण किती नग थ्री सीटर डेस्क (बेंच) करिता प्रशासकीय मान्यता घेण्यात आली, साहित्य तपासणीबाबतचा चाचणी अहवाल केव्हा प्राप्त झाला, बेंचचा प्रत्यक्ष पुरवठा झालेला नसताना व पुरवठापूर्व तपासणी अहवाल प्राप्त नसताना पुरवठादारास कोणत्या प्राधिकारात प्रदान केले, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, स्थायी समितीने फक्त एकूण रकमेला मंजुरी दिली होती. किती सीटर बेंच घ्यायचे याबाबत स्थायी समितीने निर्णय घेतला नव्हता. शिक्षण समितीने नंतरच्या काळात ३ सीटर बेंचवर जास्त विद्यार्थी बसू शकतात म्हणून ३ सीटर बेंच घेण्याचा निर्णय घेतला. यावर समितीने अशी विचारणा केली की, परिच्छेदातील अन्य तपशिलात असे म्हटले आहे की, खर्च रुपये ४३,६२,७२० झाला, तांत्रिक मंजुरी दिनांक ३१ जानेवारी २०११ रोजी घेण्यात आली. प्रशासकीय मान्यता रुपये ४३,६५,००० इतक्या रकमेस दिनांक ०८ फेब्रुवारी २०११ रोजी घेण्यात आली. पुरवठाधारकाला दिनांक ३१ मार्च २०१२ ला प्रदान केले, तोपर्यंत प्री डिलिव्हरी सॅम्पल रिपोर्ट सादर केला नव्हता आणि साहित्यही प्राप्त झाले नव्हते. तीनही प्रकारच्या डेस्कचा पुरवठा कोणत्या दिनांकास झाला याची माहिती देखील लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नव्हती. ही अनियमितता नाही का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, दिनांक ३१ मार्च २०११ ला पुरवठा आदेश दिला आणि त्याच दिवशी पुरवठा झाला असे दाखविले आहे.

वित्तीय वर्षाचा निधी खर्ची टाकण्याच्या दृष्टीने तसे केले आहे. रक्कम पुरवठा झाल्यानंतरच दिली आहे. फक्त खर्च त्यावर्षी दाखविण्यासाठी दिनांक ३१ मार्च २०११ अशी तारीख नमूद आहे. पुरवठा झाल्यानंतर अगोदरची तारीख नमूद केली आहे. वित्तीय वर्षाचा निधी व्यपगत होऊ नये म्हणून असे केले आहे. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी अशी विचारणा केली की, प्रशासकीय मान्यता घेतली त्यामध्ये २ किंवा ३ सीटर बेंच घ्यावे असे स्थायी समितीमध्ये सांगण्यात आले. त्याप्रमाणे स्थायी समितीने फक्त रुपये ४३,६२,७२० च्या खरेदीला मान्यता दिली. शिक्षण समितीने ३ सीटर बेंच घ्यावे असा ठराव केला आणि त्याप्रमाणे आदेश दिले. ठरावाच्या टिप्पणीमध्ये त्याचा उल्लेख आहे. स्थायी समितीमध्ये फक्त खर्चालाच मान्यता दिली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, साहित्याबाबतचा तपासणी चाचणी अहवाल केव्हा प्राप्त झाला, बेंचचा प्रत्यक्ष पुरवठा झालेला नसताना व पुरवठापूर्व तपासणी अहवाल प्राप्त नसताना पुरवठादारास कोणत्या प्राधिकारात प्रदान केले हे दोन्ही गंभीर प्रश्न आहेत याची उत्तरे दिलेली नाहीत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, पुरवठा झाल्यानंतरच प्रदान केले आहे. दिनांक ३१ मार्च २०११ यासाठी नमूद केले आहे की, वित्तीय वर्षाचा निधी व्यपगत होऊ नये. यावर समितीने अशी विचारणा केली की, ही बाब लेखापरिक्षणास का दाखविली नाही, सर्व बाबी लेखापरिक्षणाच्या वेळी दाखविल्या पाहिजे होत्या. लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत तर समिती ही कागदपत्रे कशी काय ग्राह्य धरणार, या प्रकरणी अनियमितता होत असल्याचे दिसत आहे. दिनांक ३१ मे २०११ ला अहवाल आला आणि दिनांक ३१ मार्च २०११ ला प्रदान केले. अहवाल येण्याच्या अगोदर प्रदान कसे काय केले. संबंधित तत्कालीन अधिकारी कोण होते, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, दिनांक ३१ मार्च २०११ या तारखेचाच धनादेश काढला आहे. मात्र तो दिनांक ३१ मे २०११ नंतरच देण्यात आला आहे. वित्तीय वर्षाचा निधी व्यपगत होऊ नये म्हणून असे केले आहे, ही अनियमितता मान्य करतो. या प्रकरणी तत्कालीन अधिकाऱ्यांची ही जबाबदारी होती. संबंधित तत्कालीन अधिकारी श्री. सोमेश्वर नेताम होते. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, अनौपचारिक चर्चेच्या वेळी देखील संबंधितांच्या नावाचा उल्लेख झाला होता. तत्कालीन संबंधित अधिकाऱ्यांना बोलविले नाही का, यावर प्राथमिक शिक्षण अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, संबंधित अधिकारी सेवानिवृत्त झाले असून सध्या रुग्णालयात दाखल आहेत. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्हा परिषदेकडून ४३ लाख रुपयांची रक्कम कोणतीही चौकशी न करता दिली जाते हे योग्य नाही. कोणत्याही प्रकारचे सॅम्पल नसताना इतक्या मोठ्या रकमांचा व्यवहार केला जात आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी अनियमितता झाली आहे हे मान्य करीत आहेत. परंतु त्याचबरोबर हे गंभीर नाही असेही म्हणत आहेत. पुरवठादाराने पुरवठा केला. सदर साहित्य वापरल्याच्या संदर्भातील युटिलायझेशन सर्टिफिकेट शाळेने सादर केले आहे का हा देखील महत्त्वाचा मुद्दा आहे. जिल्हा परिषदेकडे या संदर्भातील चलन आहे का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, तालुका स्तरावर पुरवठा केला जातो. साहित्य मिळाल्याच्या संदर्भातील नोंद आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेकडे चाचणी अहवाल आला नाही. वेळेवर पुरवठा झाला नाही, या सर्व बाबी होत असताना धनादेश का काढला, फंड केव्हा उपलब्ध झाला, कॅशबुकमध्ये नोंद आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, अनुदान व्यपगत झाले असते म्हणून ही कार्यवाही करण्यात आली. कॅशबुकमध्ये दिनांक २८ फेब्रुवारी २०११ रोजीची नोंद आहे.

समितीने अशी विचारणा केली की, एखादी वस्तू घ्यावयाची असल्यास चाचणी अहवाल मागविता. चाचणी अहवाल ३१ मे २०११ रोजी प्राप्त झाला, त्यासाठी पैशाची तरतूद करून ठेवली होती. जर पुरवठादाराने सदोष माल पाठविला असता तर काय केले असते, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, जर पुरवठादाराने सदोष माल पाठविला असता तर त्यांचे पेमेंट रद्द केले असते. अगोदर धनादेश काढला नसता तर ती रक्कम निर्लेखित झाली असती. दिनांक ३१ मार्च २०११ रोजीचे डिलिव्हरी चलन आहे. दिनांक ३१ मार्च २०११ रोजी ऑर्डर दिली. दिनांक ३१ मार्च २०१२ रोजी पुरवठा झाला. दिनांक ३१ मे २०११ रोजी चाचणी अहवाल आला. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी अशी माहिती दिली की, सन २०१०-२०११ मध्ये २५ लाख रुपयांचे अंदाजपत्रक होते. ऑक्टोबर, २०१२ मध्ये पेमेंट केलेले आहे. सुधारित अंदाजपत्रक करून खरेदी करता आली असती. त्या वर्षात ४३ लाखाचे एकही अंदाजपत्रक नाही. यावर समितीने अशी विचारणा केली की, रक्कम लॅप्स होऊ नये म्हणून चाचणी अहवाल आला नसताना पेमेंट केले. या प्रकरणी जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश द्यावेत जेणेकरून अशा गोष्टींना आळा बसेल. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, मार्च महिन्यामध्ये खरेदी केलेली आहे. दिनांक ८ फेब्रुवारी २०११ रोजीच्या स्थायी समितीमध्ये बेंच खरेदी करण्याचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे. दिनांक ३१ मार्च २०११ रोजी मागणी केली. दिनांक ३१ मार्च २०१२ रोजी मालाचा पुरवठा झाला आणि मे महिन्यात चाचणी अहवाल आला.

समितीने असे निदेश दिले की, बैठकीला तत्कालीन अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात येऊनही जे अधिकारी उपस्थित राहिले नाहीत किंवा ज्यांनी अनुपस्थितीबाबत काहीही कळविलेले नाही त्यांच्या सेवा पुस्तिकेमध्ये नोंद घेण्यात यावी व त्यांची एक वेतनवाढ रोखण्यात यावी. लेखा विभागाकडून सतत ७ वेळा माहिती मागवूनही देण्यात आली नाही. लेखा आक्षेप आल्यानंतर ज्या विभागप्रमुखांनी माहिती दिली नाही अशा अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी. लेखा आक्षेप निघाल्यानंतर जे अधिकारी माहिती देत नाहीत त्यांच्यावर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अनुसार २५ हजार रुपयांची दंडात्मक कारवाई करावी. या प्रकरणी चौकशी करून त्याचा अहवाल समितीला एक महिन्यात पाठवावा, संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कारवाई प्रस्तावित करावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

(१) टू सिटर ऐवजी थ्री सिटर डेक्स (बेंच) खरेदी प्रकरणी त्यांचा पुरवठा तपासणी अहवाल प्राप्त नसताना तसेच त्यांचा प्रत्यक्ष पुरवठा झालेला नसतानाही त्या पुरवठादाराच्या नावे दिनांक ३१ मार्च २०११ रोजी धनादेश काढल्या प्रकरणी चौकशी करून समितीने निर्देश दिल्यानुसार या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, नियमानुसार किती जणांवर कारवाई केली, नसल्यास त्याची कारणे काय ? दोषी अधिकाऱ्यांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला देण्यात यावी ?

(२) महाराष्ट्र राज्य लघु उद्योग मंडळाला माल पुरवठा करण्याचे आदेश कधी दिले, त्यांनी सदरच्या मालाचा पुरवठा केव्हा केला ? विलंबाने पुरवठा केला असल्यास त्या संदर्भात जबाबदारी निश्चित केली आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय ?

(३) या प्रकरणी समितीने संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषींविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे निदेश देऊन संपूर्ण चौकशी अहवाल समितीस पाठवून देण्याचे निर्देश देऊनही या प्रकरणी समितीला चौकशी अहवाल का पाठवला नाही ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

(१) जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या बैठक व्यवस्थेकरिता थ्री सिटर डेस्क बेंच खरेदी करण्यात आले. याकरिता पुरवठाधारकाने दिनांक ३१ मार्च २०११ रोजी साहित्य पुरवठा केलेला असल्याने पुरवठाधारकाचे देयक अनुदान व्यपगत होऊ नये म्हणून पारित करण्यात आले, पुरवठा आदेशातील परिशिष्ट " अ " मध्ये दिलेल्या शर्ती व अटीतील मुद्दा क्र. ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे तपासणी अहवाल प्राप्त झाल्यावरच पुरवठाधारकाला धनादेश देण्यात आला. पुरवठा धारकाकडून टेस्ट रिपोर्ट नागपूर यांचे पत्र क्र. शासकीय तंत्रनिकेतन २१, दि. ४ मे २०११ नुसार प्राप्त झाला. त्यानुसार संबंधितास रु. ४३,६२,७२० चा धनादेश/क्र. ३९४५२९, दि. २४ ऑक्टोबर २०११ रोजी देण्यात आलेला आहे त्याबाबतची पावतीसुद्धा घेण्यात आली आहे.

सदर खरेदी महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळाकडून करण्यात आलेली असून सदर महामंडळ शासनाचा उपक्रम आहे. खरेदी करताना नियमानुसार आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेण्यात, खरेदी प्रक्रिया पुरवठा आदेशातील शर्ती व अटीला अनुसरुन झालेली असल्याने आर्थिक गैरव्यवहार किंवा शासनाचे नुकसान झालेले नाही, त्यामुळे सदर प्रकरणी तत्कालीन अधिकारी यांचेवर कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(२) सदर खरेदीकरिता महाराष्ट्र राज्य लघु उद्योग महामंडळ, यांचेकडे दिनांक १० डिसेंबर २०१० नुसार दरकरार उपलब्ध होता. सदर खरेदी बाबत उपलब्ध तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी डेस्क बेंच खरेदीला, दिनांक ३१ जानेवारी २०१० रोजी तांत्रिक मान्यता प्रदान केली. या खरेदीसाठी स्थायी समिती सभेने, दिनांक ८ फेब्रुवारी २०११ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली. दिनांक ३१ मार्च २०११ रोजी पुरवठा आदेश देण्यात आला. यांनी दिनांक ३१ मार्च २०११ रोजीच साहित्याचा पुरवठा केला, त्यामुळे विलंबाने पुरवठा झालेला नाही.

(३) या प्रकरणी संपूर्ण चौकशी करण्यात आलेली असून चौकशी अहवाल दिनांक २७ जानेवारी २०१६ ला ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथे सादर करण्यात आला असून सदर अहवालानुसार खरेदी प्रक्रिया पुरवठा आदेशातील शर्ती व अटीला अनुसरून झालेली असल्याने आर्थिक गैरव्यवहार किंवा शासनाचे नुकसान झालेले नाही, त्यामुळे सदर प्रकरणी जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात मंत्रालयीन विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

**शालेय शिक्षण विभाग :**

जिल्हा परिषद, नागपूर यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

**चौकशी अहवाल**

जिल्हा परिषद नागपूर यांनी वाढीव उपकरातून विभागामार्फत जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचे बैठक व्यवस्थेकरिता डेस्क बेंच (स्टील) खरेदी करिता रक्कम १३,६२,७२० रुपये खर्च नोंदविलेला असून याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

जिल्हा परिषद स्थायी समिती सभा, दिनांक ८ फेब्रुवारी २०११ मध्ये डेस्क बेंच खरेदीकरिता चर्चेत ठेवण्यात आलेल्या विषयानुसार टू सीटर व थ्री सीटर डेस्क बेंचच्या दरानुसार खरेदीबाबत चर्चा करण्यात आली. स्थायी समितीने ठराव क्रमांक १० अन्वये सेस फंड योजना सन २०११-१२ मध्ये महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाचे दरकरारावर एकूण रु. ४३,६५,००० चे डेस्क बेंच खरेदी खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. यानंतर जिल्हा परिषद शिक्षण समिती दिनांक २२ मार्च २०११ मधील ठराव क्र. ९ अन्वये दरकरारातील अनु. क्र. १४ वरील नमूद प्री लॅमिनेटेड टॉप थ्री सिटर स्टील ड्यूएल डेस्क बेंचचा नमुना समितीने मंजूर केल्यामुळे सदर साहित्याची खरेदी करण्याचे ठरविण्यात आले. कार्यालयाचे आदेश

क्र. २९३८, दिनांक ३१ मार्च २०११ च्या पुरवठा आदेशान्वये थ्री सिटर डेस्क बेंच १४६४ नग प्रति नग २९८० प्रमाणे रु. ४३,६२,७२० ची खरेदी केलेली आहे. शासन दरकरारातील दर रु. २९८० इतका असल्याने त्यादरानुसार पुरवठादारास प्रदान करण्यात आल्याने अतिप्रदान झालेले नाही. तसेच २ सीटर चे ८०३ नग व ३ सीटर चे ८०४ नग असे एकूण १६०७ खरेदी केली असती तर ४०१८ विद्यार्थी बैठक व्यवस्था झाली असती परंतु ३ सीटर १४६४ नग डेस्क बेंच खरेदी केल्यामुळे ४३९२ विद्यार्थी बैठक व्यवस्था झाली असल्याने ३७४ अतिरिक्त विद्यार्थी बैठक व्यवस्था झालेली आहे.

लेखा परिक्षणाचे वेळी आवश्यक माहिती व अभिलेखे दाखविण्यात आलेले आहेत. ऑडीट विभागाकडून मागणी केल्याप्रमाणे माहिती व रेकॉर्ड दाखविलेले आहे. सन २०११-१२ च्या लेखा परिक्षण अहवालात परिच्छेद ४ मध्ये सदर बाब नमूद नाही. निधी व्यपगत होईल म्हणून ठेकेदाराचा धनादेश ३१ मार्च रोजी अगोदर काढून ठेवण्यात येतो. या संदर्भात चौकशी केली असता सन २०११-१२ मध्ये जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांकरिता डेस्क बेंच खरेदी करण्यात आले होते. सदर योजना जिल्हा परिषद सेस फंडातील असून, सन २०११-१२ या आर्थिक वर्षातील होती. त्यामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक गरज लक्षात घेता जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांकरिता डेस्क बेंच खरेदी करण्यात आले, तसेच पुरवठा धारकाने सदर साहित्य दिनांक ३१ मार्च २०११ रोजी पुरवठा केल्यानुसार सन २०१०-११ च्या तरतुदीतून जिल्हा परिषद स्थायी समितीने दिनांक २ जानेवारी २०११ रोजीच्या सभेत ठराव क्रमांक ७ (१०) नुसार सदर तरतूद सन २०११-१२ मध्ये खर्चास मंजुरी प्रदान केली. तथापि पुरवठा आदेश दिनांक ३१ मार्च २०११ परिशिष्ट “ अ ” शर्ती व अटी मध्ये मुद्दा क्रमांक ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे तपासणी अहवाल प्राप्त झाल्यावरच देयकाच्या शोधनाचा धनादेश पुरवठाधारकाला देण्यात आलेला आहे. पुरवठादाराकडून तपासणी अहवाल दिनांक ३ मे २०११ रोजी प्राप्त झाल्यावरच दिनांक ३१ मार्च २०११ रोजी धनादेश तयार करण्यात आला प्रत्यक्ष माल पुरवठा झाल्याबरोबर दिनांक ३० मार्च २०११ ला धनादेश तयार करण्यात आला नव्हता तर दिनांक ३ मे २०११ या तारखेनंतरच दिनांक ३१ मार्च २०११ रोजी धनादेश तयार करण्यात आला. या प्रकरणी पुरवठा आदेशातील शर्ती व अटीनुसार खरेदी प्रक्रिया झालेली आहे.

सदर खरेदी महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळाकडून करण्यात आलेली असून सदर महामंडळ शासनाचा उपक्रम आहे. खरेदी करताना नियमानुसार आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेण्यात आल्याचे दिसून येते. खरेदी प्रक्रिया पुरवठा आदेशातील शर्ती व अटीला अनुसरुन झालेली असल्याने आर्थिक गैरव्यवहार किंवा शासनाचे नुकसान झालेले नाही, तथापि आर्थिक वर्षाच्या शेवटी खरेदी प्रक्रिया राबविण्यात आल्याने तांत्रिक अडचणी आल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर प्रकरणी जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, टू सिटर ऐवजी थ्री सिटर डेक्स (बेंच) खरेदी प्रकरणी पुरवठा तपासणी अहवाल प्राप्त नसताना तसेच प्रत्यक्ष पुरवठा झालेला नसतानाही पुरवठादाराच्या नावे दिनांक ३१ मार्च २०११ रोजी धनादेश काढल्या प्रकरणी चौकशी करून समितीने निर्देश दिल्यानुसार कोणती चौकशी केली आहे, त्यात काय आढळून आले, नियमानुसार किती जणांवर कारवाई केली, नसल्यास त्याची कारणे काय, दोषी अधिकाऱ्यांवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला देण्यात यावा. यावर सहसचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, या संदर्भात चौकशी करण्यात आलेली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षण अधिकाऱ्यांनी एकत्रित चौकशी अहवाल सादर केलेला आहे. या संदर्भात स्थायी समिती व शिक्षण समितीच्या परवानगीने टू सिटर व थ्री सिटर डेक्स बेंच खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता, त्याकरिता ४३,६२,००० रुपयांचे खरेदी आदेश होते. त्याचा लाभ जिल्ह्यातील १५६२ शाळांना मिळणार होता. याबाबतचे खरेदी आदेश दिनांक ३१ मार्च २०११ रोजी महाराष्ट्र राज्य लघु उद्योग मंडळाला देण्यात आले होते. तथापि, खरेदी आदेशासोबत जे आवश्यक फंड होते त्याकरिता दिनांक ३१ मार्च, २०११ रोजीचा धनादेश तयार ठेवण्यात आला होता परंतु तो त्याच दिवशी वितरित करण्यात आलेला नाही. या संदर्भातील पुरवठयाचे चाचणी अहवाल घेण्यात आलेले असून ते दिनांक ३ मे, २०११ रोजी प्राप्त झालेले आहेत. सर्व शाळांना याचा पुरवठा प्राप्त झालेला आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, प्रत्यक्ष पुरवठा न करताच त्या एजन्सीच्या नावाने धनादेश कसा काय वठवण्यात आला, यावर सहसचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, पुरवठा झाल्यानंतरच धनादेश दिला यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेला प्राप्त झालेला निधी २ वर्षापर्यंत खर्च करता येतो. जिल्हा परिषदेने पुरवठा आदेश न देता, धनादेश देण्याचे कारण असे दिले आहे की, पुरवठाधारकाचे देयक अनुदान व्यपगत होऊ नये याकरिता धनादेश दिला, ही गंभीर बाब आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांनी समितीस विदित केले की, यामध्ये तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी चौकशी केलेली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हापरिषदेची चौकशी करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नाहीत. शासनाने या प्रकरणाची चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दर्जाच्या किंवा त्यांच्यापेक्षा अधिक दर्जाच्या अधिकाऱ्यांकडून केली पाहिजे होती. यावर सहसचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, महाराष्ट्र राज्य लघु उद्योग मंडळाकडून ही खरेदी झालेली आहे.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, शालेय शिक्षण विभागाच्या सर्व योजनांना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालन अधिकारी प्रशासकीय मान्यता देतात. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या विभागावर आक्षेप आला असताना सचिव त्यांच्याकडूनच त्याबाबतचा चौकशी अहवाल मागवितात, जिल्हा परिषदांनी पुरवठा आदेश न देता धनादेश कसा वठवला या आक्षेपावर " निधी व्यपगत होऊ नये " असे उत्तर देण्यात आलेले आहे, मात्र यांना २-२ वर्षे खर्च करण्यास परवानगी असते. यावर सहसचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, दिनांक ३१ मार्च, २०११ रोजी वर्कऑर्डर देण्यात आली. धनादेश दिनांक ३१ मार्च, २०११ रोजीचा होता मात्र तो त्यांनी दिनांक २४ ऑक्टोबर, २०११ रोजी पुरवठा पूर्ण झाल्यानंतर वितरित केला. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेने उत्तरात " निधी व्यपगत होऊ नये " हे कारण नमूद केले आहे. मात्र या प्रकरणामध्ये आक्षेपच असा आहे की, पुरवठा आदेश झालेला नसतानाही जिल्हा परिषदेने धनादेश वठविला आहे. यावर सहसचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीला विदित केले की, दिनांक ३१ मार्च, २०११ रोजी पुरवठा आदेश देण्यात आला होता. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेने ३१ मार्च, २०११ रोजी धनादेश दिला व ३१ मार्चलाच साहित्याचे वाटप झाल्याचे दर्शविले आहे. एका दिवसात हे सर्व कसे शक्य झाले. याबाबतच्या कागदपत्रांमध्ये त्रुटी आहेत काय, हा निधी कोणत्या लेखा शिर्षाखाली होता, तो जिल्हा नियोजन समितीचा होता की, राज्य शासनाचा होता, कोणत्या वर्षाचा होता, तो जिल्हानिधी होता काय, याची बाबनिहाय सविस्तर माहिती द्यावी यावर सहसचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, सदरहू निधी हा जिल्हा परिषदेच्या सेस फंडाचा होता. यावर समितीने पुढे विचारणा केली की, तो निधी खर्च करण्याची जिल्हा परिषदेला जी २ वर्षांची मुदत दिली होती, ती दिनांक ३१ मार्च, २०११ रोजी संपत होती काय, यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, यामध्ये मोठी चूक झालेली आहे. मात्र बजेट लॅप्स झाले तर पुढच्या वर्षाची सुरूवातीची शिल्लक वाढली असती व जुलै-ऑगस्ट महिन्यामध्ये रिॲप्रोप्रिएशन करून ते करता आले असते. यामध्ये चूक आहे. हा निधी जरी शासनाचा नसला तरीही यामध्ये अनियमितता आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारचा वाद नाही. त्यामध्येही असे करायला नको ही बाब शासनाकडे पाठवून त्या निधीच्या खर्चासाठी एक्सटेन्शन घेतले पाहिजे होते. विभाग याबाबत काही मत व्यक्त करत नाही मात्र या प्रकरणाची जी चौकशी केली, त्यामध्ये असे आढळून आले की, माल पोहोचला होता व त्याची गुणवत्ता देखील होती. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सांगितले आहे की, यामध्ये अपहार नाही पण मोठी अनियमितता आहे याबाबत कोणत्याही प्रकारचे दुमत नाही.

समितीने असे मत व्यक्त केले की, खातेप्रमुखांनी पुरवठा आदेशासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे नस्ती पाठविल्यानंतर त्यांनी त्या नस्तीवर सही कशी केली, राज्य सरकारचे कार्यालय प्रमुख म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नियुक्ती केलेली आहे. सर्व खाते प्रमुखांचे निरीक्षण करण्याचे पूर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत. असे असताना खातेप्रमुख चुकीची नस्ती पाठवितात व मुख्य कार्यकारी अधिकारी त्यावर सही करतात, यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, विभाग डिफेन्ड करू शकत नाही कारण हे योग्य नाही, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ३१ मार्च रोजी कामाचा व्याप असतो. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ३१ मार्चला कोणती कामे असतात, त्यांच्याकडे बिले जातात काय, त्यांच्याकडे तर कोणतीही बिले जात नाहीत. यावर ग्राम विकास विभाग यांनी समितीला विदित केले की, विभाग याबाबत डिफेन्ड करू शकत नाही. हे योग्य नाही. परंतु त्यांनी प्रत्यक्षात धनादेश कधी दिला हे यावरून कळते की, चेक त्यानंतरच बँकेतून रिअलाईज झाला. यावर समितीने अशी विचारणा केली की, या प्रकरणामध्ये जो कोणी पुरवठादार आहे त्याच्याकडून गैरव्यवहार झाला आहे. कारण निधी व्यपगत होत नव्हता. तो पुढच्या वर्षामध्ये कव्हर करता आला असता. व्यवहार झाल्याशिवाय पुरवठा आदेश होऊ शकत नाही, हा मोठा गैरव्यवहार आहे. यावर सचिव, ग्राम विकास यांनी समितीस विदित केले की, पुरवठा झाल्यानंतर बँकेतून पैसे निघाले याचा अर्थ यामध्ये गैरव्यवहार दिसत नाही. महाराष्ट्र राज्य लघु उद्योग मंडळाकडून ते घेतलेले आहे. यामध्ये अपहार होण्याची शक्यता नाही, परंतु मोठी अनियमितता आहे. या प्रकरणामध्ये सेस फंड असल्याने तो व्यपगत होऊ नये याकरिता त्याला मुदतवाढ मिळावे यासाठी प्रयत्न करता येत होता मात्र तसे न केल्याने हे प्रकरण उद्‌भवले आहे. यामध्ये फार मोठी अनियमितता झालेली आहे.

समितीने निदेश दिले की, यापुढे अशा गोष्टी घडणार नाहीत, याकरिता सचिव म्हणून सर्व जिल्हापरिषदांना निदेश देणे गरजेचे आहे. यामध्ये अफरातफर झाली, भ्रष्टाचार झाला, असा विषय नाही. असे प्रकार यापुढे होणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे. विभागाने दिलेल्या ज्ञापनामध्ये असे नमूद केलेले आहे की, खरेदी प्रक्रिया पुरवठा आदेशातील शर्ती व अटीला अनुसरून झालेला असल्याने आर्थिक गैरव्यवहार किंवा शासनाचे नुकसान झालेले नाही. त्यामुळे सदर प्रकरणी तत्कालीन अधिकारी यांचेवर कार्यवाही करण्यात आलेली नाही, विभाग त्यांच्याशी सहमत आहेत. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, चूक झाली असेल तर विभाग क्लिअर करेल, परंतु प्रशासकीय पद्धतीने मोठ्या प्रमाणात अनियमितता आहे. यामध्ये गैरव्यवहार नाही परंतु अनियमितता दिसत आहे. ही फोर्जरी आहे कारण पेमेंट झाले ते पुरवठा आदेश झाल्यावर पुरवठा केल्यावर मात्र धनादेश अगोदरच वठला.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, पुरवठा झाल्यावर धनादेश वठला. परंतु पुरवठादाराच्या नावाने चेक तर अगोदरच वठवला गेला, पुरवठा करायच्या आधीच त्याला पैसे मिळाले. त्याने पुरवठा केला नसताना तरीही तो जिल्हापरिषदेकडे देयकासंबंधी दावा करण्यास पात्र होता. त्यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीला खुलासा केला की, जिल्हापरिषद किंवा महानगरपालिकेत कधी कधी ३१ मार्चला बजेट लॅप्स

होते. ३१ मार्च रोजी चेक काढण्याचे कारण म्हणजे पैसे लॅप्स होण्याची भिती होती. ३१ मार्चला चेक काढून ठेवला आणि तो एप्रिल महिन्यामध्ये दिला. यावर समितीने पुढे विचारणा केली की, हे चूक आहे. जिल्हापरिषदेमध्ये ते ३१ जुलैपर्यंत चालवितात मात्र कोणीही धनादेश बॅकडेटमध्ये वठवून ठेवत नाही. बॅकडेटमध्ये कामकाज सुरू राहते. जिल्हापरिषदेच्या वित्त लेखा अधिकारी यांनी याबाबत सांगावे. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीला विदित केले की, धनादेश नंबर लिहून ठेवला मात्र सही नंतरच केली असेल. यावर समितीने पुढे विचारणा केली की, बांधकामाचे बिल गेले तर तो धनादेश वठवून ठेवतात काय, यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, विभाग यामध्ये डिफेन्ड करीत नाही. मात्र पुरवठा अधिकाऱ्यांनी हे गैरहेतूने केले याची शक्यता वाटत नाही. समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, ते आर्थिक वर्ष जुलै महिन्यापर्यंत चालवतात. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, ती देखील अनियमितता आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, यामध्ये अनियमितता असेल तर ऑनलाईन संकेतस्थळ १२.०० वाजता बंद करावे. याबाबत लेखा व वित्त अधिकाऱ्यांनी सांगावे. यावर लेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, ६ एप्रिलपर्यंत ते चालतात. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीला माहिती दिली की, अधिकारी अशा गोष्टी कोणत्याही गैरहेतूने तर कधी कधी प्रॅक्टिकली जिल्हापरिषदेचा शेवटचा पैसा वाचविण्यासाठी करतात हे अयोग्य आहे. ९९ टक्के केसेसमध्ये अधिकारी असे गैरहेतूने करीत नाही. विभाग याबाबत दक्षता घेईल. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, नवीन आर्थिक वर्षाचे कामकाज माहे मार्च संपल्यानंतर सुरू होते. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, विभाग एक नवीन कार्यप्रणाली सुरू करणार आहे. त्यासंदर्भात महालेखाकार, वित्त विभाग व मंत्री महोदयांची परवानगी घेण्यात आली आहे. २० तारखेला अंतिम ॲन्युईटी आहे. विभागाकडून जिल्हा परिषदेला निधी वितरीत करण्यात येणार नाही. संगणकावर कामाचे नाव व जिल्हा परिषदेचे नाव नमूद करून त्यासाठी मंजूर करण्यात आलेला निधी नमूद करण्यात येणार आहे. त्या आधारे संबंधित जिल्हा परिषदेने निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी व वर्क ऑडरची माहिती त्यांनी संगणक प्रणालीमध्ये भरावयाची आहे. नवीन संगणक प्रणाली तयार करण्यात येत असून त्याबाबत विभागाकडून माहिती देत आहे. सदरहू संगणक प्रणालीद्वारे एखाद्या तीर्थ क्षेत्राच्या कामासाठी २ कोटी रुपये निधी मंजूर केल्यानंतर संबंधित जिल्हा परिषदेने निविदा प्रक्रिया राबवावी, वर्क ऑर्डर संगणक प्रणालीमध्ये काढण्यात यावी, त्यानंतर बिल पास करण्यासाठी किती लाखांचे मंजूर झाले हे त्यांनी नमूद करावयाचे आहे. राज्यातील किती कामांची देयके मंजूर झाली याची माहिती विभागाला संगणक प्रणालीच्या माध्यमातून मिळेल. यामुळे जिल्हा परिषदेकडे पैसे पडून राहणार नाहीत, कारण खर्च झाल्यानंतरच त्यांना रक्कम प्रदान करण्यात येणार आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, संगणक प्रणालीद्वारे बीडीएस देताना एक सुधारणा करावी लागणार आहे. बीडीएस काढण्यासाठी सर्व कार्यवाही करावी. मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा कॅफो १० टक्के बजेट प्राव्हिजन प्राप्त झाल्याशिवाय काम सुरू करीत नाही. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, जिल्हा परिषदेला कामासाठी रक्कम मंजूर झाल्यानंतरच त्यांना निविदा प्रक्रिया राबवावयाची आहे. नवीन संगणक प्रणालीमध्ये सर्व बाबींचा विचार करण्यात आला आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, हा तांत्रिक मुद्दा आहे. विभागाने पुढील कालावधीमध्ये संगणक प्रणालीनुसार कामकाज सुरू करावे व अफरातफर किंवा गैरव्यवहार होणार नाही याची पूर्ण दक्षता घ्यावी.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०११-१२ या अहवाल वर्षात जिल्हा परिषद नागपूरने आपल्या स्वनिधीतून जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांचे बैठक व्यवस्थेकरिता डेस्कबेंच खरेदी करण्याचा निर्णय घेऊन ४३,६२,७२० रुपयांचे डेस्कबेंच खरेदी केले. त्यासंदर्भात लेखापरिक्षकांनी २ सीटर बेंचची मंजुरी असताना ३ सीटर बेंच खरेदी केले त्यामुळे अतिरिक्त खर्च रुपये ९,६६,२४० वसूल करावा आणि ३ सीटर बेंचचा नमूद दर २९७० असताना २९८० प्रमाणे देयक अदा केले असून रुपये ६०८० चे अतिप्रदान वसूल करावे असे अभिप्राय व्यक्त केले. लेखापरिक्षकांच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, नागपूर यांनी समितीकडे लेखी खुलासा केला की, शिक्षण समितीने ३ सीटर बेंच खरेदीस मान्यता दिली आहे तसेच बेंचचा २९८० हा दर बरोबर असून अतिप्रदान झालेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षी दरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, बेंचचा पुरवठा झालेला नसतानाही पुरवठादाराच्या नावाने दिनांक ३१ मार्च २०११ रोजी धनादेश काढून ठेवला होता. सदरची बाब गंभीर असल्यामुळे समितीने प्रस्तुत प्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निदेश दिले होते. तद्नुषंगाने समितीस प्राप्त झालेल्या चौकशीत कोणीही दोषी आढळून आले नाही. परंतू दिनांक ३१ मार्च रोजी अनुदान व्यपगत होवू नये याकरिता पुरवठा आदेश दिल्याचे नमूद करण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रकरणात दिनांक ३१ मार्च, २०११ रोजी पुरवठा आदेश आणि त्याच दिवशी पुरवठा झाला आहे. पुरवठा आदेशातील अटी आणि शर्तीनुसार शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर यांचा चाचणी अहवाल दिनांक ४ मे २०११ रोजी प्राप्त झाल्यानंतर पुरवठादारास दिनांक २४ ऑक्टोबर, २०११ रोजी संपूर्ण देयक अदा केलेले आहे. पुरवठा आदेशाचा दिनांक आणि पुरवठा दिनांक एकच असल्यामुळे समितीला संपूर्ण प्रकार संशयास्पद वाटत आहे. सेस फंडातून खरेदी करायची असल्यामुळे जिल्हा परिषदेला पुढील आर्थिक वर्षात निधीचे नवीन अर्थसंकल्पात नियोजन करता आले असते किंवा जास्तीत जास्त पुढील वर्षात सुरूवातीची शिल्लक वाढली असती आणि जुलै-ऑगस्ट महिन्यामध्ये पुनर्विलोकन करता आले असते. केवळ आर्थिक वर्ष संपण्याच्या दिवशी दिनांक ३१ मार्च, २०११ रोजी पुरवठा आदेश देणे हे अयोग्य आहे.

प्रस्तुत प्रकरणात कळीचा मुद्दा असा आहे की, खाते प्रमुखांनी पुरवठा आदेशाकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे नस्ती पाठविली असता त्यांनी सदरहू मान्यता देण्यासंदर्भात विचारविनिमय करणे आवश्यक होते असे समितीचे मत आहे. राज्य शासनाचा जबाबदार प्रतिनिधी म्हणून काम करताना त्यांनी अत्यंत जबाबदारीने कर्तव्य पार पाडणे आवश्यक होते, असे असताना ग्राम विकास विभागाचे सचिवांकडून देखील वेळापत्रकाप्रमाणे कामाचा आग्रह न धरता विलंबाने काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचे अशाप्रकारे समर्थन केले जात आहे, याबाबत समिती सखेद आश्चर्य व्यक्त करत आहे.

प्रस्तुत **प्रकरणात आर्थिक वर्षाच्या अखेरच्या म्हणजे ३१ मार्च या दिवशी पुरवठा आदेश देण्यामध्ये सक्षम अधिकाऱ्याचे काही अंतस्थ हेतू (Vested Interest) होते किंवा कसे याची चौकशी करण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ हा राज्य शासनाचा उपक्रम असला तरी ते देखील स्वतः बेंच तयार करीत नाहीत. पुरवठादार खाजगी लघु उद्योजकच असतो त्यामुळे लघु उद्योजक आणि जिल्हा परिषद मधील अधिकारी यांच्यातील घाई घाईने पुरवठा आदेश देणे आणि त्याच दिवशी पुरवठा करणे यामुळे त्यांच्या हेतूबाबत शंका निर्माण होत असल्यामुळे या प्रकरणी पुन्हा चौकशी करण्याची आवश्यकता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अर्थसंकल्पीत निधी व्यपगत होऊ नये यासाठी वेळापत्रकाप्रमाणे काम करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या हितासाठी अथवा सार्वजनिक हिताच्या दृष्टीने वापरण्यात येणारा निधी घाई घाईने वापरल्यास त्याच्यात अनेक चुका होऊ शकतात व योजनेच्या अंमलबजावणीवर त्याचा परिणाम होतो ही बाब विचारात घेता याकरिता ३१ मार्च रोजी आर्थिक वर्ष संपायच्या शेवटच्या दिवशी असे प्रकार होऊ नयेत याकरिता सचिवांनी समितीस आश्वासित केल्याप्रमाणे ३१ मार्च रोजी अर्थसंकल्पविषयक संकेतस्थळ रात्रौ १२-०० वाजता बंद करणे किंवा १ एप्रिल पासून मागील आर्थिक वर्षाचे व्यवहार पूर्णतः बंद करण्यासंदर्भात बदल करून तद्नुषंगाने संगणक प्रणालीमध्ये योग्य ती सुधारणा करण्यात यावी व केलेल्या सुधारणे संदर्भात समितीला अवगत करावे अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, नागपूर

## शालेय पोषण आहार योजना सन २०११-१२ वर्ग १ ते ८ च्या विद्यार्थ्यांना शिजविलेले अन्न पुरविण्याबाबत

**(परिच्छेद ३.१३२) (सन २०११-२०१२)**

जिल्हा परिषद, नागपूर यांनी इयत्ता पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेंतर्गत रु. ५,९८,७९,०४१ केंद्र + रु.१,९४,२१,६७० राज्य = रुपये ७,९३,००,७११ चा खर्च केलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक २०१०/प्र.क्र.१८/प्रशि ४/दिनांक २.२.२०११ अन्वये अन्न शिजविणाऱ्या यंत्रणांनी आठवडयातून किमान एक दिवस पुरक आहार उदा. फळे, सोयाबिस्कीटे, दुध, चिक्की, राजगिरा लाडू, गूळ, शेंगदाणे इत्यादी देण्यात यावे असे स्पष्ट निर्देश असताना प्रत्यक्ष तपासणीत आठवडयातून एक दिवस सर्व शाळेत हा नियम पाळल्याचे आढळून आल्याचे दिसत नाही.

(२) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र. शापोआ-२०१०/प्र.क्र.३८१/प्रा.शा.४, दिनांक २० ऑगस्ट २०१० अन्वये सदर योजनेंतर्गत शाळांमध्ये शुद्ध पिण्याचे पाणी पुरविण्याबाबत निर्देश आहेत. मात्र याबाबतचा कोणताही अभिलेख परिक्षणास सादर करण्यात आला नाही.

(३) उपयोगिता प्रमाणपत्रानुसार शिल्लक अनुदान खर्च करण्यास शासनाची मंजुरी घेऊन सादर करावी किंवा अखर्चित अनुदान शासनास परत करावे.

(४) अखर्चित अनुदान केंद्र रु. २०,६८,८७,८७७ राज्य रु. ६,६७,८१,४६२

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) शालेय पोषण आहार योजने अंतर्गत महाराष्ट्र शासन, क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक २०१०/प्र.क्र.१८/प्राशि ४/दिनांक २ फेब्रुवारी २०११ अन्वये प्रत्येक शाळेमध्ये आठवडयातून किमान एक दिवस विद्यार्थ्यांना पूरक आहार उदा. फळे, सोयाबिस्कीटे, दुध, चिक्की, राजगिरा, गुळ, शेंगदाणे इत्यादी दिले जाते. त्याबाबतच्या वापराच्या नोंदी दैनंदिन साहित्य वापर नोंदवह्यामध्ये घेतल्या जातात. नमुन्या दाखल नोंदवहीची सत्यप्रत सोबत जोडली आहे.

(२) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र. शापोआ-२०१०/प्र.क्र.३८१/प्रा.शा.४/ दिनांक २० ऑगस्ट २०१० अन्वये नागपूर जिल्ह्यातील १३ तालुक्यातील शाळांना शुद्ध पिण्याच्या पाण्याकरिता एकूण १,४४,५५० मेडिक्लोर (एम) द्रावणाच्या बॉटलचा पुरवठा करण्यात आलेला होता. तसेच जिल्हा परिषद सेसफंड योजनेतुन नागपूर जिल्ह्यातील १३ तालुक्यातील ७७४ शाळांना थेट पुरवठ्याअंतर्गत वॉटर फिल्टर चा पुरवठा करण्यात आलेला आहे. पुरवठा आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

(३) तालुकानिहाय प्राप्त उपयोगिता प्रमाणपत्रानुसार शिल्लक अनुदान हे शिक्षण संचालक (प्राथमिक) पुणे यांचेकडून प्राप्त परवानगीनुसारच खर्च केल्या जाते. सन २०१०-११ ची रक्कम सन २०११-१२ मध्ये शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांचे पत्र क्र. ४६८८, दिनांक १२ जुलै २०११ च्या परवानगीने खर्च करण्यात आली होती. परवानगीची सत्यप्रत सोबत जोडलेली आहे. मूळ परिच्छेदात उल्लेख केल्याप्रमाणे पंचायत समिती नरखेडच्या सन २०११-१२ चे उपोगिता प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

(४) अखर्चित अनुदान केंद्र हिस्सा रु. २०,६८,८७,८७७ व राज्य हिस्सा रु. ६,६७,८१,४६२ दर्शविण्यात आलेले आहे. परंतु सदर रक्कम ही अखर्चित अनुदान नसून सन २०११-१२ मध्ये जिल्हानिधीतून प्रमाणक निहाय शोधन करण्यात आलेल्या देयकांची रक्कम आहे. त्या अन्वये उपरोक्त रक्कम ज्या बाबींसाठी प्राप्त झाली होती ती त्याच बाबीवर खर्च करण्यात आल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २९ सप्टेंबर २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन निर्णय दिनांक २ फेब्रुवारी २०११ नुसार शालेय पोषण आहारासोबत आठवड्यातून एक दिवस पूरक पोषण आहार देणे आवश्यक आहे. पूरक पोषण आहार दिल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणास का उपलब्ध केले नाहीत, तसेच दिनांक २० ऑगस्ट २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार शाळांमध्ये शुद्ध पिण्याचे पाणी पुरविण्याबाबत आदेश आहेत त्याबाबत विभागाने कोणती कार्यवाही केली, महाराष्ट्र स्टेट को.ऑफ.कन्झ्युमर्स फेडरेशनकडून पंचायत समितीनिहाय साहित्याचा पुरवठा केव्हा व किती करण्यात आला आहे, त्याबाबतचा तपशील लेखापरीक्षणास उपलब्ध करून का देण्यात आला नाही, लेखा आक्षेप आल्यानंतर त्या

संदर्भातील माहिती विभाग प्रमुखांनी देणे ही त्यांची जबाबदारी आहे. या संदर्भात विभाग प्रमुखांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, प्रत्येक शाळेमध्ये नोंदवही असते. कोणत्या शाळेमध्ये काय काय आहार दिला त्याची नोंद त्या शाळेमध्ये उपलब्ध असते.

समितीने अशी विचारणा केली की, एकूण २७ कोटी रुपयांचा पुरवठा झालेला आहे. नोंदवही दाखविली नाही तर विद्यार्थ्यांना अंडी, केळी देण्यात आली हे समजणार कसे, या योजनेमध्ये केंद्र सरकारचा ७५ टक्के व राज्य शासनाचा २५ टक्के हिस्सा असतो. केंद्र सरकारकडून रुपये २० कोटी ६८ लाख ८७ हजार तर राज्य शासनाकडून रुपये ६ कोटी ६७ लाख ८१ हजार असे एकूण २७ कोटी रुपयांचे अनुदान प्राप्त झालेले आहे. सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षात तांदूळ, तूरडाळ, हरभरा, मोहरी, मिरची पावडर, सोयाबीन तेल इत्यादींचा स्टेट को.ऑ. कन्झ्युमर्सकडून केव्हा व किती पुरवठा करण्यात आला त्याचा अहवाल व पाककृती संदर्भात दस्तऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही. आहारात भाजीपाल्याचा समावेश असल्याचे मुख्याध्यापकाचे प्रमाणपत्र दाखविण्यात आलेले नाही. आठवड्यातून एक दिवस दिल्या जाणाऱ्या पुरक पोषण आहारामध्ये राजगिरा लाडू, फळे, केळी इत्यादी देण्यात आलेले नाही. विद्यार्थ्यांना न्यूट्रीशन्स दिलेले नाही. या संदर्भात लेखापरिक्षणाच्या वेळी कोणतेही अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आले नाहीत. केंद्र व राज्य शासनाची अखर्चित असलेली रक्कम जवळपास २७ कोटी रुपये इतकी आहे. उक्त रक्कम नंतर ज्या बाबीसाठी होती, त्याच कारणाकरिता खर्च झाल्यासंबंधी उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध करून देण्यात आले नाही. शालेय शिक्षण विभागाच्या संदर्भात समितीकडे गंभीर स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. शालेय पोषण आहारामध्ये आळ्या सापडल्याची तक्रार प्राप्त झाली होती. पुरवठादारासमवेत केलेल्या करारात अटी व शर्तीचे पालन झाले आहे का, यावर प्रभारी शिक्षण अधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस विदित केले की, शासन स्तरावर करारनामा होत असून मार्केटिंग फेडरेशनकडून मालाचा पुरवठा होत असतो. शालेय स्तरावर फक्त नोंदवही असते, ती उपलब्ध आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, लेखा परिक्षणाच्या वेळी सदर नोंदवही उपलब्ध करून न दिल्यामुळे आक्षेप घेण्यात आला आहे. लेखा परिक्षणात आक्षेप आल्यानंतर नोंदवही तयार करण्यात आली. यावर प्रभारी शिक्षण अधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस विदित केले की, लेखा परिक्षणाच्या वेळी सदर नोंदवही दाखविण्यात आली नसल्याची बाब मान्य आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ही गंभीर बाब असल्यामुळे या प्रकरणी संबंधितांविरुद्ध कारवाई होणे अत्यावश्यक आहे. यावर संचालक स्थानिक निधी लेखा यांनी असे मत व्यक्त केले की, प्रत्येक आठवड्यातून एकदा पुरक पोषण आहार देणे आवश्यक आहे. त्या संबंधी दैनंदिन साहित्य वापर नोंदवहीमध्ये नोंद घेतली जाते. परंतु लेखापरिक्षणाच्या वेळी सदर नोंदवही दाखविण्यात आली नाही. यावर प्रभारी शिक्षण अधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस विदित केले की, जिल्हा परिषदेच्या स्तरावर लेखा परिक्षण होत असते. सदर नोंदवही शाळेमध्ये असते.

समितीने असे मत व्यक्त केले की, लेखा परिक्षणाच्यावेळी आवश्यक ती कागदपत्रे दाखविणे अत्यावश्यक आहे. शाळा स्तरावर कागदपत्रे असल्यामुळे लेखापरिक्षणाच्या वेळी ते दाखवायचे नाही, ही बाब योग्य नाही. लेखा परीक्षणाच्या वेळी सर्व कागदपत्रे उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. लेखा परीक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध करून न देणे, ही अतिशय गंभीर बाब आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, या प्रकरणी चौकशी करून संबंधितांविरुद्ध जबाबदारी निश्चित केली जाईल. यावर समितीने अशी विचारणा केली की, या प्रकरणी गटविकास अधिकारी, शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी (शिक्षण) या सर्वांची जबाबदारी असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध कारवाई होणे अत्यावश्यक आहे, शालेय पुरक पोषण आहार कोणाकडून दिला जातो, यावर प्रभारी शिक्षण अधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस विदित केले की, मार्केटिंग फेडरेशनकडून शालेय पोषण आहाराचा पुरवठा केला जातो. शासन निर्णयानुसार अन्न शिजवणाऱ्या यंत्रणांनी आठवड्यातून एक दिवस पुरक पोषण आहार देणे बंधनकारक आहे. शासन आदेशानुसार प्रत्येक दिवशी किती कॅलरीचा आहार द्यावयाचा, हे ठरविले जाते व त्यानुसार पुरक पोषण आहार देण्याची कार्यवाही केली जाते. समितीने अशी विचारणा केली की, एकूण शाळा किती आहेत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, एकूण १५६२ शाळा आहेत. यावर समितीने पुढे विचारणा केली की, ७७४ शाळांना शुद्ध पाणी मिळण्याकरिता सेस फंडातून वॉटर फिल्टरचा पुरवठा करण्यात आला. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सर्व शाळांना वॉटर फिल्टर देण्यात येणार आहेत. सेस फंडातून दरवर्षी १०० ते १५० वॉटर फिल्टर देण्याकरिता तरतूद केली जाते. सद्य:स्थितीत १२०० शाळांना वॉटर फिल्टर दिले असून ३०० शाळांना वॉटर फिल्टर देणे बाकी आहे. समितीने विचारणा केली की, संबंधित प्रकरण अगोदरच्या काळातील लेखा आक्षेप असला तरी, मुख्य कार्यकारी अधिकारी या नात्याने या प्रकरणास जबाबदार आहात, या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुद्ध तातडीने कारवाई करणे गरजेचे आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, या प्रकरणी संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यात येईल.

समितीने पुढे विचारणा केली की, पुरक पोषण आहाराच्या मालाचा पुरवठा करण्यासंबंधी करारात किती अटी व शर्ती आहेत, लेखा परीक्षणाच्या वेळी निर्धारित उष्मांक व प्रथिनांचा पोषण आहार पुरविल्याबाबतचे अभिलेख उपलब्ध करून देण्यात आले नाहीत. कागदपत्रे उपलब्ध न झाल्यास त्या अनुषंगाने देयक अदा करण्याचे अधिकार आहेत का, लेखा परीक्षण झाल्यानंतर विचारणा करून सुद्धा रेकॉर्ड उपलब्ध होऊ शकले नाही. यावर

मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विदित केले की, रेकॉर्ड उपलब्ध झाले नसते तर पेमेंट केले नसते. यावर समितीने पुढे विचारणा केली की, शासन निर्णयानुसार शालेय पोषण आहारासमवेत आठवड्यातून एक दिवस पूरक पोषण आहार देणे आवश्यक आहे. परंतु या संदर्भात योग्यती कार्यवाही करण्यात आली नाही. परिणामी मुलांना पुरक पोषण आहार मिळाला नाही. याकरिता कोण जबाबदार आहे. सदर विषयाच्या संदर्भात गांभीर्याने विचार केला पाहिजे, फक्त दंडात्मक कारवाई करून चालणार नाही, कठोर कारवाई केली पाहिजे. सदर प्रकरणी तत्कालीन मुख्याध्यापक, विस्तार अधिकारी (शिक्षण), शिक्षणाधिकारी आणि इतर जे संबंधित असतील त्यांच्यावर कठोर कारवाई केली पाहिजे. तालुकानिहाय प्राप्त उपयोगिता प्रमाणपत्रानुसार शिल्लक अनुदान शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांच्याकडून प्राप्त परवानगी नुसारच खर्च केले जाते असे सांगितले आहे. त्यांची परवानगी घ्यावीच लागते का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, वित्तीय वर्षात जो अखर्चित निधी राहिला त्याला पुढील वर्षी परवानगी दिली आहे, यावर समितीने असे मत व्यक्त केले की, मान्यता देत असताना अनियमितता झाली आहे का हे तपासले पाहिजे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, २० कोटी रूपयांचा निधी प्राप्त झाला होता, वित्तीय वर्षात ३१ मार्चला जो निधी अखर्चित राहतो तो शासन खाती जमा करावा लागतो. यावर समितीने विचारणा केली की, तो निधी खर्च का झाला नाही, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, विद्यार्थ्यांच्या संख्येप्रमाणे निधी मिळतो तो तेवढा खर्च करण्यात येतो.

समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेने तो निधी जास्त घेतला होता का, कारण मागणीनुसार निधी येत असतो. जास्त निधी कसा आला की जिल्हा परिषदेने जास्त निधीची मागणी केली होती, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस उत्तर दिले की, बालके आली नाहीत तर निधी अखर्चित राहू शकतो. यावर पुढे समितीने अशी विचारणा केली की, हजेरी वेगळी असते, प्रत्यक्षात वेगळे असते आणि पुरवठा वेगळा असतो. शालेय पोषण आहार किती भरायचा हे मुख्याध्यापक, पुरवठादार व अधिकारी ठरवितात. प्रत्यक्षात मुले किती उपस्थित आहेत, किती गैरहजर आहेत, शाळा सोडून किती गेले आहेत हे पाहिले जात नाही. सर्व बाबींमध्ये तफावत आहे. शंभर टक्के बालके उपस्थित होते का, यावर प्रभारी शिक्षण अधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस विदित केले की, जेवढे उपस्थित होते तेवढा यांनी शालेय पोषण आहार घेतला आहे. यावर समितीने विचारणा केली की, पटपडताळणी केव्हा झाली, बालकांना आहार शंभर टक्के दिला का, यावर प्रभारी शिक्षण अधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस विदित केले की, शिक्षणाधिकारी सेवानिवृत्त झाले आहेत. सन २०११ मध्ये ३८३३ शाळांमध्ये विशेष पट पडताळणी केली. त्यावेळी १३४ शाळांत ५० टक्क्यांपेक्षा कमी उपस्थिती आढळली होती. ५० टक्के अनुपस्थितीचा अहवाल प्राप्त झाला. ५० टक्के अनुपस्थिती आढळलेल्या १३४ शाळा होत्या.

समितीने पुढे अशी पृच्छा केली की, जिल्हापरिषदेकडून पट पडताळणी होते का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, जिल्हापरिषदेकडून ३० सप्टेंबरला पट पडताळणी केली जाते. सन २०११ ला संपूर्ण राज्यात पटपडताळणी केली त्याची आकडेवारी देण्यात येत आहे. तत्कालीन शिक्षणाधिकारी, तत्कालीन विभाग प्रमुख, तत्कालीन विस्तार अधिकारी (शिक्षण), तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी जे कोणी संबंधित असतील किंवा ज्यांनी लेखापरिक्षणाच्या वेळी कागदपत्रे दाखविली नसतील त्यांच्यावर लेखासंहिता नियम ७ प्रमाणे दंडात्मक कारवाई करावी असे निदेश समितीने दिले. सदर विषय रकमेचा नसून विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहाराचा आहे. फक्त रक्कम मोठी आहे म्हणून प्रकरण चौकशीसाठी ठेवायचे का हाही प्रश्न आहे. विद्यार्थ्यांपर्यंत शालेय पोषण आहार पोहचतो की नाही, त्यामध्ये अनियमितता झाली का हे प्रश्न आहेत. त्यामुळे या संदर्भात चौकशी करावी आणि याबाबतीतील सविस्तर अहवाल समितीला सादर करावा. भविष्यात असे होऊ नये याची काळजी घ्यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) समितीने भेटीच्या वेळी निर्देश देऊनही त्याप्रमाणे चौकशी करून केलेल्या कार्यवाहीचा चौकशी अहवाल समितीस सादर न करण्याची कारणे काय, या प्रकरणी शासनाने संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

(२) या प्रकरणी दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध चौकशी केली आहे काय, त्यानुसार लेखा परिक्षकास लेखा परिक्षणाच्या वेळी कागदपत्रे न दाखविणाऱ्यांविरुद्ध स्थानिक निधी लेखा परिक्षण नियम ७ अन्वये दंडात्मक कारवाई का करण्यात आली नाही ?

(३) लेखा परिक्षणाचे वेळी लेखा परिक्षणास संबंधितांनी कागदपत्रे दाखविली असल्याचे जिल्हा परिषदेच्या अहवालात नमूद आहे, या प्रकरणी वस्तुस्थिती स्पष्ट करण्यात यावी ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायती राज समितीने दिलेल्या निदेशानुसार सदर आक्षेपासंबंधी चौकशी करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दिनांक २७ फेब्रुवारी २०१६ रोजी पंचायत राज समिती कक्ष, विधान मंडळ, मुंबई येथे सादर करण्यात आलेला आहे.

(१) जिल्हा स्तरावरील लेखापरिक्षणात नागपूर जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजनेचा लाभ घेणाऱ्या ग्रामीण भागातील एकूण २५७४ शाळांना मागणी केल्याप्रमाणे वेळेवर लेखापरिक्षणास अभिलेखे घेऊन बोलविणे शक्य होत नाही. परंतु काही शाळांना तोंडी सुचनेनुसार अभिलेखे सादर करण्याबाबत कळविले होते. दिनांक ७ जानेवारी २०१३ व दिनांक ८ जानेवारी २०१३ या दोन दिवसांच्या कालावधीमध्ये ३३ शाळा लेखापरिक्षणासाठी उपलब्ध होत्या. इतर सर्व शाळांची अभिलेखे प्राप्त झाली तोपर्यंत लेखापरिक्षण संपलेले असल्याने लेखापरिक्षणास सदर अभिलेखे दाखविता आले नाहीत. तसेच, मा. समिती अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानुसार सदर प्रकरणी चौकशी केली असता, सर्व शाळांकडे नोंदवह्या ठेवलेल्या आहेत.

(२) पंचायत समिती स्तरावर होणाऱ्या लेखापरिक्षणास सदर नोंदवह्या दाखविण्यात येतात. शालेय पोषण आहार अधीक्षक यांनी केलेल्या यादृच्छिक तपासण्यांमध्ये कागदपत्रे ठेवण्यात आलेले असल्याचे आढळून आल्याने दंडात्मक कार्यवाही केलेली नाही.

(३) सदर, लेखापरिक्षणाचे वेळी लेखापरिक्षणास जिल्हास्तरावरील अभिलेखे दाखविण्यात आले होते परंतु त्यावेळेस ग्रामीण भागातील शाळांकडून अभिलेखे सादर करण्याबाबत कळविले होते शाळांकडून अभिलेखे प्राप्त झाले तोपर्यंत लेखापरिक्षण संपलेले असल्याने लेखापरिक्षणांस शाळास्तरावरील उपलब्ध सर्व अभिलेखे दाखविता आली नाहीत. मात्र जिल्हास्तरावरील उपलब्ध सर्व अभिलेखे दाखविण्यात आले होते.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात शालेय शिक्षण विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) जिल्हा परिषद, नागपूर यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

(२) जिल्हा परिषद, नागपूर यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

(३) जिल्हा परिषद, नागपूर यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

## चौकशी अहवाल

### परिच्छेद क्र. १४ शालेय पोषण आहार योजना सन २०११-१२ वर्ग १ ते ८ च्या विद्यार्थ्यांना शिजवलेले अन्न पुरविण्याबाबत

शालेय पोषण आहार योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून ती वर्ग १ ते ५ करीता सन २००२-०३ ला सुरू करण्यात आलेली होती. तसेच राष्ट्रीय मध्यान्ह भोजन कार्यक्रम वर्ग ६ ते ८ करिता सदर योजना सन २००८-०९ पासून शाळास्तरावर राबविण्यात येत आहे.

सदर योजना ही जिल्हा परिषद शाळा, महानगरपालिका व नगर परिषद क्षेत्रातील शाळा, खाजगी अनुदानित शाळा (२०% अनुदान पासून योजना सुरू), आश्रमशाळा, रात्रशाळा मध्ये राबविण्यात येते. सदर योजनेंतर्गत वर्ग १ ते ५ करिता १०० ग्रॅम तांदुळ व वर्ग ६ ते ८ करिता १५० ग्रॅम तांदुळ प्रतिदिन प्रतिविद्यार्थी प्रमाणे शाळास्तरावर वाटप केले जाते. सदर तांदुळ हा भारतीय खाद्य निगम अजनी, नागपूर या गोदामातून उचल केली जाते. सदर तांदुळ उचल करून पुरवठा करण्यासाठी व धान्यादी मालाचा शाळास्तरावर पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे पुरवठादार महाराष्ट्र स्टेट को- ऑपरेटिव्ह कन्झुमर्स फेडरेशन, मुंबई यांचेशी करारनामा झालेला आहे.

सदर योजनेकरिता सन २०११-१२ मध्ये वर्ग १ ते ५ करिता रु. २.८० व वर्ग ६ ते ८ करिता रु. ४.१५ दर निश्चित करण्यात आलेला होता. सदर अनुदानातून मुख्याध्यापकांना शाळास्तरावर भाजीपाला, इंधन व पुरक आहार इ. वर खर्च करण्याबाबत निर्देश होते. या योजनेत राखीव रकमेतून विविध साहित्य, साधन सामूग्री व सुक्ष्मपोषण अंतर्गत (IFA विटॅमीन टॅब्लेट, मायक्रोन्युट्रियन सिरप, प्रोटीन पाऊडर, मेडीक्लोर एम द्रावण, हॅन्डवाश इ.) आवश्यक साहित्याची खरेदी ही संचालनालय स्तरावरून करून सदर साहित्याचा पुरवठा थेट तालुकास्तरावर करण्यात येतो.

शाळा स्तरावर अन्न शिजविण्याकरिता शाळा व्यवस्थापन समिती मार्फत स्वयंपाकी तथा मदतनीस यांची निवड करून त्यांच्यामार्फत आहार शिजवून घेणे, धान्य सफाई व अन्य कामे करून घेतली जातात. स्वयंपाकी तथा मदतनीस यांना मानधन म्हणून प्रतिमहा रु. १००० प्रमाणे पटसंख्येवर स्वतंत्र अनुदान दिले जाते. शहरी भागातील महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील शाळांना फक्त तांदुळ पुरवठा करण्यात येतो. शाळांना अन्न शिजवून देणे, इंधन व भाजीपाला व स्वयंपाकी मानधन असे एकत्रितपणे अनुदान वाटप केले जाते.

सन २०११-१२ ला शालेय पोषण आहार योजनेचे लेखापरिक्षण करण्यात आले. सदर लेखा परिक्षणातील परिच्छेद क्र. १४ हा पंचायती राज समिती पुढे अहवाल क्र. ३.१३२ अन्वये अनुपालनाकरिता ठेवण्यात आलेला होता.

सदर लेखापरिक्षणाच्या अनुपालन अहवालावर झालेल्या चर्चेनुसार मा. समिती प्रमुख यांनी खालील अभिप्राय दिलेले आहे.

(१) लेखापरिक्षणाचे वेळी पूरक पोषण आहार पुरवठ्याबाबतची कागदपत्रे दाखविण्यात आली नाहीत.

(२) विद्यार्थ्यांपर्यंत शालेय पोषण आहार पोहचतो की नाही ? त्यामध्ये अनियमितता झाली का ? याची चौकशी करावी.

(३) केंद्र व राज्य शासनाची अखर्चित असलेली रक्कम जवळपास २७ कोटी रुपये इतकी आहे. उक्त रक्कम नंतर ज्या बाबीसाठी होती ती त्याच कारणासाठी खर्च झाल्यासंबंधी उपयोगिता प्रमाणपत्र ऑडीटच्या वेळी उपलब्ध करून देण्यात आले नाही.

(४) तत्कालीन शिक्षणाधिकारी, तत्कालीन विभाग प्रमुख, तत्कालीन विस्तार अधिकारी (शिक्षण), तत्कालीन मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी जे कोणी संबंधित असतील किंवा ज्यांनी लेखापरीक्षणाच्या वेळी कागदपत्रे दाखविली नसतील त्यांच्यावर लेखासंहिता नियम ७ प्रमाणे दंडात्मक कारवाई करावी.

सदर प्रकरणी दोषींवर कार्यवाही प्रस्तावित करून समितीला अहवाल एक महिन्यात सादर करावा. सदर प्रकरणात जी अनियमितता झाली त्याबाबत संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देऊन विभागीय आयुक्तामार्फत चौकशी करून कार्यवाहीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा. विषय समितीकडे साक्षीला ठेवण्यात यावा असे निर्देश देण्यात आले होते.

यावर खालील प्रमाणे चौकशी करण्यात आली.

**मुद्दा क्र. १ :** लेखापरिक्षणाचे वेळी पूरक पोषण आहार पुरवठयाबाबतची कागदपत्रे दाखविण्यात आली नाहीत.

उपरोक्त प्रकरणी चौकशी केली असता लेखापरिक्षण हे जिल्हा स्तरावर झालेले आहे. जिल्हास्तरावरील अभिलेख मागणीनुसार लेखापरिक्षणास उपलब्ध करून दिलेले आहे. तसेच मागणी केल्याप्रमाणे करारनाम्याची प्रत सुद्धा उपलब्ध करून देण्यात आलेली होती. पूरक पोषण आहार साठा नोंदवहया हया शाळास्तरावर उपलब्ध असतात. जिल्हास्तरावरील लेखापरीक्षणाचे वेळी शाळांच्या साठा नोंदवही या अभिलेखाची मागणी केल्याप्रमाणे लेखापरीक्षणाचे वेळी उपलब्ध होऊ शकले नाही. सदर शाळास्तरावरील साठा नोंदवहयांची तपासणी पंचायत समितीच्या लेखापरिक्षणाचे वेळी करण्यात आलेली आहे. मुख्याध्यापकांनी शाळास्तरावर साठा नोंदवही ठेवलेली असल्याचे चौकशीमध्ये निदर्शनास आले.

**मुद्दा क्र. २ :** विद्यार्थ्यांपर्यंत शालेय पोषण आहार पोहचतो की नाही ? त्यामध्ये अनियमितता झाली का ? याची चौकशी करावी.

उपरोक्त प्रकरणी चौकशी केली असता मुलांना कॅलेंडरप्रमाणे सन २०११-१२ ला एकूण २२० दिवस पोषण आहार दिला आहे, पुरवठादार महाराष्ट्र स्टेट कॉ-ऑपरेटिव्ह कन्झुमर्स फेडरेशन, मुंबई हे असून त्यांनी तालुकास्तरावरून शाळावार दिलेल्या मागणीनुसार पुरवठा केलेला आहे. मुलांना पूरक आहार आठवडयातून एक दिवस नियमित दिला जातो. सदर पूरक आहाराचा पुरवठा हा पुरवठादारामार्फत न होता शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे शासन निर्णय दिनांक २ फेब्रुवारी २०११ मधील शासन तरतुदीतील निर्देशानुसार मुख्याध्यापकांना दिलेल्या अनुदानातून ते आठवडयातून एक दिवस पूरक आहारामध्ये उदा. केळी, बिस्किटे, चुरमुरे, लाडू, शेंगदाणा, पापडी इत्यादी शाळास्तरावरील ठेवलेल्या नोंदवहयामध्ये खात्री पटली. विद्यार्थ्यांना शाळास्तरावर पूरक आहार दिला जात असल्याची चौकशीमध्ये शाळास्तरावरील तपासणी केलेल्या नोंदवहीवरून खात्री पटल्यामुळे सदर प्रकरणी कोणतीही अनियमितता केली नाही.

**मुद्दा क्र. ३ :** केंद्र व राज्य शासनाची अखर्चित असलेली रक्कम जवळपास २७ कोटी रुपये इतकी आहे. उक्त रक्कम नंतर ज्या बाबीसाठी होती ती त्याच कारणासाठी खर्च झाल्यासंबंधी उपयोगिता प्रमाणपत्र ऑडीटच्या वेळी उपलब्ध करून देण्यात आले नाही.

उपरोक्त प्रकरणी जिल्हास्तरावरील लेखा संदर्भाने शालेय पोषण आहार योजनेची दस्ताऐवजाची तपासणी केली असता केंद्र व राज्य शासनाचा अखर्चित अनुदान केंद्रहिस्सा रुपये २०,६८,८७,८७७ व राज्य हिस्सा रुपये ६,६७,८१,४६२ असे एकूण जवळपास २७ कोटी दर्शविण्यात आलेले आहे. परंतु प्रत्यक्ष चौकशी मध्ये सदर रक्कम ही अखर्चित अनुदान नसून सन २०११-१२ मध्ये जिल्हानिधीतून प्रमाणक निहाय शोधन करण्यात आलेल्या देयकांची रक्कम आहे.

तसेच मागील वर्षाची अखर्चित रक्कम पुढील वर्षात खर्च करण्याची परवानगी शिक्षण संचालक यांचेकडून प्राप्त होत असून त्याप्रमाणे सन २०१०-११ ची रक्कम सन २०११-१२ मध्ये खर्च करण्याची परवानगी शिक्षण संचालक (प्राथ.), पुणे-१ यांचे पत्र क्र. ४६८८ दिनांक १२ जुलै २०११ रोजी प्राप्त झाल्यानुसार रक्कम खर्च केलेली आहे. रक्कम ज्या बाबीसाठी प्राप्त झाली होती ती त्याच बाबीवर खर्च करण्यात आल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र मागणीनुसार लेखापरिक्षणाचे वेळी सादर करण्यात आल्याचे निदर्शनास आले.

**मुद्दा क्र. ४ :** तत्कालीन शिक्षणाधिकारी, तत्कालीन विभाग प्रमुख, तत्कालीन विस्तार अधिकारी (शिक्षण), तत्कालीन मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी जे कोणी असतील किंवा ज्यांनी लेखापरिक्षणाच्या वेळी कागदपत्रे दाखविली नसतील त्यांच्यावर लेखासंहिता नियम ७ प्रमाणे दंडात्मक कारवाई करावी.

मा. समिती अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानुसार केलेल्या चौकशीअंती सदर प्रकरणी जिल्हास्तरावरील लेखा परिक्षणात मागणीनुसार अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आले होते. परंतु जिल्हास्तरावरील लेखापरिक्षणात नागपूर जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजनेचा लाभ घेणाऱ्या ग्रामीण भागातील २५७४ शाळांना मागणी केल्याप्रमाणे वेळेवर लेखापरिक्षणास अभिलेखे घेऊन बोलविणे शक्य नसल्याने काही शाळांना तोंडी सुचनेनुसार

अभिलेखे सादर करण्याबाबत कळविले होते परंतु अभिलेखे प्राप्त झाले तोपर्यंत लेखापरिक्षण संपलेले असल्याने लेखापरिक्षणास सदर अभिलेखे दाखविता आले नाहीत. तथापि सर्व शाळांकडे नोंदवहया ठेवलेल्या आहेत. पंचायत समिती स्तरावर होणाऱ्या लेखापरिक्षणास सदर नोंदवहया दाखविण्यात येतात. त्यामुळे सदर प्रकरणी कुणीही दोषी नसल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :** मुख्याध्यापकांनी शाळास्तरावर साठा नोंदवही ठेवलेली असल्याचे चौकशीमध्ये निदर्शनास आले. विद्यार्थ्यांना शाळास्तरावर पुरक आहार दिला जात असल्याची चौकशीमध्ये खात्री पटल्यामुळे सदर प्रकरणी कोणतीही अनियमितता झाली नाही. अखर्चित रक्कम शासन परवानगीचे अधीन राहून पुढील वर्षी खर्च करण्यात आली आहे तसेच उपयोगिता प्रमाणपत्र मागणीनुसार लेखापरिक्षणाचे वेळी सादर करण्यात आल्याचे निदर्शनास आले.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, समितीने भेटीच्या वेळी निर्देश देऊनही त्याप्रमाणे चौकशी करून केलेल्या कार्यवाहीचा चौकशी अहवाल समितीस सादर न करण्याची कारणे काय, या प्रकरणी शासनाने संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय, या प्रकरणी दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध चौकशी केली आहे काय, लेखापरिक्षकास लेखापरिक्षणाच्यावेळी कागदपत्रे न दाखविणाऱ्याविरुद्ध स्थानिक निधी लेखापरिक्षण नियम ७ अन्वये दंडात्मक कारवाई का करण्यात आली नाही, लेखापरिक्षणाचे वेळी लेखापरिक्षणास संबंधितांनी कागदपत्रे दाखविली असल्याचे जिल्हापरिषदेच्या अहवालात नमूद आहे, या प्रकरणी वस्तुस्थिती स्पष्ट करण्यात यावी, यावर सहसचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी यांची यामध्ये महत्वाची भूमिका आहे. मुलांना मध्यान्ह भोजनानंतर किंवा भोजनासमवेत पूरक पोषण आहार अंतर्गत केळी, बिस्कीट्स, मांसाहार देण्यासंदर्भातील नोंदवही स्वतंत्र ठेवण्यात आलेली आहे.

समितीने विचारणा केली की, मध्यान्ह भोजनानंतर पूरक पोषण आहारांतर्गत जे जिन्नस मुलांना देणे आवश्यक असते, त्याकरिता निधी दिला जात नाही. तसेच यासंदर्भातील नोंदवह्यामध्ये याची नोंद घेतलेली आढळून आलेली नाही. मुलांना लोह, कॅल्शिअम दिले की नाही, यासंबंधीची नोंद वहीमध्ये ठेवली जाते का, यावर सहसचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, पूरक पोषण आहारांतर्गत निधी दिला जातो, काही ठिकाणी विलंब झाला असेल. मुख्याध्यापक त्यांच्या शाळेतील मुलांना देण्यात येणाऱ्या पूरक पोषण आहाराबाबतची नोंद घेत असतात. सन २०१३ पासून या नोंदी शालेय स्तरावर नोंदविल्या जात आहेत. शालेय पोषण आहार दैनंदिनी नोंदवही, अन्नधान्य साठा नोंदवही, मुलांचे वजन, उंची व इतर संदर्भात एक नोंदवही असते. यामध्ये या संबंधित उपक्रमाचा रेकॉर्ड ठेवला जातो. मुलांना लोह, कॅल्शिअमच्या गोळया दिल्या संबंधीची नोंद शालेय स्तरावरील नोंदवहीमध्ये ठेवलेली असते. नोंदवही ही या योजनेचे आत्मा असून ती अतिशय महत्वाची आहे. शाळेतील या शालेय पोषण आहार समितीला अन्नधान्याच्या साठयाचा पुरवठा होतो, हे कधी कधी माहिती नसते, मग नोंदवहीमध्ये अन्नधान्य तपासणी केली जाते का हे माहिती नसते. प्रत्येक महिन्याची प्रत्येक महिन्यात सही घेतली जात नाही. एकाच वेळी बारा महिन्याच्या सहया संबंधित नोंदवहीवर घेतल्या जातात. याचा गैरफायदा घेतला जातो. नोंदवही हिशेब किंवा लेखापरिक्षणाकरिता उपलब्ध होत नाही नोंदवही उपलब्ध झाली तरीही त्या अपूर्ण असतात. यामुळे ही योजना योग्यरितीने राबविलेली नाही, अशी समितीला शंका आहे. शालेय स्तरावरील नोंदवहया दर तीन महिन्यांनी सक्षम प्राधिकाऱ्यापुढे तपासणी करिता ठेवणे आवश्यक आहे. जिल्हापरिषदेच्या विभागापुढे, शासनाच्या प्रतिनिधीपुढे ही नोंदवही वेळच्या वेळी मंजूर करून घेणे आवश्यक आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, नोंदवहया लेखापरिक्षणाच्या वेळेस देखील सादर केलेल्या नाहीत. करारनाम्याची प्रत मुख्याध्यापकांकडे असते काय, यावर सहसचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, तालुका स्तरावर सदर प्रत उपलब्ध असते. यावर समितीने पुढे विचारणा केली की, करार हा राज्यस्तरावर होत असतो. तालुका स्तरावर करारनाम्याची प्रत उपलब्ध नसते. शाळेमध्ये सॅम्पलचे नमुने ठेवण्यात येतात काय, २० दिवसापुर्वी माल आला पाहिजे, करारनाम्यामध्ये कोणत्या अटी आणि शर्ती समाविष्ट असतात, हे बऱ्याच वेळेस मुख्याध्यापकांना माहितीच नसते. शालेय पोषण आहारामध्ये अधीक्षक, गट विकास अधिकारी दोषी असतो. परंतु, कारवाई ही मुख्याध्यापकांवर होत असते. करारनाम्याची प्रत मुख्याध्यापकांना दिली जाते काय, या विषयावर विधानसभेमध्ये भरपूर वेळेस चर्चा होत असते. करारनाम्यामध्ये कोणत्या गोष्टी असावयास पाहिजे याबाबतची माहिती मुख्याध्यापकास नसते. जिल्हापरिषदेला वेठीस आणण्याचे प्रकार होत आहेत, राज्य शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी केव्हाच होत नाही तसेच मुख्याध्यापकांनी ज्या धान्याची मागणी केली असेल, त्या धान्याचा पुरवठा होत नाही. पुरवठादार ज्या गोष्टींची मागणी करतो तेच धान्य शाळेला पुरविले जाते.

समितीने पुढे विचारणा केली की, शाळेमध्ये जो माल येत असतो तो विहित वजनाचा येत नाही. कोणत्याही धान्याचे ५० कि.ग्रॅ. वजनाचे पोते असेल तर त्याचे वजन ४५ कि.ग्रॅ. पर्यंतच भरते. तसेच, आलेला माल हा जशाच्या तसा शाळेला स्वीकारावा लागतो. तो जरी ४५ कि.ग्रॅ. असेल तरी तो ५० कि.ग्रॅ. जशाच्या तसा शाळेला स्वीकारावा लागतो. तसेच तो माल चांगल्या दर्जाच्या असतोच असे नाही. कोणत्या प्रकारचे धान्य किंवा

माल आला पाहिजे, याबाबत मुख्याध्यापकास काही माहिती नसते, कंत्राटदार हा मुख्याध्यापकाकडून माल दिल्याची पावती घेऊन जातो. तसेच धान्य किंवा माल बदलुन देण्याचे धाडस सुद्धा कंत्राटदार करीत असतात. त्याचप्रमाणे शाळेसाठी जे तेल देण्यात येते त्या तेलाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असतो.

समितीने नागपूर जिल्ह्याला भेट दिली तेव्हा या गोष्टी निदर्शनास आलेल्या आहेत. परंतु केवळ नागपूर जिल्ह्यातच असे होते, असे नाही. संपूर्ण राज्यभरामध्ये असे प्रकार होत असतात. यावर समितीने पुढे विचारणा केली की, याबाबत राज्याच्या दृष्टीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. करारनाम्यामध्ये स्पष्ट उल्लेख आहे की, जर धान्य चांगल्या दर्जाचे नसेल तर ताबडतोब ते धान्य परत करावे, त्याचप्रमाणे धान्य किंवा माल हा खुल्या बाजारामधून खरेदी करावा. खरेदी केलेल्या मालाचे देयके पुरवठादाराच्या देयकामधून वसूल करावे. अशा प्रकारचा उल्लेख आहे तसेच माल मिळाल्यानंतर त्याची चाचणी करावी लागते. जोपर्यंत चाचणी होत नाही, तो पर्यंत तो वापरता येत नाही, अशी देखील करारनाम्यामध्ये तरतूद आहे. या सर्व गोष्टी समितीने उपस्थित केलेल्या आहेत. हा प्रश्न राज्यातील विद्यार्थ्यांच्या जीवनाशी निगडीत आहे. यामध्ये सरकारच्या माध्यमातुन पुरवठादाराला मदत करण्याची भूमिका घेण्यात येत आहे की काय, यासंदर्भात संशय निर्माण होत आहे.

मुख्याध्यापकांना जर करारनामा माहित असेल तर तो माल घेणार नाही. करारनाम्याची प्रत अंतर्भूत केलेली आहे असे समितीला सांगण्यात आले. आता अशा प्रकारची करारनाम्याची प्रत अंतर्भूत केलेली आहे. परंतु इतक्या वर्षाच्या कालखंडामध्ये सातत्याने याबाबत अनियमितता चालू आहे. मुख्याध्यापकाला काहीच माहिती नाही, पुरवठादारावर काही कारवाई करावयाची नाही. त्यामुळे ही बाब राज्याच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभीर आहे. असे प्रकार होणे संयुक्तिक वाटत नाहीत. पुरवठादार निकृष्ट दर्जाचा माल पुरवित असतो. तसेच लेखापरिक्षणा संदर्भात जर मुख्याध्यापक नोंदी ठेवत नसेल तर ही बाब गंभीर आहे. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, यामध्ये दोन मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहेत. पहिला मुद्दा असा आहे की, मुख्याध्यापक हतबल असतात किंवा त्यांच्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांचा दबाव असल्यामुळे ते अशा प्रकारचा माल स्वीकारतात. मुख्याध्यापकांकडे मालाचा दर्जा आणि माप याशिवाय माल स्वीकारण्यावाचून पर्याय नसतो. तसेच दुसरा मुद्दा उपस्थित करण्यात आला की, मुख्याध्यापकांना करारनाम्यातील अटी किंवा शर्तीची माहिती नसते पहिल्या मुद्द्यासंबंधी मुख्याध्यापकांवरील अशाप्रकारचा दबाव किंवा वरिष्ठ अधिकारी शाळेची किंवा त्यांची चौकशी करेल, अशा प्रकारची भिती त्यांच्या मनातुन काढून टाकावी लागेल. त्यासाठी काहीतरी ठोस यंत्रणा निर्माण केली पाहिजे की, जरी माल कमी आला तरी तो आपण परत पाठवू शकतो किंवा जेवढा आलेला असेल तेवढयाच मालाची नोंद करु शकता. अमरावती जिल्ह्यामधील एका मुख्याध्यापकाला पोत्यामध्ये धान्य कमी आल्यामुळे आत्महत्या करावी लागली होती. त्यामुळे त्यांच्या आत्महत्येला जबाबदार कोण, ५० कि.ग्रॅ. चे धान्य जर ४५ कि.ग्रॅ. येत असेल आणि मुख्याध्यापकांना त्याबाबत माहिती नसेल तर त्यासाठी प्रशासनास जबाबदार धरले पाहिजे. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस असे विदित केले की, यामध्ये विभागाच्या मते मुख्याध्यापक हे भितीपोटी किंवा दबावामुळे धान्य कमी असले तरी स्वीकारत असतील. परंतु जर मुख्याध्यापकांनी सांगितले की सदर माल ५० कि.ग्रॅ. चा आहे, तर वरच्या अधिकाऱ्यांना ती गोष्ट मान्य करावी लागते. त्यामुळे त्यांनी त्यांची जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडली तरच असे प्रकार होणार नाहीत.

मुख्याध्यापकांवर शिक्षण अधिकारी, गट शिक्षण अधिकारी, गट विकास अधिकारी. संचालक, उप संचालक असतात. मुख्याध्यापकांवर भरपूर जबाबदारी आहे. ती जबाबदारी कमी केली तर निश्चितपणे ते चांगले काम करु शकतील. जर त्यांनी अचूक अभिप्राय दिले तर गट शिक्षण अधिकारी, शिक्षण अधिकारी त्यांची चौकशी करतात किंवा त्यांच्यावर दबाव टाकत असतात असे समितीने मत व्यक्त केले, शालेय पोषण आहाराबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे आणि केंद्र शासनाच्या निर्देशानुसार मुख्याध्यापकांना दाबून टाकण्याचा प्रयत्न झालेला आहे. कंत्राटदारावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. धान्याचे किंवा मालाचे पोते ५० कि.ग्रॅ. पेक्षा कमी वजनाचे भरले तर कंत्राटदारावर कारवाई करण्यात यावी. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, मुख्याध्यापक माझी चौकशी होईल, किंवा दुसरे काही तरी करतील या भितीपोटी ते खरा अहवाल देत नाहीत.

समितीने असे निदेश दिले की, कंत्राटदारावर कारवाई करण्यात यावी. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस आश्वासित केले की, कंत्राटदारावर कारवाई होईलच. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, आतापर्यंत कोणत्या कंत्राटदारावर कारवाई झालेली आहे, यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, पुरवठा झालेला माल हा अटी आणि शर्तीप्रमाणे आहे, हे कोणीतरी सांगावयास पाहिजे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदर विषय अगदी स्पष्ट आहे की, कंत्राटदारावर कारवाई केली पाहिजे, यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, जर मुख्याध्यापकांनी ५० कि.ग्रॅ. ऐवजी ४५ कि.ग्रॅ. माल आला आणि स्वाक्षरी करून जर त्यांच्यावर कारवाई केली असेल तर कंत्राटदार यामधून निर्दोष सुटला जातो, कारण त्यांच्याकडे ५० कि.ग्रॅ. माल मिळाल्याची मुख्याध्यापकाची पोच असते. कंत्राटदार यामध्ये म्हणू शकतो की, मी ५० कि.ग्रॅ. माल पुरविलेला आहे आणि त्याची माझ्याकडे पोच आहे. जर तो माल विहित वजनाचा नसेल तर त्यांनी लगेच पाच किलोचा अपहार झाल्याबाबत सांगितले पाहिजे. त्यामुळे याबाबत स्पष्ट भूमिका घेण्याची आवश्यकता आहे. त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी एखादी समिती असली पाहिजे.

समितीने अशी विचारणा केली की, यासाठी शालेय पोषण आहार समिती आहे. सदर समितीला सुद्धा मुध्याध्यापक काही सांगत नाहीत. सर्वात महत्वाची बाब म्हणजे या करारनाम्याची माहिती जिल्हापरिषदेला सुद्धा नसते. जिल्हापरिषदेच्या सभागृहात याबाबत माहिती होत नाही. शालेय पोषण आहारावर प्रत्येक महिन्याला किती खर्च हातो, त्याची देखील माहिती दिली जात नाही. पंचायत समिती, शालेय पोषण आहार समिती हया विकासाचे अंग आहेत. त्यांना देखील याबाबत माहिती नाही. शालेय पोषण आहार समिती आणि मुख्याध्यापकांचे संयुक्त खाते आहे.

सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीसमोर असे मत व्यक्त केले की, मुख्याध्यापकांना पाठिंब्याची आवश्यकता आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, राज्याच्या दृष्टीकोनातून करारनामाही अतिशय गंभीर बाब आहे. शासन निर्णयामध्ये सर्व अटी, शर्ती, नियम नमूद केलेले आहेत. या निर्णयामध्ये मालाच्या संदर्भात, पुरवठादाराच्या संदर्भात, त्यांनी करावयाच्या कारवाई संदर्भात जे काही नमूद केले असेल त्या सर्व निर्णयाची अंमलबजावणी काटेकोरपणे केली पाहिजे. या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून आपण आपल्या स्तरावरून सर्वांना निदेश दिले पाहिजेत. त्या निदेशांची अंमलबजावणी केली पाहिजे आणि चांगल्या दर्जाचा माल खरेदी केला पाहिजे. कंत्राटदाराला पाठीशी घालता कामा नये. यासर्व निर्णयांची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. करारनाम्यामधील अटी आणि शर्ती हया शाळेच्या दर्शनी भागावर लावल्या पाहिजेत ही बाब कोठेही दिसत नाही. कोणत्याही शाळेमध्ये अशा प्रकारे दर्शनी भागावर माहिती लावली जात नाही. शाळेचा माल देखील व्यवस्थित ठेवला पाहिजे. त्यासाठी जागा असली पाहिजे. त्यासाठी सर्व यंत्रणा आहे. शिक्षक आहेत कर्मचारी आहेत, मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. त्यांनी त्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष भेटी दिल्या पाहिजेत. त्यामुळे असे प्रकार होणार नाहीत, सर्व यंत्रणा अद्ययावत होईल, या दृष्टीने कारवाई केली पाहिजे. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी असे मत व्यक्त केले की, ही जी यंत्रणा आहे त्यामध्ये ग्रामपंचायतीचा अंतर्भाव केला पाहिजे. यावर समितीने अशी विचारणा केली की, ग्रामपंचायतीचा प्रतिनिधी शाळा व्यवस्थापन समितीमध्ये असतो. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, ग्रामपंचायत प्रतिनिधी त्या समितीमध्ये असतो. तरी सुद्धा मुख्याध्यापकावरच कारवाई का करण्यात येते की, यंत्रणा ही ग्रामपंचायतीवर जबाबदारी टाकू शकत नाही.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हापरिषद, नागपूर यांनी सन २०११-१२ या वर्षामध्ये इयत्ता १ ली ते ८ वी तील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत रुपये ७,९३,००,७११ खर्च केला. लेखापरिक्षकांनी यासंदर्भात प्रमुख आक्षेप घेतला की, पूरक आहार दिल्याबाबत नोंदी आढळून येत नाहीत, शाळांमध्ये पिण्याचे शुद्ध पाणी पुरविल्याबाबतचे अभिलेख लेखापरिक्षणास सादर केले नाही आणि अखर्चित अनुदान शासनास परत केले नाही. यासंदर्भात जिल्हापरिषदेने समितीकडे लेखी खुलासा केला की, विद्यार्थ्यांना आठवड्यातून एक दिवस पूरक आहार दिला असून दैनंदिन साहित्य वापर नोंदवहीमध्ये घेतली आहे. जिल्ह्यातील तेरा तालुक्यांतील शाळांना मेडीक्लोर द्रावणाच्या बॉटलचा पुरवठा करण्यात आला होता. अखर्चित अनुदान खर्च करण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला साक्षी दरम्यान विदीत केले की, प्रत्येक शाळेमध्ये नोंदवही असते व त्यामध्ये कोणता आहार दिला त्याची नोंद केली जाते. मुलांना दिला जाणारा रोजचा पोषण आहार, आठवड्यातून एकवेळा द्यावयाचा पूरक पोषण आहार, मुलांना दिला जाणाऱ्या आर्यन व कॅल्शिअमच्या गोळया बाबतची नोंद या नोंदवही मध्ये ठेवलेली असते. शालेय पोषण आहार नोंदवहीमध्ये अन्नधान्य साठा इत्यादीची नोंद ठेवली जाते. त्याचबरोबर मुलांचे वजन, उंची व इतर संदर्भात एक वेगळी नोंदवही ठेवून त्यानुसार शालेय पोषण आहार योजनेचे अभिलेख ठेवले जातात. शालेय पोषण आहार नोंदवही ही योजनेचा गाभा असून ती अतिशय महत्वाची बाब असल्याचे विभागीय सचिवांचे साक्षीत स्पष्ट झाले. सदर नोंदवहीत शालेय पोषण आहार पुरवठादाराबरोबर शासनाने केलेल्या करारनाम्याची प्रत देखील जोडलेली असते अशीही माहिती समितीला प्राप्त झाली. शालेय पोषण आहारातील बहुतांश आक्षेप तसेच गैरव्यवहार हे पुरवठादाराबरोबर शासनाने केलेल्या करारनाम्याची प्रत सर्व संबंधित शाळा, शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी, गट शिक्षणाधिकारी, सरपंच, ग्रामसेवक, शालेय पोषण आहार समितीचे सदस्यांसहीत जिल्हापरिषदा व पंचायत समित्यांच्या सदस्यांना उपलब्ध करून देण्यात आलेली नसल्यामुळे होतात असे समितीचे स्पष्ट मत झाले आहे. विभागीय सचिवांचे साक्षीचे वेळी शालेय पोषण आहार नोंदवहीमध्ये करारनाम्याची प्रत अंतर्भूत केली असल्याचे निदर्शनास आले. वरील सर्व संबंधितांना माहिती अभावी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकडे सजगपणे लक्ष देता येत नाही, सदर योजनेची करारनाम्यानुसार अंमलबजावणी होते किंवा कसे याकडे त्यांना लक्ष देता यावे यासाठी नोंदवहीबरोबरच सदर करारनाम्याची प्रत वरील सर्व संबंधितांना स्वतंत्ररित्या उपलब्ध करून देणे आवश्यक आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. **सबब, पुरवठादाराबरोबर शासनाने केलेल्या करारनाम्याची प्रत सर्व संबंधित शाळा, शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी, गट शिक्षणाधिकारी, सरपंच, ग्रामसेवक, शालेय पोषण आहार समितीचे सदस्यांसहित जिल्हापरिषदा व पंचायत समित्यांच्या सदस्यांना उपलब्ध करून देण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्याच्या आत पाठवावी अशी समितीची शिफारस आहे.**

पुरवठादार जेव्हा शाळांमध्ये धान्यादी मालाचा पुरवठा करतो तेव्हा मुख्याध्यापकाने धान्याचे वजन करून घेणे आवश्यक असते. परंतू ५० कि.ग्रॅ. वजनाचे पोते ४५ कि.ग्रॅ. निघाले तरीही मुख्याध्यापकांना पोच पावतीवर ५० कि.ग्रॅ. धान्य मिळाले म्हणून स्वाक्षरी करावी लागते याचे कारण ग्राम विकास विभागाच्या सचिवांनी समितीस विदीत केले की, मुख्याध्यापक माझी चौकशी होईल किंवा दुसरे काही तरी करतील या भितीपोटी खरा अहवाल देत नाहीत. एवढेच नव्हे तर शासनाने धान्यादी मालाचा पुरवठा करताना जे नमूने मान्य केले आहेत ते नमूने प्रत्येक शाळेमध्ये ठेवणे बंधनकारक असून मुख्याध्यापकांनी पुरवठादाराने पुरविलेला माल त्या नमुन्याप्रमाणे आहे किंवा कसे याची देखील खात्री करणे आवश्यक असते. समितीने ज्या ज्या शाळांना भेटी दिल्या त्या शाळांमध्ये अशा प्रकारचे धान्यादी मालाचे नमुने आढळून आले नाहीत. मुख्याध्यापकाने स्वीकारलेल्या धान्यादी मालाची नोंद नोंदवहीमध्ये घेऊन त्यावर शालेय पोषण आहार समितीची दरमहा स्वाक्षरी घेणे आवश्यक असते व त्या दर तीन महिन्यांनी तपासणीकरिता सक्षम प्राधिकाऱ्यापुढे ठेवणे आवश्यक असते. परंतु एकाच वेळेला अनेक महिन्यांच्या स्वाक्षऱ्या नोंदवहीवर घेतल्या जातात त्यामुळे सदरहू योजना योग्य रीतीने राबविलेली नाही अशी समितीला शंका निर्माण झाली आहे. **अतः ग्राम विकास विभागाच्या सचिवांनी विदित केल्याप्रमाणे मुख्याध्यापक दबावापोटी ५० किलो ऐवजी ४५ किलो माल आला तरीही ५० किलोची पोच देत असेल तर कंत्राटदार त्यामधून निर्दोष सुटला जातो त्यामुळे त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी एखादी समिती असली पाहिजे असे सचिवांनी आश्वासित केले आहे. त्यानुसार एकट्या मुख्याध्यापकास जबाबदार धरण्यापेक्षा शालेय पोषण आहाराच्या पुरवठा, साठा याकरिता शालेय पोषण आहार समिती, ग्रामपंचायत व मुख्याध्यापक या सर्वांवर जबाबदारी विभागण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

या सर्व नोंदवह्या शाळास्तरावर असल्यामुळे त्या लेखापरिक्षणाचे वेळी उपलब्ध करून देण्यात आल्या नव्हत्या हे जरी खरे असले तरी सदर नोंदवह्या ह्या संबंधीतांकडून वेळच्या वेळी भरल्या जातात की नाही ते पाहणे देखील सर्व संबंधीत अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. नोंदवह्या अपूर्ण असल्यामुळे त्या लेखापरिक्षणास वेळीच उपलब्ध करून दिल्या जात नाहीत असे समितीचे मत आहे. कारण लेखापरिक्षणाचा कार्यक्रम लेखापरिक्षकांकडून पुर्वसूचना देऊन घेतला जातो, त्यामुळे काही शाळांच्या अशा नोंदवह्या लेखापरिक्षणाकरिता उपलब्ध करून देणे सहज शक्य होते. परंतू जिल्हा-परिषदेने त्या उपलब्ध करून दिल्या नाहीत. त्याचबरोबर शाळांमध्ये पिण्याचे शुद्ध पाणी पुरवठा करण्याचे निदेश मा.सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे असून त्याद्वारेच शासनाचे प्रत्येक शाळांमध्ये मुलांना शुद्ध पाणीपुरवठा करण्याचे आदेश असूनही जिल्ह्यातील सुमारे ३०० शाळांना अद्याप शुद्ध पाण्याचा पुरवठा केला जात नसल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली आहे. **लेखापरिक्षकांनी याबाबतचे अभिलेख मागविले असता जिल्हापरिषदेकडे केवळ अहवाल वर्षातील १,४४,६५० मेडीक्लोर द्रावण बॉटलचा पुरवठा आदेशाची प्रत केवळ असल्याचे निदर्शनास आले. याचा अर्थ पुरवठा आदेश दिला असल्यास पुरवठादाराचे देयक सर्व पंचायत समित्यांना द्रावण मिळाल्याच्या पोच पावत्या, उपयोगिता प्रमाणपत्र इत्यादी अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध करून देता आले असते. परंतू जिल्हापरिषदेने विभागीय सचिवांच्या साक्षीपर्यंत याबाबत कोणताही खुलासा केला नाही. त्यामुळे महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियमातील कलम ७ नुसार सर्व संबंधितांवर २५,००० रुपये दंड आकारुन त्याबाबतची नोंद त्यांच्या सेवापुस्तिकात घेऊन त्यांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात रोखण्याची कार्यवाही करावी तसेच जिल्ह्यातील सर्व शाळांना टप्प्याटप्प्याने पिण्याच्या शुद्ध पाण्याची व्यवस्था करण्यात यावी, याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठवावा अशीही समितीची शिफारस आहे.**

जिल्हापरिषदेकडे शालेय पोषण आहार योजनेतील सुमारे २७ कोटींपेक्षा अधिकची रक्कम अखर्चित राहिली होती ती शासनाची मंजूरी घेऊन खर्च करणे आवश्यक होते किंवा अखर्चित अनुदान शासनास परत करणे आवश्यक होते. यासंदर्भात जिल्हापरिषदेने शिक्षण संचालकांच्या परवानगीने सदर रक्कम खर्च करण्यात आल्याची माहिती समितीस दिली आहे. दरवर्षी शालेय पोषण आहाराकरिता निधी प्राप्त होतो व उपस्थित विद्यार्थ्यांना आहार वाटप करून त्याबाबतचे देयक विहित वेळेत अदा केले जाते. असे असताना २७ कोटींपेक्षा अधिकची अखर्चित रक्कम शालेय पोषण आहारात खर्च करण्यात आली आहे. त्यामुळे शिक्षण संचालकांना असा अखर्चित निधी खर्च करण्याची परवानगी देण्याचे अधिकार आहेत काय, याची स्पष्ट माहिती समितीस प्राप्त झाली नाही. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याची समितीला शंका निर्माण झाल्यामुळे समितीने चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निदेश दिले आहेत. समितीच्या निदेशानुसार केलेल्या चौकशीत कोणतीही अनियमितता झाली नसल्याचे व अखर्चित रक्कम शासन परवानगीच्या अधिन राहून पुढील वर्षात खर्च करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. **अखर्चित रक्कम शासनाच्या परवानगीने खर्च केली आहे की, शासन परवानगीच्या अधिन राहून खर्च करण्यात आली याबाबत समिती साशंक आहे. अतः प्रस्तुत प्रकरणात नागपूर जिल्हा परिषदेतील सन २०११-१२ ते सन २०१६-१७ या कालावधीतील शालेय पोषण आहार योजनेवर झालेला खर्च, अखर्चित निधी खर्च करण्यास परवानगी देण्याबाबत शिक्षण संचालकांना असलेले प्रदत्त अधिकार, त्यानुसार त्यांनी अखर्चित निधी खर्च करण्यात दिलेली उक्त कालावधीतील परवानगी, शाळांतील विद्यार्थ्यांची उपस्थिती, त्यासंदर्भातील सर्व नोंदवह्या इत्यादी सर्व समावेशक बाबींची साकल्याने चौकशी करण्यात यावी व त्यात दोषी आढळलेल्यांवर नियमानुसार कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात पाठवावा अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, नागपूर

## जिल्हा परिषद प्रशासकीय इमारत बांधकामाबाबत

**परिच्छेद ३.२५६ (सन २०११-१२)**

जिल्हा परिषद नागपूर उप विभाग नागपूर सन २०११-१२ सदर बांधकामावर १२ व्या देयकापर्यंत रुपये ७,८५,२३,३३३ इतका खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

सदर बांधकामाचे अंदाजपत्रकीय मुल्य रुपये ६,५१,०६,९६९ आहे. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र. झेडपीए-२००९/प्र.क्र.५१४/वित्त-९ मंत्रालय, मुंबई दिनांक २० नोव्हेंबर २००९ अन्वये रुपये ६४,२०० च्या स्टॅम्प पेपरवर करणे आवश्यक असतांना रुपये १०० चे स्टॅम्प पेपरवर केल्याने रुपये ६४,१०० इतक्या महसुलाचे नुकसान झाले आहे. तरी सदरची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

मुद्रांक महसुलाची रक्कम रु. ६४,१०० ची वसूली १४ व्या धावत्या देयकातून प्रमाणक क्रमांक ५५९, दिनांक ४ सप्टेंबर २०१५ अन्वये धनादेश क्र. ८८२३९४, नुसार वसूल करण्यात येऊन शासन खाती चलनाद्वारे जमा करण्यात आलेली आहे. चलनाची प्रत संलग्न.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २९ सप्टेंबर २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, कामाचा करारनामा रुपये ६४,२०० च्या मुद्रांका ऐवजी रुपये १०० च्या मुद्रांकावर कोणत्या नियमानुसार करण्यात आला आहे, या अनियमिततेस कोण जबाबदार आहे, वसूलपात्र मुद्रांक महसुलीची रक्कम रुपये ६४,१०० वसूल केली आहे काय, सदरहू कामाची सद्यःस्थिती काय आहे, ही वसूली केव्हा केली, यावर कार्यकारी अभियंता, बांधकाम यांनी समितीस विदित केले की, ६४ हजार १०० रुपयांची वसूली नंतर केलेली आहे. दिनांक ४ सप्टेंबर, २०१५ रोजी वसूली केलेली आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेने ठेकेदाराला सहा वर्षे पैसे वापरण्यास दिले. संबंधित अधिकाऱ्यांच्या पगारातून ही वसूली करावी. यावर कार्यकारी अभियंता, बांधकाम यांनी समितीस विदित केले की, हे काम रिव्हाईज झालेले आहे. यानंतर मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांनी समितीस विदित केले की, रिव्हाईज कामास शासनाची मान्यता आहे. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, सदर कामाचे अंदाजपत्रकीय मूल्य ६ कोटी ५१ लाख ६ हजार ९६९ इतके होते आणि आपण प्रत्यक्षात ७ कोटी ८५ लाख २३ हजार ३३३ इतका खर्च केलेला आहे. म्हणजे जवळपास १ कोटी ३५ लाख इतका अतिरिक्त खर्च केलेला आहे. या खर्चास सक्षम अधिकाऱ्याची मंजुरी नसताना हे देयक अदा कसे केले, यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता, बांधकाम यांनी समितीस विदित केले की, ७ कोटी ८५ लाख २३ हजार ३३३ या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळाली होती. हे काम जवळपास पूर्ण झालेले आहे. या कामामध्ये पदाधिकाऱ्यांनी काही सूचना केल्या त्यानुसार कामामध्ये वाढ झाली. त्या कामास शासनाकडून मान्यता मिळालेली आहे. यावर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेने मान्यता कधी घेतली, यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी समितीस विदित केले की, दिनांक ३ एप्रिल २०१३ रोजी मान्यता घेतली. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, अंदाजपत्रकापेक्षा जास्त रक्कम खर्च का केली, काम पूर्ण आहे असे सांगितले तर मग ६४ हजार १०० रुपयांची वसूली १४ व्या धावत्या देयकातून का केली, यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता, (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, या कामामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष महोदयांच्या दालनांचा समावेश झाल्यामुळे खर्च वाढला. यावर समितीने विचारणा केली की, या टेंडरमध्ये प्राईज एस्क्लेशन आहे काय, सदर प्रकरणास मुख्य अभियंत्याची तांत्रिक मान्यता घेतली होती काय, यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता, (बांधकाम) यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले. यावर अंदाजपत्रकापेक्षा जास्त खर्च झाला त्यास मान्यता घेतली काय, यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले, ६ कोटी ५१ लाख रुपयांचे सिलिंग टेंडर होते. परंतु जो खर्च वाढलेला आहे त्यामध्ये दोन लिफ्ट बसविण्यात आल्या शिवाय अध्यक्ष आणि उपाध्यक्षांच्या दालनांचा समावेश आहे. या कामाचे पुनर्नियोजन करण्यात आले. एकूण ११ कोटी रुपयांचे काम होते. त्यातील सिव्हील कामासाठी ६ कोटी रुपये होते. ११ कोटी रुपयांपैकी १० कोटी रुपये राज्य शासन देणार होते आणि १ कोटी रुपये जिल्हा परिषद देणार होते. या कामामध्ये सिव्हीलचे मूळ टेंडर ६ कोटी ५१ लाख रुपयांचे होते. इलेक्ट्रीकचे टेंडर वेगळे होते. लिफ्टचे टेंडर वेगळे होते. प्रत्येक उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दालने वातानुकुलित करण्यात येणार होती. या कार्यक्रमाला तत्कालीन उप मुख्यमंत्री यांनी अध्यक्षांचे व उपाध्यक्षांचे दालन वातानुकुलित करण्यास सांगितले. एकूण ११ कोटी रुपयांचे बजेट १२ कोटी ६४ लाख झाले आणि या सुधारित खर्चास मान्यता मिळालेली आहे. अधीक्षक अभियंता यांचेकडून तांत्रिक मान्यता घेण्यात आली होती. शासनाकडे सुधारित प्रशासकीय प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. शासनाने सुधारित प्रशासकीय प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. तांत्रिक मान्यता घेऊन शासनाकडे अंदाजपत्रक पाठविण्यात आले होते. त्यानंतर शासनाकडून प्रशासकीय मान्यता मिळाली.

यावर समितीने अशी विचारणा केली की, या प्रकरणी सखोल चौकशी करावी. त्यात अनियमितता झाली असल्यास संबंधितांविरुद्ध दंडात्मक कारवाई करून त्याबाबतचा अहवाल एक महिन्यात समितीकडे सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्द्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

जिल्हा परिषद प्रशासकीय इमारत बांधकामाबाबत वाढीव कामाचे पुर्ननियोजित करण्यात आल्याबाबतची तसेच त्यात अनियमितता झाल्या प्रकरणी चौकशी करून केलेल्या कारवाईची माहिती समितीस देण्यात यावी.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत राज समितीने दिलेल्या निर्देशास अनुसरून नागपूर जिल्हा परिषद नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाचे पुर्ननियोजन व अनियमिततेबाबत चौकशी करणेसाठी कार्यकारी अभियंता बांधकाम यांची दिनांक ३ ऑक्टोबर २०१५ रोजी नियुक्ती करण्यात आली होती.

या प्रकरणी त्यांनी सादर केलेल्या अहवालातुन निष्कर्ष थोडक्यात खालील प्रमाणे आहे.

(१) सदर कामाचे प्राकलनानुसार वाढीव बाबीचे परिणामास वेळोवळी बांधकाम समिती, स्थायी समिती व जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा तसेच शासनाची परवानगी घेतलेली आहे.

(२) सद्यःस्थितीत काम पुर्ण झालेले असून सुधारित प्रशासकीय मान्यता, सुधारित तांत्रिक मंजुरी व कलम ३८ नुसार १२५ टक्के पेक्षा जास्त वाढीव परिणामाच्या बाबीस सक्षम अधिकारी अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर यांचेकडून कार्योत्तर मंजुरी घेतलेली आहे.

उपरोक्त बाबीची कामाबाबत निकड लक्षात घेता वरीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे. वरील बाबी ग्राह्य धरून मुद्दा निकाली काढण्यात यावा ही विनंती.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्राम विकास विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी विभाग सहमत आहे.

### चौकशी अहवाल

### कामाचे नाव : जिल्हा परिषद नागपूर, नवीन प्रशासकीय इमारत बांधकाम

जिल्हा परिषद नागपूर, नवीन प्रशासकिय इमारत बांधकामास शासन निर्णय क्रमांक जिपई २००७/प्र.क. १८०/प.स- ७, दिनांक ७ एप्रिल, २००८ ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई अन्वये रुपये ११,००,३७,३०० ला प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती व त्यानुसार स्थापत्य भागाचे तांत्रिक मान्यता पत्र. क्र. ५०२७ दि.२०/११/२००८ तांत्रिक मान्यता क्र. ५८/मु.अ./२००८-०९ नुसार रुपये ६,५१,०६,९६९ रकमेला प्रदान करण्यात आली व निविदा प्रक्रिया केल्यानंतर मे. सी. एम. एम. इंफ्राप्रोजेक्टस् लि., जि. नागपूर यांची सर्वात कमी म्हणजे ५.५१ टक्के कमी दराची स्विकृत करण्यात येऊन, कार्याभार आदेश पत्र क्र. जिपना/बांध-३/निविदा/५/०९, दिनांक १ जानेवारी २००९ अन्वये करारनामा क्र. बी१/१६४/२५१५/आर.डी.पी./२००८-०९ करण्यात आला. मंजूर आराखड्यानुसार कामाला सुरूवात करण्यात आली. तांत्रिक मान्यतेतील सुचनांचे अनुषंगाने सविस्तर आर.सी.सी. संकल्पन अधिक्षक अभियंता यांचेकडे पत्र क्र.२०२०/०९, दिनांक १९ मार्च २००९ नुसार सादर केले व अधिक्षक अभियंता यांचे सुचनेनुसार विश्वेश्वरैया राष्ट्रीय प्रऔद्योगिक संस्था, नागपूरचे मार्फत तपासणी करून त्यांचे पत्र क्र.एएम/आरकेआय/४११/५२१५, दिनांक ५ ऑक्टोबर २००९ अन्वये मान्यतेकरिता अनुमोदित करण्यात आले व त्यानुसार अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्र.तां.वि./प्र.अ.४/९७६५/२००९, दिनांक ३१ डिसेंबर २००९ अन्वये संकल्पन मंजूर केले.

वेळोवेळी होणाऱ्या सुचना व बदलांचे दृष्टीने तसेच वास्तुशास्त्रज्ञ यांचे सुचनांचे अनुषंगाने व आवश्यकतेनुसार या कामात अधिक्षक अभियंता यांचे कार्यालयातून त्यांचे पत्र क्र. ६०५९, दिनांक ४ जून २०१० अन्वये अतिरिक्त बाब दरसुची क्र. १ रुपये ८७,३३,४४३ व पत्र क्र. ११०५६, दिनांक २१ नोव्हेंबर २०११ अन्वये अतिरिक्त बाब दरसुची क्र.-२ रुपये ११,८०,५८७ ची मंजूर करण्यात आली. त्यामुळे स्थापत्य भागाची एकूण किंमत रुपये ७,१४,३३,६०५ झाली, वारंवार सुचनांचे अनुषंगाने होणारे बदल व वाढणारी किंमत लक्षात घेता ह्या कार्यालयाचे पत्र क्र.५८७५/११, दिनांक ११ ऑक्टोबर २०११ अन्वये शासनाकडे अधिक्य खर्चाचा प्रस्ताव सादर करण्यात आला. तसेच जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा, दिनांक २ डिसेंबर २०११ च्या सभेत विषय क्र. १० (१८) ठराव क्र. २८ अन्वये अधिक्य खर्चाच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात आली. परंतु दिनांक २३ नोव्हेंबर २०११ ला उद्घाटन प्रसंगी मा. अध्यक्ष व उपध्यक्षांनी मागणी केल्यानुसार तत्कालिन मा. उप मुख्यमंत्री महोदयांनी या इमारतीमध्ये मा. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे दालन समाविष्ट करावे अशा सुचना केल्यात, त्यानुसार त्यांचे कक्षाकरिता तळ मजल्यावरील मुळ व्यवस्थेत बदल करून अध्यक्ष व उपाध्यक्ष महोदयांकरिता कक्ष निर्मितीचा प्रस्ताव पत्र क्र २ (१) १८७७/१२ दिनांक २८ मार्च २०१२ अन्वये रुपये ३१,७१,८०० करिता शासनाकडे

सादर करण्यात आला, अधिक्य खर्चाचा प्रस्ताव व दालने निर्मीतीचा प्रस्ताव एकत्रित करून सुधारित सविस्तर प्राकलन करण्याच्या सुचनाचे अनुषंगाने उप सचिव यांचे पत्र जिपई-२०११/प्र.क्र.२००/पं.रा.-७, दिनांक २८ मे २०१२ नुसार सुचनाचे अनुषंगाने या पत्र क्र. २ (१)/२०१२, दिनांक १७ मे २०१५ अन्वये सविस्तर सुधारित प्राकलन रुपये १३,९६,७२,००० रकमेकरिता सुधारित प्रशासकिय मान्यता मिळणेकरीता अधीक्षक अभियंता यांचेकडे सादर केले व त्यांची सविस्तर पडताळणी करून मुख्य अभियंता यांचेकडे पत्र क्र.ता.वि./प्र.अ.८/९७१७/२०१२, दि. ७ सप्टेंबर २०१२ अन्वये सुधारित प्रशासकिय मान्यता प्राप्त करणे करिता शासनाकडे सादर करणेस्तव मिळाले. त्यानुसार पत्र क्र.२ (१) ५४३७/२०१२, दिनांक ७ सप्टेंबर २०१२ नुसार उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सुधारित प्रशासकिय मान्यता मिळणेस्तव सादर करण्यात आले.

मंत्रालय मुंबई येथे पाठपुरावा करून सदर प्राकलन हे २६-९६ टक्के अधिकचे असल्यामुळे उप सचिव तपासणी करताना केलेल्या मौखिक सुचनाचे आधारे काही बाब ज्या कार्यान्वित झाल्या नव्हत्या किंवा मूळ प्राकलनात समाविष्ट नसल्यामुळे वगळण्याच्या सुचनेमुळे सदर प्राकलनात रुपये १२,६४,३४,५०० पर्यंत कमी करण्यात येऊन १५ टक्के च्या मर्यादेत सुधारणा करून देण्यात आली व शासन निर्णय क्रमांक जिपई-२०१२/ प्र.क्र.२६०/पं.रा.७, ग्राम विकास विभाग, मुंबई, दिनांक ९ एप्रिल २०१३ अन्वये सुधारित प्रशासकिय मान्यता रुपये १२,६४,३४,५०० करिता घेण्यात आली.

दिनांक २९ सप्टेंबर २०१५ ते १ ऑक्टोबर २०१५ पर्यंत झालेल्या पंचायत राज समिती मध्ये उपस्थित मुद्यांचे अनुषंगाने पत्र.क्र.२(१)/७२९८, दिनांक १७ ऑक्टोबर २०१५ नुसार अंतिम झालेल्या परिणामानुसार रुपये ८,४६,८३,००० किंमतीचे सुधारित तांत्रिक मान्यतेकरिता सादर करण्यात आले आहे. तसेच मूळ प्राकलनातील मंजूर परिमाणामध्ये १२५ टक्के पेक्षा जास्त खर्च झालेल्या बाबींचे कलम ३८ नुसार जास्त झालेल्या परिमाणाला व खर्चाचे मंजूरीकरिता प्रस्ताव क्र. ८२३५, दिनांक २३ नोव्हेंबर २०१५ अन्वये अधीक्षक अभियंता यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे.

त्यानुसार अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर यांचे पत्र क्र. का. ३ (११) / निविदा/४७०, दिनांक १८ जानेवारी २०१६ अन्वये कामातील वाढीव बाबीचे परिमाणास मान्यता प्राप्त झालेली आहे व तसेच मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर यांचे मंजूर अंदाजपत्रक क्र. ३५६/ मु.अ./२०१५-१६ रुपये ८,४६,८२,८४२ ला दिनांक २५ जानेवारी २०१६ अन्वये सुधारित तांत्रिक मान्यता प्राप्त झालेली आहे.

सकृतदर्शनी या कार्यालयाचे पत्र दिनांक ०६ ऑक्टोबर २०१५ रोजी तत्कालीन कार्यकारी अभियंता यांना देण्यात आलेले असून त्यांचा खुलासा दिनांक २० ऑक्टोबर २०१५ ला प्राप्त झालेला आहे. त्यानुसार वाढीव परिमाणास वेळोवेळी बांधकाम समिती, स्थायी समिती व जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा तसेच शासन स्तरावरून परवानगी घेण्यात आली असून कामात अनियमितता न झाल्याचे निदर्शनास येत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ ऑक्टोबर २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषद प्रशासकीय इमारत बांधकामाबाबत वाढीव कामाचे पुर्नविनियोजित करण्यात आल्याबाबतची तसेच त्यात अनियमितता झाल्या प्रकरणी चौकशी करून केलेल्या कारवाईची माहिती समितीस देण्यात यावी. यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, मुख्य आक्षेप हा इमारतीच्या बांधकामासाठी झालेल्या वाढीव खर्चाबाबत आहे. सदर कामामध्ये १ कोटी रुपये एवढा जिल्हा परिषदेला तर ९.५ कोटी रुपये एवढा हिस्सा शासनाचा होता. सिव्हिल वर्कमध्ये १ कोटी ९५ लाख रुपये जादा झालेला आहे. हे प्रामुख्याने आर.सी.सी. डिझाईनमध्ये वाढ झाल्यामुळे हा जादा झालेला आहे. ती वाढ ७८ लाख रुपये आहे. आपल्या प्लॅनमध्ये मोठे हॉल्स होते. या हॉलमध्ये पार्टीशन्स व फर्निचर बसविण्यासाठी ८० लाख रुपये असा एकूण १ कोटी ६० लाख रुपये हा टाळता न येण्याजोगा खर्च होता. अंदाजपत्रकाला वेळेत मंजुरी घेतलेली आहे व कोठेही अनियमितता झालेली नाही.

समितीने विचारणा केली की, सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यासाठी एवढा वेळ का लागला, यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, उपरोक्त दोन्ही कामांसाठी जादा आयटेम दरपत्रक तयार करून घेण्यात आले होते. या प्रकरणी टिप्पणी सादर केली होती. ज्या-ज्या वेळी या बाबी उद्‌भवल्या त्या-त्या वेळी जिल्हा परिषदेच्या कार्यकारिणीची देखील मंजुरी घेतलेली आहे. अधीक्षक अभियंता व शासनालाही कळविलेले आहे. यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, या इमारतीचे काम सन २००९ मध्ये सुरू झाले त्यासाठी २ वर्षाची कालमर्यादा होती. परंतु ते पूर्ण होण्यासाठी साडेतीन वर्षाचा कालावधी लागला. आर.सी.सी. डिझाईनसाठीच सुमारे १ वर्षाचा कालावधी लागला. व्ही.एन.आय.टी कॉलेजला सबमिट करून त्याला मंजुरी घेतल्यानंतर काम सुरू झाले यावर समितीने अशी विचारणा केली की, डिझाईन तर अगोदर केली आहे. वर्क ऑर्डर दिल्यानंतर २४ महिन्यांमध्ये काम का झाले नाही, त्याला दीड वर्ष जास्त का लागले, यावर

सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, जुनी इमारत हेरिटेज इमारत होती. त्यामुळे नवीन इमारत मागे घेण्यास सांगण्यात आले. यावर समितीने अशी विचारणा केली की, असे असताना आराखडा सुरुवातीस मंजूर कसा झाला, सुरुवातीचा आराखडा न पाहता मंजूर करण्यात आला का, हेरिटेज समितीने का आक्षेप घेतला, अगोदर त्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात आले नव्हते का, की त्यांच्या ना-हरकत प्रमाणपत्राची गरज नव्हती. यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, इमारतीचे काम सुरू करण्याच्या वेळी हेरिटेज समितीने आक्षेप घेतला होता, यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, सदर प्रकरणी कार्यवाहीचे काम सुरू होते. समितीने पुढे अशी विचारणा केली की, कार्योत्तर मंजुरीच्या अधिन राहून सर्व कामे केली, सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी दोन वर्षे का लागली माहिती विभागाने द्यावी. यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, दिनांक २८ मे २०१२ रोजी शासनाकडे प्रकरण दाखल करण्यात आले त्यानंतर ज्या बाबी एक्झिक्युट झाल्या नव्हत्या परंतु आवश्यक आहेत असा अहवाल आला होता, त्या कमी करून १५ टक्क्यांच्या आत बसविण्याबाबत सांगण्यात आले. दिनांक ९ एप्रिल २०१३ रोजी सुधारित प्रशासकीय मान्यतेस मंजुरी मिळाली. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारीतीचे काम पूर्ण झालेले आहे. सुधारित प्रमाणपत्र मान्यतेला विलंब झाल्यामुळे कामाची किंमत वाढली. त्यामुळे याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी, यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, अंदाजपत्रकाला उशीर लागल्यामुळे किंमत वाढलेली नाही. दिनांक ३१ जुलै २०१२ रोजी काम पूर्ण झालेले आहे. जोपर्यत सुधारित प्रमाणपत्रक मंजूर होत नाही तोपर्यंत वाढीव देयक देता येत नाही. त्यामध्ये बरेच प्रश्न असतात, ते पुन्हा पाठविले जाते. तपासणी करून प्रकरण वित्त विभागाकडे जाते. यावर समितीने अशी विचारणा केली की, याबाबत तात्काळ कार्यवाही होणे आवश्यक होते. या इमारतीचे काम चांगल्या प्रकारचे झालेले आहे. सुधारित प्रशासकीय मान्यतेस वेळ का लागला याची माहिती विभागाने द्यावी. यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, सुधारित प्रशासकीय मान्यता घेताना बऱ्याच गोष्टी तपासल्या जातात त्यामुळे वेळ लागतो. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, या सर्व प्रकरणांबाबत तात्काळ कार्यवाही करण्यासाठी वेळच्या वेळी तपासणी करून पुढील काळात असा विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच यामुळे शासनाला वाढीव खर्च करावा लागणार नाही. याबाबतची देखील काळजी घ्यावी. तसेच लेखा परिक्षणाचे आक्षेपाचे आणखी किती परिच्छेद प्रलंबित आहेत, यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, ६६०३ परिच्छेद प्रलंबित आहेत. यावर समितीने असे निदेश दिले की, प्रशासकीय व्यवस्थेत आवश्यक त्या सुधारणा करून गंभीर स्वरूपाचे आक्षेप तात्काळ निकाली काढावेत.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, नागपूरच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामावर सन २०११-१२ मध्ये १२ व्या देयकापर्यंत ७,८५,२३,३३३ इतका खर्च नोंदविण्यात आला. यासंदर्भात लेखापरिक्षकांनी कामाच्या अंदाजपत्रकीय मूल्यांवर ६४,२०० ऐवजी १०० रुपयांचे मुद्रांक शुल्क आकारले असल्याचा आक्षेप घेतला होता. सदरहू आक्षेपावर जिल्हा परिषदेने ६४,१०० या मुद्रांक महसुलाची वसुली दिनांक ४ मे २०१५ रोजी करण्यात आल्याचा लेखी खुलासा केला.

प्रस्तुत प्रकरणात कार्यकारी अभियंत्यांनी मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या कलम ३४ नुसार त्यांच्या समोर निष्पादीत झालेल्या दस्तांवर योग्य ते मुद्रांक शुल्क भरले आहे की नाही याची पडताळणी करणे आवश्यक होते. समितीने नागपूर जिल्हा परिषदेला भेट दिली नसती तर समितीच्या बैठकीपूर्वी दिनांक ४ सप्टेंबर २०१५ रोजी शासकीय महसूलाची रक्कम वसुल झाली नसती. सदर मुद्रांकाच्या फरकाची रक्कम ५ वर्षे विलंबाने भरली आहे त्यामुळे शासनाचे नुकसानच झाले आहे. **त्यामुळे शासन परिपत्रक दिनांक २० नोव्हेंबर २००९ अनुसार योग्य शुल्क भरून घेण्याची जबाबदारी ज्या अधिकाऱ्यावर होती त्या अधिकाऱ्यावर कारवाई करणे आवश्यक आहे अन्यथा असा प्रकार यापुढील काळात सुरू राहील. अतः प्रस्तुत प्रकरणात मुद्रांकाची रक्कम भरून घेतली नसल्याबाबत सर्व संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा नियमांतर्गत कारवाई करून तत्संबंधीत अहवाल समितीस शिघ्रतेने सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्रस्तुत प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय सचिवांच्या साक्षी दरम्यान प्रशासकीय इमारतीच्या कामाच्या परिमाणात १२५% पेक्षा अधिक वाढ झाली हा मुद्दा समिती समोर आला. नागपूर जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास रुपये ११,००,३७,३०० ला प्रशासकीय मान्यता शासनाने दिलेली होती. वेळोवेळी होणाऱ्या सूचना व बदलांचे दृष्टीने आवश्यकतेनुसार अतिरिक्त बाबींचा बांधकामात समावेश झाला. बदल व वाढणारी किंमत लक्षात घेऊन जिल्हा परिषदेने शासनाकडे दिनांक ११ सप्टेंबर २०११ रोजी अधिक्य खर्चास मान्यता देण्याबाबत शासनास विनंती केली. तद्नंतर लोकप्रतिनिधींच्या सूचनेनंतर आणखी बदल करून जिल्हा परिषदेने सुधारित अधिकच्या खर्चाचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेकरिता दिनांक २८ मार्च २०१२ रोजी पाठविला. परंतु उक्त प्रस्तावास सुमारे ४ वर्षांनंतर शासनाने दिनांक १८ जानेवारी २०१६ रोजी कामातील वाढीव बाबीचे परिमाणास मान्यता दिली, असे करताना मूळ प्राकलनातील मंजूर परिमाणामध्ये १२५ पेक्षा जास्त वाढ झाली. शासनाची मान्यता प्राप्त होण्यास सुमारे चार वर्षांचा विलंब झाला आहे ही बाब समितीला अत्यंत गंभीर वाटते. यामुळे कामाच्या वाढीव परिमाणास मान्यता देताना दरसूची

मध्ये निश्चितच वाढ झाली व कामाची किंमत वाढली आहे. समितीच्या साक्षी दरम्यान विभागीय सचिवांनी सुधारित मान्यतांना लागणाऱ्या विलंबाचे समर्थन करणे ही बाब देखील समितीस अनाकलनीय वाटते. **माहिती तंत्रज्ञानाच्या आधुनिक काळात सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास सुमारे ४ वर्षांचा अवधी लागावा ही बाब समर्थनीय नाही, अशा विलंबाने देण्यात येणाऱ्या मंजुरीबाबत कोणतेही सबळ कारण समितीपुढे आले नाही. मूळ प्राकलनापेक्षा सुमारे १२५ टक्के वाढ होणे म्हणजे हा जनतेच्या पैशाचा होणारा अपव्यय आहे. याच वाढीव पैशात त्यात मूळ काम वेळेवर केले असते तर त्यात अजून चांगले काम झाले असते व पैशाचीही बचत झाली असती. परंतू शासन स्तरावर होणाऱ्या विलंबाची दखल ही कोणत्याही परिस्थितीत शासनाने घेणे आवश्यक आहे असे समितीला वाटते. यास्तव यापुढील काळात प्रशासकीय/तांत्रिक मंजुरीसाठी येणारे प्रस्ताव शासनाच्या संबंधित विभागाने तातडीने निकाली काढण्यासंदर्भात शासनाने कठोर पावले उचलून अशा प्रस्तावांना मान्यतेसाठी कोणत्याही परिस्थितीत ३ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लागणार नाही, यास्तव शासनाने पुन्हा नव्याने कडक स्वरूपाच्या मार्गदर्शक सूचना अथवा शासन निर्णय निर्गमित करावा व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्यांत पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण दहा

## जिल्हा परिषद, नागपूर

### श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान कोराडी येथे चारचाकी वाहनतळ बांधकामाबाबत

**परिच्छेद ३.२५७ (सन २०११-१२)**

जिल्हा परिषद, नागपूर उपविभाग नागपूर अंतर्गत सन २०११-१२ मध्ये सदर बांधकामावर रुपये ४४,७९,१७७ इतका खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) सदर कामाचे अंतिम मोजमापाप्रमाणे अंदाजपत्रकातील बाब क्र.१ मध्ये ३३५९ क्युबिक मीटर रुपये ७,७२,९९१ इतक्या रकमेचे जादा कार्य केले आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम परिपत्रक क्र. संकिर्ण २००४/प्र.क्र.८५/रस्ते, दिनांक ११ जून २००४ तसेच निविदा कलम ३८ मधील तरतुदीप्रमाणे एखाद्या बाबीचे २५ % किंवा रुपये ५,००० जे कमी असेल यापेक्षा जादा काम होत असल्यास शासन परिपत्रकातील निदेशाप्रमाणे काम करणे आवश्यक असताना निर्देशाचे पालन न केल्याने जादा कामाचे रुपये ७,७२,९९१ प्रदान नियमबाह्य आहे.

(२) शासन निर्णय क्र. जि.प.२/२००९/प्र.क्र.१८०/पंरा-८/ दिनांक ३१ डिसेंबर २००९ अन्वये कामाची माहिती दर्शविणारा फलक लावण्यात आला नाही.

(३) अंदाजपत्रकातील तरतूद केलेल्या बाब क्र.७,८,९,१०,१३ मधील कामाच्या बाबी कार्यान्वित केले नसल्याने काम केले नाही. वरील बाबींचे काम न करण्याचे कुठलेही कारण दर्शविण्यात आले नाही. रक्कम मूल्य रुपये ७,७६,१६२ अंदाजपत्रकात समाविष्ट केले असल्याचे शासन परिपत्रक क्र. झेडपीएस-१०९४/प्र.क्र.३४, दिनांक ३१ ऑक्टोबर १९९४ सदर कामाची तपासणी अधिक्षक अभियंता यांनी करणे आवश्यक असतांना केलेली नाही. अंदाजपत्रकानुसार काम न करणे तांत्रिकदृष्ट्या योग्य नाही. याबाबत अधिक्षक अभियंता यांचा तपासणी अहवाल सादर करण्यात यावा. तरी रक्कम रुपये ७,७२,९९१ वसूल होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) कामाच्या मूळ प्राकलनात १३,०९३ घन मीटर मातीकाम करण्याबाबत तरतूद करण्यात आली होती. काम करण्याच्या ठिकाणी दलदलीचा परिसर असल्याने मुरुम आच्छादन, ८० मिलीमिटर खडीकरण व त्याला समपातळीत आणून त्यावर काँक्रीट व मोल्डड इंटर लॉकींग पेव्हमेंट तयार करणे असा वाढीव वाव मूळ प्राकलनात अंतर्भूत करण्यात आला. प्रत्यक्ष कामाचे वेळी पृष्ठभाग समतल करीत असतांना प्राकलनातील तरतुदी पेक्षा जास्त भरण भरणे गरजेचे होते. मूळ पातळी समतल झाल्याशिवाय त्यावरील पुढील थर देणे शक्य नसल्यामुळे अधिकचे भरण करून पृष्ठभाग समतल करणे प्राधान्याने करण्यात आले. त्यामुळे झालेल्या अतिरिक्त ३३५९.३७ घन मीटर कामासाठी कामाचे सुधारित प्राकलन तयार करून त्याला सक्षम अधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे.

(२) कामाच्या ठिकाणी कामाची माहिती दर्शविणारा फलक लावण्यात आला आहे.

(३) काम करित असताना बाब क्र. १ भरण भरणेचे कामावर रु. ७,७२,९९१ चा खर्च अधिकचा झाला. कामाकरिता मंजूर तरतुदीच्या अधिन राहून काम करण्याच्या दृष्टीने बाकी बाब वगळून काम पूर्ण करण्यात आले. कामाचे तुलनात्मक तक्त्यात व सुधारित प्राकलनात इतर बाबी वगळण्याची कारणे नमूद करण्यात आली आहेत. तुलनात्मक तक्त्याची प्रत सोबत जोडलेली आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २९ सप्टेंबर २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, बाब क्रमांक १ संबंधी कामामध्ये झालेल्या वाढीव खर्चाचे मूळ अंदाजपत्रक तयार करताना पृष्ठभाग समतल करण्याची बाब विचारात घेण्यात आली नव्हती का, चुकीचे अंदाजपत्रक तयार करण्यास कोण जबाबदार आहेत, जादा परिणामास सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्व मंजुरी का घेण्यात आली नाही, सुधारित प्राकलन कोणत्या दिनांकास तयार करण्यात आले, त्यावर सक्षम अधिकारी म्हणून कोणत्या अधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता घेण्यात आली, कामाच्या मूळ ठिकाणी कामाचा फलक केव्हा लावण्यात आला, यावर कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी समितीस विदित केले की, कामाच्या मूळ प्राकलनात १३,०९३ घन मीटर मातीकाम करण्यात आले. परंतु प्रत्यक्ष कामाला सुरुवात केल्यानंतर मातीकामाकरिता केलेल्या तरतुदीमध्ये पूर्ण मातीकाम होणार नसल्याचे निदर्शनास आले. यामुळे जादा खर्च करावा लागला. याकरिता सुधारित मंजुरी सुद्धा प्राप्त करून घेण्यात आली. यावर समितीने अशी विचारणा केली की, अंदाजपत्रकात ७,७२,९९१ रुपयांचे जादा काम झाले आहे. अंदाजपत्रक तयार करीत असताना त्याच वेळी जास्त तरतूद का करण्यात आली नाही, सुधारित प्राकलन कोणत्या तारखेला

मंजूर केले, यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, कामाच्या ठिकाणी दलदलीचा भाग असल्यामुळे कामामध्ये वाढ झाली. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, अंदाजपत्रक तयार करीत असताना प्रत्यक्षात साईटवर जाऊन तपासणी केली जाते. त्यावेळी आपण सर्व बाबींचा विचार करणे आवश्यक होते. यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, तलाव व दलदलीचा भाग असल्यामुळे बॅक वॉटर येत असल्यामुळे कामामध्ये वाढ झाली.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, बॅक वॉटर कोणत्या ठिकाणापर्यंत येऊ शकते, ही बाब समजली नाही का, बॅक वाटर येत असताना तेथे तुम्ही कसे काम केले, बॅक वॉटरच्या ठिकाणी कामाला मंजुरी मिळू शकत नाही, चुकीचे रेकॉर्डवर येता कामा नये. या प्रकरणी जाणीवपूर्वक चूक झाली आहे की अनावधनाने चूक झाली आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, नागपूर जिल्ह्यातील कोराडी देवस्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याच्या आजूबाजूला जागा उपलब्ध नव्हती. बाजूला दलदलीचा भाग व तलाव होता. कोराडी येथे नवरात्रीच्या वेळी मोठ्या संख्येने येणाऱ्या पर्यटकांच्या वाहनांच्या पार्किंगकरिता जागा उपलब्ध नव्हती. यामुळे दलदलीच्या ठिकाणी भराव करून पार्किंगची व्यवस्था करण्याचे ठरविले. यावर समितीने अशी विचारणा केली की, तेथे दलदलीचा भाग असल्याबाबत समितीला माहिती देण्यात आली. परंतु संबंधित अधिकारी तेथे नंतर बॅक वॉटर येत असल्याचे सांगत आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, या संदर्भात तत्कालीन पालकमंत्र्यांनी कामाच्या ठिकाणी भेट देऊन अशी सूचना केली होती की, पेव्हर ब्लॉक बसविण्याऐवजी पूर्ण भराव टाकावा. यामुळे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले व कामामध्ये वाढ झाली. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदर कामाच्या अंदाजपत्रकात पुढील बाबी कार्यान्वित करण्यात आल्या नाहीत. बाब क्रमांक ७ - एसएस खडी, १०९.८० घनमीटर, मूल्य रु.७५,३३९, बाब क्रमांक ८ - प्रोव्हीडिंग ॲण्ड लेईंग सिमेंट, ६२.२० घनमीटर, १:४:८, मूल्य रु.१,६२,१२१, बाब क्रमांक ९ - प्रोव्हीडिंग ॲण्ड लेईंग सिमेंट कॉंक्रिट, १९.८० घनमीटर, मूल्य रु.१,०४,५६७, बाब क्रमांक १० - प्रोव्हीडिंग ॲण्ड फिक्सिंग आरसीसी पाईप, १३८६ मीटर, मूल्य रु.६१,८९५, बाब क्रमांक १३ - प्रोव्हीडिंग रबर पेव्हींग ब्लॉक,६६० चौ.मीटर, मूल्य रु.३,७२,२४० उक्त १ ते ५ बाबींचे मूल्य रु.७,७६,१६२ इतके आहे. ही जादा रक्कम मूळ अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात आली नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, पूर्वीच्या कामात पार्किंग लॉट करीत असताना पेव्हर ब्लॉक केल्यास पार्किंगला अडथळा येऊ शकतो, यामुळे तत्कालीन पालकमंत्र्यांनी अशी सूचना केली की, उक्त सर्व बाबी वगळून सुधारित अंदाजपत्रक करून प्लेन वाहनतळ करावे. सुधारित अंदाजपत्रक तयार करून उक्त बाबी वगळण्यात आल्या. तेथे नवरात्रीकरिता मोठा पार्किंग लॉट तयार करण्यात आला, यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, बाब क्रमांक १ साठी सुधारित अंदाजपत्रकाची क्वॉंटिटी किती होती, यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, प्रथम १३,०९३ घनमीटर मातीकाम होते, सुधारित अंदाजपत्रक तयार करून त्यात १६,४५२ घनमीटर पर्यंत वाढ करण्यात आली.

संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस विचारणा केली की, निविदा कलम ३८(२) नुसार कामामध्ये एवढी वाढ करता येऊ शकते का, दिनांक ११ जून २००४ च्या शासन परिपत्रकानुसार कामाकरिता अधिक्षक अभियंता यांची मंजुरी घेणे आवश्यक नव्हते का, यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, २५ टक्क्यांपर्यंत काम वाढविता येते. परंतु त्यापेक्षा जास्त काम वाढल्यास सक्षम अधिकाऱ्यांची मंजुरी घेणे अत्यावश्यक आहे. सदर कामासंबंधी तत्कालीन पालकमंत्र्यांनी सूचना केल्या होत्या. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस विचारणा केली की, पालकमंत्र्यांनी सूचना केली, तसेच कामाची आवश्यकता असल्यामुळे काम करणे गरजेचे आहे. परंतु वाढीव कामाकरिता नियमानुसार सक्षम अधिकाऱ्यांची मंजुरी घ्यावयाची नाही का, यावर जिल्हा परिषदेकडून उत्तर प्राप्त झाले नाही. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, कामाच्या मूळ प्राकलनात १३०९३ घनमीटर काम करण्याबाबत तरतूद करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात काम करीत असताना १६४५२ घनमीटरचे काम करण्यात आले, यामुळे सदर कामाकरिता ७,७२,९९१ रुपयांचा जास्त खर्च झाला. अशा प्रकारे कामामध्ये २५ टक्क्यांपर्यंत वाढ झाली. अशा पद्धतीने कामामध्ये २५ टक्क्यांपर्यंत वाढ होणार असल्यास काही उपयोग नाही. जबाबदार अधिकारी आहात. अशा पद्धतीने कामामध्ये वाढ होणार असल्यास ही बाब योग्य नाही. यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता, (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, कामाची अतिशय निकड होती. त्यामुळे प्रतिकूल परिस्थिती असतानाही तेथे काम करावे लागले.

समितीने आणखी अशी विचारणा केली की, मूळ अंदाजपत्रकात बाब क्रमांक ७, ८, ९, १० व १३ मधील कामे न करता सदर काम पूर्ण कसे करण्यात आले व ते गुणवत्तापूर्ण कसे झाले व ते कोणी प्रमाणित केले, या बाबत प्रमाणपत्र उपलब्ध नाही. नियमानुसार अधिक्षक अभियंता यांनी कामाची तपासणी करणे अत्यावश्यक असताना तशी कार्यवाही का करण्यात आली नाही, या कामामध्ये अनियमितता झाली आहे का, यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, नाही. सर्व काम नियमानुसार केले आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, कामात अनियमितता झाली नसल्यास लेखा परिक्षणात आक्षेप का घेण्यात आला, यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, २५ टक्क्यांपर्यंत काम वाढले आहे. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस विचारणा केली की, काम करीत असताना २५.७५ टक्के काम वाढले आहे. निविदा कलम ३८(२) नुसार अधिक्षक अभियंत्यांची मंजुरी घेणे अत्यावश्यक होते, त्यानुसार कार्यवाही केली आहे का, यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, वाढीव कामाच्या संदर्भात मंजुरी घेतली

आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, वाढीव कामाकरिता मंजुरी घेतली असल्यास लेखापरिक्षणाच्या वेळी का दाखविण्यात आली नाही, यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, निविदा कलम १८ नुसार २५ टक्के किंवा ५ हजार रुपयांयापेक्षा यापेक्षा जे कमी असेल त्यापेक्षा जादा खर्च झाल्यास अधीक्षक अभियंत्यांची परवानगी घेणे आवश्यक असते. जास्त कामाचे पेमेंट सीएसआरनुसार केले आहे. परंतु एखाद्या बाबीवर २५ टक्क्यांपेक्षा जास्त काम होत असल्यास कंत्राटदाराने वाढीव कामासाठी विनंती करणे गरजेचे असते. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, निविदा कलम ३८(१) नुसार आपल्याला १२५ टक्क्यांपर्यंत पेमेंट करण्याचे अधिकार आहेत. त्यापेक्षा जास्त कामाचे पेमेंट करायचे असल्यास अधीक्षक अभियंत्याची मंजुरी घेणे अत्यावश्यक आहे. कामामध्ये ३ किंवा ४ पट वाढ केल्यास सीएसआरनुसार तुम्ही पेमेंट करू शकता का, यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, कामाच्या संदर्भात सीएसआरनुसार पेमेंट केले आहे. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, सीएसआरनुसार पेमेंट केल्यामुळे काम ३-४ पट वाढविल्यास चालू शकते का, यावर पुढे समितीने विचारणा केली की, एखादे काम २५ टक्क्यांनी वाढल्यास पूर्वी ठरलेल्या दरानुसार पेमेंट करता येते. परंतु त्यापेक्षा जास्त काम वाढल्यास त्याचे पेमेंट चालू दराने करावे लागते. एका बाजूला सदर कामाला मंजुरी घेतल्याची माहिती समितीला देण्यात आली आणि दुसऱ्या बाजूला सीएसआरने पेमेंट केल्यामुळे मंजुरी घेण्याची गरज नाही, असे सांगितले जात आहे. अशा प्रकारे संबंधित अधिकारी समितीला दिशाभूल करणारी उत्तरे देत आहात, ही बाब अतिशय गंभीर आहे. यामुळे अधिकाऱ्यांनी त्यांना माहिती देत असताना दिशाभूल करणारी उत्तरे देता कामा नये. दिनांक ११ जून २००४ च्या शासन निर्णयानुसार निविदेतील प्रस्तावाला क्षेत्रिय अधीक्षक अभियंत्यांची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर तसेच तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर अशा बाबीचे वाढीव काम हाती घेण्यात यावे अशा प्रकारे स्पष्टपणे नमूद केले आहे. अधिकाऱ्यांनी समितीला सत्य माहिती देणे अत्यावश्यक आहे. अंदाजपत्रकात कार्यान्वित न केलेल्या बाबींसंबंधी आक्षेप आला आहे. शेड्यूल बी मध्ये कोणत्या बाबी होत्या, यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, Providing earth work in embankment with approved fly ash, Supplying soft murum at the road side, Spreading gravel, sand, soft murum. Compacting the hard murum, Clearing of site, Excavation for roadway in earth soil of all sorts sand अशा शेड्यूल बी मध्ये बाबी होत्या. यावर समितीने अशी विचारणा केली की, आपण १:४:८ केले नाही. यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस नकारार्थी उत्तर दिले. यावर समितीने विचारणा केली की, तुम्ही खडी देखील टाकलेली नाही. हा भाग मान्य केला आहे. फक्त मूळ अंदाजपत्रकामध्ये गाळाचा किंवा दलदलीचा भाग विचारात घेतला नसल्यामुळे अंदाजपत्रकीय किंमत वाढली आहे. लेअरच टाकलेली नाही. तेथे जर दलदलीचा भाग होता तर त्यामध्ये खडी, सिमेंट टाकले पाहिजे होते. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, अशा ठिकाणी खडी टाकली पाहिजे. यावर समितीच्या मते मुरूम टाकला आहे, राख टाकली आहे. मुरूमावर पीसीसी करणे अत्यंत आवश्यक आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, दलदलीचा भाग असताना १:४:८ टाकणार नसाल तर ते काम कसे टिकेल, हार्ड रॉक असेल तरी पीसीसी करावे लागते. पीसीसी हे लेव्हल करण्यासाठी करावे लागते. काम करून किती वर्षे झाले, यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, काम करून २ वर्षे झाले आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, वर्षभरात १० दिवस नवरात्रौत्सवाचा कार्यक्रम असतो, त्यावेळी रस्त्याचा वापर होतो. हा रस्ता व्यवस्थित आहे. यावर समितीने विचारणा केली की, अंदाजपत्रकात शेड्यूल बी आहे. लेअर टाकण्यासाठी तरतूद केली. मात्र १:४:८ केले नाही. मग हा रस्ता कसा काय राहणार, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ते ड्रॉप करून हे केले आहे. सदर रस्त्यावर फक्त वर्षातून १० दिवस दळणवळण असते. यावर समितीने अशी विचारणा केली की, मग तरतूद कशासाठी केली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सुरुवातीला यासाठी अंदाजपत्रकात तरतूद केली होती. काम सुरू झाले त्यावेळी हे करू नका असे सांगण्यात आले. एवढ्या रकमेचे मातीचे काम केले आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, आपण अंदाजपत्रक तयार करताना काळजी घेतली असती तर या सर्व बाबी समोर आल्या नसत्या. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संदर्भात पाहणी करून एक महिन्यात समितीला अहवाल सादर करावा असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान कोराडी, येथे चार चाकी वाहनतळ बांधण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पाहणी करून त्याबाबतचा चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश समितीने देऊनही या संदर्भातील समितीने आक्षेपित केलेल्या बाबीचा चौकशी अहवाल समितीस सादर न करण्याची कारणे काय आहेत, या प्रकरणी शासन दोषीं विरुद्ध कोणती कारवाई करणार आहे, नसल्यास त्याची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत राज समितीने दिलेल्या निर्देशास अनुसरून नागपूर श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी येथील चारचाकी वाहनतळाची पाहणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेली असून या कामाची चौकशी कार्यकारी अभियंता, बांधकाम यांचेमार्फत करण्यात आली. त्यांनी सादर केलेल्या चौकशीचा अहवाल दि. २७ जानेवारी २०१६ रोजी पंचायती राज समितीस सादर करणेसाठी विधानमंडळ सचिवालयाकडे पाठविलेला आहे.

कार्यकारी अभियंता यांनी केलेल्या चौकशीचे निष्कर्ष खालील प्रमाणे आहे.

भाविकांची गैरसोय, तत्कालीन मा. आमदार व सध्याचे मा.पालकमंत्री यांनी वेळोवेळी केलेल्या लेखी सुचनेनूसार काम तातडीने पूर्ण करण्यात आलेले आहे. सद्यःस्थितीत काम पूर्ण झालेले असून प्रशासकीय मान्यतेच्या किमतीचे मर्यादेतच आहे. प्रत्यक्षात एका बाबीमध्ये १२५ टक्के इतकीच वाढ झालेली आहे. परंतु काही बाबी वगळलेल्या असल्याने झालेल्या कामाच्या सुधारीत प्रस्तावास सक्षम अधिका-यांची मंजुरी घेण्यात आलेली आहे.

समितीने वस्तुस्थिती लक्षात घेऊन सदर मुद्या ग्राह्य धरुन निकाली काढावा हि विनंती.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

श्री. महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी येथील चारचाकी वाहनतळ बांधण्याकरीता रुपये ४७.८१ लक्ष ऐवढ्या निधीची प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. प्रत्यक्ष बांधकाम करताना वाहनतळाची जमीन दलदलीची आढळल्याने, मातीकामात वाढ झाली होती. सदर वाढीचे प्रमाण २५ टक्केचे मर्यादेत असल्याने सदर बाबीस सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेण्यात आली होती. तसेच सदर काम प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेतच पूर्ण करण्यात आलेले आहे.

**चौकशी अहवाल**

**(३.२५७ श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी येथे चार चाकी वाहनतळ बांधकामाबाबत)**

(१) कामाचे नांव : श्री.महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी या तीर्थक्षेत्र ठिकाणी चारचाकी वाहनतळ बांधकाम करणे.

(२) मूळ प्रशासकीय मान्यता : ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र./विकास-०८/प्र.क्र१८/यो-७ मंत्रालय, मुंबई दि. ३१ मार्च २०१० (रु. ४७.८१ लाख)

(३) मूळ तांत्रिक मान्यता : (१) आदेश तां.वि./प्र.अ.-८/२६३/२०१० दि. १५ जून १० (रु.४४,६९,०५५)

(२) तांत्रिक मान्यता -७०/तांत्रिक/अ.अ./२०१०-११ (रु. ४४,६९,०५५)

(४) कंत्राटदाराचे नाव : श्री. जयेंद्र धनराज बरडे, मु.पो. कोराडी (नांदा) ता. कामठी, जि. नागपूर.

५) कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक :- जा.क्र./जिपना/बांध/का-३/निविद/१२८९/२०११ दि. ०९ मार्च ११ रु. ४४,०२,०२०.

(६) करारनामा क्रमांक : बी-१/३२७/टीडीपी/२०१०-११ दि. १ मार्च २०११ (१.५ टक्के कमी दाराने)

(७) कामाची मुदत : ६ महिने

(८) प्रत्यक्षात काम सुरू केल्याचा दिनांक : ०१ मार्च २०११ (कार्यारंभ आदेशान्वये)

(९) काम पूर्ण केल्याचा दिनांक : दि. २८ ऑगस्ट २०११

(१०) कामाला मुदत वाढ दिली आहे किंवा नाही : नाही.

(११) मुदत वाढ दिली असल्यास दंड आकारला काय ? : नाही.

(१२) अंतिम मुल्याकंन : रु.४४,११,९८९ (१.५ टक्के कमी दराने)

(१३) अंतिम मोजमापे : दि. २६ ऑगस्ट २०११ मोजमाप पुस्तिका क्र. ४४९

श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी या तिर्थक्षेत्र ठिकाणी चारचाकी वाहतळ बांधकाम (हलके वाहन) हे काम ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या शासन निर्णय क्रमांक विकास २००८/प्र.क्र.१८/योजना -७ मंत्रालय, मुंबई, दि. ३१ मार्च २०१०, रक्कम रु. ४७.८१ लक्ष अन्वये ब-वर्ग तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत मंजूर करण्यात आले त्यानंतर सदर कामाचे विस्तृत प्राकलन तयार करण्यात आले. प्राकलनामध्ये खालील बाबीचा समावेश करण्यात आला.

| अ.क्र. | नाव | परिमाण | दर | रुपये |
|---|---|---|---|---|
| (१) | कामाच्या ठिकाणी मातीचा/औष्णीक विद्युत केंद्रातील रोखचा भराव करणे व दबाई करणे | १३०९३.५५ घनमीटर | २३०.१० | ३०१२८२६ |
| (२) | कामाच्या ठिकाणी मुरुम पुरविणे | १८००.०० घनमीटर | ३२७.९० | ५९०२२० |
| (३) | गोळा केलेला मुरुम पसरविणे | १८००.०० घनमीटर | ११.०० | १९८०० |
| (४) | पसरविण्यांत आलेल्या मुरुमाची दबाई करणे | ९०००.०० चौ.मी. | ५.५० | ४९५०० |
| (५) | कामाच्या जागेवरची झाडे, झुडपे तोडुन जागा साफ करणे | ९०००.०० चौ.मी. | १.५० | १३५०० |
| (६) | रस्त्यासाठी खोदकाम करणे | २१.६० घनमीटर | ६३.०० | १३६१ |
| (७) | तयार झालेल्या जागेवर ८० मी.मी खडीचा थर टाकणे व दबाई करणे | १०९.८० घनमीटर | ६८६.१५ | ७५३३९ |
| (८) | खडी करण्याच्या पृष्ठभागावर १:४:८ चे कॉक्रीट करणे | ६२.२० घनमीटर | २६०६.४५ | १६२१२१ |
| (९) | इंटरलॉकींग पेव्हींगच्या कडेने आरसीसी सिम तयार करणे | १९.८० घनमीटर | ५२८१.१५ | १०४५६७ |
| (१०) | आर.सी.सी. सिम करीता लोखंडाचे रेन फोर्समेंट करणे | १३९८.०० चे टन. | ४४६५७.३० | ६१८९५ |
| (११) | कामाच्या जागी दगडी चुरा गोळा करणे | ३३.०० घनमीटर | १६१.३० | ५३६३ |
| (१२) | दगडी चुरा पसरविणे | ३३.०० घनमीटर | ११.०० | ३६३ |
| (१३) | पेव्हींग ब्लॉक बसविणे | ६६०.०० | ५६४.०० | ३७२२४० |
| | | | **एकूण** | **रु. ४४६९०५५** |

उपरोक्त बाबीचा समावेश करून तयार करण्यात आलेले प्राकलन अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर यांचेकडे तांत्रिक मंजुरीस सादर केल्यावर त्यांचेकडुन आदेश क्रमांक तांवि/प्र.अ.८/२६३/२०१० दि. १५/६/२०१० अन्वये तांत्रिक मान्यता क्रमांक ७०/तांत्रिक/अ.अ./२०१०-११ रक्कमच रु. ४४,६९,०५५ ला तांत्रिक मंजुरी प्राप्त झाली.

सदर काम सुरू केल्यावर तत्कालीन आमदार यांनी पत्राद्वारे (प्रत संलग्न) केवळ मातीकाम करावयास सुचविले त्या अनुषंगाने, करारनाम्यातील एकूण १ ते १३ बाबींपैकी फक्त १ ते ५ बाबी कार्यान्वीत केलेल्या आहेत. बाब क्र.६ ते १३ कार्यान्वीत केलेल्या नाही. त्या खालीलप्रमाणे आहेत.

| Sr. No. | Item Of Work | Estimated Measurement | Actual Measurement | Estimated Cost | Actual Cost |
|---|---|---|---|---|---|
| (1) | Earthwork | 13093.55cum | 16452.92cum | 3012826 | 3785817 |
| (2) | Supplying murum | 1800cum | 1859.55cum | 590220 | 609746 |
| (3) | Spreading murum | 1800 cum | 1859.55 cum | 19800 | 20455 |
| (4) | Compaction | 9000 cum | 9287.56 cum | 49500 | 51082 |
| (5) | Site Cleareance | 9000 | 8051.40 | 13500 | 12077 |
| (6) | Extraction for Roadway | 21.60cum | - | 1361 | - |
| (7) | Soling 80 mm | 109.80 cum | - | 75339 | - |
| (8) | 1:4:8 | 62.20 cum | - | 192121 | - |
| (9) | RCC Beams curb beams | 19.80 cum | - | 104537 | - |
| (10) | Steel | 1.386 m.ton | - | 61895 | - |
| (11) | Supply Stone dust | 33 cum | - | 5323 | - |
| (12) | Spreading Stone dust | 33 cum | - | 363 | - |
| (13) | Paving Blocks | 660 sq.mt. | - | 372240 | - |
| | | | Total | 4469055 | 4479177 |

वरील मूळ अंदाजपत्रकाध्ये पृष्ठभाग समतल करणेकरीता १३०९३.५५m३ मातीकाम घेण्यात आलेले होते. परंतू प्रत्यक्ष काम करित असतांना पृष्ठभाग समतोल करणेकरिता अतिरिक्त मातीकामाची आवश्यकता भासल्यामुळे १६४५२.९२cu.m. मातीकाम झालेले आहे.

तसेच मा.तत्कालीन आमदार यांचे लेखी सुचनांच्या अनुषंगाने अ.क्र.६ ते १३ च्या बाबी वगळण्यात आल्यामुळे खर्च वास्तविकता रुपयांची बचत झालेली आहे.

अंदाजपत्रकामध्ये मातीकाम १३०९३.५५ cu.m. मी. होते व प्रत्यक्ष मातीकाम १६४५२.९२m३ म्हणजेच रुपये ७,७२,९९१ रुपयाचे अधिक झालेले आहे.

मातीकामाची प्रत्यक्ष वाढीव परिमाण बघता १२५ टक्के मर्यादेत असून महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद २६५ अन्वये (पान क्र.११४) जेव्हा महत्वाची संरचनात्मक फेररचना करण्याची आवश्यकता नसली तरी तेव्हा मूळ मंजुरी देणाऱ्या प्राधिकाऱ्याचे आदेश घेण्यात यावेत. असे नमूद आहे. तरीही समितीने दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर यांना प्रस्ताव दिनांक २ नोव्हेंबर २०१५ रोजी सादर केलेला असून दिनांक ५ जानेवारी २०१६ रोजी प्रस्तावास कलम ३८ अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

निष्कर्ष :

(१) कामाचे मूळ अंदाजपत्रकातील अ.क्र.६ ते १३ बाबी वगळलेल्या असून काम आवश्यकतेप्रमाणे पूर्ण केल्याचे दिसून येते.

(२) शासन निर्णय दि.११ जून २००४ अन्वये कलम ३८ च्या अनुषंगाने सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजुरी प्राप्त आहे.

(३) सदर काम प्रशासकीय मान्यतेच्या आतच केलेले आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान कोराडी येथे चार चाकी वाहनतळ बांधण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पाहणी करून त्याबाबतचा चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश समितीने देऊनही या संदर्भातील समितीने आक्षेपित केलेल्या बाबीचा चौकशी अहवाल समितीस सादर न करण्याची कारणे काय आहेत, या प्रकरणी शासन दोषी विरुद्ध कोणती कारवाई करणार आहे, नसल्यास त्याची कारणे काय, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, सदरहू प्रकरणी कार्यवाही झालेली आहे.

## अभिप्राय व शिफारशी

नागपूर जिल्ह्यातील श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी देवस्थान अत्यंत महत्वाचे आहे. या तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी चारचाकी वाहनतळ बांधकाम (हलके वाहन) हे काम ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या शासन निर्णयानुसार रुपये ४७.८१ लक्ष रकमेचे “ब” वर्ग तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत मंजूर करण्यात आले. सदर कामाचे बांधकामावर रुपये ४४,७९,१७७ इतका खर्च करण्यात आला. लेखापरिक्षकांनी आक्षेप उपस्थित केला की, मोजमापाप्रमाणे अंदाजपत्रकातील बाब १ मध्ये ३३५९ क्युबीक मीटरचे ७,७२,९९१ चे जास्तीचे काम झाले आहे. सदर आक्षेपावर जिल्हा परिषदेने लेखी खुलासा केला की, कामाच्या ठिकाणी दलदलीचा परिसर असल्याने मुरुम आच्छादन, खडीकरण, सम पातळीत आणणे, त्यावर काँक्रीट व पेव्हमेंट त्यावर करणे आदी वाढीव बाबी मूळ अंदाजपत्रकात अंतर्भूत करण्यात आल्या.

वस्तुतः मूळ अंदाजपत्रक तयार करतानाच पृष्ठ भाग समतल करण्याची बाब विचारात घेणे आवश्यक होते. अंदाजपत्रक तयार करताना प्रत्यक्षात कामाच्या ठिकाणी जावून तपासणी केली जाते. कामाच्या ठिकाणी तलावाचा भाग आहे, दलदल आहे किंवा बॅक वॉटर येते ही बाब अंदाजपत्रक तयार करणाऱ्या अधिकाऱ्याच्या निदर्शनास आली नाही. समितीला वाढीव कामाचे कारण बॅक वॉटरचे देण्यात आले त्यावर समितीने बॅक वॉटरचे ठिकाणी कामाला परवानगी मिळू शकत नाही हा मुद्दा उपस्थित केल्यावर तेथे दलदलीचा भाग असल्याचे अधिकाऱ्यांनी विदित केले. समितीने तीव्र आक्षेप घेतल्यावर स्थानिक लोक प्रतिनिधींच्या आग्रहास्तव पेव्हर ब्लॉक ऐवजी पूर्ण भराव टाकावा लागला त्यामुळे कामामध्ये वाढ झाल्याची वस्तुस्थिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विषद केली.

प्रस्तुत प्रकरणात मूळ अंदाजपत्रकातील चूक किंवा लोकप्रतिनिधींचा आग्रह हे कारण असले तरी निविदा कलम ३८ (२) नुसार कामाला १२५% पेक्षा जास्तीची वाढ करता येत नाही. त्याकरीता अधिक्षक अभियंत्यांची मंजुरीची आवश्यकता होती ती घेण्यात आली नाही. एवढेच नव्हे तर मूळ अंदाजपत्रकातील बाब क्रमांक ७, ८, ९, १० आणि १३ मधील कामेच करण्यात आली नाहीत आणि ही कामे पूर्ण न करता सदर काम पूर्ण कसे करण्यात आले व ते गुणवत्तापूर्ण कसे झाले व ते कोणी प्रमाणित केले किंवा शेड्युल “बी” मधील कामे जसे खडी देखील टाकण्यात आलेली

नाही हे ही स्पष्ट झाले. तसेच बांधकाम अभियंत्यांनी १:४:८ केले नाही, अशा कामावर पी.सी.सी. करावे लागते. पी.सी.सी. हे लेव्हल करण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. अंदाजपत्रकात शेड्युल "बी" आहे, लेअर टाकण्यासाठी तरतूद केली, मात्र १:४:८ केले नाही. त्यामुळे या वाहन तळाचे काम दर्जेदार झाले नसल्याने ते जास्त काळ टिकणार नाही. **समितीला असे सांगण्यात आले की, वर्षातून केवळ १० दिवस (नवरात्रोत्सवात) तेथे वाहन तळ वापरण्यात येतो म्हणून या बाबी वगळण्यात आल्या आहेत. वर्षातील १० दिवस वापर होतो म्हणून सदर काम दर्जेदार न करणे हे योग्य नाही. अतः नागपूर जिल्ह्यातील अत्यंत महत्वाच्या श्री. महालक्ष्मी देवस्थान, कोराडी या संस्थानातील वाहनतळाच्या कामामध्ये नियमांचे उल्लंघन, अंदाजपत्रकातील कामे वगळणे इत्यादी गंभीर बाबींची वरिष्ठ पातळीवर चौकशी होणे आवश्यक आहे. त्यानुसार संबंधितांची चौकशी करून त्यात संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून त्यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा नियमांतर्गत कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन महिन्यात पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण अकरा

## जिल्हा परिषद, नागपूर

### (१) मौजे सुरेरा, बनेरा व घाटकुकडा ता.पारशिवनी येथील पुरक नळ पाणीपुरवठा योजनेबाबत : (परिच्छेद ३.४२०) (सन २०११-२०१२)

पाणीपुरवठा विभागाने ग्रामपंचायतीला सदर योजनेचे काम करण्यासाठी रुपये १६,७२,५५३ प्रदान केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन अर्धशासकीय पत्र क्र.सुप्रभा-२०११/प्र.क्र/१८३/पापु/१०/पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई दिनांक ७ सप्टेंबर २०१२ पत्रान्वये तसेच दिनांक १० फेब्रुवारी २०१२ दिनांक २ जून २०१२, अन्वये कार्यकारी अभियंता यांना विचारणा केली असता कंत्राटदाराने काम सोडून दिल्यामुळे नुकसानीची माहिती कळविण्याचे निर्देशित करण्यात आले. उप विभागीय अभियंता पारशिवनी यांचे पत्र क्रमांक ५७३ दि. २१ ऑक्टोबर २०११ अन्वये कार्यकारी अभियंता यांना सदर योजनेच्या कामाची स्थिती कळविण्यात आली आहे ती खालील प्रमाणे आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता समितीने निकाजु कंन्स्ट्रक्शन कंपनी यांना काम दिले त्यांनी अर्धस्थितीत काम सोडून दिले आहे. विहिरीचे ९ मी खोदकाम बांधकाम केले. प्राकलनात विहिरीची खोली १६ मी. असून मूल्य रु. ३६,५०,००० आहे, परंतु ९ मी. बांधकामात खोदकामात रु.१४,८५६ खर्च करण्यात आलेला आहे. ९ मीटर खोलीत पाण्याची आवक नाही.

हॉस्टींग अरेंजमेंट मटेरियल ग्रामपंचायती जवळ ठेवण्यात आला आहे. पंपीग मशिनरी भाडे अदा न केल्याने उपलब्ध नाही १००० मीटर (९० मि.मी. व्यास ६ के.जी/सेमी) पाईप ग्रामपंचायत कोलीतमारा येथे आहे. पाईप वापरण्या योग्य नसल्याचे दिसून येते.

वरील सर्व बाबी वरुन असे दिसून येते की, ६ वर्षापूर्वी नियोजन अभावी केलेला खर्च नुकसान पूर्ण झालेला आहे खर्चाची रक्कम रु. १६,७२,५५३ वसुल होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

मौजा सुरेरा ता.पारशिवनी, जिल्हा नागपूर येथील पाणी पुरवठा योजनेचे रु. १९.९७ लक्ष चे कामाला दि. १० फेब्रुवारी २००६ रोजी तांत्रिक मंजुरी व दि. १० मार्च २००६ रोजी प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने मे.निकाजु कन्स्ट्रक्शन कंपनीला दि. ३१ मार्च २००६ व्दारे काम दिले. तथापि काम पूर्ण न करता कंत्राटदाराने अर्धवट स्थितीत काम सोडून दिले. दरम्यान सदर कंत्राटदाराला मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे पत्र क्र.३०४० दि. ०८ ऑक्टोबर २००८ अन्वये काळ्या यादीत टाकण्यात आले. करारनाम्याप्रमाणे मंजूर व कंत्राटदाराने केलेल्या कामाचे मूल्य दर्शविणारे विवरण खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मंजुर उपांगे | मंजूर किंमत | कंत्राटदाराने केलेली कामे व झालेले मुल्यांकन | |
|---|---|---|---|---|
| १. | पुरवठा विहीर ६ मी व्यास × १६ मी. लांबी | ६,५०,८०० | ९.०० मी. खोदकाम व बांधकाम | ७,१४,८५६ |
| २. | हाईस्टींग अरेंजमेंट | ४३,२४० | हाईस्टींग अरेंजमेंट | ३१,४५० |
| ३. | पंपीग मशिनरी-२ नग | ६८,८०० | दोन नग पंप पुरवठा | ४१०३४ |
| ४. | पंपघर | ३९,७८२ | निरंक | निरंक |
| ५. | उर्ध्वनलिका पीव्हीसी ९० मीमी व्यास व लांबी ३३० मीटर | ५८,७३१ | ९० मीमी व्यासाचे व १००० मीटर लांबीचे पाईप पुरवठा त्यापैकी ३६३ मीटर पाईप लाईन टाकलेली आहे. | ७२,००० |
| ६. | साठवण बंधारा | ८,३०,१५७ | साठवण बंधारा, बांधकाम पूर्ण | ८,५५,३७० |
| | एकूण | १६,९१,५१० | | १७,१४,७१० |

पुरवठा विहिर, हार्यस्टींग अरेंजमेंट इत्यादीबाबत अनुपालन खालीलप्रमाणे आहे :-

(१) पुरवठा विहीर : सदर अतिरिक्त खर्च हा मुख्यत्वे करून विहिरीच्या सभोवताल गाळण प्रक्रियेकरिता बोल्डर व रेतीचा भरणा अतिरिक्त केला असल्याचे व इतर किरकोळ बाबींवर झालेला आहे. याबाबतीत संबंधित शाखा अभियंता व उप अभियंता यांना दि. ०७ सप्टेंबर २०१५ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावून विचारणा करण्यात आली आहे.

(२) या व्यतिरिक्त दि. १० डिसेंबर २०१४ रोजी त्रिसदस्यीय चौकशी समितीतर्फे चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवालाप्रमाणे वसुलपात्र रकमेची मागणी उप अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, पारशिवनी यांचे पत्र क्र २६५ दि. ८ जुलै २०१५ अन्वये कंत्राटदारास त्वरीत भरणा करण्यास्तव कळविण्यात आले तथापि कंत्राटदाराने वसुलपात्र रकमेचा भरणा न केल्याने विभागीय कार्यालयाचे पत्र क्र. २०७६ दि.२७ जुलै २०१५ अन्वये महसुली थकबाकी वसुली (आर.आर.सी) ची नियमाप्रमाणे कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

(३) पंपिंग मशिनरी :- पंपिंग मशिन रु. ४१,०३४ ची खरेदी करण्यात आली. सद्यःस्थितीत मशिन उपलब्ध नसल्यामुळे सदर मशिन प्राप्त करण्याबाबत संबंधित कंत्राटदाराकडून महसुली थकबाकी (आर.आर.सी) वसूली नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येऊन पंपिंग मशिनची रक्कम वसुली करण्यात येत आहे.

(४) उर्ध्वनलिका : १००० मी. पाईप खरेदी करण्यात आले आहे यावर खर्च रु.७२,००० झालेला असून १००० मीटर पाईप पैकी ३६३ मीटर पाईपलाईन टाकण्यात आली आहे व उर्वरित ६३७ मीटर पाईपच्या रकमेची संबंधित कंत्राटदाराकडून वसुली करण्याबाबत महसुली थकबाकी (आर.आर.सी.) वसुली नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येऊन वसूलीची कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर योजनेवर यापूर्वी झालेला खर्च रु. १६,७२,५५३ सह सुधारित प्राकलन रु. २६.०८ लक्षचा प्रस्ताव दि. १०.०८.२०१० ला मंजुरीसाठी शासनास सादर केला आहे. शासनातर्फे सुधारित प्राकलनलास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर पूर्वीचे खर्चासह योजना पूर्ण करण्यात येईल व योजनेचा उद्देश सफल होईल. कंत्राटदारांनी काम अर्धवट सोडल्यामुळे त्याचे नाव काळ्या यादीत टाकून त्याचे विरुद्ध कार्यवाही करण्यात आली.

**(२) मौजा बनेरा पाणीपुरवठा योजना ग्रामपंचायत ढवळापूर, ता. पारशिवनी :**

**(परिच्छेद ३.४२१) (सन २०११-२०१२)**

सदर योजनेच्या बांधकामाकरिता ग्रामपंचायतीला रुपये १७,०२,३८१ विभागामार्फत प्रदान करण्यात आले या बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहे.

सदर काम ६ वर्षांपासून अपूर्ण स्थितीत आहे. ग्रामीण पाणीपुरवठा स्वच्छता समितीने निकाजू कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यादेश दिला होता.

विहिरीचे खोदकाम बांधकाम प्राकलनात १७ मीटर घेण्यात आले त्याचे मूल्य रुपये ६,५५,००० आहे. परंतु प्रत्यक्षात ७.५० मी. खोदकाम बांधकाम करून रुपये ७,३७,४१९ खर्च केलेला आहे. विहिरीला पाण्याची आवक नाही, पंपींग मशिनरी कामाकरीता उपलब्ध नाही. १००० मी. (९० मि.मी. व्यास ६ के.जी/सेमी) परिमाणाचे पाईप ग्रामपंचायत कोलीतमारा येथे आहे. पाईप वापरण्यायोग्य नाही. तसेच बंधाऱ्याला पाट्या लावण्यात आल्याचे दिसून येत नाही.

वरील सर्व बाबीवरून योजनेचा उद्देश नियोजनाअभावी अकार्यक्षमतेअभावी रक्कम रुपये १७,०२,३८१ वसूल होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

मौजा बनेरा, ता.पारशिवनी, जि.नागपूर येथील पाणीपुरवठा योजनेचे रुपये १९.५० लक्ष चे कामाला दिनांक १० फेब्रुवारी २००६ रोजी तांत्रिक मंजुरी व दिनांक १० मार्च २००६ रोजी प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने मे.निकाजू कन्स्ट्रक्शन कंपनीला दिनांक ३१ मार्च २००६ द्वारे काम दिले. तथापि काम पूर्ण न करता कंत्राटदाराने अर्धवट स्थितीत काम सोडून दिले. दरम्यान सदर कंत्राटदाराला मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे पत्र क्र. ३०४०, दिनांक ०८ ऑक्टोबर २००८ अन्वये काळ्या यादीत टाकण्यात आले. करारनाम्याप्रमाणे मंजूर व कंत्राटदाराने केलेली कामाचे मूल्य दर्शविणारे विवरण खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मंजुर उपांगे | मंजूर किंमत | कंत्राटदाराने केलेली कामे व झालेले मुल्यांकन | |
|---|---|---|---|---|
| १. | पुरवठा विहीर ६ मी व्यास × १७ मी खोली | ६,५५,००० | ७.५० मी.खोदकाम व बांधकाम पूर्ण | ७,३७,४१९ |
| २. | हाईस्टींग अरेंजमेंट | ४३,२४० | हाईस्टींग अरेंजमेंट | ३१,४५० |
| ३. | पंपींग मशिनरी-२ नग | ६९,०३० | दोन नग पंप पुरवठा | ४१,०३४ |
| ४. | पंपघर | ३९,७८२ | पंपघर | ३९,७८२ |
| ५. | उर्ध्वनलिका पीव्हीसी ९० मीमी व्यास व लांबी २४० मीटर | ८१,१५० | ९० मीमी व्यासाचे १००० मीटर लांबीचे पाईप पुरवठा त्यापैकी ३०० मी. लांबीची पाईप लाईन टाकलेली आहे | ७२,००० |
| ६. | साठवण बंधारा | ८,३०,१५७ | साठवण बंधारा, बंधारा पूर्ण, पाट्या लावल्या नाहीत | ८,२५,२६० |
| | एकूण | १७,१८,३५९ | | १७,४६,९४५ |

पुरवठा विहीर, हायॅस्टींग ॲरेंजमेंट इत्यादीबाबत अनुपालन खालील प्रमाणे आहे.

१. पुरवठा विहीर : सदरचा अतिरिक्त खर्च हा मुख्यत्वे करून विहिरीच्या सभोवताल गाळण प्रक्रियेकरीता बोल्डर व रेतीचा भरणा अतिरिक्त केला असल्याने व इतर किरकोळ बाबींवर झालेला आहे. याबाबतीत संबंधित शाखा अभियंता व उप अभियंता यांना दिनांक ७ सप्टेंबर २०१५ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावून विचारणा करण्यात आली आहे.

२. या व्यतिरिक्त दिनांक १० डिसेंबर २०१४ रोजी त्रिसदस्य चौकशी समिती तर्फे चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवालाप्रमाणे वसुलपात्र रकमेची मागणी उप अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा उप विभाग, पारशिवनी यांचे पत्र क्र.२६५, दिनांक ८ जुलै २०१५ अन्वये कंत्राटदारास त्वरित भरणा करण्यास्तव करण्यात आली. तथापि कंत्राटदाराने वसुलपात्र रकमेचा भरणा न केल्याने विभागीय कार्यालयाचे पत्र क्र.२०७६, दिनांक २७-७-२०१५ अन्वये महसुली थकबाकी वसुली (आर.आर.सी) ची नियमाप्रमाणे कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

३. पंपिंग मशिनरी : पंपिंग मशिन रु.४१,०३४ ची खरेदी करण्यात आली. सद्यःस्थितीत मशिन उपलब्ध नसल्यामुळे सदर मशिन प्राप्त करण्याबाबत संबंधित कंत्राटदाराकडून महसुली थकबाकी (आर.आर.सी.) वसुली नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येऊन पंपिंग मशिनची रक्कम वसुली करण्यात येत आहे.

४.उर्ध्वनलिका : १००० मी पाईप खरेदी करण्यात आले आहे त्यापैकी ३०० मीटर पाईपलाईन टाकण्यात आली आहे. यावर खर्च रु.७२,००० झालेला असून ७०० मीटर पाईपच्या रकमेची संबंधित कंत्राटदाराकडून वसुली करण्याबाबत महसुली थकबाकी (आर.आर.सी.) वसुली नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येऊन वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर योजनेवर यापूर्वी झालेला खर्च रु. १७,४६,९४५ सह सुधारित प्राकलन रु.२७.९७ लक्ष चा प्रस्ताव दिनांक १६-८-२०१० ला मंजुरीसाठी शासनास सादर केला आहे. शासनातर्फे सुधारित प्राकलनास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर पूर्वीचे खर्चासह योजना पूर्ण करण्यात येईल. तथापि स्थानिक व्यवस्थेद्वारे पुरवठा विहीर, हायॅस्टींग अरेंजमेंट इत्यादीबाबत अनुपालन खालील प्रमाणे आहे.

**(३) मौजा घाटकुकडा पुरक नळ पाणी पुरवठा योजना, ता. पारशिवनी : (परिच्छेद ३.४२२) (सन २०११-२०१२)**

सदर योजनेवर बांधकामाकरिता ग्रामपंचायतीला रु.२०,५३,८३३ विभागामार्फत प्रदान करण्यात आले यावर लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत. सदर काम अर्धवट करून कंत्राटदार माहे एप्रिल, २००७ पासून काम सोडून गेल्याचे आढळून आले आहे. काम करीत असताना पाण्याची स्त्रोताचे कोठलेही काम करण्यात आले नसल्याने पाणी उपलब्ध नसताना पाईप लाईन, पाण्याची टाकी, पंपिंग मशिन याचा काहीही उपयोग नसल्याचे दिसून येत नाही. सदर काम सन २००६-२००७ मध्ये करण्यात आल्याने ती आजच्या स्थितीत निरर्थक असल्याचे दिसते. सदर योजनेसंबंधी सुधारित अंदाजपत्रकाचा प्रस्ताव सादर करण्याबाबत मुख्य अभियंता, विशेष कार्यकारी अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अर्ध शासकीय पत्र क्रमांक सुप्रमा/प्रत्रक १२९/पापु-१०/दि २९ सप्टेंबर २०१२ तसेच विभागास दि.२३ मार्च २०११, २/१/२०१२, २ जून २०१२, दि.२ जुलै २०१२ ला स्मरणपत्र पाठवून सुद्धा विभागाने योग्य कार्यवाही करण्यात आली नसल्याचे दिसून येते. ग्रामपंचायतला निधीचे वितरण करताना काम योग्यप्रकारे होत असल्याबाबत विभागाने खात्री केलेली नसल्यामुळे ६ वर्षापूर्वी झालेला खर्च निरर्थक बाबींवर केल्यामुळे खर्च रक्कम रुपये २०,५३,८३३ वसूल होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

मौजा घाटकुकडा, ता. पारशिवनी, जि. नागपूर येथील पाणी पुरवठा योजनेचे रु.२३.४१ लक्ष रुपयांचे कामाला दिनांक १०/२/२००६ ला तांत्रिक मंजुरी व दिनांक १०-३-२००६ ला प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने मे. निकाजु कन्स्ट्रक्शन कंपनीला दिनांक ३१-३-२००६ द्वारे काम दिले. तथापि काम पूर्ण न करता कंत्राटदाराने अर्धवट स्थितीत काम सोडून दिले. दरम्यान सदर कंत्राटदाराला मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे पत्र क्र. ३०४० दिनांक ८-१०-२००८ अन्वये काळ्या यादीत टाकण्यात आले. करारनाम्याप्रमाणे मंजूर व कंत्राटदाराने केलेली कामाचे मुल्य दर्शविणारे विवरण खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | मंजुर उपांगे | मंजूर किंमत | कंत्राटदाराने केलेली कामे व झालेले मुल्यांकन | |
|---|---|---|---|---|
| १. | पुरवठा विहीर ६ मी व्यास × १२ मी खोली | ४,९८,६२० | ९.० मी. खोदकाम व बांधकाम पूर्ण | ६,१६,२९४ |
| २. | हाईस्टींग अरेंजमेंट | ४५,२५२ | हाईस्टींग अरेंजमेंट (गर्डर व रेलींगचा पुरवठा) | ३१,४५० |
| ३. | पंपींग मशिनरी-२ नग | ८०,१८२ | दोन नग पंप पुरवठा | ४१,०३४ |
| ४. | पंपघर | ३९,७८२ | निरंक | निरंक |
| ५. | उर्ध्वनलिका पीव्हीसी ९० मीमी, व्यास व लांबी ८५६ मीटर | १,६७,९२६ | ९० मीमी व्यासाचे १९०० मीटर लांबीचे पाईपचा पुरवठ्यापैकी ७७४ मी. लांबीची पाईप लाईन टाकलेली आहे | १,२३,१२० |
| ६. | साठवण बंधारा | ८,६३,२१५ | साठवण बंधारा, बंधारा पूर्ण, | ९,२६,७८७ |
| ७. | ट्रेच गॅलरी | ११,९६२ | निरंक | निरंक |
| ८. | पाण्याची उंच टाकी क्षमता ३०००० लिटर | ३,०४,००० | काम पूर्ण | ३,७३,२८८ |
| ९. | वितरण व्यवस्था | ७७,२४९ | काम पूर्ण | ५४,९१८ |
| | एकुण | २०,८८,१८८ | | २१,६६,८९१ |

उपस्थित मुद्यांबाबत सादर करण्यात येते की, स्त्रोतांचे ठिकाणी बंधाऱ्याचे बांधकाम पूर्ण केल्यानंतर डिसेंबर, २००६ पर्यंत विहिरीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. दरम्यान पाण्याचे टाकीचे काम व उर्ध्वनलिकेचे पाईप पुरवठा करण्यात आला.

सुधारित योजना प्रस्तावाचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, सदर प्रस्ताव मुख्यत्वेकरून एम.एस.ई.डी.सी.एल.च्या विद्युत पुरवठ्याच्या अतिरिक्त मागणीकरीता आवश्यक होता. तथापि सुधारित प्रस्ताव शासनास सादर केल्यानंतर एम.एस.ई.डी.सी.एल.च्या निधीतून विद्युत पुरवठा विहिरीजवळ उपलब्ध झाला. त्यामुळे योजनेच्या मंजूर निधीतून आवश्यक कामे पूर्ण करून गावाला पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे त्यामुळे योजनेचा उद्देश सफल झाला आहे व त्याचा जनतेला लाभ मिळाला आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे आधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नागपूर यांची दिनांक २९ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ठेकेदाराने अर्धवट काम सोडून जाण्याची कारणे काय आहेत, यावर कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा यांनी समितीस विदित केले की, दिनांक ३१ मार्च २००६ रोजी कार्यारंभ आदेश दिला होता. सदर कामांची महसुली थकबाकी वसुली (आरआरसी) चाचणी केली असून वसुली प्रस्तावित केली आहे. सदर प्रकरण जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत तहसिलदाराकडे गेले असून याबाबत पाठपुरावा सुरू आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदरची योजना कुठे आहे, तसेच सन २००५-०६ मधील मंजूर योजनेच्या संदर्भात सन २०१० मध्ये सुधारित अंदाजपत्रक करणे, योजनेच्या सद्य:स्थितीचा अहवाल सन २०११ मध्ये कार्यकारी अभियंता यांना सादर करणे या विलंबास कोण जबाबदार आहे, एकूण रु. २,५९,३४० चा खर्च वाया गेला आहे हे खरे आहे का, याची जबाबदारी कोणावर निश्चित करणार आहात, यावर कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा विभाग) यांनी समितीस विदित केले की, पारशिवनी तालुक्यातील सुलेगा गावात ही पाणीपुरवठा योजना आहे. योजनेस विलंब झाला आहे, याप्रकरणी वेळोवेळी अनुपालन केले आहे. ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यातबाबतचे आदेशही काढले आहेत. रुपये १७,४२,००० इतका प्रत्यक्ष खर्च झाला. खर्च वाया गेलेला नाही. पंपिंग मशिन दिली होती, पाईप दिले होते. जास्तीच्या पाईपचा पुरवठा केला होता. आवश्यक पाईप वापरात आणले असून बाकीचे परत दिले आहेत आणि त्या रकमेची आरआरसीमार्फत वसुली प्रस्तावित केली आहे. सदर प्रकरण तहसिलदाराकडे गेले आहे. या प्रकरणी पाठपुरावा सुरू आहे. याबाबत समितीने पुढे आणखी विचारणा केली की, विहिरीच्या ९ मीटर खोदकामावर झालेला खर्च रु. १,१४,८५६ आहे, हाईस्टींग अरेंजमेंटच्या मटेरिअलचा खर्च रु. ३१,४५० आहे, पंपिंग मशिनचा खर्च रु. ४१,०३४ आहे, पाईप खरेदीचा खर्च रु. ७२,००० आहे, असा एकूण रु. २,५९,३४० चा खर्च वाया गेला आहे. या संदर्भात जबाबदारी निश्चित केली आहे का, याबाबत कार्यकारी अभियंता (ग्रामिण पाणीपुरवठा विभाग) यांनी समितीस विदित केले की, संबंधित कनिष्ठ अभियंत्यांच्या विरुद्ध कारवाई प्रस्तावित केली आहे. ठेकेदाराला जास्त रकमेचे प्रदान झाले आहे, त्याची वसुली

आरआरसीमार्फत केली आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदरची योजना कार्यान्वित झाली आहे काय, सन २००६ ला योजनेला तांत्रिक मान्यता दिली आहे. सन २०१५-१६ सुरू आहे. लोकांना ९ वर्षे पाण्यावाचून ठेवले आहे. ठेकेदाराला वेळेत काळ्या यादीत का टाकले नाही, ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यास इतकी वर्षे का लावली. यावर कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा यांनी समितीस खुलासा केला की, सदरची योजना या स्त्रोताद्वारे झालेली नाही. परंतु टॅपिंग देऊन पाणी पुरवठा सुरू केला आहे. नळ जोडणी देणार आहोत. संबंधित ठेकेदाराला सन २००८ मध्ये काळ्या यादीत टाकले आहे.

समितीने निदर्शनास आणून दिले की, मुद्दा परिच्छेद क्रमांक ३.४२१/६/ग्रा.पा.पु.-मौजा बनेरा पाणीपुरवठा योजना ग्रामपंचायत ढवळापूर, ता. पारशिवनी हाही तसाच आहे. सदर ठेकेदार देखील काम सोडून गेल्याने सदर योजनेत देखील अशाच प्रकारे अनियमितता झाली आहे. अतिप्रदान करण्यात आले आहे. सदर कामात देखील रु. ७,३७,४१९ इतका जास्त खर्च व परिमाण झाले आहे. तसेच त्यापुढील मुद्दा परिच्छेद क्रमांक ३.४२२/७/ग्रा.पा.पु.-घाटकुकडा, तालुका पारशिवनी पुरक नळ पाणीपुरवठा हाही तसाच आहे. त्यामध्ये देखील तशीच अनियमितता झाली आहे. सदर योजनांची सद्यःस्थिती काय आहे ते सांगावे. यावर कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा विभाग) यांनी समितीस अशी माहिती दिली की, मौजा बनेरा येथे २ महिन्यांपासून आणि घाटकुकडा येथे ९ महिन्यांपासून पाणीपुरवठा सुरू केला आहे. त्यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, पाईप ग्रामपंचायतीमध्ये ठेवले होते, ते वापरण्यायोग्य नाहीत. मडावी यांच्या घरी पंपिंग मशिन ठेवली होती. संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे. फक्त दंडात्मक कारवाई करून काहीही होणार नाही. संबंधितांना निलंबित करावे, त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत. ६ वर्षांत कार्यवाही होणार नसेल तर ते योग्य नाही. एकाच्या घरात पाईप आणि दुसऱ्याच्या घरात पंपिंग मशिन ठेवले जात असेल तर तेही योग्य नाही. तीनही पाणीपुरवठा योजनांसाठी एकच ठेकेदार होता काय, तीनही योजनांसाठी कोण कार्यकारी अभियंता होते, यावर समितीस अशी माहिती देण्यात आली की, तीनही योजनांमध्ये एकच ठेकेदार होता. त्यावेळी श्री. देशभ्रतार हे उप अभियंता होते. सदर योजनेमध्ये शासनाचा निधी खर्च झाला असून गेली ६ वर्षे योजनेस उशीर झाला आहे. यावर कार्यकारी अभियंता यांनी समितीस विदित केले की, ही योजना मागणीवर आधारित होती. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्हा परिषदेचे म्हणणे बरोबर आहे. परंतु जिल्हा परिषदेचे त्यावर नियंत्रण असले पाहिजे. यावर कार्यकारी अभियंता यांनी समितीस विदित केले की, जे काम झाले त्याचे मूल्यांकन झाले आहे. याबाबतचा विभागीय आयुक्त कार्यालयात त्याचा प्रस्ताव येतो आणि त्यानंतरच दुसऱ्या हप्त्याचा निधी दिला जातो. समिती, उप अभियंता, शाखा अभियंता यांच्यामार्फत योजना राबविली जाते. जिल्हा परिषदेकडे फक्त मागणीचा प्रस्ताव येतो. जिल्हा परिषद एवढेच पाहते की, पहिला हप्त्याचे पैसे दिले आहेत, त्याचे मूल्यमापन झाले का, यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, निविदा कोण काढते, यावर कार्यकारी अभियंता यांनी समितीस असे विदित केले की, निविदा समिती स्तरावर काढली जाते. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, देखरेखीच्या कामासाठी शाखा अभियंता, उप अभियंता असतात. मग सदर योजनेस विलंब का होत आहे, यावर कार्यकारी अभियंता यांनी समितीस विदित केले की, झालेल्या कामाचे मूल्यमापन झाले आहे. काम अंतिम झालेले नाही. संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकले आहे. यावर समितीने अशी पुढे अशी विचारणा केली की, ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यात आले म्हणजे सर्व झाले का, शासनाचे पैसे वाया गेले आहेत. काम पूर्ण नसताना निधी का दिला, यावर कार्यकारी अभियंता यांनी समितीस विदित केले की, जिल्हा परिषदेकडून पहिला हप्ता दिल्यानंतर मूल्यांकन येते आणि त्यानंतर दुसऱ्या हप्त्याची मागणी करतात, कामाप्रमाणे मूल्यांकन झाले नसेल तर दुसरा हप्ता दिला जात नाही.

यावर पुढे समितीने अशी विचारणा केली की, परिच्छेद क्रमांक ३.४२०/५/ग्रा.पा.पु.-पारशिवनी येथील पुरक नळ पाणीपुरठा योजना या संदर्भातही अनेक मुद्दे उपस्थित झाले आहेत. तसेच परिच्छेद क्रमांक ३.४२१/६/ग्रा.पा.पु. मौजा बनेरा पाणीपुरवठा योजना ग्रामपंचायत ढवळापूर, ता. पारशिवनी हे काम ६ वर्षापासून अपूर्ण होते. ठेकेदार काम अर्धवट सोडून गेला. सदर काम ६ वर्षांपासून अपूर्ण स्थितीत राहण्याची कारणे काय आहेत, ठेकेदार काम केव्हा सोडून गेला, नव्याने काम सुरू करण्यासाठी संबंधित खात्यामार्फत कोणते प्रयत्न सुरू आहेत, १७ मीटर खोलीच्या विहीर खोदाईसाठी तरतूद रूपये ६,५५,००० असताना व फक्त ७.५० मीटरचे खोदकाम करून काम अपूर्ण असताना मात्र रुपये ७,३७,४१९ इतका खर्च झाला आहे. हा जादा खर्च व परिमाण कोणत्या प्राधिकारात केले, जादा खर्चास पूर्वमंजुरी का घेतली नाही, सदर योजनेची सद्यःस्थिती काय आहे, पाणीपुरवठा सुरू केल्याचे अनुपालनात नमूद का करण्यात आले नाही, पाणीपुरवठा केव्हा सुरू केला, खरेदी केलेले पाईप वापरण्यायोग्य आहेत की नाहीत, ग्रामस्थांच्या (मडावी) घरी ठेवलेली पंपिंग मशिनरी अद्याप ताब्यात घेतलेली नाही. विहिरीचे खोदकाम ६.५ मीटर खोलीपर्यंतच झाले असताना पाणीपुरवठा कसा सुरू झाला या सर्व बाबींची यामध्ये चौकशी होणे आवश्यक आहे. तसेच परिच्छेद क्रमांक ३.४२२/७/ग्रा.पा.पु.-घाटकुकडा ता. पारशिवनी पुरक नळ पाणीपुरवठा योजना सुधारित अंदाजपत्रक सन २०१० मध्ये सादर केल्यानंतर सन २०१२ मध्ये म्हणजे दोन वर्षांनी त्यात त्रुटी काढल्या आहेत, या विलंबाची कारणे काय आहेत, सुधारित अंदाजपत्रकाबाबत मंत्रालयीन विभागाने ४ स्मरणपत्रे देऊनही त्रुटींची पूर्तता केलेली नाही. विभागाने दिलेल्या अनुपालनात सदर योजनेचा पाणीपुरवठा सध्या सुरळीत सुरू असल्याचे नमूद केले आहे. विहिरीची खोदाई पूर्ण झालेली नसताना आणि पाण्याचा उद्भव पूर्ण नसताना योजनेतून पाणीपुरवठा कसा करण्यात आला, विहिरीचे खोदकाम फक्त ७.३० मीटर झाले आहे. पंपिंग घराचे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे. उर्ध्वनलिकेचे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे. पाण्याच्या टाकीचे व वितरण व्यवस्थेचे

काम १०० टक्के झाले आहे. मात्र यासाठी लागणाऱ्या पाण्याच्या स्त्रोताचे कोणतेही काम केलेले नाही. त्यामुळे वरील सर्व बाबींवर झालेला खर्च निरर्थक ठरतो. त्यामुळे या संदर्भात जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, आपण संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकले आहे. ठेकेदाराला काळ्या यादीत टाकतो याचा अर्थ अनियमितता घडली आहे हे सिद्ध होते. मात्र आपण एजन्सी किंवा ठेकेदारांना दोष देऊ शकत नाही. लॅक ऑफ सुपरव्हिजन (नियंत्रणाअभावी) देखील असू शकते.

प्रस्तुत प्रकरणात ९ वर्षे असेच गेले आहेत हे योग्य नाही. हा शासनाचा, जनतेचा पैसा आहे. आपण जेव्हा एजन्सीवर जबाबदारी निश्चित करतो, त्यावेळी लॅक ऑफ सुपरव्हिजनसाठी संबंधित अधिकाऱ्यांवरदेखील जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. सर्व बाबी समितीच्या निदर्शनास आल्यानंतर सदर कामांमध्ये अनियमितता झाल्याचे स्पष्ट दिसून आले. यावर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संदर्भात सखोल चौकशी करून संबंधित दोषी अधिकाऱ्यांना निलंबित का करण्यात येऊ नये असा प्रस्ताव शासनाकडे पाठवून द्यावा असे निदेश दिले. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, तीनही पाणीपुरवठा योजनांमध्ये एक ठेकेदार, एक कनिष्ठ अभियंता व एक उप अभियंता होता. मात्र समिती ३ वेगवेगळ्या होत्या. तीनही गावांना भेटी दिल्या होत्या. यामध्ये गंभीर स्वरूपाची अनियमितता झाली आहे. अधिकच्या कामाचे एमबी (मोजमाप पुस्तिकेमध्ये नोंद) केली आहे. सदर प्रकरणी समिती काही प्रमाणात दोषी आहे आणि अभियंता व ठेकेदार हेही दोषी आहेत. तीनही गावांचा पाणीपुरवठा १० वर्षे बंद होता. गावांना पाणी देण्याच्या दृष्टीने पर्यायी व्यवस्था करून पाणीपुरवठा सुरू केला आहे. सदर प्रकरणी चौकशी केली असता जवळपास १० लाख रूपयांचा अपहार झाल्याचे प्रथमदर्शनी जिल्हा परिषदेच्या निदर्शनास आले आहे. जिल्हा परिषद या संदर्भात सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करून सदरचा अहवाल समितीस सादर करेल. सदर प्रकरणांतील एका उप अभियंत्यांना निलंबित केले असून कनिष्ठ अभियंत्यांना व कार्यकारी अभियंत्यांना नोटीस देण्यात आली आहे. विहिरीचे मोजमाप कमी दर्शविण्यात आले असून खर्च जास्त दाखविला आहे. कनिष्ठ अभियंत्यांनी मोजमाप पुस्तिकेत जास्तीची नोंद केली आहे. सदर प्रकरणी ज्या अधिकाऱ्यांनी, ठेकेदारांनी पैशाचा गैरव्यवहार केला आहे, त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून व्याजासहित रक्कम वसूल करण्यात यावी. कारण हा शासनाचा, जनतेचा पैसा आहे. याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठवावा आणि संबंधित दोषी अधिकाऱ्यांच्या निलंबनाचा प्रस्ताव शासनाला पाठवावा, तसेच संबंधितांच्या खाजगी मालमत्तेवर बोजा चढविण्यात यावा असे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) मौजा सुरेरा, बनेरा, घाटकुकडा, ता.पारशिवनी, जि.नागपूर येथील पाणीपुरवठा योजनेच्या बांधकामात झालेली अनियमितता ही सदर योजनेशी संबंधित शाखा अभियंता, उप विभागीय अभियंता, कार्यकारी अभियंता, कंत्राटदार व ग्राम पाणीपुरवठा स्वच्छता समितीचे अध्यक्ष / सचिव यांचे संगमताने झाल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे चौकशी अहवालात नमूद आहे. यापैकी केवळ संजय इंगळे, तत्कालिन शाखा अभियंता यांचे विरुद्ध निलंबनाची कारवाई करण्यात आली इतर कोणाही विरुद्ध कार्यवाही न करण्याचे कारण काय ?

(२) सदर योजनेचा कालावधी किती होता यात कामाचे कार्यारंभ ते काम संपेर्यंत किती अधिकाऱ्यांचा समावेश होता, कंत्राटदार तसेच ग्रामीण पाणीपुरवठा समितीचे अध्यक्ष/सचिव कोण होते या सर्वांवर कारवाई केली आहे काय, असल्यास ती चौकशी अहवालात का नमूद करण्यात आली नाही?

(३) या प्रकरणी समितीने निर्देश दिल्याप्रमाणे अनियमितता झाल्याप्रकरणी किती रक्कम वसूल केली, ती कोणाकडून व कोणत्या दिनांकास वसूल केली, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

(४) सुरेरा तसेच मौजे बनेरा, ढवळापूर, ता.पारशिवनी येथील पाणीपुरवठा योजना ठेकेदाराने मागील १० वर्षांपासून अर्धवट सोडून दिल्याप्रकरणी दोषी असलेल्या जिल्हा परिषद अधिकाऱ्यांवर शासनाने केलेल्या कारवाईची माहिती समितीस देण्यात यावी ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) मौजा सुरेरा, बनेरा व घाटकुकडा ता.पारशिवनी, जि.नागपूर येथील पाणीपुरवठा योजनेच्या बांधकामात झालेली अनियमितता संबंधाने श्री. इंगळे, शाखा अभियंता यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., नागपूर, आदेश क्र. जिपना/ग्रापापुवि/शा.अ./२८९७/१५, दि.०३ नोव्हेंबर २०१५ ला निलंबित करण्यात आले आहे व विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली असून विभागीय चौकशी सुरू आहे.

(२) तसेच तत्कालीन कार्यकारी अभियंता, श्री.चंद्रागडे व तत्कालीन उप विभागीय अभियंता, श्री. देशभ्रतार हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या अधिनस्त असल्यामुळे सदर कर्मचाऱ्यांविरुद्ध प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/ ग्रापापुवि/ शा.अ./ ३३२९/२०१५, दि. २३ डिसेंबर २०१५ अन्वये सादर केला आहे व या अनुषंगाने मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र क्र. विभाचौ/ २०१६/ नागपूर/ ८/ पारशिवनी/ आस्था-२ (वि.चौ), दि. १३. फेब्रुवारी २०१७ अन्वये ज्ञापन बजावण्यात आले असून विभागीय चौकशी सुरू आहे तसेच या कार्यालयाचे पत्र क्र. जिपना/ग्रापापुवि/०४/२०१६, दि. ०२ जानेवारी २०१७ अन्वये तत्कालीन सचिव, श्री.टी.एच.गावंडे

ग्राम आरोग्य पोषण व पर्यावरण समिती, मौजा घाटकुकडा व बनेरा ग्रामपंचायत, ढवळापूर, सचिव, श्री. गावंडे ग्राम आरोग्य पोषण व पर्यावरण समिती, मौजा घाटकुकडा व बनेरा ग्रामपंचायत, ढवळापूर यांनी सदर योजनेच्या कामात झालेल्या अनियमिततेबाबत यांचेविरुद्ध खाते चौकशी सुरू आहे. तसेच श्री. सागर बन्सोड, तत्कालीन सचिव, ग्राम, आरोग्य, पोषण व पर्यावरण समिती, सुरेरा ग्रामपंचायत, कोलीतमारा यांचेविरुद्ध सदर योजनेच्या कामात अनियमिततेबाबत शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याबाबत (सद्यस्थितीत वर्धा येथे कार्यरत) जिल्हा वन अधिकारी, वन विभाग कार्यालय, वर्धा यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक जिपना/ग्रापापु-०३/२०१७, दिनांक २ जानेवारी २०१७ अन्वये कळविण्यात आले आहे.

या अनुषंगाने जिल्हास्तरावर आदेश क्र. १९५, दि. २० जानेवारी २०१७ अन्वये समिती स्थापन करण्यात आली होती व समितीचा अहवाल प्राप्त झाला असून त्याअन्वये तत्कालीन अध्यक्ष ग्रामीण पाणीपुरवठा समिती, बनेरा व घाटकुकडा ग्रामपंचायत, ढवळापूर व तत्कालीन अध्यक्ष, ग्रापापु समिती, सुरेरा ग्रामपंचायत, कोलीतमारा यांचेविरुद्ध वसुली प्रस्तावित करण्यात आली आहे. व या कार्यालयाचे पत्र क्र. १११७ व १११८ दि. २० एप्रिल २०१७ अन्वये सात दिवसांत रक्कम जमा करण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु, त्यांनी अद्याप सदर रक्कम न जमा केल्यामुळे या कार्यालयाचे दिनांक २२ सप्टेंबर २०१७ चे पत्र क्र. २९५१ व २९५२ अन्वये रक्कम जमा करण्याबाबत कळविले आहे.

(२) मौजा बनेरा, सुरेरा व घाटकुकडा या योजनांचा काम करण्याचा कालावधी १ वर्ष होता, सदर योजनेचा कार्यारंभ ते काम अर्धवट करेपर्यंत (१) श्री.मिलिंद चंद्रागडे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जि.प.,नागपूर, (२) श्री.पी.के.देशभ्रतार, उप विभागीय अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद, उप विभाग, पारशिवनी, (३) श्री.एस.के.इंगळे, शाखा अभियंता, (४) मे.निकाजु कंन्स्ट्रक्शन कंपनी, नागपूर ही कंत्राटदार होती, (५) श्री. रामचरण करणाके अध्यक्ष, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, बनेरा व घाटकुकडा (६) श्री. राजाराम कोडवते, अध्यक्ष, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती सुरेरा, (७) श्री.पी.एस.गावंडे, सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, बनेरा व घाटकुकडा, (८) श्री. सागर एस.बन्सोड, सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, सुरेरा ही होती. सदर अधिकारी/कर्मचारी अध्यक्ष व सचिव यांचेवर प्रशासकीय/वसुलीची कार्यवाही करणेबाबत सर्वांना नोटीस देण्यात आली आहेत.

वरील सर्वांवर कार्यवाही करण्याबाबत चौकशी अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्याप्रमाणे सर्वांवर चौकशी अहवालात नमूद करण्यात आले नुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) सदर प्रकरणी समितीने निर्देश दिल्याप्रमाणे मे.निकाजु कंन्स्ट्रक्शन कंपनी, नागपूर यांचेकडून दिनांक ०५ जानेवारी, २०१६ खालील प्रमाणे नमूद रकमांचे अतिरिक्त भूगतान वसुल केले आहे. सदर रक्कम कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांचे खात्यात दि. ५ जानेवारी २०१६, पावती क्र. १७५०९ अन्वये जमा करण्यात आली आहे. रु. ३,६०,७२८ एवढी रक्कम वसुल करण्यात आलेली आहे व सदर रक्कम ही कंत्राटदाराने पुरवठा न केलेल्या वस्तूचे देयक उचललेल्या प्रकरणी वसुली करण्यात आली आहे. तसेच सदर कंत्राटदाराला आदेश क्र. ३०४०, दि. ८ ऑक्टोबर २००८ अन्वये काळ्या यादीत टाकण्यात आले आहे.

(४) मौजा सुरेरा, बनेरा व घाटकुकडा ता. पारशिवनी येथील पाणीपुरवठा योजनेत ठेकेदाराने मागील १० वर्षांपासून अर्धवट सोडून दिलेल्या कामासंबंधाने जि.प.अधिकारी, श्री. एस.के.इंगळे, शा.अ. यांना दि. ३ नोव्हेंबर २०१५ ला निलंबित करण्यात आले असून संबंधितांवर विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली असून चौकशी सुरू आहे. तसेच (१) श्री. मिलिंद चंद्रागडे, तत्कालीन का.अ., ग्रापापु, जि.प., नागपूर, तसेच श्री. पी.के.देशभ्रतार, तत्कालीन उविअ, जि.प. ग्रापापु उप विभाग, पारशिवनी हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिनस्त अधिकारी असल्यामुळे त्यांच्यावर प्रशासकीय कार्यवाहीचा प्रस्ताव कार्यालयीन पत्र दि. २३ डिसेंबर २०१५ अन्वये शासनास सादर केलेला आहे व मुख्य प्रशासकीय अधिकारी, मजिप्रा, मुंबई यांचे पत्र क्र. विभाचौ/२०१६/नागपूर/ ८/पारशिवनी/आस्था-२ (वि.चौ), दि. १३ फेब्रुवारी २०१७ अन्वये ज्ञापन बजावण्यात आले असून विभागीय चौकशी सुरू आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) रकाना क्रमांक ५ प्रमाणे

(२) कार्यकारी अभियंता व उप अभियंता हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी असून त्यांचेविरुद्ध कारवाईचे अधिकार सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना असल्याने त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येत आहे. ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती विरुद्ध कारवाईचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना असून त्यांचेमार्फत आवश्यक कारवाई करण्यात येत आहे.

(३) नियमानुसार वसूली केली असल्याने अभिप्राय नाहीत.

(४) (१) श्री.चंद्रागडे, कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु.वि., चंद्रपूर व (२) श्री.देशभ्रतार उप विभागीय अभियंता, अधीक्षक अभियंता कार्यालय, म.जि.प्रा.,नागपूर यांचे विरुद्ध प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत शासनाच्या क्र.मजीप्रा-२०१६/प्र.क्र.२०/पापु-२३, दि.०६ फेब्रुवारी २०१६ अन्वये सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत,म.जि.प्रा. तील संबंधित जबाबदार अधिकारी, श्री. एम.के. चंद्रागडे, कार्यकारी अभियंता व श्री. पी.के.देशभ्रतार, उप अभियंता यांच्या विरुद्ध म.ना.से. (शि.व.अ.), नियम १९७९ व सुधारित नियम १९८१ अंतर्गत नियम ८ खाली विभागीय चौकशीची कार्यवाही करण्यासाठी ज्ञापन बजावण्यात आले आहे.

मौजे सुरेरा योजना पूर्ण करण्यासाठी आवश्यक तांत्रिक तपासणी करून योजना पूर्ण करणेबाबत आवश्यक कार्यवाही करण्याबाबत कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु.वि., जि.प., नागपूर यांना दि. २२ फेब्रुवारी २०१६ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

**चौकशी अहवाल**

**विषय : मौजा सुरेरा, बनेरा, घाटकुकडा ता.पारशिवनी, जि. नागपूर येथील पाणी पुरवठा योजनेच्या बांधकामात झालेल्या अनियमितेबाबत.**

मौजा सुरेरा, बनेरा व घाटकुकडा ता. पारशिवनी येथील पाणीपुरवठा योजनांची प्रत्यक्ष पाहणी केली असता व योजनांचे पुरवठा विहीर पाण्याची उंच टाकी व इतर उपांगाचे निरीक्षण केले असता, निरिक्षणादरम्यान असे निदर्शनास आले की, तीनही पाणीपुरवठा योजनांचे पुरवठा विहिरीवरील लोखंडी गर्डर, चिकट प्लेट, पंपचे भुगतान कंत्राटदारास करण्यात आलेले आहे. परंतु सदर साहित्य योजनांच्या पुरवठा विहिरीवर आढळले नाही. तसेच बंधाऱ्याचे पाट्या व उर्ध्वनलिकेचे पी.व्ही.सी. पाईपसुद्धा आढळले नाहीत.

वरील तीनही पाणीपुरवठा योजनेचे प्राकलन व बी-१ करारनाम्याप्रमाणे पुरवठा विहिरीचे बांधकाम हे ६ मी. व्यास, १६ मी. खोल करावयाचे होते व त्याची अंदाजित किंमत १. सुरेरा-रु.६,५०,८०० २. बनेरा रु.६,५५,००० ३. घाटकुकडा रु. ६,५५,००० आहे. परंतु मोजमाप पुस्तिकप्रमाणे झालेल्या भुगतानानुसार सुरेरा पाणीपुरवठा योजनेच्या पुरवठा विहिरीचे ९ मी. खोदकाम व बांधकाम झालेले असून पुरवठा विहिरीवर रु. ७,१४,८५६ इतका खर्च झालेला आहे व विहिरीला ९ मी. खोलीवर आवश्यक आवकसुद्धा उपलब्ध नाही. तसेच बनेरा पाणीपुरवठा योजनेच्या पुरवठा विहिरीचे प्रत्यक्षात खोदकाम व बांधकाम ७.५० मी झालेले असून पुरवठा विहिरीवर रु.७,३७,४१९ खर्च झालेला आहे व विहिरीला ७.५० मी वर आवश्यक आवक उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे घाटकुकडा पाणीपुरवठा योजनेच्या पुरवठा विहिरीचे प्रत्यक्षात खोदकाम व बांधकाम ७.५० मी झालेले असून पुरवठा विहिरीवर रु. ७,३७,४१९ खर्च झालेला आहे व विहिरीला ७.५० मी. वर आवश्यक आवक उपलब्ध नाही.

सदर तीनही पाणीपुरवठा योजनांचे पुरवठा विहिरीचे बांधकामावर करारनाम्यानुसार विहिरीची आवश्यक खोली न करता पुरवठा विहिरीवर मंजूर प्राकलनापेक्षा जास्तीचा निधी खर्च झाल्याचे निदर्शनास येते. तसेच लोकसंख्येनुसार गावाला आवश्यक असणारी पाण्याची आवक लक्षात न घेता, आवश्यक आवक क्षमता न तपासता योजनेच्या पुरवठा विहिरीचे व इतर उपांगाचे कामे काही प्रमाणात करण्यात आलेले आहे असे निदर्शनास येते. सदर बाब अतिशय गंभीर स्वरूपाची आहे व सदर कामात नियमाचे उल्लंघन व शासनाच्या निधीच्या गैरवापर झाल्याचे दिसून येत आहे.

सदर निधीचा गैरवापर हा शाखा अभियंता, उप विभागीय अभियंता, कार्यकारी अभियंता, कंत्राटदार व ग्राम पाणीपुरवठा स्वच्छता समितीचे अध्यक्ष/सचिव यांचे संगनमताने झाल्याचे दिसून येते.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी (१) मौजा सुरेरा, बनेरा, घाटकुकडा ता. पारशिवनी जि.नागपूर येथील पाणीपुरवठा योजनेच्या बांधकामात झालेली अनियमितता ही सदर योजनेशी संबंधित शाखा अभियंता, उप विभागीय अभियंता, कार्यकारी अभियंता, कंत्राटदार व ग्राम पाणीपुरवठा स्वच्छता समितीचे अध्यक्ष / सचिव यांचे संगनमताने झाल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे चौकशी अहवाल नमूद आहे. यापैकी केवळ संजय इंगळे तत्कालीन शाखा अभियंता यांचे विरूद्ध निलंबनाची कारवाई करण्यात आली इतर कोणाही विरूद्ध कार्यवाही न करण्याचे कारण काय, (२) सदर योजनेचा कालावधी किती होता यात कामाचे कार्यारंभ ते काम संपेपर्यंत किती अधिकाऱ्यांचा समावेश होता, कंत्राटदार तसेच ग्रामीण पाणीपुरवठा समितीचे अध्यक्ष / सचिव कोण होते या सर्वांवर कारवाई केली आहे काय, असल्यास ती चौकशी अहवालत का नमूद करण्यात आली नाही, (३) या प्रकरणी समितीने निर्देश दिल्याप्रमाणे अनियमितता झाल्याप्रकरणी किती रक्कम वसुल केली, ती कोणाकडून व कोणत्या दिनांकास वसूल केली, नसल्यास विलंबाची कारणे काय, ४) सुरेरा तसेच मौजे बनेरा ढवळापूर, ता. पारशिवनी येथील पाणीपुरवठा योजना ठेकेदाराने मागील १० वर्षापासून अर्धवट सोडून दिल्याप्रकरणी दोषी असलेल्या जिल्हा परिषद अधिकाऱ्यांवर शासनाने केलेल्या कारवाईची माहिती समितीस देण्यात यावी, त्यावर मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, सदर योजनेमध्ये एकूण १० लाख रुपयांची अनियमितता झाल्याचे चौकशीअंती आढळून आले

आहे. त्यापैकी ३ लाख ५० हजार रुपये संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करण्यात आलेली आहे. त्याच कंत्राटदारास पुन्हा एक नोटिस पाठविलेली आहे त्यात असे नमूद केले आहे की, आपण सदर काम चुकीचे केले असल्यामुळे आपणावर का कारवाई करण्यात येऊ नये. त्याआधी त्यांना या संदर्भात विचारणा करणे आवश्यक असल्यामुळे त्यांना एप्रिलमध्ये नोटिस दिली आहे. सदर प्रकरणात तीन अभियंत्यांचा समावेश आहे. त्यातील एका अभियंत्याला निलंबित केले असून दोन उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्यावर विभागीय चौकशी सुरू आहे. त्यांना स्मरणपत्रदेखील पाठविलेले आहे. या संदर्भात त्यांचे काही उत्तर आलेले नाही. सदर प्रकरणी त्यांच्याकडून रक्कम वसूल करण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही सुरू आहे. श्री. इंगळे, शाखा अभियंता यांना दिनांक ३ नोव्हेंबर २०१५ रोजी निलंबित केले आहे. तत्कालीन कार्यकारी अभियंता, श्री. चंद्रागडे व तत्कालीन उप विभागीय अभियंता, श्री.देशभ्रतार यांच्या अभीनस्त सदर कर्मचारी असल्यामुळे त्या कर्मचा-यांवर प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाने पत्र क्र. जिपना/ ग्रापापुवि/शा.अ./३३२९/२०१५, दिनांक २३ डिसेंबर २०१५ अन्वये सादर केला आहे.

समितीने पुढे आणखी अशी विचारणा केली की, दिनांक २३ डिसेंबर २०१५ पासून या दोन्ही अधिका-यांवर काय कारवाई केली आहे. यावर मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, संबंधित अधिका-यांवर विभागीय चौकशी सुरू आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, दोन वर्षापासून त्यांच्यावर विभागीय चौकशी सुरू आहे का, सदर प्रकरणी अनियमितता झालेली आहे की गैरव्यवहार झालेला आहे, यावर मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, गेल्या दोन वर्षापासून त्यांची विभागीय चौकशी सुरू आहे. सदर प्रकरणी अनियमितता झालेली आहे. सदर प्रकरणात गैरव्यवहार झाल्याचे सचिवांनी मान्य केले आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, संबंधित अधिका-यावर एफ.आय.आर. दाखल केलेला आहे का यावर मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, संबंधित अधिका-यावर एफआयआर दाखल करण्यात यावा अशी नोटिस देण्यात आलेली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, दोन वर्षापासून एफआयआर दाखल केला नाही का, ३ लाख रुपयांची वसुली करण्यात आली आहे काय, यावर अप्पर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, एकूण ३ नळ पाणीपुरवठा योजना होत्या. कामाच्या संबंधी तक्रार प्राप्त झाल्यामुळे चौकशी करण्यात आली. या चौकशीत असे निष्पन्न आले की, १० लाख रुपयांचा गैरव्यवहार झालेला आहे. जेवढ्या रकमेचे देयक काढले तेवढ्या रकमेचे काम झालेले नाही. यामुळे चौकशीकरिता एक समिती नियुक्त करण्यात आली. या समितीने चौकशी केली असून केलेल्या मोजमापानुसार १० लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले. यामुळे संबंधित ठेकेदाराकडून रक्कम वसूल करावी लागेल. गाव पातळीवरील समितीकडून काही रक्कम वसूल करावी लागेल व काही रक्कम ठेकेदाराकडून वसूल करण्यात आली आहे. कामाच्या तुलनेत देयक रक्कम जास्त काढण्यात आले.

समितीने पुढे विचारणा केली की, सदर कामाचे सी.सी देण्यात आले होते काय, काम पूर्ण झाले झाले काय, सदरची योजना किती रकमेची होती, यावर अप्पर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, सदर कामाचे सी.सी. देण्यात आले नाही. काम अद्याप पूर्ण झालेले नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांनी समितीस विदित केले की, तांत्रिक मान्यता दि. १० फेब्रुवारी, २००६ मध्ये देण्यात आली. व सुधारीत प्रशासकीय मान्यता दिनांक १० मार्च, २००६ मध्ये देण्यात आले. वर्क ऑर्डर दिनांक ३१ मार्च, २००६ रोजी देण्यात आली होती. कामाची एकूण योजना १७ लाख ९१ हजार रुपयांची होती. विहीर १६ मीटर खोल व ६ मीटर व्यास ठरविण्यात आला होता. यावर समितीने पुढे विचारणा केली की, १६ मीटर खोल करायचे होते. मात्र विहिरीचे काम ९ मी. खोलीचे करण्यात आले, त्या विहिरीला पाणी लागले काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांनी समितीस विदित केले की, विहिरीला पाणी लागले नाही. यावर समितीने पुढे विचारणा केली की, विहिरीला पाणी लागले नाही. जोपर्यंत पाणी लागत नाही तो पर्यंत सदर कंत्राटदाराला पुढच्या कामाचे वर्क ऑर्डर मिळत नाही. असे असताना त्यांना पुढच्या कामाची वर्कऑर्डर कशी काय देण्यात आली, भूजल सर्व्हेनुसार पाणी असल्याचा दाखला जो पर्यंत दिला जात नाही, तोपर्यंत पुढील काम मिळत नाही. सदर योजनेत ९ मी. खोलीपर्यंत काम करण्यात आले. मात्र तेथे पाणी लागलेले नाही. एका बाजूला ही योजना पूर्ण झाल्याचे निर्दशनास येत आहे. ही योजना ग्रामपंचायतीला हस्तांतरित करण्यात आलेली आहे. एम.बी.रेकॉर्डवर किती काम झाल्याची नोंद आहे, पाणीपुरवठा योजना राबविताना निष्पन्न काय झाले, या आधारावर पुढील काम केले जाते. या योजनेत पाणी लागले नाही. १६ मीटर ऐवजी ९ मीटर खोलीचे काम झाले. या योजनेत मोठया प्रमाणात गैरव्यवहार झालेला आहे. अनियमितता झालेली आहे. अशा वेळी ही प्रक्रिया थांबावयास हवी होती. सन २००६ पासून सदर काम सुरू असून या करिता ११ वर्षे झालेली आहेत. यावर अप्पर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की कारवाई सुरू आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, अधिका-यांच्या दुर्लक्षामुळे राज्यातील ५० टक्के पाणीपुरवठा योजना बंद आहेत. सन २००५-०६ मध्ये वर्कऑर्डर देण्यात आली होती मात्र अद्याप या योजनेनुसार विहिरीला पाणी आलेले नाही. यामुळे तेथे दुसरी पाणीपुरवठा योजना सुरू करता येत नाही ही वस्तुस्थिती आहे. यासंबंधी कठोर कारवाई करण्याचा निर्णय समितीला घ्यावा लागेल. जिल्हा परिषदेकडून तत्कालीन शाखा अभियंता यांचे विरुद्ध निलंबनाची कारवाई करण्यात आली, संबंधितांविरुद्ध कारवाई न करण्याचे कारण काय आहे, कोणावर काय कारवाई करण्यात आली, यावर अप्पर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, तिघांवर कारवाई केलेली आहे. यावर

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांनी समितीस विदित केले की, तत्कालीन शाखा अभियंता श्री. संजय इंगळे यांना निलंबित केले असून त्यांची विभागीय चौकशी सुरू आहे. उप विभागीय अभियंता श्री. देशभ्रतार व श्री. चंद्रागडे हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिकारी (एमजेपी) मार्फत जिल्हा परिषद येथे प्रतिनियुक्तीवर कार्यरत असल्यामुळे त्यांचा प्रस्ताव दिनांक २३ फेब्रुवारी, २०१५ रोजी सादर करण्यात आला होता. मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी त्यांच्याविरुद्ध ज्ञापन बजावून विभागीय चौकशी सुरू केलेली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, श्री. देशभ्रतार यांच्या संबंधीचा प्रस्ताव पाठवला होता, त्याबाबत एमजेपीकडून काय कारवाई करण्यात आली, २ वर्षापूर्वी हा प्रस्ताव पाठवला होता. दोन वर्षापासून विभागीय चौकशी पूर्ण झाली नाही काय, सदर प्रकरणात अनियमितता झालेली आहे. यावर अप्पर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, सदर योजनेत गैरव्यवहार झालेला आहे. पाणी लागल्याशिवाय पुढील काम करावयास नको होते. मात्र ते काम केले व रक्कम खर्च करण्यात आली. चौकशी समितीने या बाबत चौकशी केलेली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, कामावर कनिष्ठ अभियंत्याचे १०० टक्के नियंत्रण असते. कनिष्ठ अभियंत्याला निलंबित करण्यात आले आहे का, त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली, २ वर्षापासून हा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे प्रलंबित आहे. यासंबंधी विभागाने कोणतीही कारवाई केली नाही. जबाबदारी निश्चित करणे आवश्यक होते. २-२ वर्षापासून अपहारी कर्मचारी पगार घेऊन गैरव्यवहार करीत आहे. त्यांना संरक्षण दिले जात आहे. यावर अप्पर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, कार्यकारी अभियंता व उपविभागीय अभियंता हे दोघही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मधील आहेत. त्यामुळे त्यांच्या चौकशीचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठविण्यात आला. दुस-या एका प्रकरणात त्यांना निलंबित करण्यात आले होते. ३ गावांमधील प्रकल्पासंबंधीचे प्रकरण होते. त्या संबंधी त्यांना नोटीस बजावण्यात आली असून चार्जशीट दाखल केलेली आहे. विभागीय चौकशी करण्यात आली असून चौकशी अधिकारी नियुक्त केलेल आहेत. त्यांनी अहवाल सादर केलेला आहे. विभागीय चौकशी करण्यापूर्वीच एका प्रकरणात त्यांना निलंबित केले होते. संबंधित दोन्ही अभियंत्यांना निलंबित केलेले आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, १० लाख रुपयांच्या गैरव्यवहारासंबंधीची संपूर्ण माहिती द्यावी. पैशाची अफरातफर झाल्यानंतर गुन्हयाची नोंद करण्यात आली काय, विभागीय चौकशी पूर्ण झाल्यानंतर एफआयआर केला जातो काय, यावर अप्पर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, कार्यालयीन कार्यपद्धती नुसार गुन्हा सिद्ध झाल्यानंतर एफआयआर नोंदवला जातो. यावर समितीने असे निदेश दिले की, विभागीय चौकशी संबंधी शासनाने निकष ठरवलेले आहेत. १० लाख रुपयांचा गैरव्यवहार झालेला आहे. या रकमेची वसुली झाली पाहिजे. सदर योजनेत मोठया प्रमाणात अफरातफर, भ्रष्टाचार झालेला आहे. सदर गाव पाण्यापासून वंचित राहिलेले आहे. राज्यात अशा अनेक योजना आहेत ज्या अपूर्ण राहिल्यामुळे लोकांना पाणी उपलब्ध झाले नाही. तसेच त्या योजना अपूर्ण असल्यामुळे दुसरी योजना सुरू करता येत नाही. योजनांमध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झालेला आहे. त्याबाबत चौकशी करून कारवाई झाली पाहिजे. रकमेची वसूली झाली पाहिजे. या प्रकरणासंबंधी तात्काळ कारवाई करावी. यावर अप्पर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विदित केले की, विभागीय चौकशी करण्यासाठी अधिकारी नियुक्त केलेले असून त्यांचा अहवाल आलेला आहे. या अहवालासंबंधी १५ दिवसांत निर्णय घेऊ. सदर गावातील पाणी पुरवठयाच्या इतर योजना पूर्ण झालेल्या आहेत. गावक-यांना पाणी दिले पाहिजे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, हा अत्यंत गंभीर मुद्दा आहे. योजना बंद असून संबंधित २ अधिका-यांची चौकशी सुरू आहे. पूर्वीच्या एका प्रकरणात त्यांना निलंबित करण्यात आले होते. याचा अर्थ ते सराईत गुन्हेगार आहेत. हे अधिकारी निलंबित असताना ते पुन्हा गैरव्यवहार करतात. योजना मंजूर करतानाच ती पूर्ण करण्यासाठी कालावधी निश्चित केला जातो. सन २००६ पासून योजना अद्याप अपूर्ण आहे. विहिरीला पाणी लागले नसताना दुसरीकडे काम कसे घेण्यात आले. यावर समितीने असे निदेश दिले की, यासंबंधी १५ दिवसात कारवाईची प्रोसेस पूर्ण करण्यात यावी. साक्षी दरम्यान जे मुद्दे उपस्थित झालेले आहेत त्यासंबंधी देखील अहवाल द्यावा.

## अभिप्राय व शिफारशी

नागपूर जिल्हा परिषदेअंतर्गत पारशिवनी तालुक्यातील सन २०११-१२ मधील सुरेरा, बनेरा, घाटकुकडा येथील नळ पाणीपुरवठा योजनेसंदर्भात लेखापरिक्षकांनी कंत्राटदाराने काम अर्धवट सोडून दिल्याबाबतीत आक्षेप उपस्थित केलेले होते. सुरेरा येथे १६ मीटर ऐवजी ९ मीटर खोल विहीर घेतली, परंतू पाणी लागले नसताना पुढे कामे केली, पंपिंग मशिन भाडे दिले नसल्यामुळे ग्रामस्थाने अडकवणे, पाईप वापरण्यायोग्य नाहीत त्यामुळे योजनेवर १६,७२,५५३ रुपये निष्फळ गेले. बनेरा येथे देखील १७ मीटर ऐवजी ७.५० मीटर खोल विहीर घेऊन बांधकाम केले आणि पाईप वापरण्यायोग्य नाहीत तसेच बंधाऱ्याला पाट्या लावल्या नव्हत्या त्यामुळे योजनेवरील १७,०२,३८१ रुपये देखील निष्फळ खर्च झाले. तसेच घाटकुकडा येथे देखील रुपये २०,५३,८३३ प्रदान करण्यात आले असूनही कंत्राटदाराने पाण्याच्या स्त्रोताचे काम आधी न करता पाईप लाईन, पाण्याची टाकी, पंपींग मशीन इत्यादी कामे केली याचा काहीही उपयोग नसल्याचे दिसून येत आहे. या तीनही नळ पाणीपुरवठा योजनांवर ५४ लक्ष २८ हजार ७६७ रुपयांचा शासनाचा निधी वसूल करण्याबाबत प्रमुख आक्षेप प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आला. समितीने जिल्हा परिषदेस भेट दिली असता जिल्हा परिषदेचा या तीनही कामांच्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकले असल्याचे तसेच कंत्राटदाराकडून आर.आर.सी. वसुलीची कार्यवाही सुरू करण्यात आली असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. सुरेरा व बनेरा योजनांवर झालेल्या खर्चावर सुधारीत प्राकलन प्रस्ताव सन २०१० मध्ये शासन मंजुरी करीता पाठविण्यात आला असून तो मंजूर

झाल्यावर पुर्वीच्या खर्चासह योजना पूर्ण करण्यात येईल अशी लेखी माहिती समितीस देण्यात आली. मौजा सुरेरा, बनेरा व घाटकुकडा ता. पारशिवनी येथील तीनही पाणीपुरवठा योजनांचे पुरवठा विहिरी वरील लोखंडी गर्डर, चिकट प्लेट, पंपाचे भुगतान कंत्राटदारास करण्यात आलेले आहे. परंतु सदर साहित्य योजनांच्या पुरवठा विहिरीवर आढळले नाही. तसेच बंधाऱ्याचे पाट्या व उर्ध्वनलिकेचे पी.व्ही.सी. पाईप सुद्धा आढळले नाहीत असे चौकशी अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. तीनही पाणीपुरवठा योजनेचे प्राकलन व बी-१ करारनाम्याप्रमाणे पुरवठा विहिरीचे बांधकाम हे ६ मी. व्यास १६ मी. खोल करावयाचे होते परंतु मोजमाप पुस्तिकेप्रमाणे सुरेरा योजनेच्या विहिरीला ९ मी. खोलीवर आवश्यक आवक सुद्धा उपलब्ध नाही. तसेच बनेरा योजनेच्या पुरवठा विहिरीचे प्रत्यक्षात खोदकाम व बांधकाम ७.५० मी. झालेले आहे व विहिरीला ७.५० मी. वर आवश्यक आवक उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे घाटकुकडा योजनेच्या विहिरीचे प्रत्यक्षात खोदकाम व बांधकाम ७.५० मी. झालेले असून विहिरीला ७.५० मी. वर आवश्यक आवक उपलब्ध नाही. लोकसंख्येनुसार गावाला आवश्यक असणारी पाण्याची आवक लक्षात न घेता, आवश्यक आवक क्षमता न तपासता योजनेच्या पुरवठा विहिरीचे व इतर उपांगाचे कामे काही प्रमाणात करण्यात आलेले आहे. सदर बाब अतिशय गंभीर स्वरुपाची आहे व सदर कामात नियमाचे उल्लघंन व शासनाच्या निधीचा गैरवापर झाल्याचे दिसुन आले. दिनांक २० जानेवारी २०१७ रोजी समिती स्थापन करण्यात आली होती व समितीचा अहवाल प्राप्त झाला असून त्या अन्वये **तत्कालीन अध्यक्ष ग्रामीण पाणीपुरवठा समिती, बनेरा व घाटकुकडा ग्रामपंचायत ढवळापूर व तत्कालीन अध्यक्ष, ग्रामीण पाणीपुरवठा समिती, सुरेरा, ग्रामपंचायत कोलीतमारा यांचेविरुद्ध वसुली प्रस्तावित करण्यात आली आहे, परंतू त्यांनी अद्याप सदर रक्कम जमा केलेली नाही. सदर रक्कमा वसूल करणे आवश्यक असून ती त्वरित वसूल करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

वस्तुतः कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्याशिवाय इतर कोणतीही कार्यवाही प्रस्तुत प्रकरणात झालेली समितीला आढळली नाही. प्रस्तुत तीनही प्रकरणात एकूण ५४,२८,७६७ खर्च करण्यात आल्याचे सांगण्यात आले. पहिल्या हप्त्याचे काम झाल्यानंतर दुसरा हप्ता वितरीत करणे गरजेचे होते. या प्रकरणात पर्यवेक्षकीय पातळीवर आणि नियोजनाच्या पातळीवर अशाच चुका झाल्या आहेत. सुमारे ९ वर्षांचा विलंब झाला असून अद्याप योजना अपूर्ण आहेत. समितीने सदरहू प्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निदेश दिले होते. समितीच्या निदेशानुसार विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान प्राप्त झालेला चौकशी अहवालात मौजे सुरेरा, बनेरा व घाटकुकडा ता.पारशिवनी जि.नागपूर येथील पाणीपुरवठा योजनेच्या बांधकामात झालेल्या अनियमितते संबंधात शाखा अभियंता यांना निलंबित करून त्यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. परंतू तत्कालीन कार्यकारी अभियंता व उपविभागीय अभियंता यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव अद्याप महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांचे स्तरावर प्रलंबित आहे. त्यावर पुढे काहीही कार्यवाही झालेली समितीस आढळून आलेली नाही. तसेच तत्कालिन ग्राम, आरोग्य, पोषण, पर्यावरण समितीचे सचिव व अध्यक्ष यांचे विरुद्ध खाते चौकशी सुरू आहे व कार्यवाही करण्याबाबत वन विभागास कळविण्यात आलेले आहे. **याचा अर्थ केवळ कनिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई सुरू आहे तर कार्यकारी अभियंता व उप विभागीय अभियंता यांसारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर केवळ नोटीसा बजावण्यात आल्या, त्यापुढील कारवाई अद्याप सुरूच करण्यात आलेली नाही याबद्दल समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. तसेच संबंधित कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांच्यावरील चौकशीची कारवाई सुरू करून सखोल चौकशी करून संबंधित कार्यरत अधिका-यांचा कालखंड योग्य रितीने तपासून त्यांना नैसर्गिक न्याय तत्वाची संधी देऊन चौकशी अंती संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून सदर चौकशी विभागाने विहित कालमर्यादेत पूर्ण करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण बारा

## जिल्हा परिषद, नागपूर

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांना १०० टक्के अनुदानावर जेन्ट्स सायकलींचा पुरवठा करण्याबाबत

## (परिच्छेद ३.६५४) (सन २०११-२०१२)

जिल्हा परिषद नागपूर यांची प्रमाणक क्रमांक १६६६ दिनांक १५.०३.२०१२ रुपये २४,२१,४४० अन्वये मे.मिना एंटरप्राईजेस मेन रोड पिंपळगाव, तालुका निफाड, जिल्हा नाशिक यांचेकडून खरेदी करून एकूण ७३६ लाभार्थ्यांकरिता सायकल पुरविण्याबाबत योजना राबविण्याकरिता खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत आक्षेप खालील प्रमाणे आहे.

(१) समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे पत्र क्र. १८५३ दिनांक ३१.०७.२०१२ अन्वये योजनेकरिता खरेदी केलेल्या साहित्याची वाटपा अभावी शिल्लक साहित्याची तपासणी केली असता एकूण १६२ नग शिल्लक असल्याचे दिसून आले. सदर योजनेचा लाभ हा त्याच वर्षामध्ये देणे आवश्यक आहे. मात्र लाभ न देण्यात आल्याने सेसफंडाची रक्कम १६२×३२९०= रक्कम रु. ५,३२,९८० निष्फळ गुंतून पडली आहे.

(२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र १०८२/६४५/३६६/३४ दिनांक २९ जुलै १९८९ अन्वये राबविलेल्या योजनांचे मुल्यमापन न केल्याने योजनाचे मूळ उद्दिष्ट सफल झाले असे म्हणता येणार नाही. सक्षम अधिका-याने मूल्यमापन अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावे.

(३) पंचायत समिती, भिवापूर येथे मंजूर यादीनुसार लाभार्थी संख्या ६१ असतांना लाभ ६२ लाभार्थ्यांना देण्यात आला आहे. तेव्हा सायकलचे प्रदान नियमबाहय ठरते.

(४) पुरवठा आदेश क्र. जिल्हा परिषद नागपूर साप्रवि/जिपसमे/पु.आ./४९३० जेन्ट्स सायकल ११-१२ दिनांक ०३ जानेवारी २०१२ अन्वये आदेश प्राप्ती पासून ४५ दिवसाचे आत पुरवठा करावयाचे आहे, मात्र पंचायत समिती नरखेड, हिंगणा, नागपूर यांची अनुक्रमे ५२ नग, १४ नग आणि ३४ नग विलंबाने पुरवठा केल्याने दंडात्मक रकमेची वसुली होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांच्याकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) लाभार्थ्यांनी साहित्याची उचल वेळेवर न केल्याने परिच्छेदात नमूद १६२ नग सायकल पंचायत समिती स्तरावर शिल्लक होते, नंतरच्या काळात सर्व सायकलचे लाभार्थ्यांना वाटप करण्यात आलेले आहे.

(२) सदर लाभार्थी विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या सायकलींमुळे त्यांना शाळेत जाणे सोयीचे झाले असून ग्रामीण भागातील शालेय गळतीचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे योजनेचे उद्दिष्ट सफल झाले आहे. यासोबत उपयोगिता प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल संलग्न आहे.

(३) पंचायत समिती भिवापूरला पुरवठा आदेशानुसार ६२ सायकलींचा पुरवठा करण्यात आला असून मंजूर यादी नुसार लाभार्थी संख्या ६१ ची यादी पाठविली व नंतर एका लाभार्थ्यांची निवड करून नाव पाठविण्यात आले व त्या लाभार्थ्यास सायकल वाटप करण्यात आली.

(४) याबाबत नियमानुसार कार्यवाही करून दंडात्मक रक्कम वसुल करण्यात आलेली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २९ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, लेखा परिक्षणापर्यंत १६२ सायकलींचे वाटप का करण्यात आले नाही, विहित वेळेत सायकल वाटप न होण्याची कारणे काय आहेत, सद्यस्थितीत किती सायकलींचे वाटप शिल्लक आहे, पंचायत समिती भिवापूरला मंजूर लाभार्थ्यांपेक्षा एक सायकलचा जास्त पुरवठा का केला, निवड केलेल्या लाभार्थ्यांचे अभिलेख लेखा परिक्षणाच्या वेळी उपलब्ध का करून देण्यात आले नाही, पंचायत समिती, नरखेड व हिंगणा यांना सायकलींचा पुरवठा कधी करण्यात आला, यावर जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, पुरवठादाराकडून ७३६ सायकलींचा पुरवठा करण्यात आला होता. त्यापैकी विविध पंचायत समित्यांमध्ये ५७४ सायकलींचे वाटप करण्यात आले. तसेच काही लाभार्थ्यांनी साहित्याची उचल वेळेवर न केल्यामुळे ते वाटप करण्यात आले नव्हते. परंतु नंतर लाभार्थ्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले. यावर समितीने अशी विचारणा केली की, सायकलींचा पुरवठा कधी करण्यात आला होता, यावर तत्कालीन समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, इयत्ता आठवी ते दहावीच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता सायकलींचे वाटप केले जाते.

दिनांक ११ मे, २०१२ रोजी सायकलींचा पुरवठा आदेश देण्यात आला होता. पुरवठा आदेशापासून ४५ दिवसांच्या कालावधीत पुरवठा करणे आवश्यक होते. परंतु पंचायत समिती, हिंगणा येथे १२ दिवस, पंचायत समिती, नरखेड येथे ३३ दिवस आणि पंचायत समिती, नागपूर येथे १२ दिवस विलंबाने सायकलींचा पुरवठा करण्यात आला. समितीने पुढे विचारणा केली की, सदर योजनेत दहावीच्या विद्यार्थ्यांचा सुद्धा समावेश होता. शैक्षणिक वर्ष पूर्ण झाले तरी विद्यार्थ्यांना सायकलीचे वाटप करण्यात आले नाही, याबाबत कोणती कार्यवाही करणार आहात, सायकलीचे वाटप केल्यानंतर ती सुस्थितीत नसल्याबाबत लाभार्थ्यांकडून तक्रारी प्राप्त झाल्या आहेत का, या प्रकरणी विलंबाने सायकल वाटप करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करणे आवश्यक आहे. लेखा परिक्षणाच्या वेळी उपयोगिता प्रमाणपत्र सादर का केले नाही, ५८ दिवसाच्या विलंबाने पुरवठा झाल्याबाबत पुरवठादाराविरुद्ध दंडात्मक कारवाई केली आहे का, यावर समाज कल्याण अधिकारी यांनी विदित केले की, लेखा परिक्षणाच्या वेळी उपयोगिता प्रमाणपत्र नव्हते. ते नंतर सादर केलेले आहे. तालुका स्तरावरुन उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करून घेतले आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सदर उपयोगिता प्रमाणपत्र तालुका स्तरावरुन प्राप्त केल्यानंतर लेखा परिक्षणाच्या वेळी सादर करणे आवश्यक होते. पुरवठा प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले. त्यानंतर उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, १६२ सायकलींचा पुरवठा करण्यात आला नाही. ५५ सायकली सुस्थितीत नसल्याने त्या पुरवठादारास परत केल्या नाहीत. सायकली वाटप न केल्यामुळे साधारणपणे रक्कम रुपये ७,३२,९८० इतकी होत आहे. शिल्लक असलेल्या १६२ सायकलींचे लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले का, विलंबाने पुरवठा केल्याबाबत संबंधित पुरवठादाराकडून दंड वसूल करणे आवश्यक होते. संबंधित एजन्सीचे नाव काय आहे, या प्रश्नावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, नाशिक जिल्ह्यातील मे.मिना एंटरप्रायजेस, पिंपळगाव यांनी सायकलींचा पुरवठा केला होता. त्यांनी विलंबाने पुरवठा केल्याबद्दल त्यांच्याकडून हिशोब करून ५८५७ रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच ५५ सायकली नादुरुस्त होत्या. त्या दुरुस्त करून लाभार्थ्यांना त्यांचे वाटप करण्यात आले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, त्यावेळी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी कोण होते, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, श्री.सैनी, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते. यावर समितीने असे निदेश दिले की, ग्रामविकास विभागाचा दिनांक २९ जुलै, १९८९ रोजीचा शासन निर्णय आहे. त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांविरूद्ध जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी व त्या बाबतचा अहवाल समितीकडे सादर करावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले. दिनांक १७ जानेवारी २००१ चे परिपत्रक आहे. त्यामध्ये योजनेच्या खरेदीच्या संदर्भातील वेळापत्रक दिले आहे. परिपत्रकामध्ये जिल्हा परिषदेच्या स्तरावर राबविण्यात येणाऱ्या योजनांचे नियोजन व अंमलबजावणी यांची मुदत दिली आहे. या सर्व बाबी नोव्हेंबर महिन्याच्या पूर्वी संपल्या पाहिजे होत्या. अंमलबजावणी योग्य पद्धतीने होत नसल्यामुळे लाभार्थ्यांना लाभ मिळत नाही. जिल्हा परिषद, शासन यांची प्रतिमा मलिन होत आहे. शासनाच्या योजना योग्य पद्धतीने राबविण्यासाठी जाणीवपूर्वक नियोजन केले पाहिजे. योजनांची अंमलबजावणी करण्यास विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई केली पाहिजे. याप्रकरणी फक्त विभाग प्रमुखांनाच जबाबदार धरले जाते. मुख्य कार्यकारी अधिकारी कस्टोडियन आहेत. त्यामुळे त्यांना देखील या संदर्भात जबाबदार धरले पाहिजे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले. यानंतर तत्कालीन समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, आता समितीने दिनांक १७ जानेवारी, २००१ च्या वेळापत्रकाच्या परिपत्रकाबाबत सांगितले आहे. परंतु परिपत्रकातील वेळापत्रकाची अंमलबजावणी करताना सर्व अधिकाऱ्यांना अडचणी येतात. समाजकल्याण अधिकारी कार्यालय जिल्हा स्तरावर आहे. जिल्हा परिषदेचे कोणतेही अधिकारी पंचायत समिती स्तरावर जात नाहीत. अंदाजपत्रकांचे कार्यक्रमपत्रक ग्रामपंचायतीकडून पंचायत समितीकडे, पंचायत समितीकडून जिल्हा परिषदेकडे येते. सर्व कार्यप्रणाली राबविताना जिल्हा परिषद, नागपूरच्या समाजकल्याण विभागाचा भाग मोठा व्यापक आहे. त्यामुळे तेवढ्या मोठ्या प्रमाणात कर्मचारी वर्ग देणे गरजेचे आहे. तत्कालीन समाजकल्याण अधिकारी कार्यरत होते, त्यावेळी विस्तार अधिकारी संवर्गाची ५ पदे होती, मात्र त्यातील फक्त एकच पद कार्यरत होते. रिक्त पदांची मोठी अडचण आहे. तत्कालीन समाजकल्याण अधिकारी रुजू झाले त्यावेळी अगोदरच्या २-३ वर्षांतील साहित्य शिल्लक होते. यावर समितीने आपले मत व्यक्त केले की, पंचायत समिती स्तरावर कर्मचारी आहे, त्यांची मदत घेऊ शकता. आपण पंचायत समित्यांच्या ठिकाणी बैठकीला जात नाही, त्यांचे ऐकून घेत नाही, आपले कार्यक्रम देत नाही. त्यामुळे असे होते. पाहणीच्या वेळी जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी पंचायत समित्यांना किती भेटी दिल्या ते समजेल. आपल्याकडे समन्वय नाही, त्यामुळे घोळ होतो. समाजकल्याण विभागाचे अधिकारी सांगतात ही वस्तुस्थिती आहे. समाजकल्याण विभागाचे तालुका स्तरावर अधिकारी नसतात. वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये साहित्याचे योग्य पद्धतीने वाटप व्हावे असे समितीला वाटते. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, वैयक्तिक लाभाच्या योजना तळागाळापर्यंत पोहचत नाहीत. खऱ्या गरजुंना लाभ मिळत नाही. ऑनलाईन अर्ज मागविले, वृत्तपत्रांत जाहिरात दिली तर त्यांना लाभ मिळू शकेल. ज्यांनी लाभ घेतला आहे त्यांची जिल्हा परिषदेकडे नावे आहेत. त्यामुळे नविन जास्त गरजु लोकांना वैयक्तिक योजनांचा लाभ देता येईल. परंतु यामध्ये एकच अडचण राहिल की, याला पदाधिकाऱ्यांचा सक्त विरोध राहिल. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्हा परिषदेची सुचना चांगली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, पदाधिकारी यादी तयार करतात आणि मग ती यादी अंतिम होते. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, एका व्यक्तीचे हित लक्षात घ्यायचे नाही. शासनाची योजना आहे आणि

ती गरजुंसाठी आहे. ऑनलाईनचे म्हणणे त्यांच्यासाठी योग्य आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, मार्च महिना आला तरी यादी अंतिम होत नाही. जिल्हा परिषद, पंचायत समिती स्तरावर यादीमध्ये दुबार नावे येतात. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, बीपीएलमधील व्यक्तींना ऑनलाईन अर्ज भरणे शक्य नाही. लोकप्रतिनिधींची सद्विवेकबुद्धी महत्त्वाची आहे. दुर्बल लोक योजनांपासून खूप अंतरावर आहेत, त्यांना लाभ देणे अपेक्षित आहे. कल्पना चांगली आहे. यामुळे नैसर्गिक न्याय मिळेल. ही कल्पना वापरली तर गरजुंना लाभ पोहचू शकतो.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना १०० टक्के अनुदानावर जेन्टस सायकलींचा पुरवठा करण्याबाबत : पुरवठादाराकडून ७३६ सायकलींपैकी ५७४ सायकलींचे वाटप करण्यात आले व १६२ सायकलींचा पुरवठा करण्यात आला नाही. तसेच ५५ सायकली नादुरुस्त झाल्या होत्या. त्याच प्रमाणे पुरवठादाराने पुरवठा विलंबाने केला होता. याप्रकरणी ग्रामविकास विभागाच्या दिनांक २९ जुलै, १९८९ रोजीच्या शासन निर्णयानुसार याप्रकरणी चौकशी करून संबंधित योजना राबविण्यात होणारा विलंब टाळण्यासाठी शासन कोणती विशेष उपाययोजना करणार आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली** :—

याप्रकरणी शासनाच्या दि. २९ जुलै १९८९ च्या शासन निर्णयातील तरतुदींच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे. पुरवठादाराने ७३६ सायकलींचा पुरवठा केलेला आहे. कार्यालयाचे आदेश क्र. ४९३०/२०११-१२ दि. ३ जानेवारी, २०१२ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. सदर आदेशानुसार ४५ दिवसाचे आत पुरवठा करण्याचे होते. मात्र पंचायत समिती, नरखेड येथे दिनांक २३ मार्च २०१२ ला ४२ नग ३३ दिवस उशिराने तसेच पंचायत समिती हिंगणा येथे दिनांक २ मार्च २०१२ ला १४ नग १२ दिवस उशिराने तसेच पंचायत समिती नागपूर येथे ३४ नग विलंबाने पुरवठा केला होता.

विहित कालावधीत वर नमूद सायकलींचा पुरवठा न केल्याने पुरवठादाराकडून नियमाप्रमाणे रुपये ५८५७ इतका दंड वसुल करण्यात आला आहे. तत्कालीन परिस्थितीत ७३६ सायकलींपैकी लाभार्थ्यांना वाटप न झालेल्या १६२ सायकली हया संबंधित विद्यार्थ्यांनी (लाभार्थी) सायकलींची उचल न केल्याने शिल्लक होत्या. विद्यार्थ्यांनी सायकलींची उचल न करण्यामागे उन्हाळ्याची सुटी हे एक प्रमुख कारण असल्याचे आढळून आले. उन्हाळ्याची सुटी संपल्यानंतर उर्वरित १६२ लाभार्थींनी (विद्यार्थ्यांनी) सायकलींची उचल केलेली आहे. शासनाच्या दि. २९ जुलै १९८९ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार या प्रकरणी फलश्रुती अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे घेण्यात आल्याचे आढळुन येत आहे. तसेच याप्रकरणी ५५ सायकलीं नादुरुस्त असल्याचे कोठेही अभिलेख्यावरुन आढळून आलेले नाही. लाभार्थ्यांना सायकलींचा पुरवठा झालेला असून यामध्ये कोणतीही आर्थिक अनियमितता तसेच शासनाचे कोणतेही नुकसान झालेले नाही. सन २०१५-१६ पासुन वेळेची बचत करण्यासाठी समाज कल्याण विभागाद्वारा ऑनलाईन पद्धतीने लाभार्थीकडून अर्ज भरण्याची पद्धत जिल्हा परिषद कार्यालयाने सुरू केली आली आहे. तसेच नियोजन विभागाच्या दि. ५ डिसेंबर २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तु स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतर, रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात मंत्रालयीन विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास विभाग**

पुरवठादाराने एकूण ७३६ सायकलींचा पुरवठा केला. विद्यार्थ्यांना त्यांच्या अडचणीमुळे वेळेवर सायकलींची उचल न केल्यामुळे सायकली वाटपा अभावी शिल्लक होत्या. सर्व पात्र लाभार्थ्यांना सायकल वाटप जिल्हा परिषद कार्यालयाने केले आहे. पुरवठादाराकडून सायकलींचा पुरवठा विलंबाने झाल्यामुळे त्यांचेकडून दंडात्मक कार्यवाही म्हणून रु.५,८५७ रक्कम वसूल केली आहे. सन २०१५-१६ पासुन ऑनलाईन पद्धतीने लाभार्थ्यांकडून अर्ज भरण्याची पद्धत जिल्हा परिषद कार्यालयाने अवलंबिण्यात आली आहे. तसेच नियोजन विभागाच्या दिनांक ५ डिसेंबर २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तु स्वरुपात मिळणा-या लाभाचे हस्तांतर, रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

**चौकशी अहवाल**

उपरोक्त प्रकरणी सायकल खरेदी बाबत दस्ताऐवजाची चौकशी केली असता ग्रामीण भागातील मुलांना शाळेत येण्या-जाण्यासाठी सायकल पुरवठा करणे ही योजना जि.प. सेस फंडात तरतूद करण्यात येऊन योजना राबविण्यात आली. सदर वर्षात मूळ तरतूद ४९ लाख होती. पुर्नविनियोजनानंतर रु. १,१६,००,००० करण्यात आली. समाज कल्याण समिती सभा पुर्ननियोजन ठराव क्र.२ दि. २० डिसेंबर २०११ व जिल्हा परिषद सर्व साधारण सभा ठराव क्र. ७ व ८ दिनांक २ डिसेंबर २०११ अन्वये मंजुरी प्राप्त करण्यात आली असून कार्यालयीन खर्च तांत्रिक मंजुरी आदेश क्र.४९२९, दि.०३.०१.२०१२ रोजी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. त्यानुसार या कार्यालयाचे पुरवठा आदेश क्र.४९३० दि.३ जानेवारी २०१२

अन्वये दर प्रती नग रु. ३२९० एकुण खरेदी नग ७३६ खरेदीची रक्कम रु.२४,२१,४४० अन्वये मे. मिना एटप्राईजेस, मेन रोड, पिंपळगाव यांचेकडून खरेदी करण्यासाठी मंजुरी घेऊन पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

पुरवठादाराने पुरवठा आदेश दिल्यानंतर दि. १८ फेब्रुवारी २०१२ आणि दि. २९ फेब्रुवारी २०१२ तसेच दि. २ मार्च २०१२ दि.२३ मार्च २०१२ पंचायत समितीला ५८ दिवस विलंबाने सायकलचा पुरवठा केल्यामुळे दंडात्मक रकमेची रु.५८५७ ची वसुली करण्यात आलेली आहेत. सर्व पंचायत समिती कडून उपयोगिता प्रमाणपत्र आणि फलश्रुती अहवाल प्राप्त करून नस्तीला जोडलेला आहे. खंड विकास अधिकारी, पं.स. यांना यापुढे विहित मुदतीत उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत आढावा बैठकीत सक्त ताकीद देण्यात आलेली असून मुल्यांकन योग्य पद्धतीने होत नसेल तर संबंधित अधिक-यावर आवश्यक कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहे. या कार्यालयाकडून सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षापासून ऑनलाईन अर्ज भरण्याच्या पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला असून भविष्यात आर्थिक वर्षातच विद्यार्थ्यांना सायकलीचे वितरण करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

अभिप्राय : सन २०११-२०१२ मध्ये मागासवर्गीय विघार्थ्यांना १००% अनुदानावर जेन्टस सायकलचा पुरवठा करणे ही योजना राबविण्यात आलेली होती. पुरवठादाराने विहित मुदतीत पुरवठा न केल्यामुळे ५८ दिवस उशिराने पुरवठा केल्याने रु.५८५७ दंडात्मक वसुली करण्यात आलेली आहे. पुढील कालावधीत शिल्लक असलेल्या सायकलीचे वाटप करण्यात आलेले आहे. सर्व पंचायत समितीकडून सदर साहित्याचे उपयोगिता प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल नस्तीला जोडलेले आहे. उपरोक्त प्रमाणे सर्व बाबीची चौकशी करण्यात आलेली असून यात कोणतीही अनियमितता झालेली नाही असे दिसुन येते.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १० ऑक्टोबर २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी विचारणा केली की, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना १०० टक्के अनुदानावर जेन्टस सायकलींचा पुरवठा करण्याबाबत पुरवठादाराकडून ७३६ सायकलीपैकी ५७४ सायकलींचे वाटप करण्यात आले व १६२ सायकलींचा पुरवठा करण्यात आला नाही तसेच पुरवठा करण्यात आलेल्या ५५ सायकली नादुरुस्त होत्या. त्याच प्रमाणे पुरवठाराने पुरवठा विलंबाने केला होता. या प्रकरणी ग्राम विकास विभागाच्या दिनांक २९ जुलै १९८९ रोजीच्या शासन निर्णयानुसार याप्रकरणी चौकशी करून संबंधित योजना राबविण्यात होणारा विलंब टाळण्यासाठी शासन कोणती विशेष उपाययोजना करणार आहे यावर सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी समितीला विदित केले की, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना १०० टक्के अनुदानावर सन २०१०-२०११ मध्ये जेन्टस सायकल वाटपाची योजना राबविण्यात आली होती. तीन पंचायत समितीमध्ये ही योजना राबविण्यात आली होती. सदर सायकलींचा पुरवठा ४५ दिवसांच्या आत करणे आवश्यक आहेत. पंचायत समिती, नरखेड येथे ४२ नग ३३ दिवस उशिराने पुरविण्यात आले. पंचायत समिती, हिंगणा येथे १४ नग १२ दिवस उशिराने पुरविण्यात आले. पंचायत समिती, नागपूर येथे ३४ नग उशिराने पुरविण्यात आले. त्याच प्रमाणे कामठी येथे २४ नग १३ दिवस उशिराने पुरविण्यात आले. कळमेश्वर येथे २७ नग ४ दिवस उशिराने पुरविण्यात आले. उमरेड येथे ३१ नग ४ दिवस उशिराने पुरविण्यात आले. काटोल येथे २५ नग ५ दिवस उशिराने पुरविण्यात आले. ११० सायकलींचा पुरवठा ४४ ठिकाणी उशिराने करण्यात आलेला आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, १०० टक्के अनुदानावर सायकलीचे वाटप करण्यात आले आहे काय, जिल्हा परिषदेने उचल करण्याची परवानगी का दिली नाही, उशिरा उचल का केली, जिल्हा परिषदेने दिलेले उत्तर असे आहे की, ७३६ सायकलींपैकी लाभार्थ्यांना वाटप न झालेल्या १६२ सायकली उचल न केल्याने शिल्लक होत्या. सायकली १०० टक्के अनुदानावर आहेत. मात्र तरीही उचल करीत नाहीत. विभाग स्वतःचा अभिप्रायच सांगत नाही. यावर सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी समितीस विदित केले की, सायकलींची उचल न करण्यामागचे मोठे कारण म्हणजे उन्हाळ्याची सुट्टी हे होते. त्यामुळे सायकलींची उचल केली नाही. १६२ सायकलींची उचल विलंबाने केली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, देयक अदा केव्हा झाले आहे, यावर सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी समितीस विदित केले की, दिनांक ५ मार्च २०१२ ला देयक अदा झाले आहे. पुरवठा आदेश दिनांक ३ जानेवारी २०१२ चा आहे. यावर समितीने विचारणा केली की, पुरवठा आदेश दिनांक ३ जानेवारी २०१२ चा आणि पेमेंट दिनांक ५ मार्च, २०१२ ला झाले आहे. पुरवठा ४५ दिवसांच्या मुदतीत करायचा होता. पुरवठा होण्याच्या अगोदरच देयक अदा केले आहे. विद्यार्थ्यांनी उचल केली नाही, असे कारण येथे देत आहात. ४५ दिवसांच्या आत पुरवठा झालेला नाही. विद्यार्थ्यांचे कारण दाखवत आहात. ग्रामविकास विभाग अशा प्रकारचे अभिप्राय देत आहे. शासन जिल्हा परिषदेला पाठीशी घालत आहे का, यावर सचिव, सामाजिक न्याय विभागानी यांनी समितीस विदित केले की, पुरवठा ४५ दिवसांच्या मुदतीत झाला आहे. फक्त ३ पंचायत समित्यांमध्ये विलंबाने पुरवठा झाला आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, पुरवठा आदेश ३ तारखेला आणि देयक अदा ५ तारखेला दिले आहे. जिल्हा परिषदेला इतकी घाई का होती, पुरवठा झालेला नाही. पुरवठा न होण्याची कारणे काय आहेत? २ दिवसात पेमेंट केले आहे. यावर सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी समितीस विदित केले की, पुरवठा आदेश दिनांक ३ जानेवारी, २०१२ चा आहे आणि पेमेंट दिनांक ५ मार्च, २०१२ चे आहे. पुरवठा ४५ दिवसांत

झाला आहे. फक्त ३ पंचायत समित्यांमध्ये पुरवठा विलंबाने झाला आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, पुरवठा विलंबाने होण्याची कारणे काय आहेत, कारण माहिती मध्येच दिले आहे. ५५ सायकली नादुरुस्त होत्या. यावर सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी समितीस विदित केले की, पुरवठादाराने काही तांत्रिक कारणांमुळे सायकलींचा पुरवठा विलंबाने केला. पुरवठा विलंबाने झाल्याबाबत पुरवठादाराकडून रु. ५,८५७ इतका दंड आकारण्यात आला आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, एकीकडे पुरवठा विलंबाने झाल्याबाबत कारवाई करता दुसरीकडे लाभार्थ्यांनी उचल केली नाही असे म्हणता, तिसरीकडे सांगत आहात की, ५५ सायकली नादुरुस्त होत्या. यावर सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी समितीस विदित केले की, तीनही बाबी वेगवेगळ्या आहेत. पहिली बाब म्हणजे पुरवठादाराने ३ पंचायत समित्यांमध्ये विलंबाने पुरवठा केला, त्यासाठी त्याला रु ५,८५७ इतका दंड केला आहे. दुसरी बाब म्हणजे १६२ सायकली विलंबाने घेतल्या आहेत, लाभार्थ्यांनी घेण्यास विलंब लावला आहे. मात्र पुरवठा झालेला आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, लाभार्थ्यांना गरज नव्हती का, शाळांनी माहिती दिली नाही का, फॉर्म भरण्यात काही चूक झाली का, उन्हाळ्याचे दिवस होते का, यावर सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी समितीस विदित केले की, उन्हाळ्याची सुट्टी होती. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ३ तालुक्यांमध्ये पुरवठा केव्हा झाला आहे, नादुरुस्त सायकलींचा विषय काय होता, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, ३ तालुक्यांमध्ये सायकलींचा पुरवठा नंतर झाला आहे. ५५ सायकली नादुरुस्त होत्या. डीबीटी केले आहे. शासनाने पुरवठ्याच्या संदर्भात डीबीटी करण्याचा प्रयत्न केला आहे. सुरूवातीपासुन लाभार्थ्यांना कल्टिवेटर्स, सायकली, शिलाई मशिन अशा वस्तू दिल्या जात होत्या. आता डीबीटी झाले आहे. वस्तु विकत घेतली होती का, हा प्रश्न आता येऊ शकत नाही यावर समितीने विचारणा केली की, डीबीटीमध्ये सायकल घेण्याची खात्री असेल का, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, लाभार्थ्याने सायकल घेतल्यावर पावती दाखवावी लागते. लाभार्थ्यांचा सायकलबरोबर फोटो काढून घेतो आणि त्यानंतर त्याच्या खात्यामध्ये पैसे पाठविले जातात.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, नागपूर यांनी सन २०११-१२ मध्ये एकूण ७३६ लाभार्थ्यांकरिता सायकल पुरविण्याबाबत योजना राबविण्याकरिता खर्च केलेला आहे. परंतू एकूण १६२ नग शिल्लक असल्याचे दिसून आले. सदर योजनेचा लाभ हा त्याच वर्षामध्ये देणे आवश्यक आहे. मात्र लाभ न देण्यात आल्याने सेसफंडाची रक्कम रु. ५,३२,९८० निष्फळ गुंतून पडली आहे. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक दिनांक २९ जुलै १९८९ अन्वये राबविलेल्या योजनांचे मुल्यमापन न केल्याने योजनाचे मूळ उद्दिष्ट सफल झाले असे म्हणता येणार नाही. सक्षम अधिका-याने मूल्यमापन अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले नाही. पंचायत समिती, भिवापूर येथे मंजूर यादीनुसार लाभार्थी संख्या ६१ असतांना लाभ ६२ लाभार्थ्यांना देण्यात आला आहे. तेव्हा सायकलचे प्रदान नियमबाह्य ठरते आणि ३४ नग विलंबाने पुरवठा केल्याने दंडात्मक रकमेची वसुली होणे आवश्यक आहे असे आक्षेप लेखा परिक्षकांनी प्रस्तुत प्रकरणी घेतले. सदर आक्षेपास अनुसरुन जिल्हा परिषद, नागपूर यांनी नंतरच्या काळात सर्व सायकलचे लाभार्थ्यांना वाटप करण्यात आलेले आहे. विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या सायकलींमुळे त्यांना शाळेत जाणे सोयीचे झाले असून ग्रामीण भागातील शालेय गळतीचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे योजनेचे उद्दिष्ट सफल झाले आहे. उपयोगिता प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल उपलब्ध आहे आणि विलंबाबाबत पुरवठादाराकडून दंडात्मक रक्कम वसुल करण्यात आलेली आहे असा लेखी खुलासा समितीस प्राप्त झाला.

प्रस्तुत प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय सचिवांचे साक्षीदरम्यान वेगवेगळी माहिती समितीस प्राप्त झाली. साधारणतः जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना सायकलींचे १००% अनुदानावर वाटप करायचे होते. याचा अर्थ यामध्ये लाभार्थी हिस्सा भरण्याचा प्रश्नच नव्हता, पूर्णतः मोफत सायकलींचे वाटप करावयाचे होते. दिनांक १७ जानेवारी २००१ रोजीच्या **(परिशिष्ट १२.१)** शासन परिपत्रकात अशा योजना राबविण्याचे वेळा पत्रक घालून देण्यात आले आहे. सुरूवातीला जिल्हा परिषदेच्या अंदाजपत्रकात मूळ तरतूद ४८ लक्ष रुपयांची होती. परंतू पुर्नर्वियोजनानंतर ती १,१६,००,००० करण्यात आली. समाजकल्याण समितीचा दिनांक २० डिसेंबर २०११ व सर्वसाधारण सभेचा दिनांक २ डिसेंबर, २०११ रोजीच्या ठरावानुसार सायकल खरेदीला मान्यता देण्यात आली. त्यास अनुसरुन जिल्हा परिषद कार्यालयाने दिनांक ३ जानेवारी, २०१२ रोजी ७३६ सायकल खरेदीचे पुरवठा आदेश पुरवठादाराला दिलेले आहेत.

साधारणतः १७ फेब्रुवारीच्या आधी ४५ दिवसांत पुरवठादाराने सर्व सायकलींचा पुरवठा करणे आवश्यक होते. परंतू पुरवठादाराने ११० सायकलींचा पुरवठा उशिराने केलेला असला तरी नरखेडला ३३ दिवस व हिंगण्याला १२ दिवस वगळता इतर ठिकाणी ४-५ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदर परिस्थिती पहाता पुरवठादाराचा विलंब आणि १६२ सायकली गोदामात पडून राहण्याचा संबंध जोडता येत नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. एवढेच नव्हेतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या साक्षीदरम्यान ५५ सायकली नादुरुस्त असल्याची माहिती देण्यात आली होती. परंतु विभागीय साक्षीदरम्यान ५५ सायकली नादुरुस्त असल्याचे आढळून आले नाही अशी माहिती समितीस प्राप्त झाली. दोन्ही साक्षीदरम्यान प्राप्त झालेल्या माहितीतील विसंगती लक्षात घेता प्रस्तुत प्रकरणात प्रशासनाकडून तथ्ये लपवून ठेवली जात असल्याची समितीला शंका आहे. पुरवठादाराने सायकली विलंबाने दिल्या किंवा नादुरुस्त दिल्या काय यामध्ये १६२ विद्यार्थ्यांना वेळेवर व त्याच शैक्षणिक वर्षामध्ये सायकली मिळाल्या नाहीत व

ते या शैक्षणिक सुविधेपासून वंचित राहिले. इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना १० वीची परिक्षा झाल्यावर सायकली मिळाल्या असतील तर त्यापेक्षा गंभीर बाब दुसरी असणार नाही. केवळ पुरवठादाराकडून विलंबाबाबत ५८५७ रुपयांचा दंड वसूल करून विभागाची जबाबदारी संपत नाही. वस्तुतः दिनांक १७ जानेवारी, २००१ रोजीच्या परिपत्रकातील वेळापत्रकाप्रमाणे योजनेची अंमलबजावणी झाली असती तर असा आक्षेपच उद्‌भवला नसता. त्यामुळे सद्यःस्थितीमध्ये देखील दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजीच्या **(परिशिष्ट १२.२)** शासन निर्णयानुसार लाभार्थ्यांच्या (डीबीटी) खात्यात वैयक्तिक लाभाच्या योजनेच्या अनुदानाची रक्कम जमा करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. परंतू त्यामध्ये २००१ च्या परिपत्रकानुसार वेळापत्रक घालून दिलेले नाही. सर्व लाभार्थ्यांना साहित्याच्या अनुदानाचे वाटप १ ते ८ जानेवारी दरम्यान होईल असे नियोजन करणे आवश्यक आहे, त्यानुसार (डीबीटी) योजनेमध्ये देखील लाभार्थ्यांच्या खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करण्याचे वेळापत्रक विभागाने घालून देणे आवश्यक आहे, **अन्यथा लाभार्थी अशा प्रकारच्या योजनांना प्रतिसाद देतील की नाही याबाबत समिती साशंक आहे. कारण लाभार्थ्यांने आधी वस्तु खरेदी करायची आहे. वस्तुची पावती सादर केल्यानंतर त्याच्या खात्यावर अनुदानाची रक्कम जमा केली जाणार आहे. प्रत्यक्षात वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभार्थी गरीब असतो त्याची जर आधी सायकल घ्यायची ऐपत असती तर त्याने ती आधीच घेतली असती तो शासनाच्या अनुदानाची प्रतिक्षाच करत बसला नसता असे समितीचे स्पष्ट मत आहे. त्यामुळे डीबीटी संबंधात निर्णयाच्या अंमलबजावणीचा एक वर्षाचा अनुभव लक्षात घेवून त्याबाबत करावयाच्या सुधारणा करून सुधारित शासन निर्णय शासनाने निर्गमित करावा अशी समितीची शिफारस आहे.**

लेखा परिक्षकांनी प्रामुख्याने ग्रामविकास विभागाच्या दिनांक २९ जुलै, १९८९ **(परिशिष्ट १२.३)** रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदी अनुसार प्रस्तुत प्रकरणातील सायकल वाटप योजनेचे मुल्यमापन केल्याने योजनेचे मूळ उद्दिष्ट सफल झाले नाही, तसेच सक्षम अधिकाऱ्याने मुल्यमापन अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले नाही असा प्रमुख आक्षेप घेतलेला होता. परंतू सन १९८९ रोजीच्या शासन निर्णयानुसार मुल्यमापनच प्रस्तुत प्रकरणात झालेले नाही. समितीच्या बैठकीच्या वेळी उपयोगिता प्रमाणपत्र व फलश्रृती अहवाल सादर करण्यात आले परंतू त्यावर दिनांकित स्वाक्षरी नसल्यामुळे तसेच थोड्याफार फरकाने एकाच फॉरमॅट मधील उपयोगिता प्रमाणपत्रे असल्यामुळे ते समितीच्या भेटीच्या वेळी मागावून नंतर तयार करण्यात आले असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे समितीच्या मते ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील, वंचित मागासवर्गीय लाभार्थ्याला वैयक्तिक लाभाच्या योजनेचा लाभ देत असताना सदर योजनेची फलश्रृती पाहाण्यासाठी जिल्हा परिषदांनी व त्यांच्या विषय समित्यांनी आणि संबंधित विभाग प्रमुखांनी कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने कार्यक्रमाचा आढावा घेऊन मुल्यमापन करणे आवश्यक आहे. असे अंतर्गत मुल्यमापन हे कामास जबाबदार असलेल्या खाते प्रमुखाकडून दरवर्षी आर्थिक वर्ष संपल्यानंतर एप्रिल/मे महिन्यापर्यंत करायचे होते. या मुल्यमापनाच्या प्रती मुख्य कार्यकारी अधिकारी व विषय समित्यांचे सभापतींना ३१ मे पर्यंत सादर करणे आवश्यक होते. तद्‌नंतर दुसऱ्या स्तरावरील मुल्यमापन हे स्वतंत्ररित्या विभाग प्रमुखांकडून उदा. अधिक्षक अभियंता, सह संचालक, कृषी आदी यांनी करणे आवश्यक आहे. तेही दरवर्षी जून/जुलै मध्ये करणे आवश्यक आहे. मुल्यमापनाच्या फलश्रृतीच्या प्रती संबंधित विभाग प्रमुखांच्या लगेच वरिष्ठ अधिकाऱ्यांना उदा. मुख्य अभियंता, संचालक, पशुसंवर्धन यांना तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा परिषद, अध्यक्ष यांना ३१ जुलै पर्यंत सादर कराव्यात व इतर कोणत्याही विभाग अधिकाऱ्यांशी संबंधित नसलेल्या कामाचे मुल्यमापन विभागीय आयुक्तांनी करायचे आहे व त्यांनी केलेल्या मुल्यमापनाच्या फलश्रृतीच्या अहवालाची प्रत सचिव ग्रामविकास विभाग यांना पाठवावयाची असते. समितीच्या मते अशा प्रकारची कारवाई कोठेही होत नाही. **अतः प्रस्तुत प्रकरणात झालेले शासन निर्णयाचे उल्लंघन पहाता सदर शासन निर्णयाचे अनुपालन पुढील काळात अधिक क्षमतेने वेळेवर होईल याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. अन्यथा शासनाच्या कल्याणकारी योजनांचे उद्दिष्ट साध्य होणार नाही अशीही समितीची शिफारस आहे.**

प्रस्तुत प्रकरणातील ६३७ सायकलींचा पुरवठा आदेश दिनांक ३ जानेवारी, २०१२ रोजी दिले, परंतू उर्वरित ११० सायकली प्राप्त होण्यापूर्वीच दिनांक ५ मार्च, २०१२ रोजीच पुरवठादाराला देयक अदा करण्यात आले आहे. **सायकलींचा पुरवठा आदेश विलंबाने झाला असून पुरवठादाराने सायकलींचा पुरवठा मार्च महिन्यात केला आहे. मार्च महिन्यात परिक्षेचे दिवस असतात व त्यानंतर मुलांच्या सुट्टया असतात, अशा वेळी या सायकलींचा वापर त्या वर्षातील शैक्षणिक सत्रात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना होत नाही त्यामुळे या योजनेचा हेतू सफल होत नाही. सायकल घेऊन मुलाला त्याचा शैक्षणिक कामासाठी वेळीच वापर न होणे हे देखील एक अनियमितता व अकार्यक्षमतेचे लक्षण असून अधिका-यांमधील योजनेच्या अंमलबजावणी संबंधात उदासिनतेचे लक्षण आहे. अशा अधिकाऱ्यांकडून शासनाच्या मागासवर्गीयांसाठी विविध कल्याणकारी योजना तत्परतेने राबविल्या जात नसल्यामुळे अशा समुहाची शासनाबाबतची उदासिनता वाढते, त्यामुळे योजना वेळापत्रकाप्रमाणेच राबविली गेली पाहिजे व त्या योजनेचा संबंधितास ज्या कारणासाठी योजना राबविली जाते, त्यासाठी लाभ देणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांकडून साक्षीत नमूद केल्याप्रमाणे अनियमितता झाली असल्यामुळे याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून त्यांचेवर कारवाई करावी व अशा योजनांचा लाभार्थ्यांना वेळीच लाभ कसा होईल या दृष्टीने सर्व संबंधितांना कठोर सूचना निर्गमित कराव्यात व अशा योजनांची फलनिष्पत्तीची देखील नोंद घ्यावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी.**

## प्रकरण तेरा

## जिल्हा परिषद, नागपूर

## पाटणसावंगी येथील अंतर्गत रस्ते बांधकामाबाबत

## परिच्छेद ४.१५९ (सन २०११-१२)

पंचायत समिती सावनेर रस्ते बांधकामाची अंतिम मोजमापे नोंदवून अंतिम प्रदाने करण्यात आली आहेत. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्र. झेडपीए. २००५/प्र.क्र.३६६/वित्त-५ मंत्रालय, मुंबई दिनांक ३० डिसेंबर २००६ अन्वये रुपये ५ ते ५० लाख पर्यंतची कामे राज्यस्तरीय मराठी, हिंन्दी या वृत्तपत्रांमध्ये निविदा प्रसिद्ध केली नाही. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे आदेश क्र.६२९८ दिनांक ०१ नोव्हेंबर २०११ अन्वये खंड विकास अधिकारी यांचे स्तरावर काम करणे व निविदाकरण करणेबाबत निर्देश असतांना पंचायत समितीस्तरावर निविदाकरण केले नाही.

(२) बाब क्र.१.४० एम.एम.खडी ५५.८० क्यु.मि. वापर केल्याने रुपये ७०,१४० चे ज्यादा प्रदान केले, बाब क्र.७ पोव्हायडींग रेनफोर्समेंट ९.३७ मे. टन स्टील ऐवजी १५.२१७ मे. टन स्टील वापर केल्याने रुपये ३,११,२८९ चे जादा प्रदान झाल्याने सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण २००४/प्र.क्र.८५/रस्ते-१, दिनांक १६ एप्रिल २००४ चे उल्लंघन झाले आहे.

(३) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्र.व्ही.पी.एम. १०९९/प्र.क्र.५४/०८ दिनांक २० मे १९९९ नुसार कामाच्या ठिकाणी बोर्ड लावणे आवश्यक आहे. तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ नुसार कार्यकारी अभियंता यांची तपासणी ५ टक्के व पूर्णत्व प्रमाणपत्रावर सही नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए.२००६/प्र.क्र.३३६/वित्त-०९ दिनांक ३१.१२.२००९ च्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे सदर कामाची जाहिरात व वर्गाचे दैनिक वृत्तपत्रात (युवराष्ट्र दर्शन) ग्राम पंचायत पाटणसावंगी यांनी जाहिरात प्रसिद्ध केलेली आहे. पंचायत समिती अंतर्गत ग्राम पंचायत स्तरावर निविदा काढण्यात आलेल्या असून कमी दराच्या निविदाधारकास कामाचे आदेश देण्यात आले आहे.

(२) पाटणसावंगी येथे सन २०११-१२ या आर्थिक वर्षात २५१५ ग्रामीण विकास या शिर्षकाखाली गावांतर्गत सिमेंट काँक्रीट रस्त्याचे बांधकाम मंजूर होते. प्राकलनामध्ये फक्त १५ टक्के खड्डे भराई करिता ४० मिलीमीटर खडीची तरतूद करण्यात आली होती. वरील रस्ते हे गावांतर्गत विस्तृत स्वरुपात असल्यामुळे व रस्ता समतल पातळी करण्याचे दृष्टीने काही ठिकाणी रस्त्यांची लांबी खोलगट भागातून जात असल्यामुळे या भागात रस्त्याच्या पूर्ण रुंदीमध्ये जास्तीचा थर द्यावा लागल्याने प्रत्यक्षात झालेल्या कामामध्ये खडीच्या परिमाणात वाढ झाली. सिमेंट काँक्रीट रस्त्याला लागणारे स्टीलचे परिमाण हे अंदाजपत्रकामध्ये ढोबळमानाने ९.३७ मेट्रीक टनची तरतूद करण्यात आलेली होती. परंतू प्रत्यक्षात केलेल्या कामानुसार स्टीलचे मोजमापाचे परिमाण १५.२१७ मेट्रीक टन झाले. उपरोक्त बाबी सक्षम अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून देण्यात आली होती व त्याबाबत सक्षम अधिकाऱ्यांची मान्यता घेण्यात आलेली आहे.

(३) सदरहू काम हे ग्रामपंचायत स्तरावरील असल्यामुळे ग्रामपंचायतीनी काम सुरू करतेवेळी माहिती दर्शक फलकदर्शनी भागावर लावलेला असल्यामुळे पुनःश्च माहिती फलक लावण्यात आलेला नाही. लावण्यात आलेल्या फलकाचे छायाचित्र जोडण्यात आलेले आहेत तसेच संबंधित कामाची कार्यकारी अभियंता यांनी नियमाप्रमाणे तपासणी केली असून बाब क्र.६ मोजमाप पुस्तिका क्र.९५२ पान क्र. ८ वर याची नोंद आहे व पूर्णत्वाचे प्रमाणपत्रावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :

नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २९ सप्टेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पाटणसावंगी अंतर्गत रस्त्याचे काम रुपये ३९,९९,९५० इतक्या रकमेचे असल्याने त्याची निविदा राज्यस्तरीय मराठी वर्तमानपत्रातून प्रसिद्ध करणे आवश्यक होते. ही कार्यवाही कोणत्या प्राधिकरान्वये डावलली, या कामामध्ये ४० मी.मी. खडी व स्टीलचे अनुक्रमे रुपये ७०,१४० व रुपये ३,११,२८९ इतक्या रकमेच्या जादा परिणामास सक्षम अधिकाऱ्यांची पूर्वमंजुरी का घेण्यात आली नाही, खडी व स्टीलच्या परिमाणात वाढ होण्याची कारणे काय आहेत, अंदाजपत्रक तयार करताना ही बाब विचारात का घेण्यात

आली नाही, कार्यकारी अभियंता यांनी कामाची ५ टक्के तपासणी केव्हा केली, मोजमाप पुस्तिकेत नोंदविण्यात आलेल्या तपासणीची नोंद लेखा परिक्षणाच्या वेळी का दर्शविण्यात आली नाही, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ही निविदा ग्रामपंचायत स्तरावर काढण्यात आली होती. लाभार्थ्यांना लाभ मिळावा याकरिता युवराष्ट्र दर्शन या जिल्हास्तरीय वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात आली होती. यावर समितीने पुढे विचारणा केली की, ही निविदा ग्रामपंचायत स्तरावर कशी काढली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, निधी ग्रामपंचायतीकडे आलेला असल्यामुळे ग्राम पंचायत स्तरावर निविदा काढली. ४० लाख रुपयांचे काम होते. या संदर्भात एका वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. या संदर्भात जिल्हा परिषदेकडून गट विकास अधिकारी स्तरावर सदरहू काम करण्याकरिता पाठविले होते. परंतु त्यांनी ते ग्रामपंचायतीकडे पाठविल्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर निविदा काढण्यात आली, या बाबत सविस्तर माहिती घेण्यात येईल. यावर समितीने अशी विचारणा केली की, या प्रकरणी उघडपणे अफरातफर झाल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे सविस्तर चौकशी होणे आवश्यक आहे. ५ ते ५० लाख रुपयांच्या कामांची निविदा असल्यास त्याकरिता राज्य स्तरीय वर्तमानपत्रातून प्रसिद्धी देणे अत्यावश्यक आहे. सदर कामाची निविदा युवराष्ट्र दर्शन या वर्तमानत्रात प्रसिद्ध केली. संबंधित वर्तमानपत्र राज्यस्तरीय आहे का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, युवराष्ट्र दर्शन हे साप्ताहिक असून ते जिल्हास्तरीय आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, एवढ्या मोठ्या रकमेची निविदा प्रसिद्ध करण्याकरिता साप्ताहिकामध्ये जाहिरात प्रसिद्ध करता येत नाही. २००६ च्या शासन निर्णयानुसार राज्य स्तरीय वर्तमानपत्रात निविदेची जाहिरात देणे बंधनकारक आहे. परंतु या प्रकरणी शासन निर्णय विरोधी कार्यवाही केली आहे. या कामाकरिता देखरेख करण्याची जबाबदारी कोणाची होती, संबधित कामाच्या नोंदी मोजमाप पुस्तिकेमध्ये कोणी घेतल्या होत्या, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, या संदर्भात पंचायत समितीची जबाबदारी आहे. कनिष्ठ अभियंत्यांनी सदरच्या कामाच्या मोजमाप पुस्तिकेमध्ये नोंदी घेतल्या होत्या. तसेच सदर कामाची तपासणी केल्यानंतर कामाचे बिल अंतिम केले. यावर समितीने अशी विचारणा केली होती की, निविदा रक्कम ४० लाख रुपयांची असल्यामुळे जिल्हा स्तरावर निविदा काढणे अत्यावश्यक होते. रुपये ७०,१४० इतक्या जास्त रकमेचे मुल्यांकन कसे केले.

समितीने अशी विचारणा केली की, रु. ३,८१,००० कुठे गेले, यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की पूर्वमंजुरी घेतल्याशिवाय अंमलबजावणी करता येत नाही. सव्वा पटपेक्षा जास्त वाढ झाली आहे. यासाठी तांत्रिक मान्यता घ्यावी लागेल. प्रमाणापेक्षा अधिकचे काम वाढल्यामुळे तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, या संदर्भातील सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन २००४ चे परिपत्रकाचे अवलोकन करणे आवश्यक आहे, जिल्हा परिषदेने जेवढ्या रकमेस तांत्रिक मान्यता दिली त्यापेक्षा जास्त देयक अदा केले आहे. सव्वापटीपेक्षा जास्त काम अंमलात आणले आहे. सन २००४ च्या परिपत्रकाप्रमाणे जिल्हा परिषदेने अधीक्षक अभियंता यांची मंजुरी घेतली पाहिजे होती, ती घेतली नाही असे जिल्हा परिषद का मान्य करीत नाही, सार्वजनिक बांधकाम विभागाचे दिनांक १४ एप्रिल, २००४ चे या संदर्भात परिपत्रक आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, महाराष्ट्र जिल्हा परिषद/पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ नुसार या कामाची कमीत कमी ५ टक्के तपासणी होणे आवश्यक आहे. तसेच पूर्णत्वाचे प्रमाणपत्र असणे अत्यंत आवश्यक आहे. कार्यकारी अभियंत्यांची पूर्णत्वाच्या दाखल्यावर स्वाक्षरी नाही, त्यांनी पूर्णत्वाचा दाखला दिलेला नसताना देयक सादर कसे केले, यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, तपासणी केली आहे. स्वाक्षरी केली आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, जिल्हापरिषदेने पूर्णत्वाचा दाखला समितीस सादर करण्यात यावा. यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस विदित केले की, सुधारित मान्यता घेण्याचे राहिले असल्याचे मान्य केले. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन २००४ चे परिपत्रक आहे. जिल्हापरिषदेने ते निदेश पाळले पाहिजेत. यावर समितीने असे निदेश दिले की, सदर प्रकरणी ज्या काही चुकीच्या बाबी झाल्या आहेत, त्या संदर्भात सखोल चौकशी करून तत्संदर्भातील अहवाल ३ महिन्यांच्या आत समितीला पाठविण्यात यावा. तसेच सदर प्रकरणी अनियमितता झाली असेल तर संबंधितांच्या विरूद्ध कारवाई प्रस्तावित करावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पाटणसावंगी रस्त्याच्या रुपये ३९,९९,९५० एवढ्या रकमेच्या कामाची निविदा सन २००६ च्या शासन निर्णयानुसार राज्यस्तरीय वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणे आवश्यक होते. तसेच रुपये ३,८१,००० एवढ्या रकमेच्या वाढीव कामास दिनांक १४ एप्रिल, २००४ च्या परिपत्रकानुसार सुधारित मान्यता घेण्यात आली नाही. या प्रकरणी दोषीवर काय कारवाई करण्यात आली ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली—**

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्र. झेडपीए.२००६/प्र.क्र.३६६/वित्त-९, मंत्रालय, मुंबई दि. ३१ डिसेंबर, २००९ नुसार पाटणसावंगी रस्त्याच्या कामाची रु. ३९,९९,९५० किमतीची निविदा युवाराष्ट्र, नागपूर जिल्हा दर्शन या दैनिक वृत्तपत्रात (ब वर्ग दैनिक) दि. ०६ नोव्हेंबर २०११ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

सदरची जाहिरात कमीत कमी ३ दैनिकांमध्ये प्रसिद्ध करण्याची आवश्यकता होती. तसेच निविदा कालावधी शासन निर्णय क्रमांक निविदा-२०१२/प्र.क्र.९७/पं.रा.७ दि. २३ सप्टेंबर, २०१३ अन्वये प्रथम वेळ २१ दिवस असणे आवश्यक होते. यासंबंधीची जबाबदारी गट विकास अधिकारी पंचायत समिती, सावनेर यांचेवर सोपविलेली असतांनाही त्यानुसार त्यांनी कारवाई केली नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे तत्कालिन गट विकास अधिकारी, श्री.भगत यांना या कार्यालयाचे पत्र क्र. जिपना/बांध/पंरास/८२२४/१५ दि. २१ नोव्हेंबर २०१५ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. त्यानुसार त्यांनी आपला खुलासा पत्र क्र. पंसक/गविअ/५५२/१६ दि. ०८ फेब्रुवारी २०१६ अन्वये खुलासा सादर केलेला आहे. खुलासा समाधानकारक नसल्यामुळे या कार्यालयाचे आदेश क्र. जिपना/पंरास/१४२७/१६ दि. २२ फेब्रुवारी २०१६ अन्वये विभागीय चौकशीसाठी प्रस्ताव मा. प्रधान सचिव ग्रामविकास व जलसंधारण, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे १ ते ४ जोड पत्रासह सादर करण्यात आलेले आहे. तत्कालीन शाखा अभियंता, श्री.एन.के.कुंभलवार यांनी कर्तव्य पार पाडताना कामात वाढ होणा-या बाबी वेळोवेळी वरिष्ठांच्या निदर्शनास आणून देणे गरजेचे होते. परंतु तसे न करून काम पूर्ण केलेले आहे. त्यांनी त्यांचे कर्तव्यात केलेल्या कसुरांच्या अनुषंगाने शिक्षा म्हणून एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात एक वर्षाकरिता थांबविण्यात येत आहे. या कामामध्ये ४० मि.मी.खडी व स्टीलचे परिमाणात वाढ झालेली आहे. सविस्तर अंदाजपत्रके तयार करतांना खडी व स्टीलची तरतूद अंदाजे करण्यात येते. परंतु प्रत्यक्षात काम करतांना मूळ रस्ता खोलगट भागातुन जात असल्याने रस्ता समपातळीत घेणे व पुरेशी खडीची जाडी तयार करण्याकरिता प्रत्यक्ष काम करतांना जास्तीचा खडीची थर द्यावा लागल्यामुळे परिमाणात वाढ झालेली आहे. त्यामुळे सदर वाढीव कामास सुधारित मान्याता घेणे आवश्यक होते. या प्रकरणी करारनाम्यातील परिमाणानुसार १२५ टक्के पेक्षा जास्त वाढीव बाबीस सक्षम अधिकारी, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर यांचेकडून कार्योत्तर मंजुरी दिनांक १३ जानेवारी २०१६ रोजी घेण्यात आलेली आहे.

समितीने वस्तुस्थिती लक्षात घेऊन सदर मुद्दा ग्राहय धरुन निकाली काढावा, ही विनंती.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात मंत्रालयीन विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली—**

**ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभाग**

ग्राम विकास व जलसंधारण (ग्राम विकास) विभागाचे अभिप्राय :

श्री. डी. एन. भगत, गट विकास अधिकारी, पंचायत समिती सावनेर, जिल्हा परिषद, त्यांच्याविरुद्ध दि. २५/०९/२०१७ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम १० नुसार दोषारोप बजावण्यात आले आहे.

**चौकशी अहवाल :**

**कामाचे नाव : पाटणसावंगी येथे अंतर्गत सिंमेट रस्ते बांधकाम पंचायत समिती, सावनेर, जि.नागपूर**

**निधी वितरण आदेश : ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.विकास-२०१०/ प्र.क्र.१०१/५२१८ दि.३१/३/२०११ रु. ४०.०० लक्ष.**

पाटणसावंगी, ता.सावनेर येथे लेखाशिर्ष २५१५ (लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे सन २०११-१२) अंतर्गत सिमेंट रस्ता बांधकाम करण्यासाठी रु.४०.०० लक्ष रकमेस शासन निर्णय दिनांक ३१ मार्च २०११ नुसार मंजुरी प्राप्त झालेली होती. त्यानुसार या कामास प्रशासकीय मान्यता, निविदा विषयक कार्यवाही व करारनामा करण्याकरिता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सावनेर यांना निर्देश देऊन रु.४०.०० लक्ष निधी हस्तांतरित करण्याचे आदेश पत्र क्र.जिपना/ बांध/का-२ (१)/६२९८/११, दिनांक १ नोव्हेंबर २०११ नुसार अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी दिले.

त्यानुसार कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्र.जिपना/बांध/सलेअ/६४०३/२०११ दि.४ नोव्हेंबर २०११ अन्वये रु.४०.०० लक्ष निधी खंड विकास अधिकारी यांना हस्तांतरित केला.

त्यानुसार कामाचे सविस्तर अंदाजपत्रके तयार करण्यात आले. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर यांनी आदेश पत्र क्र.तांवि/प्र.अ.८.१२९०/२०११, दिनांक १० ऑक्टोबर २०११ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान केली. अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता क्र.१५३/टी/अधिक्षक अभियंता/२०११-१२ रु.३९,८०,०५१, लेखाशिर्ष २५१५ इतर ग्रामविकास कार्यक्रम, २०११-१२.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सावनेर यांनी त्यांचे पत्र क्र.पंससा/बांध/ ५१७०/२०११ दिनांक ४ नोव्हेंबर २०११ नुसार ग्रामपंचायत, पाटणसावंगी यांना कंत्राटदार नियुक्त करून निविदा त्यांचे स्तरावर काम करण्याचे आदेश दिले. पंचायत समिती सर्वसाधारण सभा दिनांक ९ नोव्हेंबर २०११ चे विषय क्र.८-अ नुसार कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येऊन सदर काम ग्रामपंचायतमार्फत करणेसाठी ठराव पारित करण्यात आलेला आहे.

सरपंच/सचिव ग्रामपंचायत, पाटणसावंगी यांनी दिनांक ६/११/२०११ ला युवाराष्ट्र नागपूर जिल्हा दर्शन या दैनिक वृत्तपत्रात ("ब" वर्ग दैनिक) जाहिरात दिलेली होती. निविदा रक्कम रु.३९,९९,९५० व इसारा रक्कम १ टक्का होती. कोरे प्रपत्र विक्री कालावधी दिनांक ६/११/२०११ ते दिनांक १२ नोव्हेंबर २०११ पर्यंत होता. भरलेल्या निविदा स्विकारण्याचा दिनांक १३ नोव्हेंबर २०११ पर्यंत होता. दिनांक १४ नोव्हेंबर २०११ ला निविदा उघडण्यात आल्या.

यानुसार ग्राम पंचायत, पाटण सावंगी यांना फक्त ३ (तीन) निविदा प्राप्त झाल्या.

(१) श्री.संजीव कपूर - सी.एस.आर.दराने

(२) मे.के.एन.पी.कंस्ट्रक्शन - ०.३० टक्के कमी

(३) श्री.एस.एन.ढोणे - २.१० टक्के जास्त दराने

वरील प्रमाणे निविदा देकार प्राप्त झाल्याने तुलनात्मक विवरणानुसार मे.के.एन.पी.कंस्ट्रक्शन यांचे दर इतरांचे तुलनेत कमी असल्यामुळे त्यांचेशी रुपये ३१०० रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करण्यात येऊन ग्राम पंचायत स्तरावरुन कार्यारंभ आदेश देण्यात आले. जा.क्र.ग्रा.पं. पाटणसावंगी/बांध/निविदा/२/२०११ दिनांक १४ नोव्हेंबर २०११.

सदर काम उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, सावनेर यांचे तांत्रिक मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत, पाटणसावंगीमार्फत प्रत्यक्ष काम सुरू करून करारनाम्याप्रमाणे पूर्ण करण्यात येऊन वाहतुकीस रस्ता खुला करण्यात आला. रत्याचे काम दिनांक २१ फेब्रुवारी २०१२ ला पूर्ण झालेले आहे. सिमेंट रस्त्याचे बांधकामास ४ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असून रस्त्याचा दर्जा अद्यापही सुस्थितीत आहे.

**सदर रस्त्याचे बांधकामाबाबत पंचायत राज समितीने घेतलेले आक्षेप व समितीच्या बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने सुधारित चौकशी अहवाल खालील प्रमाणे आहे.**

**मुद्दा क्रमांक १.—** पाटणसावंगी अंतर्गत रस्ता काम रु.३९,९९,९५० इतक्या रकमेचे असल्याने त्याची निविदा राज्य स्तरीय मराठी वर्तमान पत्रातुन प्रसिद्ध करणे आवश्यक होते. ही कार्यवाही कोणत्या प्राधिकरणाने डावलली.

**खुलासा.—**महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे दिनांक ३० डिसेंबर २००६ चे परिपत्रक अभिक्रमित करून शासनाने परिपत्रक क्र.झेडपीए/२००६/प्रक-३६६/वित्त-९ मंत्रालय, मुंबई दिनांक ३१ डिसेंबर २००९ निर्गमित केल्यानुसार ५.०० ते ५०.०० लक्ष पर्यंतची कामे विभागीय स्तरावरील एक "ब" वर्ग साप्ताहिक मध्ये प्रकाशित करण्याचे नमूद आहे. त्यानुसार युवाराष्ट्र नागपूर जिल्हा दर्शन या "ब" वर्ग साप्ताहिक वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली. ही कार्यवाही नियमाप्रमाणेच आहे.

**मुद्दा क्रमांक २.—**या कामात ४० मि.मी खडी व स्टीलचे अनुक्रमे रु.७०,१४० व रु.३,११,२८९ इतक्या रकमेच्या जादा परिमाणास सक्षम अधिकाऱ्यांची पुर्वमंजुरी का घेण्यात आली नाही, खडी व स्टीलच्या परिमाणात वाढ होण्याची कारणे काय आहेत, अंदाजपत्रक तयार करताना ही बाब विचारात का घेण्यात आली नाही, आणि कार्यकारी अभियंता यांनी कामाची ५ टक्के तपासणी केव्हा केली, मोजमाप पुस्तिकेत नोंदविण्यात आलेल्या तपासणीची नोंद लेखा परिक्षणास त्याच वेळी का दर्शविण्यात आली नाही ?

**खुलासा.—**या कामामध्ये ४० मि.मी. खडी व स्टीलचे परिमाणात वाढ झालेली आहे. सविस्तर अंदाजपत्रके तयार करताना खडी व स्टीलची तरतुद अंदाजे करण्यात आलेली होती. परंतु प्रत्यक्षात काम करताना मूळ रस्ता खोलगट भागातून जास्त असल्याने रस्ता समपातळीत घेणे व पुरेशी खडीची जाडी (Crust) तयार करण्याकरिता प्रत्यक्ष काम करतांना जास्तीचा खडीचा थर द्यावा लागला त्यामुळे परिमाण व रक्कम वाढलेली आहे.

तसेच स्टिलचे परिमाण प्रत्यक्षात काम करतांना वापरलेल्या स्टिलचे दर्शनी मोजमाप केलेले असल्याने अंदाजपत्राकातील तरतुद कमी झाल्याने खडी रु. ७०,१४० व स्टिल रुपये ३,११,२८० नी वाढ झालेली आहे. सदर कामाची तपासणी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, नागपूर यांनी दिनांक १५ नोव्हेंबर २०११ ला केलेली असून त्या बाबतची निरिक्षण टिपणी पत्र क्र.७६१४ दिनांक २ डिसेंबर २०११ अन्वये निर्गमित केलेली आहे. त्यानुसार खोलगट भागातील रस्ता समपातळीवर आणण्यासाठी आवश्यक खडीचा थर व आवश्यक जाडीची लोखंडी सळी वापरण्याचे निर्देश दिलेत. तसेच दिनांक २३ नोव्हेंबर २०११ ला मोजमाप पुस्तक क्र. ९५२, पान क्र.०८ कार्यकारी अभियंता, बांधकाम यांनी कामाची तपासणी केलेली आहे.

सदर काम मंजुर अंदाजपत्रकातील तरतुदी व आवश्यकतेनुसार पूर्ण करण्यात आलेले आहे. हे काम सद्यस्थितीत योग्य आहे. प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्यानंतर देयकाचे प्रदान होण्यापुर्वी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, नागपूर यांनी नियमांप्रमाणे मोजमापाची तपासणी केलेली आहे. तसेच कामाचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र सुद्धा साक्षांकित केलेले आहे. करारनाम्यातील परिमाणामध्ये १२५ टक्केपेक्षा जास्त वाढ झालेल्या

बाबींचे परिमाणाच्या दरास अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर यांनी त्यांचे पत्र जावक क्र.का.३(११)/निविदा/३२५/२०१६ दिनांक १३ जानेवारी २०१६ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. मोजमाप पुस्तिकेत नोंदिवण्यात आलेल्या तपासणीची नोंद लेखा परिक्षकास त्याच वेळी दाखविण्यात आलेली होती.

**मुद्दा क्रमांक ३ :** ही निविदा ग्रामपंचायत स्तरावर कशी काढली ?

**खुलासा :** सदर कामाचा निधी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे दिनांक १ जानेवारी २०११ चे आदेशानुसार पंचायत समिती, सावनेरला कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांचे दिनांक ४ नोव्हेंबर २०११ चे पत्रानुसार हस्तांतरित करण्यात आला. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सावनेर यांनी त्यांचे पत्र क्र.पंससा/बांध/५१७०/२०११ दिनांक ४ नोव्हेंबर २०११ नुसार ग्राम पंचायत पाटण सावंगी यांना निविदा त्यांचे स्तरावर करण्याचे आदेश दिले. तसेच पंचायत समिती सर्वसाधारण सभा दिनांक ९ नोव्हेंबर २०११ चे विषय क्र.८-अ नुसार सदर काम ग्राम पंचायत मार्फत करणेसाठी ठराव पारित करण्यात आला. त्यानुसार निविदा ग्रामपंचायत स्तरावर निविदा काढण्यात आली.

**मुद्दा क्रमांक ४ :** या प्रकरणी उघडपणे अफरातफर झाल्याचे निर्देशनास येत असल्यामुळे सविस्तर चौकशी होणे आवश्यक आहे.

**खुलासा :** सदर प्रकरणी रु.४०.०० लक्ष निधी पंचायत समितीला हस्तांतरित करून सदर कामास प्रशासकीय मान्यता, निविदाविषयक कार्यवाही व करारनामा करण्याकरिता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सावनेर यांना आदेश दिले असतांना गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सावनेर यांनी ग्राम पंचायत पाटण सावंगी यांना कन्त्राटदार नेमून निविदा त्यांचे स्तरावर करण्याचे आदेश दिले.

सरपंच/सचिव, ग्रामपंचायत पाटणसावंगी यांनी दिनांक ६ नोव्हेंबर २०११ ला “युवाराष्ट्र नागपूर जिल्हा दर्शन” या साप्ताहिकात (“ब” वर्ग साप्ताहिक) जाहिरात प्रसिद्ध करून ७ दिवसाचे कालावधीच्या निविदा बोलाविण्यात आल्या. प्राप्त फक्त १ (तीन) निविदेच्या तुलनात्मक विवरणांनुसार ०.३० टक्के सर्वात कमी दराची मे.के.एन.पी.कंस्ट्रक्शन यांचेशी रुपये ३१०० रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करण्यात येऊन ग्रामपंचायत स्तरावरुन दिनांक १४ नोव्हेंबर २०११ कार्यारंभ आदेश देण्यात आले.

ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्र.झेडपीए-२००८/प्र.क्र.४४४/वित्त-९/दिनांक १५ जुलै, २००८ नुसार रुपये ४०.०० लक्ष रकमेच्या निविदा मंजुरीचे अधिकार पंचायत समिती सभेला प्रदान केलेले आहे. तथापि, ग्रामपंचायत स्तरावरुन मागविण्यात आलेल्या निविदेस पंचायत समिती सभेची निविदा स्विकृतीची मंजुरी घेण्यात आलेली नाही. शासन निर्णय क्र.निविदा-२०१२/प्र.क्र.९७/पं.रा.७/ दिनांक २३ सप्टेंबर २०१३ मधील तरतुदीनुसार निविदेचा कालावधी प्रथम वेळ २१ दिवस असणे आवश्यक आहे. यासंबंधीची जबाबदारी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सावनेर यांचेवर सोपविलेली असतांना त्यानुसार त्यांची कार्यवाही केलेली नसल्याचे दिसून आले आहे. तसेच शासन निर्णयानुसार कार्यवाही केलेली नसल्याने कर्तव्यात कसुर केल्याचे दिसुन आले आहे.

तसेच या कामासाठी नियुक्त क्षेत्रीय शाखा अभियंता यांनी कामात वाढ होणाऱ्या बाबींचा खंड ३८ नुसार वेळेवर प्रस्ताव सादर करणे गरजेचे होते. परंतू तसे न करून काम पूर्ण केल्याने तत्कालिन शाखा अभियंता, श्री.एन.के.कुंभलवार यांनी कसुर केल्याचे निदर्शनास येते.

पाटणसावंगी येथील सिमेंट रस्त्याचे बांधकामामध्ये काही प्रमाणात प्रशासकीय कार्यवाही करताना अनियमितता झालेली आहे. कामात वाढ होणाऱ्या बाबींचा खंड ३८ नुसार वेळेवर प्रस्ताव सादर करण्यात आलेला नाही. या दोन्ही बाबी खऱ्या असल्या तरी या कामात कुठलेही अफरातफर झालेली नाही.

**निष्कर्ष :** (१) पाटणसावंगी येथील सिमेंट रस्त्याचे बांधकामाची जबाबदारी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सावनेर यांचेवर सोपविलेली असताना त्यानुसार त्यांनी कार्यवाही केलेली नाही. शासन निर्णयातील तरतुदीनुसार निविदा बोलाविण्यासाठी नेमुन दिलेल्या विहित कालावधी निश्चित केलेला नाही. निविदेस पंचायत समिती सभेची मंजुरी घेण्यात आलेली नाही. त्यामुळे तत्कालीन गट विकास अधिकारी यांनी कर्तव्यात कसूर केल्याचे सिद्ध होते.

(२) या कामासाठी नियुक्त क्षेत्रीय शाखा अभियंता यांनी कामात वाढ होणाऱ्या बाबींचा खंड ३८ नुसार वेळेवर प्रस्ताव सादर करणे गरजेचे होते. परंतू तसे न करून काम पूर्ण केल्याने तत्कालीन शाखा अभियंता श्री.एन.के.कुंभलवार यांनी कसूर केल्याचे सिद्ध होते.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नागपूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, पाटणसावंगी रस्त्याच्या रुपये ३९,९९,९५० एवढ्या रकमेच्या कामाची निविदा सन २००६ च्या शासन निर्णयानुसार राज्यस्तरीय वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणे आवश्यक

होते. तसेच रुपये ३,८१,००० एवढ्या रकमेच्या वाढीव कामास दिनांक १४ एप्रिल, २००४ च्या परिपत्रकानुसार सुधारित मान्यता घेण्यात आली नाही. या प्रकरणी दोषींवर काय कारवाई करण्यात आली, यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, सदरहू प्रकरणी कार्यवाही झाल्यामुळे समितीने समाधान व्यक्त केले.

**अभिप्राय व शिफारशी**

ग्रामविकास विभागाने दिनांक ३१ मार्च, २०११ रोजी मौजे पाटणसावंगी ता.सावनेर, जि.नागपूर येथील २५१५ अंतर्गत ४० लक्ष रुपयांच्या रस्त्याच्या कामाला प्रशासकीय मान्यता दिली. सदर बांधकामाची अंतिम मोजमापे नोंदवून अंतिम प्रदाने करण्यात आली. यासंदर्भात लेखापरिक्षकांनी आक्षेप उपस्थित केला की, ५ ते ५० लक्ष रुपयापर्यंतच्या कामाची राज्य स्तरीय वृत्तपत्रामध्ये निविदा प्रकाशित केली नाही, पंचायत समिती ऐवजी ग्रामपंचायत स्तरावर निविदा काढल्या आणि खडी व स्टील च्या वापराचे परिमाण वाढल्याने ३,११,२८९ रुपये जादा प्रदान झाले. सदर आक्षेपावर जिल्हा परिषदेने समितीला लेखी खुलासा केला की, युवराष्ट्र दर्शन या दैनिकात जाहिरात प्रसिद्ध केली, खड्डे भरण्याकरीता सखल भाग व रुंदी वाढल्यामुळे खडी अधिक लागली तर स्टीलचे ढोबळ मानाचे अंदाजपत्रक होते प्रत्यक्षात अधिक स्टील लागले आहे.

प्रस्तुतचे काम जिल्हा परिषदेकडून गट विकास अधिकारी स्तरावर करण्याकरीता पाठविण्यात आले होते. परंतू त्यांनी ते ग्रामपंचायतीकडे पाठविले असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. ५ ते ५० लक्ष रुपयांपर्यंतच्या कामाची निविदा राज्यस्तरीय वर्तमानपत्रात प्रसिद्ध न करता अत्यंत कमी खपाच्या युवाराष्ट्र दर्शन या साप्ताहिकात प्रसिद्ध करणे, निविदांना कालावधी २१ दिवस देणे आवश्यक असताना त्याबाबत गटविकास अधिकारी यांनी आवश्यक कारवाई केली नाही त्यामुळे **संबंधित गटविकास अधिकाऱ्यावर सन २०११-१२ च्या आक्षेपा प्रकरणी दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ रोजी महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९७९ च्या नियम १० नुसार दोषारोप पत्र बजावले आहे. अद्याप त्यांची विभागीय चौकशी अंतिम झालेली नाही. सद्य:स्थितीत केवळ दोषारोप पत्र तेही ६ वर्षांच्या विलंबानंतर बजावण्यात आले याबाबत समिती सखेद आश्चर्य व्यक्त करते. संबंधितांची विभागीय चौकशी विहित कालमर्यादेत तातडीने पूर्ण करावी व त्याबाबतचा अहवाल समितीस ३ महिन्याच्या आत सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

सदरचे काम हे उप विभागीय अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उप विभाग, सावनेर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करायचे होते. सदर कामाचे १०० टक्के पर्यवेक्षण शाखा अभियंता, श्री. एन. के. कुंभलवार यांनी केलेले आहे. या कामामध्ये ४० मि.मी. खडी व स्टीलचे परिमाणात वाढ झालेली आहे. त्याचे कारण देताना जिल्हा परिषदेने सविस्तर अंदाजपत्रक करताना खडी व स्टीलची तरतूद अंदाजे करण्यात आलेली होती, परंतू प्रत्यक्षात काम करताना मूळ रस्ता खोलगट भागातून जात असल्यामुळे रस्ता समपातळीत घेणे व पुरेशी खडीची जाडी करण्याकरीता जास्तीचा थर द्यावा लागला असल्याचा खुलासा एक वेळ मान्य केला तरी कामाच्या परिमाणात १२५% वाढ झाली त्यामुळे प्रत्यक्ष काम करण्यापूर्वी सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक होते ती या प्रकरणात घेतलेली नाही. या उलट कार्योत्तर मान्यता घेतली आहे. या संपूर्ण अनियमितते संबंधात शाखा अभियंत्यांची एक वेतनवाढ रोखणे ही कारवाई पुरेशी नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषदा लेखा संहितेनुसार कामाची कमीत कमी ५ टक्के तपासणी झालेली नाही तसेच पूर्णत्वाचे प्रमाणपत्रावर कार्यकारी अभियंत्यांची स्वाक्षरी नाही हे सर्व नसताना कामाचे पूर्ण देयक अदा करण्यात आले नाही. **तत्कालीन कार्यकारी अभियंत्यांनी साक्षीचे वेळी सुधारित मान्यता घेण्याचे राहिले आहे व ही चूक त्यांनी मान्य देखील केली आहे. अतः केवळ शाखा अभियंत्यांवर या संपूर्ण अनियमिततेची जबाबदारी टाकणे योग्य नाही. सदर काम संपूर्णपणे उप अभियंत्यांच्या मार्गदर्शनाखाली होणे आवश्यक आहे. कार्यकारी अभियंत्यांनी पर्यवेक्षकीय जबाबदारी पार पाडली नाही, या सर्व बाबी विचारात घेता सर्व संबंधितांवर कर्तव्यात कसूर केल्याबाबत कारवाई करणे अपेक्षित होते, परंतू अशी कारवाई अद्याप झालेली नाही, याबाबत समिती तीव्र खेद व्यक्त करते. सबब, उपरोक्त नमूद आक्षेपात आढळलेल्या त्रुटींनुसार सर्व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून महाराष्ट्र नागरी सेवा नियमांतर्गत कारवाई करावी व त्याबाबतचा अहवाल तीन महिन्यांत समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट " अ "

## शासनाचे आदेश व परिपत्रक

परिशिष्ट क्र. २.१

सामाजिक न्याय विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येत असलेल्या अनुदानित संस्थांमधील प्रवेशितांना देण्यात येणा-या दरडोई परिरक्षण (परिपोषण) अनुदानात वाढ करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- विभशा-२००६/प्र.क्र.११५/मावक-६,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २७ मे २००८.

वाचा :- १) शासन निर्णय, समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र.व्हीजेडब्लू-१०९०/प्र.क्र.२२/प्रस्ताव-१/मावक-६, दि.२४ सप्टेंबर १९९१.
२) शासन निर्णय, समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र.व्हीजेडब्लू-१०२०/प्र.क्र.२२/प्रस्ताव-२/मावक-६, दि. ९ ऑक्टोबर १९९१.
३) शासन निर्णय, समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्र.व्हीएएस-१०९४/प्र.क्र.१७६/मावक-६, दि.२५ जुलै १९९६.
४) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र.विभशा-२००१/प्र.क्र.५९/मावक-६, दि. २० नोव्हेंबर २००२.
५) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.विभशा-२००६/ प्र.क्र.११५/मावक-६, दि.९.२.२००७.

**प्रस्तावना** :- स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या सामाजिक न्याय विभागातील आश्रमशाळा / वसतीगृहे, अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळा यामधील निवासी विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणा-या परिपोषण अनुदानात एकसूत्रता रहावी व सदर दर ग्राहक मूल्य निर्देशांकानुसार देण्यात यावा ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत असणा-या विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या व अनुसूचित जाती / जमातीच्या आश्रमशाळांमधील निवासी विद्यार्थ्यांसाठी रु.६००/- असा दर दि. १.४.२००७ पासून करण्यात आला आहे. या सर्व अनुदानित आश्रमशाळा, वसतीगृहे, अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळा यामधील निवासी विद्यार्थ्यांच्या भोजनावरील खर्च भागविण्यासाठी परिपोषण अनुदानात वाढ करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय** :- स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या सामाजिक न्याय विभागातील आश्रमशाळा / वसतीगृहे, अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळा यामधील निवासी विद्यार्थ्यांसाठी दरमहा दरडोई रु.६३०/- असा परिरक्षण (परिपोषण) दर दि. १.४.२००८ पासून लागू करण्यास शासन मंजूरी देत आहे. सदर दर खालील संस्थांच्या आश्रमशाळा, वसतीगृहे, अपंग संस्थांच्या शाळा, वृध्दाश्रम यांच्यासाठी लागू रहातील.परिरक्षण (परिपोषण) अनुदानाचा दर प्रत्येक वर्षी ग्राहक मूल्याशी निगडित इतका सुधारित करण्यात यावा.

| क्रमांक | संस्थेचा प्रकार |
|---|---|
| १ | विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या अनुदानित प्राथमिक / माध्यमिक आश्रमशाळा |
| २ | उसतोड कामगारांच्या मुलांसाठी असलेल्या अनुदानित प्राथमिक आश्रमशाळा |
| ३ | अनुसूचित जातीच्या अनुदानित प्राथमिक / माध्यमिक आश्रमशाळा |
| ४ | मागासवर्गीय मुलामुलींची अनुदानित वसतीगृहे |
| ५ | अपंग संस्थांच्या शाळा (विशेष शाळा / कर्मशाळा) |

| | |
|---|---|
| ६ | मतिमंद मुलांसाठी शाळा |
| ७ | अस्थिव्यंग मुलांसाठी शाळा |
| ८ | बहिरे व मुके यांच्याकरिता असलेल्या शाळा |
| ९ | अंध मुलांसाठीच्या शाळा |
| १० | वृध्दाश्रम |

**परिपोषण अनुदानात वाढ केल्यामुळे देय होणारे अनुदान वितरित करण्यापूर्वी वरील सर्व संस्थेमध्ये निवासी विद्यार्थ्यांची संख्या योग्य आहे किंवा कसे, पटावर दर्शविण्यात आलेले निवासी विद्यार्थी संस्थेत नेहमी उपस्थित असतात किंवा कसे याची पूर्ण तपासणी करुन पटलावरील निवासी विद्यार्थी संख्या योग्य असल्याची खात्री करावी तद्नंतरच परिपोषण अनुदान वितरित करण्यात यावे अशा स्पष्ट सूचना संचालक,विमुक्त जाती, भटक्या जमाती / संचालक,समाजकल्याण / आयुक्त, अपंग कल्याण यांनी सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी व सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना द्याव्यात.**

२. या बाबीवरील खर्च त्या त्या संस्थांच्या आश्रमशाळा, वस्तीगृहे, अपंगांच्या शाळा / कर्मशाळा, वृध्दाश्रम यासाठी मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा. त्यासाठी आवश्यक वाढीव तरतूद संबंधित योजनेच्या लेखाशिर्षाखाली संबंधितांनी उपलब्ध करुन द्यावी.

३. सदर शासन निर्णय, नियोजन व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१४१/०८/व्यय-१४, दि.२७.३.२००८ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.२००८०५२७०९३१३८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(एन. आरुमुगम)
सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति :-
मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधान सभा, विधान भवन, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
मा.मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे,
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे,
आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे,

सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी.
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी.
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य,पुणे,
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य,पुणे,
विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक / पुणे / औरंगाबाद / नागपूर,
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हापरिषद,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद,
महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर,
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सह संचालक,लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला (२ प्रती),
वरिष्ठ लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व जिल्हे),
सर्व लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,
सर्व कार्यासन अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय,मुंबई,
निवड नस्ती, का-मावक-६ .

## परिशिष्ट क्र. ४.१

अखर्चित निधी खर्च
करण्याबाबतची कार्यप्रणाली

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांकः २६ सप्टेंबर, २००५

वाचा:- शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय,
दिनांक १० ऑक्टोबर २००२.

प्रस्तावना:-

उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयाद्वारे वित्त विभागाने ग्रामविकास व जलसंधारण विभागांतर्गत वर्ष अखेरच्या अखर्चित राहिलेल्या रकमा खर्च करण्याची कार्यप्रणाली विषद केली होती. दिनांक ३१ मार्च पूर्वी निधी वितरीत करुन घेऊन राज्याच्या तिजोरीबाहेर ठेवण्याची प्रवृत्ती बळावू लागली म्हणून अखर्चित निधी खर्च करतांना संदर्भाधिन शासन निर्णयाप्रमाणे कार्यप्रणाली अवलंब करण्याचे ठरविण्यात आले होते. तथापि, अखर्चित निधी शासनाच्या तिजोरीत जमा करणे किंवा त्यासाठी पुरवणी मागणीन्वये तरतूद करुन संबंधितांना खर्च करण्यास उपलब्ध करुन देणे विभागाला कठीण झाले आहे. या कार्यप्रणालीमुळे लोकप्रतिनिधी वारंवार तक्रारी करीत आहेत. या सर्व मुद्यांचा विचार करता दिनांक १० ऑक्टोबर २००२ चा शासन निर्णय रद्द करण्याचे ठरविले आहे.

शासन निर्णय:-

या आदेशान्वये दिनांक १० ऑक्टोबर, २००२ चा शासन निर्णय रद्द करण्यात येत असून अखर्चित निधी वापरण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यप्रणाली ठरविण्यात येत आहे.

(अ) अर्थसंकल्पात तरतूद आहे म्हणून ३१ मार्च पर्यंत निधी मुक्त करुन घेऊन ती शासनाच्या तिजोरीबाहेर ठेवण्यात येऊ नये,

(ब) मागील वर्षातील अखर्चित निधीची माहिती घेऊन तो निधी खर्च करण्यास या विभागाची ३० जून पूर्वी अनुमती घेण्यात यावी. जेणेकरुन अखर्चित निधी खर्च करण्यास पुरेसा कालावधी मिळू शकेल. यापैकी कांही निधी त्याच वर्षी खर्च झाला नाही तर तो निधी शासनाच्या तिजोरीत जमा करण्यात यावा.

(कृ.मा.प.)

(क) एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी निधी अखर्चित राहिल्यास तो शासनाच्या तिजोरीत जमा करण्यात यावा.

(ड) एक वर्ष किंवा त्यापूर्वीचा अखर्चित निधी कोणत्याही परिस्थितीत खर्च करण्यास अनुमती देण्यात येणार नाही, असा निधी शासनाच्य तिजोरीत जमा करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सु.सा.गायकवाड )
शासनाचे सह सचिव, वित्त विभाग

प्रति:

१. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग)

२. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.

३. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा परीक्षा), मुंबई.

परिशिष्ट क्र. ४.२

**अखर्चित निधी खर्च करण्याबाबतची कार्यप्रणाली**

**महाराष्ट्र शासन,**
**वित्त विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक:-३१/०८/२००७**

**वाचा:- शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दिनांक: २६ सप्टेंबर २००५.**

**परिपत्रक**

उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयाद्वारे वित्त विभागाने विभागांतर्गत वर्ष अखेर अखर्चित राहिलेल्या रकमा खर्च करण्याची कार्यप्रणाली विषद केली आहे. दिनांक ३१ मार्च पूर्वी निधी वितरीत करुन घेऊन राज्याच्या तिजोरीबाहेर ठेवण्याची प्रवृत्ती बळावू लागली म्हणून अखर्चित निधी खर्च करतांना संदर्भाधिन शासन निर्णयाद्वारे कार्यप्रणाली अवलंब करण्याचे ठरविण्यात आले होते. मागील वर्षातील अखर्चित निधीची माहिती घेऊन तो निधी खर्च करण्यास या विभागाची ३० जून पूर्वी अनुमती घेण्यासंबंधी सूचना दिल्या आहेत. जेणेकरुन अखर्चित निधी खर्च करण्यास पुरेसा कालावधी मिळू शकेल. परंतु अनेक विभागांकडून ब-याच प्रकरणी विहीत मुदतीत अखर्चित रकमांची माहिती घेऊन त्यासंबधीचा प्रस्ताव वित्त विभागाकडे येत नाही, असा वित्त विभागाचा अनुभव आहे. तरी सदर संदर्भात विभागांनी पुढील प्रमाणे कार्यवाही केल्यास वित्त विभागाकडे विहीत मुदतीत प्रस्ताव पाठविणे शक्य होईल.

२. (अ) विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालये व जिल्हा परिषदा, इत्यादी संबंधीत यंत्रणांना सदर कार्यप्रणालीची आगाऊ सूचना द्यावी.

(ब) मार्च अखेर विभागांनी मुक्त केलेल्या निधीच्या संदर्भात वर्ष संपल्यासंपल्या लगेच, खर्च झालेल्या निधीचा व अखर्चित निधीच्या रकमांचा एप्रिलच्या पंधरवडयातच आढावा घ्यावा व मे महिन्याच्या सुरूवातीसच अखर्चित रकमेचा प्रस्ताव संबंधीत विभागामार्फत वित्त विभागाकडे पाठवावा. जेणेकरून जून अखेर अखर्चित रकमेच्या प्रस्तावास वित्त विभागाची मान्यता प्राप्त होऊ शकेल.

(कृ.मा.प.)

३. शक्यतो ३१ मार्च पूर्वी प्रत्यक्ष खर्च न होणारा निधी वर्ष अखेर वितरीत करण्यात येऊ नये.

४. विहीत वेळेत माहिती घेउन अखर्चित निधी खर्च करण्यास अनुमती घेतली नाही तर सदर निधी ३० जूनपूर्वी शासनाच्या तिजोरीत जमा करावा लागेल.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २००७०८३११३२५४९००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**( सु.सा.गायकवाड )**
**शासनाचे सह सचिव, वित्त विभाग**

**प्रति:**

१. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग)
२. सर्व उप सचिव, अवर सचिव, वित्त विभाग,/ सर्व व्यय कार्यासने, वित्त विभाग.
३. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
४. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा परीक्षा), मुंबई.
५. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,
६. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा परीक्षा), नागपूर.
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/ वांद्रे
८. निवासी लेखा अधिकारी, मुंबई
९. निवड नस्ती, अर्थोपाय

परिशिष्ट क्र. ४.३

**अखर्चित निधी खर्च करण्याबाबतची कार्यप्रणाली**

**महाराष्ट्र शासन,**
**वित्त विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक:- १५/११/२००७**

**वाचा:- शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दिनांक: २६ सप्टेंबर २००५.**

**प्रस्तावना:-**

उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयाद्वारे वित्त विभागाने विभागांतर्गत वर्ष अखेर अखर्चि राहिलेल्या रकमा खर्च करण्याची कार्यप्रणाली विषद केली आहे. वैधानिक विकास मंडळांन शिफारस केलेली रक्कम जी रक्कम स्वायत्त संस्थाकडे अखर्चित राहीलेली आहे, त्याबाबतीती अडचणी लक्षात घेऊन, उपरोक्त शासन निर्णयात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

एखाद्या आर्थिक वर्षात प्रादेशिक वैधानिक विकास मंडळांनी शिफारस केलेला जो निधी स्वायत्त संस्थाकडे अखर्चित राहीलेला आहे, त्यासाठी दिनांक २६ सप्टेंबर २००५ च्या शास निर्णयामधील अखर्चित निधी खर्च करण्यासाठी दिनांक ३० जून पूर्वी अनुमती घेण्याची अट शिथि करण्यात येत आहे. प्रादेशिक वैधानिक विकास मंडळांनी एखाद्या आर्थिक वर्षात शिफारस केलेला स्वायत्त संस्थांना प्रत्यक्ष हस्तांतरीत झालेला निधी लगतच्या पुढील आर्थिक वर्षअखेर पर्यंत ख करण्याची अनुमती देण्यात येत आहे. सदर अनुमती केवळ सन २००६-०७ व त्यापुढील अखर्चि रकमांसाठी राहील. मात्र पुढील एका आर्थिक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अखर्चित राहीलेल निधी स्वायत्त संस्थांनी शासनाकडे परत करणे बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असू त्याचा संगणक सांकेतांक २००७१११५१४०८२०००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**( संतोष कुमार )**
**शासनाचे सह सचिव, वित्त विभाग**

**(क्र.मा.प.)**

**प्रति:**

१. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग)

२. सर्व उप सचिव, अवर सचिव, वित्त विभाग./ सर्व व्यय कार्यासने, वित्त विभाग.

३. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.

४. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा परीक्षा), मुंबई.

५. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,

६. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा परीक्षा), नागपूर.

७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/ वांद्रे

८. निवासी लेखा अधिकारी, मुंबई

९. निवड नस्ती, अर्थोपाय

परिशिष्ट क्र. ४.४

**अखर्चित निधी खर्च करण्याबाबतची कार्यप्रणाली**

**महाराष्ट्र शासन,**
**वित्त विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक:- ६ जून, २००८**

**वाचा:- शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दिनांक: २६ सप्टेंबर २००५.**

**प्रस्तावना:-**

उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयाद्वारे वित्त विभागाने विभागांतर्गत वर्ष अखेर अखर्चित राहिलेल्या रकमा खर्च करण्याची कार्यप्रणाली विषद केली आहे. शासनाने जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका, प्राधिकरणे यांना एखाद्या आर्थिक वर्षात मुक्त केलेला निधी पूर्णपणे खर्च करतांना येणा-या अडचणी लक्षात घेऊन उपरोक्त शासन निर्णयात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

शासनाने जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका, प्राधिकरणे यांना एखाद्या आर्थिक वर्षात मुक्त केलेला व अखर्चित राहीलेला निधी खर्च करण्यासाठी दिनांक ३० जून पूर्वी अनुमती घेण्याची अट शिथिल करण्यात येत आहे. आता सदर अखर्चित निधी लगतच्या पुढील आर्थिक वर्षअखेर पर्यंत खर्च करण्याची अनुमती देण्यात येत आहे. सदर अनुमती सन २००७-०८ व त्यापुढील अखर्चित रकमांसाठी राहील. मात्र सन २००७-०८ या आर्थिक वर्षाच्या आधी मुक्त केलेल्या व पुढील एका आर्थिक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अखर्चित राहीलेला निधी स्वायत्त संस्थांनी शासनाकडे परत करणे बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०६०६१४२१५७००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**( सु.प्र.करनडे )**
**शासनाचे उप सचिव, वित्त विभाग**

**(कृ.मा.प.)**

**प्रति:**

१. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग)

२. सर्व उप सचिव, अवर सचिव, वित्त विभाग,/ सर्व व्यय कार्यासने, वित्त विभाग.

३. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.

४. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा परीक्षा), मुंबई.

५. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,

६. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा परीक्षा), नागपूर.

७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/ वांद्रे

८. निवासी लेखा अधिकारी, मुंबई

९. निवड नस्ती, अर्थोपाय

**परिशिष्ट क्र. ४.५**

**शासनाने वितरीत केलेल्या अनुदानापैकी अखर्चित निधी खर्च करण्याबाबतची कार्यप्रणाली.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-१०.१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय**
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक:- २५ ऑगस्ट,२०१५.

वाचा:- १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकिर्ण १०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दि.२६ सप्टेंबर,२००५.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकिर्ण १०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दि.३१ ऑगस्ट, २००७..
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकिर्ण १०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दि.१५ नोव्हेंबर, २००७.
४) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकिर्ण १०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दि.६ जून,२००८.

प्रस्तावना:-

उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयान्वये शासनाने जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका तसेच शासनाकडून विविध महामंडळांना/प्राधिकरणांना वितरीत केलेल्या निधीपैकी वर्ष अखेर अखर्चित राहिलेला निधी खर्च करण्याची कार्यप्रणाली विषद केली आहे. महापालिका, नगरपरिषदा व जिल्हापरिषदा यांना वितरित केलेला निधी त्या आर्थिक वर्षानंतरच्या पुढील एका वर्षात खर्च करण्याची मुभा आहे. त्यानंतर शासनाची मान्यता आवश्यक आहे. अशा अखर्चित निधीबाबत विभागाकडून आढावा होऊन व अखर्चित निधी खर्च करण्याची परवानगी देत असताना प्रत्यक्ष निधीची उपलब्धता, प्रत्यक्ष काम झाले आहे किंवा कसे व त्याच कामावर एकाहून अधिक स्त्रोतातून निधी खर्च होत नाही या बाबींची तपासणी आवश्यक असते. या सर्व बाबी विचारात घेऊन व ही पध्दत अधिक सुटसुटीत व्हावी यासाठी पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

दि. ३१.०३.२०१४ पर्यंतच्या अखर्चित निधीसंदर्भात खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत:-

अ) प्रशासकीय विभागांनी अशा अखर्चित निधी संदर्भात तात्काळ आढावा घ्यावा. सदर आढावा दि.३०.०९.२०१५ पर्यंत पूर्ण करण्यात यावा.

ब) बांधकामाव्यतिरिक्त (वेतन, अनुदान व सवलती, इत्यादी) अखर्चित निधी तात्काळ शासनास जमा करण्यात यावा.

क) बांधकामाच्या निधीसंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी:-

(i) जी कामे भौतिकदृष्टया पूर्ण झाली आहेत व खर्चाच्या परवानगी अभावी देयकाचे प्रदान होऊ शकत नाही, अशा सर्व प्रकरणी खर्चाची परवानगी विभाग स्तरावर देण्यात यावी. परवानगी देत असताना त्याच कामावर इतर स्त्रोतातून खर्च न झाल्याची खात्री विभागाने करावी.

(ii) जी कामे सुरू होऊन भौतिकदृष्टया अपूर्ण आहेत, ती कामे पुढील दि.३१.०३.२०१६ पर्यंत पूर्ण होतील असे विभागाकडून नियोजन केले जाईल या अटींच्या अधीन राहून दि. ३१.०३.२०१६ पर्यंत खर्च करण्याची परवानगी विभागस्तरावर देण्यात यावी.

(iii) जी कामे अद्याप सुरू नाहीत त्याचा निधी तात्काळ शासन जमा करावा.

ड) प्रशासकीय विभागांनी यापुढे अनुदान मुक्त करत असताना विहीत मुदतीत (म्हणजेच पुढील वर्षाच्या दि.३१ मार्च पर्यंत) खर्च होईल तेवढेच अनुदान वितरित करण्याची दक्षता घ्यावी.

२. दि.३१.०३.२०१४ पर्यंत अखर्चित राहिलेला निधी खर्च करण्यास मान्यता मिळण्यासाठीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावी व दि.३१.०३.२०१४ नंतर मुक्त केलेल्या निधीच्या संदर्भात पुर्वीचे आदेश लागू राहतील व असा निधी विहीत मुदतीत खर्च करण्याची पूर्ण जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०८२५१७१६३२५८०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vasant Krishna Patil

Digitally signed by Vasant Krishna Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Vasant Krishna Patil
Date: 2015.08.25 17:41:26 +05'30'

(व.कृ.पाटील)
शासनाचे उप सचिव, वित्त विभाग

**प्रति,**

१) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग)
२) सर्व उप सचिव, अवर सचिव, वित्त विभाग / सर्व व्यय कार्यासने, वित्त विभाग
३) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
४) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परिक्षा), मुंबई
५) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
६) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परिक्षा), नागपूर
७) संचालक, लेखा व कोषागारे
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई /वांद्रे
९) निवासी लेखा अधिकारी,मुंबई.
१०) निवड नस्ती (अर्थोपाय)

GR-200408051547460001-1201

परिशिष्ट क्र. १२.१

**जिल्हा परिषदांनी योजना राबवितांना पाळावयाचेवेळापत्रक व त्यानुषंगाने विविध स्तरावर सोपविण्यात आलेली जबाबदारी**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**
**परिपत्रक क्र.झेडपीए–2000/प्र.क्र.41/33,**
**मंत्रालय, मुंबई–400 0323**
**दिनांक :– 17 जानेवारी, 2001**

**परिपत्रक :–**

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, ज्या योजना जिल्हा परिषद स्वत: त्या नियंत्रणाखाली राबवित आहे त्या योजनांचे वेळापत्रक जिल्हा परिषदांव्दारे व्यवस्थितपणे पाळले जात नसल्याकारणाने विकास कामाचे व्यवस्थापन पुर्णपणे बासळलेले आढळते. यामुळे ज्या योजना प्रत्यक्षात 31 मार्च पूर्वी पूर्ण करावयाच्या असतात (उदा. लाभार्थी निवड, साहित्य वाटप इ.) दिनांक 31 मार्च नंतर देखील सुरु असतात. या संदर्भात शासनाने योग्य त्या वेळापत्रकाचे पालन करावे अशा सुचना वारंवार दिलेल्या आहेत. तथापि त्याचा सुयोग्य परिणाम झालेला दिसून येत नाही. विकासाच्या कामासाठी प्रशासकीय मान्यता तांत्रिक मान्यता, निविदा मंजूरी व लाभार्थ्यांच्या निवडी बाबत अधिकार शासनाने विविध स्तरावर दिलेले आहेत. यापैकी कोणत्याही स्तरावर विलंब झाल्यास विकास कामाचे वेळापत्रक ढासळते.

योजना काटेकोरपणे विहित कालावधीत पूर्ण व्हाव्यात यासाठी आता खालीलप्रमाणे वेळापत्रक आखून देण्यात येत आहे.

| अ. क्र. | योजनेचा स्तर | सक्षम अधिकारी/समिती यांनी त्यांचे संबंधित काम पूर्ण करावयाचा अंतिम दिनांक | सक्षम अधिकारी/समिती यांनी कामे पूर्ण न केल्यास मु.का.अ. यांनी ही कामे पूर्ण करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | वैयक्तिक योजनांची निवड व अंमलबजावणीची रुपरेषा ठरविणे | 30 जून | 7 जुलै |
| 2 | तांत्रिक व प्रशासकीय मान्यता | 30 जून | 7 जुलै |
| 3 | एक) लाभार्थ्यांची निवड<br>दोन) निविदा प्रक्रिया सुरु करुन अंतिम करणे<br>(दोन्ही बाबी एकत्रित सुरु कराव्यात) | 30 सप्टेंबर | 7 ऑक्टोबर |
| 4 | प्रत्यक्ष आदेश देणे | 1 नोव्हेंबर | 8 नोव्हेंबर |
| 5 | साहित्य वाटप | 1 जानेवारी | 8 जानेवारी |
| 6 | प्रदाने | 10 मार्च | -- |

शासनाकडून वेळेवर दर करार मंजूर झाला नसेल या पूर्वीचा दर करार व्यपगत झाला असेल तर निविदा प्रक्रिया सुरु करण्यास हरकत नाही.

वरील वेळापत्रकात नमूद केलेली कामे विहित दिनांकास पूर्ण झाली नाहीत तर विपरित परिणाम टाळण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अध्यक्षांशी सल्लामसलत करुन थकीत निर्णय विहित दिनांका पासून 7 दिवसाचे आंत पूर्ण करतील. ( उदा. लाभार्थ्यांच्या निवडीचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी यानी अध्यक्षांच्या सल्ल्याने अंतिम करावयाचा आहे. निविदा मान्य करावयाची कार्यवाही मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेशी विचारविनिमय करुन पूर्ण करावयाची आहे )

योजनेची प्रत्येक स्तरावरील कार्यवाही ही संबंधित अधिकारी / विभागप्रमुख / समिती यांच्यावर निश्चित करण्यात आलेली आहे. विहित कालावधीत ही कार्यवाही न झाल्यास त्यासाठी ते सर्वस्वी जबाबदार राहतील. अशी अपूर्ण कार्यवाही वर नमूद केल्याप्रमाणे निश्चित दिनांकास पूर्ण करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर राहील. मात्र प्रत्येक खाते प्रमुखाची ही जबाबदारी राहील की, त्यानी प्रत्येक योजनेच्या कार्यवाहीची स्थिती वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निदर्शनास आणावी व वेळापत्रक पाळले जात नसेल तर सत्वर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या लक्षात आणून द्यावे.

सदर परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन व्हावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(वंदी अय्यंगार)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

1. सर्व विभागीय आयुक्त.
2. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
3. सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद.
4. सर्व कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद.
5. सर्व कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद.
6. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
7. सर्व उपमुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नासिक, पुणे, नागपुर, औरंगाबाद, अमरावती.
8. सर्व जिल्हा स्थानिक निधी लेखा अधिकारी.
9. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
10. महालेखापाल, (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
11. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपुर.
12. महालेखापाल, (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपुर.
13. सार्वजनिक बांधकाम विभाग, इमा--2, मंत्रालय, मुंबई.
14. पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई.
15. इतर सर्व मंत्रालयीन विभाग.
16. ग्राम विकास विभागातील सर्व अधिकारी व कार्यासने.
17. निवड नस्ती.

**परिशिष्ट क्र. १२.२**

"विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तुस्वरूपात मिळणा-या लाभाचे हस्तांतर, रोख स्वरूपात थेट लाभार्थ्याच्या बँक खात्यात करणेबाबत."

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांकः डिसीटी २३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०५ डिसेंबर, २०१६.

**प्रस्तावना -**

शासनाद्वारे थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रक्रियेवर मोठ्या प्रमाणात भर देण्यात येत आहे. जेणेकरुन लाभार्थ्यांना योजनांचा पूर्णपणे लाभ मिळेल आणि अनावश्यक गोष्टी टळू शकतील. सद्यस्थितीत डीबीटी अंतर्गत अनेक योजना अंतर्भूत असून या सर्व योजनांमध्ये रोख रकमेच्या स्वरुपात अनुदान देण्यात येते. हे अनुदान लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा होते. उदा. शिष्यवृत्ती, रोजगार हमी योजनेंतर्गत मिळणारे वेतन, पेन्शन योजना, घरगुती गॅसवरील अनुदान इ.

२. DBT कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्याची गरज आहे. DBT च्या दुसऱ्या प्रकारामध्ये शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये ज्या ठिकाणी शासनाद्वारे वस्तू स्वरुपात अनुदान देण्यात येत आहे, त्या ठिकाणी वस्तू स्वरुपात अनुदान देण्याऐवजी रोख रकमेच्या स्वरुपात अनुदान देण्यात यावे. या निर्णयाचा परिणाम सर्व प्रशासकीय विभागांच्या कल्याणकारी योजनांच्या कार्यपध्दतीवर होणार असल्याने धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत खालीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय -**

सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविण्यात आलेल्या वस्तू कोणत्याही योजने अंतर्गत खरेदी करुन लाभार्थ्यांना वाटप / वितरीत करता येणार नाही.

सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये नवीन वस्तुंचा समावेश करण्याचे अधिकार मा. मुख्यमंत्री यांना राहतील.

हे धोरण शासनाच्या सर्व विभागांना (आदिवासी विकास विभाग व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांसहित) , स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे व महामंडळे यांना लागू राहील.

२. शासकीय विभाग विभागांना (आदिवासी विकास विभाग व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांसहित) / स्थानिक स्वराज्य संस्था / मंडळे / महामंडळे यांना जर कल्याणकारी योजनेअंतर्गत कोणतीही वस्तु / साधनसामग्री लाभार्थ्यांना द्यावयाची असल्यास त्यांनी खालील प्रमाणे कार्यपध्दती निश्चित करावी -

अ) संबंधित वस्तुबाबत वितरण योजना तयार करणे.
आ) वस्तु विकत घेण्यासाठी अनुदान ठरविणे.
इ) वितरीत करावयाच्या वस्तूंचे परिमाण (specification) ठरविणे.
ई) या योजनांतर्गत पात्रतेचे निकष ठरविण्यात यावे.
उ) पात्रतेप्रमाणे लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी.
ऊ) लाभार्थ्यांची यादी तयार करुन त्यांच्या आधार क्रमांकाशी जोडणी (Seeding) करणे.
ए) निवड केलेल्या पात्र लाभार्थ्यांच्या प्रकरणाला मान्यता देवून त्यांना लेखी कळविणे.
ऐ) लाभार्थ्यांनी परिमाणाप्रमाणे (specification) वस्तूंची खरेदी करणे.
ओ)संबंधित यंत्रणेने लाभार्थ्याने खरेदी केलेल्या वस्तुची व सादर केलेल्या पावतीची शहानिशा करून पूर्णपणे खातरजमा झाल्यावर लाभार्थ्याच्या बँक खात्यावर योजनेअंतर्गत सुनिश्चित

केलेल्या अनुदानाची रक्कम जमा करणे. वस्तुची शहानिशा कशा प्रकारे करावी व ती करणे आवश्यक आहे काय याबाबत संबंधित विभागाने निर्णय घ्यावा.

औ)लाभार्थ्यांना रोख रकमेच्या स्वरूपात अनुदान त्यांच्या आधार क्रमांकाशी निगडीत बँक खात्यात जमा करण्यात यावे.

३. विविध कल्याणकारी योजनांमध्ये ज्या ठिकाणी शासनाद्वारे वस्तू स्वरुपात अनुदान देण्यात येत आहे, त्या ठिकाणी वस्तू स्वरुपात अनुदान देण्याऐवजी रोख रकमेच्या स्वरुपात अनुदान दिल्यास खालील फायदे शक्य होतील.

१) विविध कल्याणकारी योजनामधून मिळणारे लाभ हे थेट लाभार्थ्यांनाच मिळण्याची पूर्ण शाश्वती राहील.

२) विविध विभागांद्वारे विभागांना (आदिवासी विकास विभाग व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांसहित) होत असलेल्या विविध प्रकारची खरेदी टळू शकेल.

३) शासनामार्फत देण्यात येणा-या लाभांबाबत संबंधित लाभार्थ्यांची निवड करुन त्यांना वित्तीय सहायता वेळेवर देण्याची हमी शासनाची राहिल.

४) लाभार्थ्याला एक ठराविक व विशिष्ट रक्कम मिळणार असल्याने तो आवश्यक असणाऱ्या वस्तूची गुणवत्ता तपासून व भाव करुन चांगली वस्तु खरेदी करु शकेल, असे करताना लाभार्थी त्याला न आवडणारी वस्तु घेण्यास बांधील राहणार नाही.

५) स्थानिक पातळीवरच लाभार्थी वस्तु खरेदी करणार असल्याने स्थानिक उद्योग व्यावसायिकांना लाभ होईल.

६) रोख रकमेच्या स्वरूपात लाभ वाटप केल्यामुळे शासनाच्या कार्यपध्दतीत अधीक पारदर्शकता येईल व संख्यात्मक तसेच गुणात्मक वाढ होईल.

७) वस्तुंच्या खरेदी प्रकियेमुळे तसेच वस्तुच्या गुणवत्तेबाबत निर्माण होणा-या बाबी, अनियमितता याबाबत विधीमंडळ अधिवेशनात विविध आयुधान्वये उपस्थित होणारे प्रश्न, रोख स्वरूपात थेट लाभ देण्याच्या पारदर्शक प्रक्रियेमुळे टळू शकतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१२०५१५०९५१९७१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( प्रियांका रं. छापवाले )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल , महाराष्ट्र राज्य , यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा.सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव
४. मा.सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा. विधानसभा / विधानपरिषद सदस्य (सर्व)

६. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, (महाराष्ट्र-१/२), मुंबई/नागपूर.
७. मा. मुख्य सचिव , महाराष्ट्र शासन, मंत्रालय , मुंबई
८. अपर मुख्य सचिव , नियोजन विभाग, मंत्रालय , मुंबई
९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव सर्व मंत्रालयीन विभाग .
१०. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (पत्राने)
११. महासंचालक,युआयडी प्रादेशिक कार्यालय, सातवा मजला, एमटीएनएल बिल्डिंग, जी. डी. सोमानी मार्ग,कफ परेड, मुंबई -४०० ००५
१२. विभागीय आयुक्त, सर्व.
१३. जिल्हाधिकारी, सर्व
१४. व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक (सर्व)
१५. जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
१६. महाव्यवस्थापक, राज्य स्तरीय बँकर्स समिती, बँक ऑफ महाराष्ट्र, केंद्रीय कार्यालय,लोकमंगल, १५०१, शिवाजीनगर, पुणे ०५.
१७. उप सचिव , नियोजन विभाग, (का. १४१७), मंत्रालय, मुंबई
१८. सह सचिव /उप सचिव / अवर सचिव, नियोजन विभाग , मंत्रालय , मुंबई
१९. निवडनस्ती, कार्यासन १४१७.

## परिशिष्ट अ

शासनाच्या विविध विभागामार्फत लाभार्थ्यांना वाटप करण्यात येणाऱ्या साधनसामुग्रीची यादी :-

१. जनावरांचे खादयवाटप
२. विजेवर चालणारे वैरण कापणी यंत्र / कडपा कटटी यंत्र
३. मासेमारीकरिता प्रगत यंत्रसामुग्री पुरविणे
४. कृषि औजारे पुरविणे
५. मायक्रो ट्रॅक्टर व त्याची उपसाधने
६. बियाणे लघु हत्यारे वितरण
७. मधपेटया यंत्र वाटप
८. गणवेश / साडी वाटप
९. सायकल वाटप
१०. पावर टिलर पुरविणे
११. गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल पुरविणे
१२. स्वयंपाकाचा गॅस व सौरकुकर
१३. सामुहिक विवाहाप्रसंगी वस्तु देणे.
१४. महिला बचत गटांना मोबाईल व्हॅन पुरविणे
१५. बियाणे पुरवठा / वाटप
१६. पिक संरक्षण उपकरणे
१७. कामगंध सापळे
१८. किटक नाशके
१९. पाईपलाईन
२०. ताडपत्री
२१. लघुअंडी उबविणारी यंत्रे
२२. मुरघास तयार करण्याची युनीट
२३. मासेमारी साधने
२४. कुक्कूटपालनाची शेड
२५. शेळया बकऱ्यांसाठी शेड
२६. कृषी पंप
२७. वीज पंप
२८. ऑईल इंजीन
२९. यांत्रिकीकरण संबंधी साहित्यपुरवठा
३०. पाठयपुस्तके
३१. गाईडस
३२. पिठाची गिरणी
३३. शिलाई मशीन
३४. चष्मा
३५. विद्यार्थ्यांना टॅब / लॅपटॉप वाटप
३६. मोबाईल फोन वाटप
३७. छत्री / रेनकोट
३८. कांडप यंत्र

३९. अपंग व्यक्तींना देण्यात येणारे साहित्य (श्रवण यंत्र / तीनचाकी सायकल / काठी इ.)
४०. पिको फॉल मशिन
४१. शाळेचे दप्तर (School Bag)
४२. पादत्राणे (Shoes)
४३. रोटाव्हेटर
४४. HDPE Pipe

## परिशिष्ट क्र. १२.३

जिल्हा परिषदांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या फलश्रुतीचे मूल्यमापन.

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय, क्रमांक पंरास-१०८९/६४६/२६६/३४,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २१ जुलै, १९८९.

(१) परिपत्रक क्रमांक पंरास-१०७८/प्र. [illegible]/२२, दिनांक २३ सप्टेंबर १९८०.

२) शासन पत्र क्र. पंरास-१०८८/६४६/३४, दिनांक १५ जून १९८८.

३) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्रमांक पंरास-१०८९/६४६/२६६/३४, दिनांक २८ जून १९८९.

४) शासन शुद्धिपत्रक, ग्राम विकास विभाग, क्रमांक पंरास-१०८९/६४६/२६६/३४ दिनांक १२ जुलै १९८९.

[illegible] ग्रामीण विकासाच्या दृष्टीने जिल्हा परिषदांमार्फत वेगवेगळे कार्यक्रम/योजना [illegible] येतात. सदर योजनांची फलश्रुती पाहण्यासाठी क्रमांक पंरास-१०७८/प्र. [illegible]/२२, दिनांक २३ सप्टेंबर १९८० च्या शासन परिपत्रकान्वये जिल्हा परिषदांनी व त्यांच्या [illegible] व विषय समित्यांनी कोणत्या विभागाचे अधिकारी व कर्मचारीवर्ग यांच्या सहाय्याने [illegible] व नवीन कार्यक्रमाचा आढावा घेऊन मूल्यमापन करण्याबाबतचे शासन आदेश देण्यात [illegible]. त्यानंतर दिनांक १५ जून १९८८ चे पत्र क्रमांक पंरास-१०८८/६४६/२६६/३४, [illegible] सचिव, जिल्हा नियोजन व विकास मंडळ यांना [illegible] नियोजन [illegible] [illegible] कळविले होते. परंतु या दोन्ही निर्णयांमध्ये काहीशी विसंगती असल्याने शासनाचे [illegible] आले असल्यामुळे मूल्यमापन नेमक्या कोणत्या यंत्रणेमार्फत करावे हा प्रश्न काही [illegible] शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय.—जिल्हा परिषदांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या फलश्रुतीचे मूल्यमापन [illegible] व परिणामकारक होण्यासाठी वर नमूद केलेले दिनांक २३ सप्टेंबर १९८० चे [illegible], दिनांक १५ जून १९८८ चे पत्र व दिनांक २८ जून १९८९ चा शासन निर्णय [illegible] दिनांक १२ जुलै १९८९ चे शुद्धिपत्रक रद्द करून शासन असे आदेश देत आहे की, [illegible] परिषदांमार्फत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचे मूल्यमापन तीन स्तरांवर करण्यात [illegible] अंतर्गत मूल्यमापन हे कामास जबाबदार असलेल्या खाते प्रमुखांकडून दरवर्षी आर्थिक [illegible] संपल्यानंतर [illegible] करण्यात यावे. या मूल्यमापन अहवालाच्या प्रती [illegible] मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा परिषदेचे संबंधीत विषय [illegible] दुसऱ्या स्तरावरील [illegible] तसेच [illegible]

अभियंता, [illegible] यांनी [illegible] जिल्ह्याचे [illegible] [illegible] आणि यांनी [illegible] विकास [illegible] मूल्यमापन करावे. [illegible] योजनांचे मूल्यमापन हे दरवर्षी [illegible] मध्ये करावे. [illegible] फलश्रुतीबाबत [illegible] संबंधीत विभाग प्रमुखांच्या [illegible] वरिष्ठ अधिकाऱ्यांना (उदाः मुख्य अभियंता, [illegible] पशुसंवर्धन [illegible]) [illegible] मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा परिषदेचे अध्यक्ष यांना ३१ जुलै पर्यंत सादर करावेत. [illegible] विभाग अधिकाऱ्यांशी संबंधित नसलेल्या कामांचे मूल्यमापन [illegible] [illegible] केलेल्या मूल्यमापनाच्या फलश्रुतीच्या अहवालाची प्रत [illegible] विकास विभाग यांना पाठवावी.

२. वरील आदेशाचे अंमलबजावणी काटेकोरपणे पालन करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[illegible],
सह-सचिव,
महाराष्ट्र शासन

# परिशिष्ट "ब"

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

# परिशिष्ट ‘ ब ’

# समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**मंगळवार, दिनांक २९ सप्टेंबर २०१५**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, नागपूर**

**उपस्थिती**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख.
२. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
३. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
४. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
५. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
६. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
७. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
८. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
९. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१०. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
११. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१२. श्री. अमित झनक, वि.स.स.
१३. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)
श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**स्थानिक लोकप्रतिनिधी / पदाधिकारी**

१) श्री. सुनील केदार, वि.स.स.
२) श्री. नागो गाणार, वि.प.स.
३) श्रीमती निशा सावरकर, अध्यक्ष, जि. प. नागपूर
४) श्री. शरद डोणेकर, उपाध्यक्ष, जि. प. नागपूर
५) श्री. दीपक गेडाम, सभापती, समाज कल्याण समिती
६) श्रीमती पुष्पा वाघाडे, सभापती, महिला व बाल कल्याण, जि. प., नागपूर
७) श्रीमती आशा गायकवाड, सभापती, कृषी व पशुसंवर्धन, जि. प., नागपूर
८) श्री. जयकुमार वर्मा, सदस्य, जि. प., नागपूर
९) श्रीमती शालुताई मेंढुले, सभापती पं. स.,उमरेड
१०) श्रीमती नम्रता राऊत, सभापती, पं. स., नागपूर
११) श्री. संदीप सरोदे, सभापती, पं. स., काटोल
१२) श्रीमती रेखाताई कळसकर, सभापती
१३) श्री. राजेश कडू,सभापती, पं. स., पारशिवनी
१४) श्री. राजेंद्र हटणे, सभापती, पं. स.,नरखेड
१५) श्री. मनोज कोठे, सभापती, पं. स., मौदा

**संचालक, स्थानिक निधी लेखा**

श्री. बी. व्यं. तांबडे, संचालक

**ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय**

१) श्री. शिंदे, सह सचिव

२) श्री. साळुंके, कक्ष अधिकारी

**विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर**

डॉ. कमलकिशोर फुटाणे, प्रभारी उपायुक्त (आस्थापना)

**जिल्हा परिषद नागपूर**

श्री. शिवाजी जोंधळे, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. विवेक बोंदरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)

श्री. अरूण निंबाळकर, प्र.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

श्री. गणेश चौधरी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छता मिशन)

श्री. पी. डी. थोरात, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)

श्री. विजय कोल्हे, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी

श्रीमती निता ठाकरे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

श्री. सुरेश गिरी, कार्यकारी अभियंता (लघुसिंचन)

श्री. संतोष गव्हाणकर, कार्यकारी अभियंता (ग्रापापु)

डॉ. योगेंद्र सवाई, जिल्हा आरोग्य अधिकारी

डॉ. बी. ए. वाणी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

श्री. अनिल कोल्हे, प्र. शिक्षण अधिकारी (प्राथमिक)

श्री. मनोहर बारस्कल, शिक्षण अधिकारी (माध्यमिक)

श्री. एस. बी. मोहरील, कृषी विकास अधिकारी

श्री. सिद्धार्थ गायकवाड, समाज कल्याण अधिकारी

श्री. आर. डी. बागडे, गट विकास अधिकारी, नागपूर

श्री. ए. एस. निंबाळकर, प्रभारी गट विकास अधिकारी, कामटी

श्री. एम. बी. जुवारे, गट विकास अधिकारी, हिंगणा

श्री. दिलीप भगत, गट विकास अधिकारी, कळमेश्वर

श्रीमती माणिक हिमाने, गट विकास अधिकारी, सावनेर

श्री. ए. एल. खाडे, गट विकास अधिकारी, काटोल

श्री. एस. झेड. बुलकुंडे, गट विकास अधिकारी, नरखेड

श्री. बी. बी. जाधव, गट विकास अधिकारी, पारशिवनी

श्री. एन. पी. वानखेडे, गट विकास अधिकारी, रामटेक

श्री. सी. व्ही. आदमने, गट विकास अधिकारी, मौदा

श्री. बी. एच. भरक्षे, गट विकास अधिकारी, कुही

श्री. दयाराम राठोड, गट विकास अधिकारी, उमरेड

श्री. एम. डी. बारापात्रे, गट विकास अधिकारी, भिवापूर

श्री. प्रशांत पागृत, तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम)

श्री. सुरेंद्र पवार, तत्कालीन समाजकल्याण अधिकारी

श्री. बी. एम. सांगोडे, तत्कालीन कार्यकारी अभियंता

श्री. अ. श. गाडेगोणे, तत्कालीन कार्यकारी अभियंता ( बांधकाम)

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २००८-२००९ व २०११-१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील नागपूर जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक ३० सप्टेंबर, २०१५**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, नागपूर**

**उपस्थिती :**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.तथा समिती प्रमुख.
२. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
३. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
४. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
५. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
६. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
७. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
८. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
९. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१०. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
११. ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.
१२. श्री. अमित झनक, वि.स.स.
१३. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव,
श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती),
श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी.

**संचालक, स्थानिक निधी लेखा :**

श्री. बी. व्यं. तांबडे, संचालक.

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय :**

श्री. शिंदे, सह सचिव
श्री. साळुंके, कक्ष अधिकारी.

**विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर :**

डॉ. कमलकिशोर फुटाणे, प्रभारी उपायुक्त (आस्थापना).

**जिल्हा परिषद, नागपूर :**

श्री. शिवाजी जोंधळे, मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री. विवेक बोंदरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य),
श्री. अरूण निंबाळकर, प्र.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
श्री. गणेश चौधरी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छता मिशन),
श्री. पी. डी. थोरात, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण),

श्री. विजय कोल्हे, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी

श्रीमती निता ठाकरे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

श्री. सुरेश गिरी, कार्यकारी अभियंता (लघुसिंचन)

श्री. संतोष गव्हाणकर, कार्यकारी अभियंता (ग्रापापु)

डॉ. योगेंद्र सवाई, जिल्हा आरोग्य अधिकारी

डॉ. बी. ए. वाणी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

श्री. अनिल कोल्हे, प्र. शिक्षण अधिकारी (प्राथमिक)

श्री. मनोहर बारस्कल, शिक्षण अधिकारी (माध्यमिक)

श्री. एस. बी. मोहरील, कृषी विकास अधिकारी

श्री. सिद्धार्थ गायकवाड, समाजकल्याण अधिकारी

श्री. आर. डी. बागडे, गट विकास अधिकारी, नागपूर

श्री. ए. एस. निंबाळकर, प्रभारी गट विकास अधिकारी, कामटी

श्री. एम. बी. जुवारे, गट विकास अधिकारी, हिंगणा

श्री. दिलीप भगत, गट विकास अधिकारी, कळमेश्वर

श्रीमती माणिक हिमाने, गट विकास अधिकारी, सावनेर

श्री. ए. एल. खाडे, गट विकास अधिकारी, काटोल

श्री. एस. झेड. बुलकुंडे, गट विकास अधिकारी, नरखेड

श्री. बी. बी. जाधव, गट विकास अधिकारी, पारशिवनी

श्री. एन. पी. वानखेडे, गट विकास अधिकारी, रामटेक

श्री. सी. व्ही. आदमने, गट विकास अधिकारी, मौदा

श्री. बी. एच. भरक्षे, गट विकास अधिकारी, कुही

श्री. दयाराम राठोड, गट विकास अधिकारी, उमरेड

श्री. एम. डी. बारापात्रे, गट विकास अधिकारी, भिवापूर

श्री. प्रशांत पागृत, तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम)

श्री. सुरेंद्र पवार, तत्कालीन समाजकल्याण अधिकारी

श्री. बी. एम. सांगोडे, तत्कालीन कार्यकारी अभियंता

श्री. अ. श. गाडेगोणे, तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम).

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबधित अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांची सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक २ संदर्भात नागपूर जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक १ ऑक्टोबर, २०१५**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, नागपूर**

**उपस्थिती :**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.तथा समिती प्रमुख.
२. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
३. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
४. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
५. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
६. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
७. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
८. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
९. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१०. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
११. श्री. अमित झनक, वि.स.स.
१२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव,
श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती),
श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी.

**संचालक, स्थानिक निधी लेखा :**

श्री. बी.व्यं. तांबडे, संचालक

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय :**

श्री. शिंदे, सह सचिव
श्री. साळुंके, कक्ष अधिकारी

**विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर**

डॉ. कमलकिशोर फुटाणे, प्रभारी उपायुक्त (आस्थापना)

**जिल्हा परिषद नागपूर :**

श्री. शिवाजी जोंधळे, मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री. विवेक बोंदरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)
श्री. अरूण निंबाळकर, प्र. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
श्री. गणेश चौधरी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छता मिशन)
श्री. पी. डी. थोरात, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण)

श्री. विजय कोल्हे, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी

श्रीमती निता ठाकरे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

श्री. सुरेश गिरी, कार्यकारी अभियंता (लघुसिंचन)

श्री. संतोष गव्हाणकर, कार्यकारी अभियंता (ग्रापापु)

डॉ. योगेंद्र सवाई, जिल्हा आरोग्य अधिकारी

डॉ. बी.ए. वाणी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

श्री. अनिल कोल्हे. प्र. शिक्षण अधिकारी (प्राथमिक)

श्री. मनोहर बारस्कल, शिक्षण अधिकारी (माध्यमिक)

श्री. एस.बी. मोहरील, कृषी विकास अधिकारी

श्री. सिद्धार्थ गायकवाड, समाजकल्याण अधिकारी

श्री. आर.डी. बागडे, गट विकास अधिकारी, नागपूर

श्री. ए. एस. निंबाळकर, प्रभारी गट विकास अधिकारी, कामटी

श्री. एम. बी. जुवारे, गट विकास अधिकारी, हिंगणा

श्री. दिलीप भगत, गट विकास अधिकारी, कळमेश्वर

श्रीमती माणिक हिमाने, गट विकास अधिकारी, सावनेर

श्री. ए. एल. खाडे, गट विकास अधिकारी, काटोल

श्री. एस. झेड. बुलकुंडे, गट विकास अधिकारी, नरखेड

श्री. बी. बी. जाधव, गट विकास अधिकारी, पारशिवनी

श्री. एन. पी. वानखेडे, गट विकास अधिकारी, रामटेक

श्री. सी. व्ही. आदमने, गट विकास अधिकारी, मौदा

श्री. बी. एच. भरक्षे, गट विकास अधिकारी, कुही

श्री. दयाराम राठोड, गट विकास अधिकारी, उमरेड

श्री. एम. डी. बारापात्रे, गट विकास अधिकारी, भिवापूर

श्री. प्रशांत पागृत, तत्कालीन कार्यकारी अभियंता ( बांधकाम )

श्री. सुरेंद्र पवार, तत्कालीन समाजकल्याण अधिकारी

श्री. बी. एम. सांगोडे, तत्कालीन कार्यकारी अभियंता

श्री. अ. श. गाडेगोणे, तत्कालीन कार्यकारी अभियंता ( बांधकाम).

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील नागपूर जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

(शा.म.मु.) एचबी ३३२५-२१ (४५०–३-२०१८)

**मंगळवार, दिनांक १० ऑक्टोबर, २०१७**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१. श्री. सुधीर पारवे, वि.स.स.तथा समिती प्रमुख.
२. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
३. श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
४. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
५. डॉ. देवराव होळी, वि.स.स.
६. श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
७. श्री. किशोर पाटील, वि.स.स.
८. श्री. तुकाराम काते, वि.स.स.
९. प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
१०. श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
११. श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.
१२. श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
१३. श्री. तानाजी सावंत, वि.प.स.
१४. श्री. विक्रम काळे, वि.प.स.
१५. श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**विभागीय सचिव**

श्री. श्यामलाल गोयल, अतिरिक्त मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग,
श्री. विजय कुमार, प्रधान सचिव, कृषी व पणन विभाग,
श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग,
श्री. वि. रा. नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग),
श्री. दिनेश वाघमारे, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
श्री. विकास देशमुख, सचिव, पशुसंवर्धन व दुग्धविकास विभाग,
डॉ. सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,

श्री. र. प्र. आटे, सह सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

श्री. र. अ. नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री. ना. भा. रिंगणे, उप सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री. सुग्रिम धपाटे, उप सचिव, कृषी विभाग,

श्री. कमलाकर फंड, आयुक्त, आय.सी.डी.एस., मुंबई,

**जिल्हा परिषद, नागपूर**

डॉ. कादम्बरी बलकवडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर

श्री. सी. आर. गजभिये, मुख्य अभियंता तथा विशेष कार्यकारी अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, अमरावती

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २०११-२०१२ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अतिरिक्त मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, कृषी व पणन विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्राम विकास विभाग), सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सचिव, पशुसंवर्धन व दुग्धविकास विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, उप सचिव, कृषी विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, आयुक्त, आय.सी.डी.एस., मुंबई, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१. श्री. सुधीर पारवे, वि.स.स.तथा समिती प्रमुख.
२. श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
३. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
४. श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
५. श्री. भारत भालके, वि.स.स.
६. प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
७. श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
८. श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
९. श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**विभागीय सचिव**

श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग,
श्री. वि. रा. नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग),
श्रीमती विनिता वेद सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग,
डॉ.सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
श्री. र. प्र. आटे, सह सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
श्री. र. अ. नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग,
श्री. ना. भा. रिंगणे, उप सचिव, ग्रामविकास विभाग,
श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग,

**नागपूर जिल्हा परिषद**

डॉ.कादम्बरी बलकवडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २०११-२०१२ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात नागपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग), सचिव, महिला व बालविकास विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांची उर्वरित साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक २२ मार्च, २०१८**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**

१. श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२. श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
३. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
४. ॲड. राहुल कुल, वि.स.स.
५. डॉ. देवराव होळी, वि.स.स.
६. श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
८. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

**विशेष निमंत्रित सदस्य :**

९. श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
१०. श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत दहाव्या व अकराव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करून ते किरकोळ सुधारणांसह संमत केले.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई